# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## इतिहास अभ्यासपत्रिका क्र. - IV

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

# (इ.स.१००० ते इ.स.१५२६)

## पेपर कोड - 97017

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.



**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास व प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. जितेंद्र भामरे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कोकण ज्ञानपीठ कर्जत महाविद्यालय, कर्जत, जि. रायगड.

**लेखक** : **डॉ. भानुदास डी. शिंदे**
इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा फुले कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड.

: **डॉ. कृष्णा गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
एल. जे. एन. जे. महाविद्यालय, विलेपार्ले (पूर्व), मुंबई.



**ऑगस्ट २०२२, प्रथम मुद्रण**

**प्रकाशक**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय, सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | तुर्की आक्रमणे | १ |
| २. | सुलतानशाही (गुलाम घराणे) | १९ |
| ३. | सुलतानशाही (खिलजी घराणे) | ३७ |
| ४. | सुलतानशाही (तुघलक, सैय्यद व लोदी घराणे) | ४९ |
| ५. | दिल्ली सल्तनतकालीन प्रशासन | ६३ |
| ६. | विजयनगर व बहामनी साम्राज्य | ७९ |
| ७. | सल्तनतकालीन सामाजिक व आर्थिक जीवन | १०२ |
| ८. | दिल्ली सुलतानशाही काळातील सांस्कृतिक जीवन | १२४ |


*****

# T.Y.B.A. History

## SEMESTER -V

## Core Course IV- History of Medieval India (1000 CE-1526CE)

Objectives:

1. To acquaint the students with the history of early Medieval India that laid the foundation of the Sultanate in India.
2. To study the contribution of Vijayanagar and Bahamani kingdoms to Medieval Indian History.
3. To examine the administrative, socio-economic and cultural aspects of Medieval India.

**Module I: Foundation, Expansion and Decline of Delhi Sultanate**

(a) Socio-economic and political conditions on the eve of the Turkish Invasion
(b) Rise and Decline of Slave dynasty, Khilji Dynasty
(c) Tughlaq, Sayyid and Lodi Dynasty

**Module II: Administrative Structure of the Sultanate**

(a) Central Administration and Iqta system
(b) Administrative and Military Reforms of Ala-ud-din Khilji
(c) Reforms of Firozshah Tughlaq and Mohammed bin Tughlaq

**Module III: Emergence of Vijaynagar and Bahamani Kingdoms**

(a) Rise, Growth and Decline of Vijaynagar and Bahamani Kingdoms
(b) Administration, Socio-Economic and Cultural conditions of Vijayanagar Empire
(c) Administration, Socio-Economic and Cultural conditions of Bahamani Kingdom

**Module IV: Society, Economy, Religion and Culture of Delhi Sultanate**

(a) Socio-economic and religious life
(b) Education and Literature
(c) Art and Architecture

**References:**

Banerjee A. C. *New History of Medieval India*, S. Chand & Company, New Delhi, 1990.
Bhattacharya N. N., *Medieval Bhakti Movement in India,* South Asia Books, Columbai, 1990.
Burton Stein, *New Cambridge History of India: Vijayanagara*, Cambridge University Press,New Delhi, 1993.
Burton, Stein: *Peasant State and Society in Medieval South India*; Oxford Paperback, New Delhi 1980.
Chitanis K. N., *Socio-Economic History of Medieval India*, Atlantic Publishers & Distributors, New Delhi 1990.
Iswari Prasad, *History of Medieval India*, The Indian Press Ltd, Allahabad, 1952.
Lane Pool, Stanley, *Life and Culture in Medieval India*, Kamal Prakashan, Indore, 1978.
Mahajan V.D., *History of Medieval India*, S. Chand & Company, New Delhi, 1992.
Mahalingam T. V., *Administration and Social Life under Vijaynagar*; University of Madras, 1975.
Pande A. B., *Society and Government in Medieval India*, Central Book Depot, Allahabad, 1965.
Pande, Susmita, Birth of Bhakti in Indian Religion and Art, Books & Books, New Delhi, 1982.
Qureshi I. H., *the Administration of Sultanate of Delhi*, (IInd ed.), The Hague,Karachi, 1958.
Ranade A. K., *Socio-Economic Life of Maharashtra between 1100-1600 A.D.*, Serials Publication, New Delhi, 2009.
Rizvi S.A.A., *A History of Sufism in India*, Vol. I., Munshiram Manoharlal, New Delhi,1978.
Shrivastava A.L., *The Sultanate of Delhi (711 A.D – 1526)*, 5th ed, Shiv Lal Agrawala, Agra, 1966.
Shrivastava M.P., *Society and Culture in Medieval India (1206 A.D. 17007 A. D.*, Chugh Publishers, Allahabad, 1975.
Singh Upinder, *A History of Ancient and Early Medieval India*: From the Stone Age to the 12 th Century, Pearson Longman, New Delhi, 2009.
Sreenivasa Murty H.V., Ramkrishna R. *History of Karnataka*, S. Chand & Company, New Delhi, 1992.

**Marathi Books**

Acharya Dhananjay, *Madhyakalin Bharat (1000-1707)* Shri Sainath Prakashan, Nagpur, 2008.
Chaubal J.S., *Ase Hote Mughal*, Maharashtra Rajya Sahity Sanskruti Mandal Mumbai, 1992.
Kathare Anil, *Madhyayugin Bharat*-1000 -1707, Prashant Publication, Jalgaon, 2013.
Kolarkar S.G., *Madhyakalin Bharat (2106-1707),* Mangesh Prakashan, Nagpur, 1992.
Mate M. S. *Madhyayugin Maharashtra- Samajik Aani Sanskritik Jivan(1300-1650*), Maharashtra Rajya Sahitya Aani Sanskriti Mandal, Mumbai, 2002.
Sakshena B.P., *Dilli va Shahajahancha Itihas* ( Kunde B.G. Bhashantarit),1989.
Sardesai G. S., *Marathi Riyasat*, Popular Prakashan, Mumbai, 2012.

Sardesai G. S., *Musalmani Riyasat*, Bhag 1  Ani  2, Popular Prakashan, Mumbai 1993.
Sarkar Jadunath, *Mughal Samrajyacha Rhas*,Bhag 3,Maharashtra Rajya Sanskritik Mandal, Mumbai, 1982.

# १

# तुर्की आक्रमणे

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ तुर्की आक्रमणा वेळी परिस्थिती

१.२.१ राजकीय परिस्थिती

१) सिंध मुलतान प्रांत

२) पंजाब मधील शाही घराणे

३) काश्मिर राज्य

४) काश्मिर राज्य

५) बंगालमधील पाल राज्य

६) चालुक्य चंदेल, परमार राज्य

७) दक्षिण भारतातील राजकीय सत्ता

१.२.२ सामाजिक परिस्थिती

१.२.३ आर्थिक परिस्थिती

१.२.४ धार्मिक परिस्थिती

१.३ महंमद गझनीचे आक्रमण

१.३.१ महंमद गझनीच्या आक्रमणाची कारणे

१) संपत्ती प्राप्त करणे.

२) हत्तीदल प्राप्त करणे.

३) साम्राज्य विस्तार करणे.

४) मुस्लिम धर्माचा प्रसार करणे.

५) खालिफाचा आदेश.

१.३.२ महंमद गजनीच्या स्वाऱ्या

१) सीमा प्रदेशावरील हल्ला

२) पंजाबचा राजा जयपालशी युध्द

३) भेरावर विजय

४) मुलतानवर स्वारी

५) भाटियावर आक्रमण

६) उदभांडची लढाई

७) नारायणपूरवर स्वारी

८) मुलतानवर स्वारी
९) त्रिलोचनपालवर स्वारी
१०) गणेस्वरवर आक्रमण
११) काश्मिरवर स्वारी
१२) मथुराव कनोजवर स्वारी
१३) कालिंजरवर स्वारी
१४) पंजाबवर स्वारी
१५) ग्वाल्हेर व कालिंजरवर स्वारी
१६) सोरटी सोमनाथ स्वारी
१७) जाट, खोकारा टोळ्यांवर आक्रमण
१.३.३ महंमद गझनीच्या विजयाची कारणे
१) महंमद गझनी उत्कृष्ट सेनापती
२) प्रभावी घोडदळ
३) युध्द साहित्यातील तफावत
४) भारतयी राजांचा ऐक्याचा अभाव
५) हिंदुराजे पराभवाने खचले
६) श्रेष्ठत्वाचा अहंकार
१.३.४ महंमद गझनीच्या आक्रमणाचे परिणाम
१.४ महंमद घोरीचे आक्रमण
१.४.१ महंमद घोरीच्या आक्रमाणाची कारणे
१) गजनीचे साम्राज्य व वारसदार नष्ट करणे.
२) आत्मगौरवशाली भावना.
३) धर्म प्रसार करणे.
४) साम्राज्य विस्तार करणे.
५) संपत्ती तयार करणे.
६) मुस्लिम राज्याची स्थापना करणे.
१.४.२ महंमद घोरीचे आक्रमणे
१) मुलतानवर स्वारी
२) सिंध प्रांतावर स्वारी
३) गुजराथवर स्वारी
४) पेशावर आक्रमण
५) लाहोरवर आक्रमण
७) कनोजवर आक्रमण
८) बयाना व ग्वाल्हेरवर स्वारी

६) पृथ्वीराज चौहानशी संघर्ष
१.४.३ महंमद घोरीच्या विजयाची कारणे
१) सार्वभौम सत्तेचा अभाव
२) जहागिरदार पध्दत
३) परस्परातील द्वेष व स्पर्धा
४) राजनिती व मुत्सुद्देगिरीचा अभाव
५) कमकुवत परराष्ट्रीय धोरण
६) परकीय आक्रमणाची सत्ता केंद्र
७) परकीय व्यापाऱ्याचे आगमन
८) युध्दाचे कर्तव्य फक्त रजपूतांकडे
९) जातीयवादी भावना
१०) समाजातील उदासिनता व अंधश्रध्दा
११) सुखी-विलासी जीवन
१२) आर्थिक कारणे
१३) धार्मिक कारण
१४) जूने युध्दतंत्र
१५) युध्द योजनेचा अभाव
१६) उत्तम व अनुभवी सेनापती अभाव
१७) पायदलांची रचना व भरती दोषपूर्ण
१.५ सारांश
१.६ प्रश्न
१.७ संदर्भ

## १.० उद्दिष्टे

१) तुर्की आक्रमणावेळच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) महंमद गजनीच्या स्वाऱ्यांचा आढावा घेणे.

३) महंमद घोरीने भारतात सत्ता कशी स्थापना केली याची माहिती मिळवणे.

## १.१ प्रस्तावना

७ व्या शतकानंतर उत्तर भारतात अनेक छोटी मोठी रजपूत घराणे निर्माण झाली. एकमेकातील सत्ता-संघर्षामुळे ती राजकीय दृष्ट्या दुबळी बनली. या संधीचा फायदा घेऊन अरबांनी ७१२ ते ८६० या काळात सत्ता स्थापन केली. त्यानंतरच्या कालखंडामध्ये तुर्कीनी साम्राजय विस्ताराच्या हेतूने हिंदुस्थानवर आक्रमण करण्यास सुरूवात केली. तुर्की राजवंशाच्या लोकांनी म्हणजे महंमद गझनी, महंमद घोरी यांनी हिंदूस्थानवर १००१ पासून

१२०६ पर्यंत आक्रमणे केली. या आक्रमणावेळची भारतातील परिस्थिती ही काही प्रमाणात त्यास जबाबदार होती.

## १.२ तुर्की आक्रमणा वेळी परिस्थिती

### १.२.१ राजकीय परिस्थिती:

तुर्की आक्रमणामध्ये पहिले आक्रमण करणारा महंमद गझनी होय. या वेळी हिंदुस्थानमध्ये छोट्या-मोठ्या अनेक राजकीय सत्ता होत्या. परंतु त्यांच्यात राजकीय जागृती, राजकीय ऐक्य व एक राष्ट्रीयत्व या संदर्भात जागृतीचा अभाव होता. रजपूत राजे एकमेकांच्या बद्दल नेहमी द्वेष, तिरस्कार करत होते. सत्ता संघर्षामध्ये प्रसंगी शत्रू किंवा परकीय सत्ता यांची मदत घेत. एकंदरीत राजकीय विचार संकुचित आणि विचारहीन असलयाने सर्वत्र गोंधळ निर्माण झालेला होता. राज्यकर्ते स्वतःला परमेश्वर समजून चैनी, विलासी, जीवन जगत असत. सर्व राजे स्तुतीप्रिय होते. जमिनीदारांनी जनतेवर किती ही अत्याचार केला तरी, त्याची माहिती राजाला मिळत नसे. कारण अकार्यक्षम गुप्तहेर खाते होते. लष्करामध्ये प्रशिक्षित सैन्याचा अभाव होता. युध्द साहित्य जुन्याच पध्दतीचे म्हणजे भाले, तलवार होते. परकीय आक्रमणाच्या वेळी एकमेकांना मदत करत नसत. एकंदरीत संपूर्ण शासन व्यवस्थेत गोंधळ होता. या सर्व परिस्थितीमुळे आक्रमणाच्या वेळी कोणीही मदत करत नसत. त्यामुळे या देशात तुर्कांची सत्ता स्थापन झाली. तुर्की सत्तेच्या स्थापनेवेळी उत्तर भारतात विविध राजकीय घराणी होती.

१) **सिंध आणि मुलतान प्रांत:** महंमद-बिन-कासीम याने इ.स. ७१२ मध्ये राजकीय सत्ता सिंध प्रांतामध्ये स्थापन केली. ही सत्ता अरबांची होती. तुर्की आक्रमणाच्या वेळी शिया पंथीय मुसलमानांची सत्ता होती. त्यांनी तुर्की मुसलमानांशी हातमिळविणी करून आक्रमणाच्या वेळी मदत केली. महंमद गझनी व महमद घोरीयांनी प्रदेशातून हिंदूस्थानमध्ये प्रवेश केला.

२) **पंजाब मधील शाही घराणे:** तुर्की आक्रमणाच्या हिंदुकुश पर्वतापासून ते चिनाब नदीपर्यंत पंजाबच्या शाही घराण्याची सत्ता होती. महंमद गझनीने आक्रमण केले, त्यावेळी जयपाल हा राजा होता. त्याने गझनी बरोबर संघर्ष केला पण पराभव झाला.

३) **काश्मिर राज्य:** महमद गझनीच्या आक्रमणाच्या वेळी हिंदू राणी दिद्दी हिची राजवट होती. सर्व शासन व्यवस्था भ्रष्ट्राचाराने पोखरलेली होती. त्यामुळे सर्वत्र गोंधळ माजला. याचा गझनीने फायदा घेतला. हिंदुस्थानवर स्वारी केली. कनोजमध्ये प्रतिहार वंशाच्या राजपाल हा राजा राज्य करीत होता. तो कर्तव्य शून्य असल्याने तुर्कांच्या समोर त्याचा टिकाव लागलेला नाही. घोरीच्या आक्रमणाच्या वेळी कनोजवर गढरवार राठोड याने सत्ता स्थापन केलेली होती. त्याचाच वारसदार जयचंद्र राठोड राज्य करत होता. त्याची मुलगी संयोगिता हिला पृथ्वीराज चौहान याने पळवून नेऊन तिच्याशी लग्न केले. या कारणावरून चौहान घराण्याबरोबर त्याचे शत्रुत्व होते. पृथ्वीराजचा पराभव करण्यासाठी जयचंद राठोडने महंमद घोरीला हिंदूस्थानवर आक्रमण करण्याचे निमंत्रण दिले.

४) **बंगालमधील पाल राज्य:** बंगालमध्ये पाल वंशाचा महिपाल राजा राज्य करत होता. भौगोलिक दृष्ट्या सुरक्षित असल्याने गझनी आणि घोरी यांनी त्याकडे लक्ष दिले नाही.

गझनीच्या आक्रमणाच्या वेळी विजयशेर हा राजा असून तो अतिशय कर्तबगार होता. त्याची कर्तबगारी आणि भौगोलिक प्रदेश यामुळे घोरांनी या प्रदेशाकडे लक्ष दिले नाही.

५) **चालुक्य चंदेल, परमार राज्य:** गुजरातमध्ये चालुक्य, बुदेलखंडात चंदेल आणि माळव्यात परमार यांची सत्ता होती. ते एकमेकांशी सतत संघर्ष करत होते. त्यामुळे दुबळे बनलेले होते. घोरीच्या आक्रमणाच्या वेळी गुजरातमध्ये सोलंकी घराण्याची सत्ता होती. भिमदेव दुसरा हा अकार्यक्षम राजा असल्याने या घराण्याच्या हासाला प्रारंभ झाला. चंदेल वंशीय राजा विद्याधर हा पराक्रमी होता. परंतु त्याच्या मृत्युनंतर घराणे दुबळे बनले. मदनवर्मन, परमारदेव यांच्या काळात पुन्हा उत्कर्ष प्राप्त झाला. परंतु पृथ्वीराज चौहानने त्यांचा पराभव करून, त्यांचा प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडून घेतला.

६) **दक्षिण भारतातील राकीय सत्ता:** चोल, चालुक्य या घराण्याची प्रभावी राजवट होती. परंतु चालुक्य राजा तैलप व चौल राजा राजराज व राजेंद्र यांच्यात सत्ता संघर्ष मोठ्या प्रमाणात झाला. यांचा फायदा गझनीला मिळाला. चोल आणि चालुक्य याच्या हासानंतर देवगिरीचे यादव, वारंगळचे काकतीय, द्वारसमुद्राचे होयसळ, मदुरेचे पांडेय, केरळचे-चेर घराण्याचा उदय झाला.

### १.२.२ सामाजिक परिस्थिती:

तुर्की आक्रमणाच्या वेळी हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थिती विषम होती. समाजात चार्तुवर्ण व्यवस्था अस्तित्वात असून, रोटी-बेटीचे व्यवहार अतिशय कडक, कठोर पळले जात असत. समाजामध्ये हिंदू-मुसलमान असे दोन गट होते. प्रत्येक गट किंवा धर्म स्वतःला श्रेष्ठ समजत असे. त्यामुळे सामाजिक ऐक्याचा अभाव होता. समाज अतिशय मागासलेला असून बालविवाह, बालहत्या, सतीप्रथा सुरु होत्या. चार्तुवर्ण व्यवस्थेमुळे समाजाची चार भागात विभागणी करून, त्यांचे कार्य क्षेत्र निश्चित केले होते. परिणामी सर्व समाजाचे आंतरबाह्य संरक्षण करणे, परकीय आक्रमण विरूध्द आक्रमण करणे ही जबाबदारी केवळ क्षत्रियांचीच आहे. अशी समाजाची श्रध्दा होती. त्यामुळे तुर्की आक्रमणाच्या वेळी सर्व समाज एकत्र लढला नाही. समाजामध्ये बौध्द धर्म, जैन धर्म असून त्यांनी अहिंसेचे तत्व पाळल्याने कधी युध्दात सहभागी झाले नाहीत. एकदंरीत सामाजिक परिस्थिती एकसंघ नसल्याचा फायदा घेऊन तुर्कानी भारतावर आक्रमण केले.

### १.२.३ आर्थिक परिस्थिती:

महमद गझनीच्या आक्रमणावेळी भारताची आर्थिक परिस्थिती चांगली होती. कारण उद्योगधंदे परदेशी व्यापार मोठ्या प्रमाणात चालत. त्यामुळे परदेशातील संपत्तीचा ओघ हिंदूस्थानमध्ये येत होता. संपत्ती मिळविण्याच्या हेतूनेच महंमद गझनीने व त्यानंतर आलेला महंमद घोरी या दोघांनी ही आक्रमणे केले. भारतात उद्योग, व्यवसाय याची मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली होती. परंतु शेती व्यवसायात फारशी प्रगती झालेली नव्हती.

भारतातील शेती निसर्गावर अवलंबून असल्याने, कधी ओला तर कधी सुका दुष्काळ पडत असे. त्याचप्रमाणे जुन्या पध्दतीच्या बी-बियाणे, अवजारे, मशागत पध्दत होती. राज्यकर्त्यांनी शेती विकासासाठी कोणत्याही प्रकारच्या सोई सवलती दिल्या नाहीत. उदा. पाणी पुरवठा, आर्थिक मदत, कर्जपुरवठा, बी-बियाणे इ. स्वरूपात सरकारने मदत केली नाही. त्यामुळे शेतातील उत्पादनमोठ्या प्रमाणात मिळू शकले नाही. परिणामी शेतकरी, मजूर, कारागीर यांची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची व दुःखाची होती. तुर्कीनी संपत्ती मिळविण्याच्या हेतूने आक्रमण केले. त्याचे सुख दुःख सामान्य जनता, शेतकरी यांना नव्हते. कारण त्याचा रोजचा पोटाचा प्रश्न त्याच्या समोरील असल्याने आक्रमणाच्या वेळी ते अलिप्त राहिले.

### १.२.४ धार्मिक परिस्थिती:

हिंदुस्थानमध्ये हिंदू, बौध्द, जैन हे धर्म असून प्रत्येक धर्माचे पंथ, उपपंथ होते. प्रत्येकजण स्वतःचा पंथ, धर्म श्रेष्ठ आहे असे समजून, त्यांनी सांगितलेले तत्व, अटीनुसार आपले जीवन जगत असे. एक प्रकारे समाजात धर्माचे पुर्णपणे वर्चस्व वाढलेले होते. कोणताही विधि करताना पुरोहिताची मक्तेदारी होती. धार्मिक विधी करताना प्रचंड खर्च होत असल्याने, सामान्य लोकांच्या मनात धर्माबद्दल आस्था, प्रेम उरले नव्हते. धर्माच्या नावाखाली अनेक धार्मिक रीति-रिवाज, रूढी, संकल्पना समाजावर लादल्या होत्या. धर्माच्या आधारे जाती, बुवाबाजी, भुतपिशाच्च यांचे वर्चस्व वाढले. धर्माच्या वर्चस्वामुळे समाजात ऐक्य, एकरूपता, जिव्हाळा, एकमेकांबद्दलचे प्रेम उरले नव्हते. या विषम पध्दतीचा तुर्कानी फायदा घेतला व भारतावर आक्रमण केले. महंमद गझनी, घोरी या दोघांनी ही इस्लाम धर्माचा प्रसार करण्याच्या उद्देशानेच आक्रमण केले. येथील धार्मिक पध्दती मळेच धर्म प्रसार करणे सोपे झाले.

हर्षवर्धनाच्या मृत्युनंतर उत्तर भारतात अनेक छोटी-मोठी रजपुतांची राज्य निर्माण झाली. ते साम्राज्य विस्तारासाठी संघर्ष करत होते. त्यामुळे सगळे राज्य दुबळे बनले. याचा फायदा तुर्कानी घेऊन हिंदुस्थानावर अनेक आक्रमण केली. तुर्की आक्रमण म्हणजे महंमद गझनी व घोरी यांची आक्रमणे होय. या आक्रमणावेळी हिंदुस्थानाची आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थिती विषमतेची होती. कोणत्याही क्षेत्रात एकसंघ, एकराष्ट्रीयत्व या संकल्पनांचा उदय न झाल्याने समाजात सर्वच क्षेत्रात विषमता होती. याचा फायदा महंमद घोरीने घेऊन १२०६ मध्ये भारतात तुर्की राजवटीची स्थापना केली. १२०६ ते १५२६ या काळात भारतात तुर्काची जी राजवट होती. त्यास सुलतानशाहीचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- तुर्की आक्रमणाच्या वेळची भारतातील राजकीय परिस्थिती सांगा.

## १.३ महंमद गझनीचे आक्रमण (इ.स.१००० जे १०२६)

उत्तर भारतामध्ये अरबांनी सत्ता स्थापन केली. त्याच वेळेला ९ व्या शतकात सामानी वंशातील राजाने खोरासाना प्रांतात सत्ता स्थापन केली. ९५० पासून या वंशातील

सरदारांनी भारतावर आक्रमण करण्याचे प्रयत्न केले. परंतु त्याला अपयश आले. महंमद गझनी ने ९९६ मध्ये सत्ता ताब्यात घेतली आणि भारतावर आक्रमण करण्यास सुरूवात केली. तुर्की वंशातील पहिला सुलतान भारतावर आक्रमण करणारा म्हणजे महंमद गझनी होय.

### १.३.१ महंमद गझनीच्या आक्रमणाची कारणे:

**१) संपत्ती प्राप्ती करणे:** महंमद गझनीने सत्ता ताब्यात घेतली, त्यावेळी त्याच्या प्रदेशाची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजुक होती. आर्थिक दारिद्रय नष्ट करणे, लष्कराची पुनर्रचना करणे. शत्रूचा नाश करणे या सर्व कारणांसाठी संपत्तीची आवश्यकता होती. आपल्या शेजारी असणारा हिंदुस्थान अतिशय श्रीमंत आहे. तिथे जाऊन संपत्ती प्राप्त करणे. प्राध्यापक हबिब याच्या मतानुसार महंमद गझनीने संपत्ती मिळविण्यासाठी भारतावर आक्रमण केले. यासाठी त्याने पुढीलप्रमाणे कारणे सांगितली आहेत.

१) गझनीचा प्रदेश पर्वतमय, खडकाळ, डोंगराळ आणि नापीक असल्याने त्याला संपत्तीची गरज होती.

२) गझनीच्या साम्राज्यावर तुर्की टोळ्याचे आक्रमण चालू होते. या आक्रमणाला तोंड देण्यासाठी पैशाची गरज होती.

३) सैन्यात तुर्कीनी मोठ्या प्रमाणत भरती करायची होती. त्यांच्यासमोर भारतातील संपत्तीचे प्रलोभन ठेवण्यात आले होते. म्हणून गझनीने हिंदुस्थानवर आक्रमण केले.

**२) हत्तीदल प्राप्त करणे:** महंमद गझनीला स्वतःचे हत्तीदल उभारायचे होते ते हत्तीदल निर्माण करून अनेक शत्रूचा बिमोड करायचा होता. उच्च प्रतीचे हत्ती भारतात आहेत. ते मिळविण्यासाठी भारतावर आक्रमण केले.

**३) साम्राज्य विस्तार करणे:** भारतात साम्राज्य स्थापन करणे हा उद्देश गझनीच्या स्वारीचा होता. परंतु हे कारण अनेक इतिहासकारांना मान्य नाही त्याच्या मतानुसार:

१) पंजाबमध्ये मुख्य लष्करी सैन्य स्थापन करून, भारतावर सतत आक्रमण करू शकला असता. पण तसे केले नाही.

२) महंमद गझनीने कनोज व कलिंजरवर स्वारी केली. जिंकलेल्या प्रदेशात कोणतीही शासन व्यवस्था निर्माण केली नाही. सुभेदारांची नियुक्ती केली.

३) महंमद राज्य मध्य आशियात सर्वत्र पसरलेले होते. भारतात राज्य स्थापन केल्यावर मध्य आशियातील स्वतःचे राज्य गमवावे लागले अशी भिती गझनीला वाटत होती.

४) थंड प्रदेशातून आलेल्या तुकऱ्यांना भारतातील उष्ण हवामान सहन होण्यासारखे नव्हते.

५) भारतातील राज्यातील दुहीचा फायदा घेऊन एका-एका राज्यावर हल्ला करणे, लुट करणे तेवढाच उद्देश स्वारीचा होता. त्यामुळे सत्ता स्थापन केली नाही.

४) **मुस्लीम धर्माचा प्रसार करणे:** महंमद गझनीने इस्लाम धर्माचा प्रसार करण्यासाठी भारतावर स्वारी केली. धर्म प्रसारासाठी त्याने हिंदूची मंदिरे उद्ध्वस्त केली, हिंदूची कत्तल केली. या घटनेवरून धर्म प्रसार करणे हा स्वारीचा उद्देश होता. परंतु महंमद हबिबला वरील मत मान्य नाही. त्याच्या मते महंमद गझनीने धर्म प्रसारासाठी भारतावर आक्रमण केले, हे म्हणणे चुकीचे आहे. कारण मुसलमान धर्मात कोणत्याही प्रकारच्या लुटालुटीला परवानगी नाही. कोणत्याही कारणाशिवाय हल्ले चढवावेत असे कोणत्याही मुस्लीम धर्म ग्रंथात सांगितलेले नाही.

५) **खलिफाचा आदेश:** इस्लाम धर्मातील सर्वश्रेष्ठ स्थान असलेला खलिफा यांची सत्ता धर्म आणि राष्ट्र यामध्ये सर्वश्रेष्ठ स्थान होते. काही इतिहासकारांच्या मते बगदादच्या खलिफाने महंमद गझनीला धर्मप्रसार करण्याचा आदेश दिला, म्हणून गझनीने भारतावर आक्रमण केले. परंतु गझनीला खलिफाने आदेश दिल्याचा पुरावा उपलब्ध नाही.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- महंमद गझनीच्या स्वारीची कारणे सांगा उत्तर:

### १.३.२ महंमद गझनीच्या स्वाऱ्या (१००० ते १०२६):

महंमद गझनीने वेगवेगळ्या कारणांमुळे भारतावर १००० ते १०२६ या काळात १७ स्वाया केल्या. या १७ स्वाऱ्या मधून प्रचंड संपत्ती प्राप्त केली. महंमद गझनीने २६ वर्षात केलेल्या स्वाऱ्या पुढील प्रमाणे आहेत.

१) **सीमा प्रदेशावरील हल्ला:** महंमद गझनीने इ.स. १००० मध्ये सीमा प्रदेशावर अनेक आक्रमणे केली. या प्रदेशात जयपालची सत्ता होती. सर्व किल्ले ताब्यात घेतले. संपत्ती जमा केली. प्रदेश पुन्हा जयपालला दिला.

२) **पंजाबचा राजा-जयपालशी युध्द:** सीमा प्रदेश ताब्यात घेतल्यानंतर जयपालने प्रतिकार केला. गझनीने दहा हजार घोडदळासह इ.स. १००१ मध्ये पंजाबवर आक्रमण केले. जयपालचा पराभव झाला. त्याच्या मुलाला ओलीस ठेवले. हा अपमान सहन न झाल्याने जयपालने स्वतःला पेटवून घेतले. त्यानंतर त्याचा मुलगा अनंतपाल सत्तेवर आला. त्याने गझनीबरोबर संघर्ष सुरू केला.

३) **भेरावर विजय:** महंमद गझनीने झेलम नदी ओलांडून इ.स. १००३ मध्ये भेरा राज्यावर हल्ला चढविला. भेराचा राजा विजयराज याने आठ दिवस प्रतिकार केला, पराभव झाल्याने विजयराजने आत्महत्या केली.

४) **मुलतानवर स्वारी:** मुलतानमध्ये शिया पंथीय अब्दुल दाऊद यांचे राज्य होते. महंमद कट्टर सुन्नी पंथी होता. दाऊदने महंमदच्या सैन्याला मुलतान मधून जाण्यास नकार दिला. त्यामुळे गझनीने स्वारी केली. दाऊदने अनंतपालची मदत मागितली. भेराजवळ

महंमदने लष्करी तुकडी उभी केली तेथेच अनंतपालचा पराभव केला. तो काश्मिरला पळून गेला. त्यानंतर गझनीने मुलतानला वेढा दिला. दाऊदचा पराभव झाला. शिया पंथाची कत्तल केली.

दरवर्षी खंडणी देण्याचे मान्य केले. अनंतपालचा मुलगा सुखपाल याला पकडून मुसलमान बनविले व भेराचा किल्लेदार बनविला.

५) **भाटीयावर आक्रमण:** भाटीयाचा प्रदेश समृध्द असल्याने संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने आक्रमण केले. तेथील राजा बाजीराव अतिशय शुर व पराक्रमी होता. तीन दिवस लढाई झाली. पराभव झाल्याने अपमान वाटला. बाजीरावाने आत्महत्या केली. त्याच्या मृत्युनंतर गझनीने मंदिराची लुट करून, हिंदूची कत्तल केली. आणि प्रचंड संपत्ती प्राप्त केली.

६) **उदभांडची लढाई:** महंमद गझनी परत गेल्यानंतर भेराचा सुभेदार सुखपाल उर्फ नमाजशहा याने मुस्लीम धर्माचा त्याग करून, स्वतंत्र राज्य स्थापन केल्याचे जाहीर केले. त्यामुळे गझनीने त्याच्यावर स्वारी केली, पराभव करून युध्द कैदी बनविला. सतलज नदीच्या पलिकडील मंदिरावर स्वारी करण्यामध्ये प्रमुख अडचण आनंदपालची होता. म्हणून गझनीने त्याच्यावर स्वारी केली. तर सुखपाल या आपल्या मुलाला युध्द कैदी बनविल्यामुळे आनंदपाल दुःखी होता. त्यामुळे दोघांच्यात ओहिंदा येथे युध्द झाले. या युध्दामध्ये आनंदपालचा पराभव झाला. त्यानंतर महंमदने नगरकोटच्या मंदिरावर हल्ला चढविला. ७००० सोन्याचे मिनार नाणी, ७०० मण सोन्याची भांडी, २०० मण सोने, २००० अशुध्द चांदी, २० मण हिरे एवढी संपत्ती महंमद घेऊन गेला.

७) **नारायण पुरवर स्वारी:** राजस्थानमधील नारायणपूर राज्यावर गझनीने हल्ला केला. कारण हे मोठे व्यापारी केंद्र होते. परदेशात जाण्या येण्याचा मार्गावरील मुख्य केंद्र असून संपत्ती प्राप्तीसाठी हल्ला केला.

८) **मुलतानवर स्वारी:** मुलतानचा राजा दाऊद ने स्वातंत्र्य जाहीर केले. म्हणून महंमद गझनीने त्याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला. मुलतान आपल्या सामग्रज्याला जोडून घेतला.

९) **त्रिलोचनपालवर स्वारी:** आनंदपालच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा त्रिलोचनपाल हा राजा बनला. गझनीने त्याच्यावर स्वारी करुन त्याचा पराभव केला. त्रिलोचनपालचा मुलगा भिमपाल याने महंमदला अडवण्याचा प्रयत्न केला, पण अपयश आले, परिणामी तो काश्मीरला पळून गेला.

१०) **ठाणेश्वरवर आक्रमण:** ठाणेश्वर हे एकेकाळी वर्धन घराण्याची राजधानी होती. तसेच ते प्रसिध्द तीर्थक्षेत्र ही होते. चक्रधरस्वामीचे श्रीमंत मंदिर होते. विष्णूची मूर्ती व प्रचंड संपत्ती प्राप्त करण्यासाठी गझनीने स्वारी केली. यावेळी डेरा या ठिकाणी राजारामने गझनीला अडवण्याचा प्रयत्न केला पण पराभव झाला. गझनीने मंदिरात प्रवेश करून मूर्ती फोडली. संपत्ती लुटून परत गेले.

**११) काश्मीरवर स्वारी:** पंजाबचा राजा त्रिलोचनपाल व त्याचा मुलगा भिमपाल काश्मीरला पळून गेला. काश्मीरच्या राजाने त्यांना आश्रय दिला म्हणून, त्यास शिक्षा करण्यासाठी गझनीने काश्मिवर स्वारी केली. हवामान अनुकुल नसल्याने तो परत गझनीला गेला. पुन्हा काश्मीरवर आक्रमण केले परंतु काश्मीरच्या राजाचा पराभव करता आला नाही. त्यामुळे गझनींच्या स्वाऱ्यामधली काश्मीरची स्वारी त्याच्या पराभवाची ठरली.

**१२) मथुरा, कनोजवर स्वारी:** उत्तर भारतातील ही दोन्ही ठिकाणे अतिशय श्रीमंत व मंदिरे असणारा प्रदेश होता. संपत्ती मिळविण्याच्या हेतूने गझनीने स्वारी केली. या स्वारीत हरदत्तचा पराभव करून गझनी मथुरेला गेला. मथुरेत विजयपालची सत्ता होती. दोघांच्यात युध्द झाले. प्रचंड संपत्ती गझनीने लुटली. मथुरेनंतर कनोजवर हल्ला केला. कनोजचा राजा कुलचंद याने चंद्राचा आश्रय घेतला येथेही गझनीने प्रचंड संपत्ती लुटून परत गझनीला गेला.

**१३) कालिंजरवर स्वारी:** कालिंजरवर राजा नरेशगंड याच्या नेतृत्वाखाली एक राजसंघ स्थापन केला. कनोजच्या राजाने प्रतिकार न करता पळून जावे याचे दु:ख होते. त्यामुळे नरेशगंडने कनोजच्या राजाला ठार मारले. त्याचा सुड घेण्यासाठी गझनीने आक्रमण केले. नरेशगंड रणांगणातून पळून गेला.

**१४) पंजाबवर आक्रमण:** लष्करी हालचालीचे प्रमुख केंद्र पंजाब या उद्देशाने पंजाबवर स्वारी केली. त्रिलोचनपालच्या सैन्याशी युध्द झाले. त्यात त्रिलोचनचा पराभव झाला. त्यानंतर त्याचा मुलगा भीमपाल याने गझनीबरोबर संघर्ष सुरू ठेवला. २७० हत्ती मिळविले. अनेक बौध्द धर्मियांना जबरदस्तीने मुसलमान बनविले.

**१५) ग्वाल्हेर वकालिंजवर स्वारी:** गझनी परत गेल्या नंतर नरेशगंड याने पुन्हा बंड केले. म्हणून, गझनीने त्याच्यावर स्वारी केली नरेशगंडने ग्वाल्हेरच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. त्यामुळे गझनीने ग्वाल्हेर किल्ल्यांना वेढा दिला. ग्वाल्हेरचा राजा आणि गझनी यांच्यात मैत्रीकरार झाला व त्यानंतर तो परत गझनीला गेला.

**१६) सोरटी, सोमनाथवर स्वारी:** श्रीकृष्णाने येथे आपला देह ठेवला. तेथेच हे मंदिर बांधण्यात आले हेच शिवमंदिर सर्व भारतात प्रसिध्द आहे. सोमनाथची पुजा करण्यासाठी दररोज १००० ब्राम्हण, पुजारी होते. रत्नजडीत अशा ५६ कलाकुसरीच्या खांबावर हे मंदिर बांधले. १३ मजली उंच व अनेक शिखरे आहेत. २०० मण सोन्याच्या घंटा, गाभाऱ्याची शिवलिंग स्वयंभू होते. या मंदिराच्या खर्चासाठी १०,००० गावाचे उत्पादन देण्यात आले होते. गझनीने ८०,००० ची फौज घेऊन सोरटी सोमनाथकडे निघाला. वाटेतच चालुक्य राजा भिमपहिला याने अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु पराभव होताच पळून गेला. गझनीने सोरटीमध्ये प्रवेश केला. त्यावेळी लोकांनी अडवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेला ५०,००० हिंदू लोकांची कत्तल केली व मंदिरात प्रवेश केला. गाभाऱ्यातील स्वयंभू मूर्ती पाहून गझनी थक्क झाला. शेवटी कळस पाडून मूर्ती पाडण्यास आली. मूर्तीचे तुकडे तुकडे करून गझनी, मक्का, मदिना इ. ठिकणी पाठवले. मशिदीच्या पायास पिंडीचे तुकडे बसवले. अगणित संपत्ती लुटून गझनी परत गेला.

१७) **जाट, खोकारा टोळ्यांवर आक्रमण:** सोरटी, सोमनाथची लुट करून परत जात असताना या टोळ्यांनी त्याला त्रास दिला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी गझनीने स्वारी केली. पण ३० एप्रिल १०३० मध्येच गझनी मरण पावला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- महंमद गझनीच्या स्वाऱ्या स्पष्ट करा.

### १.३.३ महंमद गझनीच्या विजयाची कारणे:

महंमद गझनी इ.स. १००० ते १०१६ या काळात भारतभर एकूण १७ स्वाऱ्या केल्या या स्वाऱ्यामध्ये त्याने हिंदू मंदिरे उद्ध्वस्त केली. प्रचंड संपत्तीची लुट केली. अनेक हिंदू लोकांची कत्तल केली. त्यामुळे गझनीच्या आक्रमणाची भिती लोकांच्या मनात निर्माण झाली. हिंदू राजांनी पराभव होताच आत्महत्या केली. तसेच एकत्रित येऊन गझनीच्या विरोधात संयुक्त मोहिम हाती घेतली नाही. त्यामुळे हिंदू राजाचा पराभव झाला. गझनीच्या विजयाची कारणे पुढील प्रमाणे

१) **महंमद गझनी उत्कृष्ट सेनापती:** गझनीने कमी सैन्य असूनही आणि समोर पराभव दिसत असताना निखराने लढा देऊन विजय प्राप्त केला. कारण महंमद गझनी एक जातीवंश व उत्कृष्ट सेनापती होता. शौर्य, धाडस, प्रसंग नीती, रणनीती आणि विजयासाठी कोणतीही गोष्ट करण्यास सज्ज असणारे गुण गझनीकडे होते. त्याचप्रमाणे समाजावर दहशत बसवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कत्तल केली. कार्यक्षम गुप्तहेर खाते, चपळ घोडदळ असल्याने महंमद गझनीचा विजय झाला. तर वरील सर्व गुणाचा, कृतीचा अभाव हिंदू रजपूत राजांकडे असल्याने त्यांचा पराभव झाला.

२) **प्रभावी घोडदळ:** महंमद गझनीकडे प्रभावी चपळ घोडदळ असून त्यावरच त्याचा जास्त विश्वास होता. घोडदळामुळे जलद हालचाली होऊन त्याला विजय मिळाला. याउलट रजपूत राजांचा जास्त विश्वास हत्तीदलावर होता. त्यामुळे त्यांची हालचाल मंद गतीने होत असे. जलद हालचाली न झाल्यामुळे व घोडदळाचा कमी असल्याने हिंदू राजांचा पराभव झाला.

३) **युध्द साहित्यातील तफावत:** मंहमद गझनीने युध्दात तोफांचा उपयोग केला. त्याचप्रमाणे सैनिकांचे नैतिक बळ वाढवण्याचा प्रयत्न केला. याउलट हिंदूच्याकडे जून्याच पध्दतीचे युध्द साहित्य होते. शिवाय सैनिकात आत्मविश्वास, नैतिकता यांचा अभाव होता. अंधविश्वास हिंदूच्याकडे मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांचा पराभव झाला.

४) **भारतीय राजांचा ऐक्याचा अभाव:** महंमद गझनीने आक्रमण केले त्या वेळी संपत्ती प्राप्त करणे हा मुख्य उद्देश होता. त्यानुसार अनेक मंदिरावर आक्रमण केले. मंदिरे, कला उद्ध्वस्त करून प्रचंड संपत्ती प्राप्त केली. कोणत्याही हिंदू राजाने त्याला एकत्रित रोखण्याचा प्रयत्न केला नाही. कारण त्यांच्यात एकीचा अभाव असल्यानेच गझनी विजयी झाला.

५) **हिंदूराजे पराभवाने खचले:** गझनीने आक्रमणामध्ये मोठ्या प्रमाणात कत्तल केली. याचा परिणाम राजांच्यावर झाला. हजारो हिंदू लोकांना कैद करून गुलाम बनविले. याचे दुःख राजसत्तेना (राजांना) झाले. कारण ते स्वतःला चक्रवर्ती, महाराजा समजत असे. आपण राज्याचे, प्रजेचे संरक्षण करू शकत नाही. यामुळे अनेक हिंदू राजांना दुःख झाले. पराभवामुळे काहींनी आत्महत्या केली, काहींनी रणांगणातून पळून जाऊन जंगलांचा आश्रय घेतला. ही हिंदू राजांची मनोवृत्ती होती. त्यामुळेच त्यांचा पराभव झाला.

६) **श्रेष्ठत्वाचा अहंकार:** महंमद गझनीचे आक्रमण होत असताना आमची भाषा, धर्म, संस्कृती जगातील सर्वश्रेष्ठ आहे अशी लोकांची श्रध्दा होती. संस्कृत भाषेचे अध्यापन व अध्ययन करण्यात समाज गुरफटलेला होता. अलबेरूनी म्हणतो की-हिंदू लोकांना वाटते आपल्या देशासारखा देश नाही. राजा-सारखे राजे नाही. राज्यासारखे राज्य नाही. विद्यासारखे विद्या नाही ते गर्विष्ट व मंद आहेत सर्व पृथ्वीवर देश काय तो आपलाच एक आहे. दुसरा नाही. अज्ञानी मुर्ख लोकांना कोणते चांगले आणि कोणते वाईट हे समजत नाही. या सर्व परिस्थितीमुळे हिंदू राजांचा पराभव झाला.

**आपली प्रगती तापासा:**

प्रश्न- महंमद गझनीच्या विजयाची कारणे सांगा.

### १.३.४ महंमद गझनी आक्रमणाचे परिणाम:

१) अरबांच्या कालखंडामध्ये सिंध व मुलतान या प्रांतापर्यंत इस्लाम धर्माचा प्रसार झालेला होता. गझनीच्या आक्रमणानंतर कालिंजरवर गंगा खोऱ्यापर्यंत इस्लाम धर्माचा प्रसार झाला.

२) गझनीच्या आक्रमणानंतर वायव्य प्रदेश त्यामधील किल्ले तसेच खैबरखिंड, पजांबचा प्रदेश कायमचा गझनी साम्राज्याला जोडण्यात आला

३) भारताच्या लष्करी व राजकीय शक्ती मोठा आघात झाला. परिणामी उत्तर भारतातील राजकीय सत्ता व लष्करी परिस्थिती अतिशय दुबळी बनली.

४) महंमद गझनीच्या स्वारीचा मुख्य उद्देश संपत्ती प्राप्त करणे हा होता. त्यामुळे अनेक मंदिरे, शहरे, यामध्ये मोठ्या प्रमाणात लुटालुट करून सोने, चांदी, हिरे , माणिक यांची प्रचंड लट केली. याचा परिणाम भारतीय अर्थव्यस्थेवर झाला. त्यामुळे आर्थिक व्यवस्था पूर्ण कोलमडली.

५) गझनीने आक्रमण केल्यानंतर अनेक ठिकाणे उद्ध्वस्त केली. त्यामुळे कला स्थापत्य उद्ध्वस्त झाले. आर्थिक, दुबळेपणा निर्माण झाल्याने राजसत्तेने कलाकार, कारागीर यांचा राजाश्रय तोडला. त्यामुळे कला स्थापत्य कला याची मोठ्या प्रमाणात हानी झाली.

६) महंमद गझनीने प्रचंड प्रमाणात संपत्ती लुटून नेली. त्याचाच उपयोग साम्राज्य संरक्षणासाठी व साम्राज्य विस्तारासाठी केला.

७) गझनीने ज्या मार्गाने भारतावर आक्रमण केले तो नवीन मार्ग मिळाला. त्यामुळे खैबरखिंडीतून आक्रमण केल्यास भारतावर विजय होऊ शकतो, ही भावना अनेक आक्रमण करणाऱ्यांच्यात निर्माण झाली.

८) घोरीच्या आक्रमणासाठी गझनीने एक नवा मार्ग नवी दिशा प्राप्त करून दिली गझनीच्या आक्रमणाचा व अनुभवाचा फायदा घोरीला मिळाला. त्याच अनुभवानुसार घोरीने भारतावर आक्रमण केले व भारतात मुस्लीम सत्तेची स्थापना केली. नव्या युगाला, नव्या राजवटीला भारतात प्रारंभ झाला. याचा मुळ सुत्रधार महंमद गझनी होता.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- महंमद गझनीच्या स्वारीचे परिणाम सांगा.

## १.४ महंमद घोरीचे आक्रमण

महंमद गझनीने घोरी व हिरात हे दोन्ही प्रदेश जिंकून घेतले. गझनीच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलांच्यात सत्ता संघर्ष सुरू झाला. यावेळी घोर प्रांताची जहागिरी सैफुद्दीन घोरी याने सत्ता ताब्यात घेतली. महंमद ही पदवी धारण करून राज्यकारभाराला सुरूवात केली. गझनीच्या यादवी युध्दात एक वारसदार भारतात पळून आला. त्यामुळे घोरीने भारतावर आक्रमण केले.

### १.४.१ महंमद घोरीच्या आक्रमणाची कारणे:

१) **गझनीचे उरलेले साम्राज्य व वारसदार नष्ट करणे:** महंमद घोरीने साम्राज्य विस्ताराचे धारण स्वीकारले गझनीचे सर्व प्रदेश ताब्यात घेतल्यानंतर त्याचा वारसदार हिंदूस्थानमध्ये गेला. हिंदूस्थानमधील गझनीचे साम्राज्य व त्याचा वारसदार याचा शेवट करणे याच उद्देशाने घोरीने भारतावर आक्रमण केले.

२) **आत्मगौरवशाली भावना:** महंमद गझनीने इस्लाम धर्माचा प्रसार व मुस्लीम राजवट स्थापना हिंदुस्थानमध्ये केली. त्यामुळे मुस्लीम समाजात त्याला मान-सन्मान, प्रतिष्ठा मिळाली. अशीच प्रतिष्ठा आपल्याला ही मिळावी या आत्मगौरवशाली भावनेतून घोरीने हिंदूस्थानवर आक्रमण केले.

३) **मुस्लीम धर्माचा प्रसार करणे.**

४) **साम्राज्य विस्तार करणे.**

५) **संपत्ती प्राप्त करणे.**

६) **मुस्लीम राज्याची स्थापना करणे.**

७) **लष्कारीदृष्ट्या सामर्थ्यशाली बनणे.**

वरील विविध कारणामुळे महंमद घोरीने भारतावर आक्रमण केले. प्रचंड संपत्ती मिळवली. भारतातील प्रदेश जिंकून तिथे आपले सुभेदार नियुक्त केले. भारतातील जिंकलेला प्रदेश

आपल्या साम्राज्याचा एक भाग बनविला. त्याच्या मृत्यनंतर कुतुबुद्दीन ऐबक याने मुस्लीम सत्तेची स्थापना भारतात केली.

### १.४.२ महंमद घोरीची आक्रमणे:

१) **मुलतानवर स्वारी:** भारतावर आक्रमण करण्याचा मार्ग हा मुलतान प्रांतातून होता. त्यामुळे तो प्रांत आपल्या ताब्यात असावा या उद्देशानेच मुलतानवर आक्रमण केले व तो प्रदेश जिंकून सत्ता स्थापन केली.

२) **सिंघ प्रांतावर स्वारी:** मुलतान विजयानंतर घोरीने सिंध प्रांतातील कच्छ किल्ल्यावर आक्रमण केले, लाचलुचपतीचा उपयोग करून, किल्ला ताब्यात घेतला. कारण हा किल्ला लष्करी दृष्ट्या महत्वाचा होता, त्यानंतर उरलेला सिंध प्रांत ११८२ मध्ये ताब्यात घेतला त्यामधील देवल हे प्रसिध्द व्यापारी बंदर ताब्यात घेतले.

३) **गुजरातवर स्वारी:** गुजरातवर स्वारी करण्याचा उद्देश म्हणजे गुजरातमधून राजस्थानमध्ये जाण्याचा मार्ग होता. व्यापारी भरभराट मोठ्या प्रमाणात असल्याने प्रचंड संपत्ती मिळेल. गुजरात जिंकल्यानंतर राजस्थान, गंगा,यमुनेचे खोरे पंजाब या प्रदेशावर सत्ता स्थापन करणे सोपे होईल. वरील कारणामुळे गुजरातवर घोरीने आक्रमण केले. गुजरात चा पराक्रमी राजा मुलराज याने विरोध केला. या संघर्षात घोरीने पळ काढला. रजपूतांनी त्याचा पाठलाग केला. त्यानंतर २० वर्षाने आक्रमण करून गुजरात ताब्यात घेतले.

४) **पेशावरील आक्रमण:** गुजरात पराभवाचा सुड घेण्यासाठी महंमद घोरीने पेशावरवर आक्रमण करुन पेशावर जिंकले. राजा खुसराव मलिक याच्याकडे पेशावर सोपवून परत गेला.

५) लोहारवर आक्रमण : खुसराव मलिक याने बंडखोरी केली. परंतु तो दुबळा होता. याचा फायदा घोरीने घेऊन पंजाबवर आक्रमण केले. पंजाबाची राजधानी लाहोर जिंकले व प्रदेश ताब्यात घेतला.

६) **महंमद घोरी आणि पृथ्वीराज चौहान यांच्यातील संघर्ष:** अजमेर व दिल्ली येथील पराक्रमी राजा पृथ्वीराज चौहान होता. पृथ्वीराज चौहान आणि घोरी यांचा साम्राज्य विस्तार सीमेपर्यंत पोहोचलेला होता. पेशावर पृथ्वीराज चौहानने आक्रमण करून ताब्यात घेतले. त्यानंतर ठाणेश्वर पर्यंत आक्रमण केले. त्यामुळे महंमद घोरीने पृथ्वी विरुध्द मोहिम हाती घेतली. तराई येथे ११९१ मध्ये दोन्ही सैन्याची भेट होऊन युध्द झाले, या युध्दात पृथ्वीने घोरीचा पराभव केला. ही तराईची पहिली लढाई म्हणून ओळखली जाते. या विजयानंतर पृथ्वीराज खुश झाला. पृथ्वीचा पराभवचा पराभव करण्यासाठी घोरीने जलद तयारी सुरू केली. याचवेळी कनोजचा राजा जयचंद्र राठोड याने पृथ्वीविरोधात भूमिका घेऊन घोरीकडे मदत मागितली. त्यामुळे घोरी आनंदी झाला. पृथ्वीराज आणि जयचंद राठोड शत्रुत्वाचे मुळ कारण पृथ्वी आणि संयोगिता याचे प्रेम संबंध. तसेच स्वयंवराच्या दिवशी पृथ्वीने संयोगिताला पळवून नेले. हा अपमान व सूड घेण्याच्या उद्देशानेच जयचंद राठोडने घोरीची मदत घेतली. ११९२ मध्ये तराई येथे दुसरे युध्द झाले यामध्ये पृथ्वीचा पराभव झाला. कारण अनेक राजे,

सेनापती, सैनिक यांची एकी नव्हती. पहिल्या तराई युध्दानंतर अनेकजण आपापल्या प्रदेशात गेलेले होते. त्यामुळे पृथ्वीचा पराभव झाला. या पराभवामुळे घोरीने सत्तेचा पाया घातला. या प्रदेशात कुतुबुद्दीन ऐबक यांची नियुक्ती केली.



७) **कनोजवर आक्रमण:** कनोज हा अतिशय श्रीमंत प्रदेश होता. कनोज ताब्यात आल्याशिवाय बंगाल, बिहार हा प्रदेश मिळविता येणार नाही. म्हणून घोरीने कनोजवर म्हणजेच जयचंद राठोडवर आक्रमण केले. इटावा येथे जयचंद राठोड व घोरी यांच्यात युध्द झाले. या युध्दात जयचंदच्या डोळ्याला बाण लागल्याने तो खाली पडला. ठार झाला. असे समजून सैनिक पळून गेले. त्यामुळे घोरीचा विजय झाला. विजयानंतर प्रचंड प्रमाणात कत्तल व लुटालुट केली. अमाप संपत्ती मिळवून तो परत गेला.

८) **बयाना व ग्वाल्हेरवर स्वारी:** ११९५ मध्ये पुन्हा भारतावर स्वारी केली. बयाना, ग्वाल्हेर हे दोन्ही प्रदेश ताब्यात घेतली आणि तो परत घोरीला गेला. भारतातील जिंकलेला प्रदेश कुतुबुद्दीन ऐबकाकडे सोपविला होता. सतत भारतात असल्याने त्याच्या साम्राज्यातील अनेक सरदारांनी बंड केले. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी तो परत गेला. त्यानंतर पुन्हा भारतावर आक्रमणकेले. खोकारा टोळ्यांचा पराभव करून तो परत जात असताना, झेलम नदीच्या काठी रोहतास तेथे मुक्काम असताना त्याच्या तंबुत खोकारा लोकांनी प्रवेश करून १२०६ मध्ये ठार मारले. त्यामुळे भारताची सत्ता कुतुबुद्दीन ऐबककडे आली.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- महंमद घोरीचे आक्रमण स्पष्ट करा. उत्तर:

### १.४.३ महंमद घोरीच्या विजयाची कारणे

१) **सार्वभौम सत्तेचा अभाव:** सम्राट हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानात अनेक छोट्या मोठ्या राजकीय सत्ता निर्माण झाल्या. सार्वभौम अशी एकही सत्ता स्थापन झाली नाही. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याचा अभाव होता. त्यामुळे हिंदू राजांचा पराभव झाला.

२) **जहागिरदारी पध्दतीचा उपयोग:** भारतीय राजांनी अनेक छोट्या-मोठ्या सरदारांना वंशपरंपरागत जाहागिरी दिली. राज्यापेक्षा तो सरदारांवर जास्त प्रेम करीत असे. त्यामुळे राष्ट्रहिताच्या दृष्टीने ते धोक्याचे ठरले. जहागिरदार स्वार्थी हेतूनेच वागत असल्याने मुख्य राजसत्ता दुबळी बनली. परिणामी हिंदू राजांचा पराभव झाला.

३) **परस्परातील द्वेष आणि स्पर्धा:** हिंदुस्थानमधील जहागिरदार, राजे यांच्यात परस्परांच्या द्वेष व शत्रुत्वाची भावना होती. त्यामुळे त्यांच्यात सतत स्पर्धा सुरू होती. याचा फायदा परकीय सत्तेने घेतला. या संघर्षात राजसत्ता, सरदार दुबळे बनले. परिणामी हिंदू राजाचा पराभव झाला.

४) **राजनीती व मुत्सदेगिरीचा अभाव:** हिंदू राजे सरळ व विश्वासू स्वभावाचे होते. धर्म युध्दाचे पुरस्कर्ते होते. त्यांना राजनीती, मुत्सदेगिरी, डावपेच यांचे ज्ञान नव्हते. या उलट तुर्की लोक अतिशय आक्रमक, कठोर कारवाई करणारे होते. विजयासाठी नीति-

अनीतिचा विचार न करता कोणत्याही नितीचा वापर करून, विजय प्राप्त करत असे. परिणामी हिंदू राजांचा पराभव झाला.

५) **कमकुवत परराष्ट्रीय धोरण:** आतापर्यंत परकीयांची आक्रमणे भारताच्या वायव्य सीमेवरून होत होती. तरी पण सीमा प्रदेशाच्या संरक्षणासाठी कोणत्याही हिंदू राजांनी उपाययोजना केली नाही. त्यामुळे त्यांचा पराभव झाला.

६) **परकीय आक्रमणाची सत्ता केंद्रे:** परकीयांनी आक्रमण करून विविध प्रदेश ताब्यात घेतला. त्या ठिकाणी स्वत:चे सुभेदार नियुक्त करून स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यांनी हिंदू राजांचे साम्राज्य कमकुवत बनवले. यातूनच त्यांचा पराभव झाला.

७) **परकीय व्यापाऱ्यांचे आगमन:** भारतात व्यापाऱ्याच्या निमित्ताने हजारो तुर्की; अरब व्यापारी भारतात आले. त्यांनी प्रचंड संपत्ती प्राप्त करणे ती मायदेशी पाठविली. त्यांनी आपल्या राज्यकर्त्यांना येथील प्रदेशाची, मार्गांची राजसत्तेची व राजसत्तेतील शत्रुत्वाची माहिती दिली. त्यामुळे परकीयांना आक्रमण करणे सोपे झाले. आणि येथील परिस्थितीचा फायदा घेऊन, सहज विजय प्राप्त केला. परिणामी हिंदूचा पराभव झाला.

८) **युध्दाचे कर्तव्य फक्त रजपुताकडे:** भारतीय समाजात चार्तुवर्ण व्यवस्था असून, प्रत्येकाकडे स्वतंत्र कार्य दिलेले होते. राज्यांचे व प्रजेचे अंतर-बाह्य शत्रुपासून, आक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी फक्त रजपुताचीच आहे, असे समजून बाकीचा समाज अलिप्त राहिला. त्यामुळे हिंदुचा पराभव झाला.

९) **जातीवादी संकुचित भावना:** भारतीय समाजात वेगवेगळ्या जाती अस्तित्वात होत्या. प्रत्येक जात स्वतःला श्रेष्ठ समजत असे. स्वत:च्या जातीचे हित साधणे ही समाजाची धारणा होती. या संकुचित भावनेमुळेच दुसऱ्याजातीला कोणीही मदत करत नव्हते. त्यामुळे संघर्षाच्या वेळी क्षत्रियांना एकाकी लढावे लागले.

१०) **समाजातील उदासिनता आणि अंधश्रध्दा:** भारतीय समाजामध्ये धर्माचा पगडा होता. परकीय आक्रमण म्हणजे परमेश्वरांचा कोप आहे. त्यावर आपण काहीच करू शकत नाही. ईश्वर प्राप्ती, आत्मशांती आणि मुक्ती यामध्ये सर्व समाज गुंतलेला होता. समाजाचा ज्योतिषावर जास्त विश्वास असल्याने. पुरूषार्थ नष्ट झालेला होता. त्यामुळे हिंदूचा पराभव झाला.

११) **सुखी व विलासी जीवन:** व्यापारवाढ, अन्नधान्य उत्पादन यामुळे देशाची आर्थिक परिस्थिती चांगली होती. परिणामी सुखी, विलासी, चैनी जीवन जगण्यात लोक धन्यता मानत होते. याचा परिणाम समाजावर झाला. परकीय आक्रमणाच्या वेळीही या सुखी जीवनातून बाहेर पडण्यास लोक तयार नव्हते. त्यामुळे हिंदू राजांचा पराभव झला.

१२) **आर्थिक कारणे:** राज्या राज्यातील संघर्षामुळे अर्थव्यवस्था कोलमडली होती. परिणामी त्यावर प्रचंड पैसा खर्च होत असे. अंधश्रध्देपोटी मोठ्या प्रमाणात दान केले

जात असे. त्यामुळे अर्थव्यवस्था कमकुवत झाली. परकीयांनी आक्रमण करून प्रचंड संपत्ती लुटली. परिणामी अर्थव्यवस्था नष्ट झाली.

१३) **धार्मिक कारणे:** भारतात अनेक धर्म, पंथ, उपपंथ याचा प्रभाव होता. आपला धर्म, पंथ, कसा श्रेष्ठ आहे, यासाठी संघर्ष करत असे. या धार्मिक संघर्षामुळेच अनेकांची ताकद नष्ट झाली. याचा फायदा घेऊन मुस्लीमांनी धर्म प्रसारासाठी आक्रमण केले. धर्माचा प्रसार करण्यासाठी प्रसंग जीव देण्यास तयार होते. या आक्रमक धोरणांमुळे हिंदू धर्माचा टिकाव लागू शकला नाही. धार्मिक तीव्रता राजसत्तेत नसलयाने पराभव झाला.

१४) **जुने युध्दतंत्र:** भारतीय राजाकडे युध्द साहित्य जुने होते. तोफांचे ज्ञान नव्हते. युध्दाची सर्व जबाबदारी प्रसंगी सेनापतीवर होती. सेनापती ठार झाला की, सैन्य पळून जात असे. त्यामुळे पराभव होत असे.

१५) **युध्द योजनेचा अभाव:** लढाईपूर्वी युध्द कसे लढावे याची योजना हिंदू राजे करत नसत. प्रत्यक्षात युध्दाच्या प्रसंगी गोंधळ झाल्यास पुढे काय करावे, नियोजनाचा अभाव असल्याने पराभव झाला.

१६) **उत्तम व अनुभवी सेनापती अभाव:** राजे, सेनापती, सैन्य, युध्दासाठी बाहेरच्या देशात गेले नाहीत. त्यामुळे युध्दाचा, रणनीतीचा अनुभव मिळाला नाही. परिणामी कुशल, उत्कृष्ट सेनापती निर्माण झाले नाहीत. याउलट मुसलमानांनी भारतात आक्रमणे केली. त्यांना रणनीतीचा अनुभव मिळाला, या अनुभवाच्या जोरावर विजय मिळविला व हिंदू राजांचा पराभव केला.

१७) **पायदळाची रचना व भरती दोषपूर्ण होती:** भारतीय राजे युध्द सुरू झाले की, सैन्याची भरती करत असे. त्यामुळे या सैन्याला प्रशिक्षण, अनुभव मिळत नसे कोणतीही रणनीती माहीत नसे. त्याच्याकडे शौर्य, पराक्रम इ. गुणवत्ता असूनही शिस्त आणि कठोरता याचा अभाव असल्याने हिंदू राजांचा पराभव झाला.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न- महंमद घोरीच्या विजयाची कारणे सांगा.

## १.५ सारांश

इ.स. ७१२ पासून भारतावर अरब आक्रमणे सुरू झाली पण त्यानंतर पुढील ३०० वर्षे रजपूतांच्या पराक्रमामूळे अरबांना हिंदूस्थान काबीज करता आला नाही. मात्र इ.स. १००० पासून तुर्की मुस्लिम आक्रमकांची वक्रदृष्टी भारताकडे वळली त्यातून इ.स. १००० पासून तुर्की इस्लामी राज्यकर्त्यांची सातत्याने आक्रमणे होऊ लागली. त्यात महंमद गझनी व महंमद घोरी यांच्या भयंकर आक्रमणापुढे राजपूत शक्तीहिन बनत गेले व भारतात इस्लामी सत्तेचा उदय झाला.

## १.६ प्रश्न

१) तुर्की आक्रमणावेळीची भारतातील परिस्थिती स्पष्ट करा.

२) महंमद गझनीच्या आक्रमणाची कारणे स्वरूप स्पष्ट करा.

३) महंमद गझनीच्या विजयाची कारणे व परिणाम सांगा.

४) महंमद घोरीच्या स्वारीची कारणे व स्वरूप स्पष्ट करा.

५) महंमद घोरीच्या विजयाची कारणे सांगा.

## १.७ संदर्भ

१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयंसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****

# २

## सुलतानशाही (गुलाम घराणे)

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ कुतूबबुद्दीन ऐबक

    २.२.१ कुतूबबुद्दीन परिचय

    २.२.२ ऐबकचे कार्य

        १) ताजुउद्दीन एल्डोजचा बंदोबस्त

        २) नसिरुउद्दीन कुबेचा

        ३) अली मर्दान स्वाऱ्याचा बंदोबस्त

        ४) ख्वारिझमच्या शहाचा बंदोबस्त

        ५) रजपूत संदर्भात धोरण

    २.२.३ कुतूबबुद्दीन ऐबकच्या कार्याचे मुल्यमापन

        १) कुशल सेनापती

        २) गुलाम घराण्याची सुरूवात

        ३) इस्लाम धर्माचा प्रसार

        ४) न्यायदान व दानधर्म

        ५) साहित्य कला

२.३ शमसुद्दीन अल्तमश

    २.३.१ अल्तमशचा परिचय

    २.३.२ अल्तमशच्या समोरील अडचणी व त्याचे निराकरण

        १) कुतुबी व मुईजी सैन्याचा बंदोबस्त

        २) चाळीसगणी संघटनेची स्थापना

        ३) ताजुउद्दीन एल्डोजचा पराभव

    २.३.४ अल्तमशचे कार्य

        १) चंगीज खानचे आक्रमण

        २) सिंधच्या कुबंरचा पराभव

        ३) बंगालवर वर्चस्व

        ४) रजपूतांवर विजय

        ५) गंगेच्या खोऱ्यात वर्चस्व

        ६) खलिफाची मान्यता

२.३.५ अल्तमशचे कार्याचे मुलयमापन

२.३.६ भारतातील मुस्लिम सत्तेचा संस्थापक कोण ?

२.४ रझिया सुलतान

२.४.१ रझियाचा परिचय व राज्याभिषेक

२.४.२ रझियाचे कार्य

२.४.३ रझियाचे असमाधानकारक धोरण

२.४.४ रझियाचा पाडाव

२.४.५ रझियाच्या कार्याचे मुल्यमापन

२.५ बल्बन

२.५.१ बल्बनचा परिचय

२.५.२ पंतप्रधान या नात्याने केलेली कामगिरी

२.५.३ सुलतान या नात्याने बल्बनसमोरील अडचणी

२.५.४ सुलतान या नात्याने बल्बनची कामगिरी

१) सुलतान पदाचे महत्व

२) चाळीसगणी संघटनेचे विसर्जन

३) प्रशासन व्यवस्था

४) शत्रूचा बिमोड

५) गंगा-यमुना खोऱ्यात बंदोबस्त

६) कंदाहारचे बंड

७) शेरखानचा बंदबस्त

८) बंगालमधील तुघ्रीलबेगचा बंदोबस्त

९) मोगलांचा बंदोबस्त

२.५.५ बल्बन काळातील प्रशासन व्यवस्था

१) सत्तेचे केंद्रिकरण

२) वैभवशाली दरबार

३) सैन्य व्यवस्था

४) गुप्तहेर खाते

५) न्याय व्यवस्था

६) वायव्यसिमा व्यवस्था

७) राज्याचा जमाखर्च

२.५.६ बल्बनची योग्यता

२.६ सारांश

२.७ प्रश्न

२.८ संदर्भ

## २.० उद्दिष्टे

१) गुलाम घराण्यातील सुलतानाची माहिती मिळवणे.

२) अल्तमशने राज्याचे अपहरण केले का ? याची चर्चा करणे.

३) बल्बनने सामर्थ्यशाली सत्ता कशी निर्माण केली याची माहिती देणे.

४) गुलाम घराण्यातील कला-स्थापत्यकला याची माहिती घेणे.

## २.१ प्रस्तावना

महंमद घोरीने पृथ्वीराज चौहानचा पराभव करून, भारतात राजकीय सत्ता स्थापन केली. १२०६ मध्ये महंमद घोरी मरण पावल्यानंतर त्याचा गुलाम, ऐबकाने सुलतान सत्तेची स्थापना केली. अल्तमश, बल्बन यांनी नंतरच्या काळात आपल्या घराण्याची सत्ता स्थापन केली. हे सर्वजण सत्तेवर येण्यापूर्वी गुलाम होते. म्हणून त्यांच्या कारकिर्दीला गुलाम काळ म्हणतात. १२०६ ते १२०९ या काळात त्यांची सत्ता होती. साहित्य, कला, स्थापत्यकला आणि प्रशासन राजदरबार यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. आपल्या साम्राज्यात शांतता, सुव्यवस्था राखण्याचा विशेषतः अल्तमश, बल्बन यांनी प्रयत्न केला. बल्बननंतरचे सुलतान अकार्यक्षम, दुबळे असल्याने गुलाम घराण्याचा शेवट १२९० मध्ये झाला. तरीपण त्यांच्या घराण्याच्या कार्याचा विचार करावा लागतो.

## २.२ कुतूबुद्दीन ऐबक

१२०६ मध्ये महंमद घोरी मरण पावला. त्याला कोणीही वारसदार नव्हता. त्याने अनेक गुलाम बाळगलेले होते. त्यांच्यावर प्रेम केले आणि त्यांना सत्ता दिली. या गुलामामध्ये कुतूबुद्दीन ऐबक हा गुलामच होता. त्याने घोरी मरण पावल्या नंतर भारतात सत्ता स्थापन केली. घोरीचा वारसदार म्हणून काय केले.

### २.२.१ कुतूबुद्दीन ऐबकचा परिचय:

कुतूबुद्दीन ऐबकचा जन्म तुर्कस्थानामधील एका घरंदाज घराण्यात झाला. दिसायला तो अतिशय कुरूप, पण अतिशय बुध्दीमान होता. लहानपणी लुटारूनी त्याला पळवून नेऊन काझी या दलालाला विकले. त्याने त्याला सर्व प्रकारचे शिक्षण दिले. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांनी ऐबकला पुन्हा व्यापाऱ्याला विकले. महंमद घोरीने ऐबकला विकत घेऊन त्याला शिक्षण दिले. त्यांनंतर घोरीने ऐबकला अश्वदलाचा प्रमुख बनविले. तराईच्या युध्दाच्या वेळी पराक्रम गाजविल्याने, घोरीने त्याला दिल्ली परिसरात आपला सुभेदार म्हणून नियुक्त केले. ऐबकच्या प्रामाणिकपणवर खुश होऊन 'अमीर-ए-अखुर' या पदावर त्याची नियुक्ती केली. त्याचप्रमाणे ऐवक(चंद्रमुखी)ही पदवी दिली. तराईच्या युध्दानंतर बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतात ऐबकने अनेक ठिकाणी संघर्ष करून तो प्रदेश ताब्यात घेतला. १२०६ मध्ये घोरी मरण पावल्यानंतर लाहोरवासियांनी ऐबकला आपला प्रमुख या नात्याने निवडले. त्याचप्रमाणे दिल्लीमध्ये स्वतःचा राज्यारोहण करून घेतला व स्वतःला “सिपहसाला" (प्रांत आधिकारी किंवा सुभेदार) ही पदवी घेतली. या प्रसंगी त्याने स्वतःच्या

नावाची नाणी पाडली नाहीत. खुतबा वाचला नाही. केवळ घोरीचा सुभेदार म्हणूनच त्याने कारकिर्द सुरू केली. कारण घोरीचे नातेवाईक, कुबेचा, एल्डोज ही सर्व विरोधक मंडळी एकत्रित येऊन आपला पराभव करतील व सत्तेचा शेवट होईल. या भितीपोटीच त्याने स्वतःचा राज्याभिषेक केला नाही. शिवाय राज्यात आर्थिक टंचाई होती. लष्करी ताकद नव्हती. यामुळेच राज्याभिषेक न करता किंवा स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण न करता, केवळ घोरीचा उत्तर आधिकारी म्हणूनच कार्य केले.

### २.२.२ कुतूबुद्दीन ऐबकचे कार्य:

१) **ताजुद्दीन एल्डोजचा बंदोबस्त:** दिल्लीची सत्ता ऐबकने ताब्यात घेतल्यानंतर सत्ता स्थिर करण्याचा आणि शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जे आपले विरोधक होते. त्यांच्याशी विवाहाचे संबंध जोडले. लाहोरचा सुभेदार एल्डोज याच्या मुलीशी लग्न केले. परंतु सासरा अतिशय महत्वाकांक्षी, धुर्त होता. त्याला दिल्लीचे सिंहासन हवे होते. म्हणून त्याने दिल्लीवर आक्रमण केले ऐबकचा पराभव करून दिल्लीची सत्ता घेतली. एल्डोजच्या अत्याचाराला दिल्लीवासी लोक कंटाळले. लोकांनी ऐबकला दिल्लीवर आक्रमण करण्याचे आमंत्रण दिले. त्यानुसार ऐबकाने दिल्लीवर हल्ला केला एल्डोजचा पराभव होऊन तो लाहोरला पळून गेला. ऐबकने दिल्लीचे तख्त ताब्यात घेतले.

२) **नासिरुद्दीन कुबेचा:** कुबेचा हा अतिशय महत्वाकांक्षी, स्वार्थी होता. तयाचा बंदोबस्त करण्यासाठी ऐबकने आपलया बहिणीचे लग्न त्याच्याशी केले. तरीपण त्याच्या महत्वाकांक्षेला आवर घालता आला नाही. कारण सिंध, मुलतान प्रातांतील सरदार अलीमर्दान खान सतत बंडखोरी करत असे. त्याला कुबेचा करत होता.

३) **अलीमर्दान खानाचा बंदोबस्त:** अलीमर्दान खान हा बंगाल, बिहार प्रांताचा सुभेदार असून त्याने स्वतःचे स्वातंत्र्य राज्य जाहीर केले. त्यामुळे ऐबकने त्याच्यावर आक्रमण केले त्याचा पराभव केला. तह करून खानाने दरवर्षी खंडणी देण्याचे मान्य करून ऐबकचे स्वामीत्व स्वीकारले.

४) **खारिजामच्या शहाचा बंदोबस्त:** हा मध्य आशियाचा असून, दिल्ली ताब्यात घेण्याचा त्याचा प्रयत्न होता. ऐबकने त्याच्याशी संघर्ष न करता अलिप्त भूमिका स्वीकारली. यामुळे शहाने दिल्लीवर आक्रमण केले नाही.

५) **रजपुतासंदर्भातील धोरण:** घोरीच्या मृत्यूनंतर रजपुतांनी स्वातंत्र्य जाहीर करून, स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. परंतु ऐबकने त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. चंदेल, कनोज, प्रतिहार यांचा प्रदेश जिंकून घेतला. इ. स. १२१० मध्ये पोलोखेळ खेळताना घोड्यावरून पडला त्यातच ऐबकचा मृत्यू झाला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- कुतुबुद्दीन ऐबकचे कार्य सांगा.

## २.३ ऐबकच्या कार्याचे मुल्यमापन

ऐबकने १२०६ ते १२१० या ४ वर्षाच्या काळात राज्यकारभार केला. केवळ लष्करी ताकदीवर आपले टिकविण्याचा प्रयत्न केला. म्हणून मुस्लीम राज्याचा केवळ संस्थापक आणि प्रभावी सरदार या नात्यानेच त्याने कार्य केले.

१) **कुशल सेनापती व लढवय्या:** ऐबकचे सर्व आयुष्य रंणागणावर गेले. उच्च कुळातील असूनही तो गुलाम होता. स्वतःच्या कर्तबगारीवर गुलामापासून ते राज्याच्या संस्थापकापर्यंत उच्च पद मिळविले. तराईच्या लढाई पासून त्याच्याकडे सर्व सूत्रे घोरीने सोपवली.

२) **गुलाम घराण्याची सुरूवात:** घोरीच्या मृत्यूनंतर ऐबकने दिल्लीचे सिंहासन ताब्यात घेऊन राज्यारोहन केले. सुलतान हे पद घेतले नाही. नाणी पाडली नाहीत. खुतबा वाचला नाही. तरीपण दिल्लीमध्ये गुलाम घराण्याची सुरूवात केली.

३) **इस्लाम धर्माचा प्रसार:** ऐबक उदार धोरणाचा नव्हता. अनेक हिंदूची मंदिरे उद्ध्वस्त केली. हिंदूची कत्तल केली. अनेक ठिकाणी मशिदी बांधलया आणि इस्लाम धर्माचा प्रसार केला.

४) **न्यायदान व धर्मदान:** ऐबक हा उत्कृष्ट शासक असून अत्यंत न्यायी व उदार होता. तो सर्वांना समान राखून न्यायदान करत असे. शांतता, लोककल्याण साधण्याचा प्रयत्न केला. न्यायप्रिय राजा म्हणून त्याची प्रसिध्द होती. लांडगा आणि शेळी एका तलावात एकाच वेळी शेजारी शेजारी पाणी पित असे, अशी त्याची न्यायप्रियता होती. सिराज म्हणतो की ऐबकच्या कालखंडात एकही शत्रू नव्हता. अनेक लेखकांनी ऐबकचा उल्लेख लाखबक्ष (लाखाने दान करणारा) असा केलेला आहे.

५) **साहित्य कला:** ऐबकला साहित्य कलेची आवड होती. त्याच्या दरबारात हसन-उल-मिराझ, मिनाज-उल-सिराज हे प्रसिध्द लेखक होते. ११९१ मध्ये दिल्ली. येथे सुलतानशाही काळातील पहिली इमारत कुवत-उल-इस्लाम आणि आझमेर येथे ढाई दीन का झोपडा या मशिदी बांधल्या, दिल्लीमध्ये कुतूबमिनारचे बांधकाम सुरू केले ते अल्तमशने पूर्ण केले. कुतूबमिनारच्या बाबत इतिहासकारांमध्ये बाबत मतभेद आहेत. पु. ना. ओक यांच्या ते प्राचीन हिंदू राजा चंद्रगुप्त विक्रमादित्य याने ही इमारत बांधलेली असावी. ऐबकने भारतात मुस्लीम राज्य आणि इस्लाम धर्म यांची स्थापना केली. थोडाच काळ सत्ता असल्याने राज्यात शांतता सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी त्याला वेळ मिळाला नाही.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- ऐबकच्या कामगिरीचे मुल्यमापन करा.

## २.४ शमसुद्दीन अल्तमश

कुतूबुद्दीन ऐबकच्या मृत्यूनंतर आरामशहा हा दिल्ली सत्ताधीश बनला. परंतु त्याच्या काळात गोंधळ निर्माण झाला. परिणामी दिल्लीवासियानी अल्तमशला दिल्ली सत्ता ताब्यात घ्यावी अशी विनंती केली. त्यानुसार आरामशहाला दूर करून अल्तमशने दिल्लीची सत्ता ताब्यात घेतली. ऐबक आणि अल्तमश यांचे घराणे वेगळे होते. परंतु अल्तमश हा गुलाम होता. म्हणून त्याचा कालखंड गुलाम घराण्यात समाविष्ट करण्यात आला.

### २.४.१ अल्तमशचा परिचय:

मध्य आशियातील इलबरी टोळीत अलमखान घराण्यात अल्तमशचा जन्म झाला. दिसायला अतिशय सुंदर असून अतिशय प्रिय होता. परिणाम त्याचे इतर भाऊ त्याचा व्देष करून लागले. त्या भावांनी त्याला एका व्यापाऱ्याला विकले. व्यापाऱ्याने दिल्लीला आणले. ऐबकने त्याला विकत घेतले. त्यावेळी घोरीने ऐबकाला सांगितले की, अल्तमशची नीट व व्यवस्थित काळजी घे. भविष्यात मोठे नाव कमवेल अल्तमशकडील गुण, शौर्य यामुळे ऐबकने अश्वशाळेचा प्रमुख म्हणून नियुक्ती केली. आपल्या मुलीचे लग्न त्याच्याबरोबर केले. बदाऊनचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक केली. ऐबकच्या मृत्यूनंतर गोंधळ झाल्याने दिल्लीवासियांच्या विनंतीवरून अल्तमशने दिल्लीतील सुत्र हाती घेतले.

### २.४.२ अल्तमशने राज्याचे अपहरण केले काय?:

अल्तमशने सत्ता मिळविली त्याबाबत इतिहासकारांच्यात मतभेद आहेत. डॉ. एल्नॉर्डच्या मते अल्तमशने गुलाम घराण्याचे राज्य बेकायदेशीर मार्गाने हस्तगत केले. कारण ऐबक नंतर त्याचा कायदेशीर वारसदार आरामशहा त्याला बाजूला सारून दिल्लीचा शासनबंड म्हणजेच अल्तमशने राज्यांचे अपहरण केले.

अल्तमशहाने राज्याचे अपहरण केले, या मताची कारणे पुढील प्रमाणे:

१) अल्तमश हा गुलामाचा गुलाम असल्याने तुर्की सरदार त्याला शासक समजायला तयार नव्हते.

२) ऐबकच्या घराण्याशी अल्तमशचा कोणताही संबंध नव्हता.

३) केवळ सत्तेच्या लोभापायी अल्तमशने आरामशहाचा वध केला.

४) आरामशहालच दिल्लीच्या सिंहासनावर वारसा हक्क प्राप्त झालेला होता कारण तो ऐबकचा मुलगा होता.

डॉ. आर.पी.त्रिपाठी यांच्या मते अल्तमशने राज्याचे अपहरण केले नाही. त्यासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे कारणे सांगितलेली आहेत.

१) अल्तमशने स्वतःच्या कर्तबगारीवर व गुणांवर स्वतःचा उत्कर्ष घडवून आणला. त्यामुळे महंमद घोरी, ऐबक प्रभावित झाले. ऐबकने त्याला गुलामगिरीतून मुक्त केले होते. त्यामुळे सुलतान होण्यापूर्वी ऐबक स्वतंत्र नागरीक होता.

२) ऐबक घराण्याशी अल्तमशचा संबंध नव्हता हे म्हणणे चुकीचे आहे. कारण ऐबकने आपली मुलगी अल्तमशला दिलेली होती. त्यामुळे जावयाच्या नात्याने घराण्याशी संबंध होते.

३) ऐबकला जर तीन मुली होत्या याचा अर्थ तयाला मुलगाच नव्हता. ऐबकने सुरूवातीपासून मुलासारखे प्रेम अल्तमशवर केलेले होते.

४) आरामशहा त्याचा मुलगाच नसल्याने, जावई या नात्याने खऱ्या अर्थाने त्याचाच अधिकार होता.

५) गुलाम घराण्यातील श्रेष्ठ सरदारांनी अल्तमशच्या गुणांचा विचार करून, दिल्लीचे राज्य चालविण्याची विनंती केली होती.

६) आरामशहाच्या काळातील गोंधळ नष्ट करून शांतता, सुव्यवस्था निर्माण केली. त्यामुळे स्वतःच्या कर्तबगारीने सिंहासन मिळविले.

७) इस्लामी परंपरेनुसार ज्याच्याकडे कर्तबगारी त्याच्याकडे सिंहासन या सिध्दांतानुसार राज्य मिळविले.

८) दिल्लीच्या सर्व सरदारांनी; जनतेनी त्याला निमंत्रण दिले त्यामुळे तो दिल्लीला आला.

९) ऐबक खऱ्या अर्थाने सुलतान बनलेला नव्हता. कारण त्याने स्वतःच्या नावाची नाणी पाडली नाही. खुतबा वाचला नाही. राज्याभिषेक केला नाही. सुलतान पद धारण केले नाही.

वरील सर्व घटकांचा विचार करता त्रिपाठींनी जे मत मांडले ते योग्य आहे असे वाटते. त्यामुळे राज्याचे अपहरण केले. या मताशी सहमत होणे चुकीचे वाटते. कारण इस्लामी सत्तेच्या परंपरेत बळी तो कानपिळी म्हणजेच जो सर्व श्रेष्ठ तोच सत्ताधीश. त्यामुळे अपहरण केले म्हणणे चुकीचे वाटते.

### २.४.३ अल्तमशच्या समोरील अडचणी आणि त्याचे निराकरण:

#### १) कुतुबी व मुईजी सैन्याचा बंदोबस्त:

अल्तमशने सत्ता ताब्यात घेतल्याने तुर्की सरदाराकडून विरोध झाला. म्हणजेच कुतुबी (ऐबक) मुईजी (घोरी) सरदारांनी विरोध केला. कारण स्वतःला श्रेष्ठ व शुध्द रक्ताचे समजत असे. अल्तमश हा गुलामांचा गुलाम आहे. त्याची सत्ता मान्य करणे ज्यांना अपमान वाटत होता. त्यामुळे त्यांनी अल्तमशच्या सत्तेला विरोध केला. परिणामी दिल्ली,वाराणसी,तराई या ठिकाणच्या सर्व सरदारांचा अल्तमशने बिमोड केला आपले वर्चस्व त्यांच्यावर लादले.

**२) चाळीसागणी संघटना (तुर्काना चहलगाणी) स्थापना:**

अल्तमशने आपली सत्ता स्थापन केली. त्यास तुर्की सरदारांचा विरोध होता. राज्यात शांतता सुव्यवस्था ठेवण्यासाठी चाळीस गुलाम सरदारांचा संघ तयार केला. त्यालाच 'चाळीसगणी संघटना' किंवा 'तुर्काना चहलगाणी' असे म्हणतात. महत्वाच्या पदावर या सरदारांची नियुक्ती करून राज्यकारभार केला. प्रशासनाच्या निर्णयांमध्ये त्यांना महत्वाचे स्थान दिले. त्यामुळे तुर्की सरदारांचे वर्चस्व कमी होऊन चाळीसगणी संघटनेचे महत्व वाढले.

**३) ताजुउद्दीन एल्डोजचा पराभव:**

भारतामध्ये मध्य आशिया मध्ये ताजुउद्दीनची सत्ता होती. परंतु तेथील शहाने त्याचा पराभव केल्याने तो भारताकडे आला. त्याने लाहोर, पंजाबचा प्रदेश जिंकून घेतला. पंजाबवर आपली सत्ता स्थिर करण्याचा प्रयत्न करत असताना, अल्तमशने त्याच्यावर हल्ला केला. तराई येथे दोघाच्यात युध्द झाले. एल्डोजचा पराभव होऊन तो भारतातून पळून गेला. पळून जात असतानाच अल्तमशने त्याला कैद करून बदायूनी येथे तुरूंगात टाकले. तेथेच तो मरण पावला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- अल्तमश समोरील अडचणी सांगा.

**२.४.४ अल्तमशचे कार्य:**

१) **चंगीजखानाचे आक्रमण:** मध्य आशियातील ओमान नदीकाठच्या प्रदेशात त्याची राजवट होती. १३ व्या वर्षी त्याचे वडील मरण पावले. त्यामुळे अतिशय हाल झाले. तो अतिशय शुर आणि क्रूर होता. तो मध्य आशियाचा खान (पुढारी) बनला. बोखारा, समरकंद येथे सत्तेचा नाश करून, बोखारा येथे जनतेची चंगीजखानने कत्तल केली. जलालउद्दीनवर आक्रमण केले. त्यामुळे तो भारतात आला. अल्तमशकडे त्याने मदत मागितली. परंतु चंगीजखानच्या क्रूरपणबद्दल माहिती असल्याने अल्तमशने मदत नाकारली. त्यामुळे जलालउद्दीन परत मध्य आशियाकडे निघाला. सिंधु नदी ओलांडतना त्याची बोट उलटली, त्यात तो मरण पावला. त्यामुळे चंगीजखान आपल्या प्रदेशाकडे परत गेला. परिणामी चंगीजखानचे आक्रमण झाले नाही.

२) **सिंधच्या कुबेचा पराभव:** ऐबकच्या मृत्यूनंतर सिंध, पंजाब प्रदेशात कुबेचाने आपली स्वतंत्र्य सत्ता स्थापना केली. अल्तमशने एल्डोजचा पराभव केल्यानंतर सिंध, मुलतानवर आक्रमण केले. लाहोर जिंकून घेतले. परंतु पुन्हा कुबेचाने आपली ताकद वाढविली. चंगीजखान आक्रमणामुळे कुबेचा दुबळा बनला. याचा फायदा घेऊन, अल्तमशने दोन दिशांनी लाहोरवर हल्लाचढविला. कुबेचा पळून जाऊन किल्ल्यांचा आश्रय घेतला. त्यामुळे अल्तमशने किल्ल्याला वेढा दिला. कुबेचा किल्ल्यांतून पळून गेला. सिंधू नदीतून जात असताना त्याचा अंत झाला. परिणामी तो प्रदेश ताब्यात घेतला.

३) **बंगालवर वर्चस्व:** ऐबकच्या मृत्यूनंतर अलीमर्दान खिलजीने स्वतःचे स्वतंत्र राज्य जाहीर केले. जनतेवर प्रचंड अन्याय, अत्याचार केला. त्यामुळे अलीमर्दानला ठार केल्याने त्याचा मुलगा उद्दीनइबाज याला गादीवर बसवले. त्याने घियासद्दीन हा किताब घेऊन, स्वतंत्र कारभार सुरू केला.तो ही अल्तमशची सत्ता मानत नसे. त्यामुळे अल्तमशने आपला मुलगा नासीरउद्दीन महंमद याला पाठविले. त्याने विजय प्राप्त केला. त्यामुळे बंगालचा सुभेदार म्हणून नासीरउद्दीन महंमदची नियुक्ती अल्तमशने केली. पण लवकर मरण पावला. त्यामुळे खिलजीने स्वतःचे स्वतंत्र राजय निर्माण केले. पुन्हा अल्तमशने आक्रमण करून बंगालचा प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडून घेतला.

४) **रतपुतांवर विजय:** ऐबकच्या मृत्यूनंतर राज्यात गोंधळ निर्माण झाला. या गोंधळाचा फायदा घेऊन अनेक रजपूतांनी बंडखोरी केली. स्वतःचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अल्तमशने १२२६ मध्ये सर्व प्रथम राजस्थानवर स्वारी केली. रणथंबोरचा किल्ला ताब्यात घेतला. त्यानंतर उदयसिंह चव्हाण यांचा पराभव केला. जालोर, बायाना, अजमेर, जोधपुर इ. प्रदेश जिंकून घेतला. त्यानंतर कालिंजरवर स्वारी केली, पण अपयश आले. चालुक्य, रजपुत यांच्या गुजरातवर स्वारी केली, पण अपयश आले. माळवा, भेलसा, उज्जैनीवर हल्ला करून लुटमार केली, मंदिरे उद्ध्वस्त केली.

५) **गंगेच्या खोऱ्यात वर्चस्व:** ऐबकच्या मृत्यूनंतर या प्रदेशातील अनेक राजांनी बंडखोरी करून स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. म्हणून अल्तमशने त्यांच्या विरोधात मोहीम हाती घेतली. रजपूत राजांचा पराभव केला व आपले मांडलिक बनवून, या प्रदेशावर वर्चस्व स्थापन केले.

६) **खलिफाची मान्यता:** नासिरउद्दीन कुबेचा याच्यावर विजय मिळवल्यानंतर बगदादचा खालिफा खुश झाला. त्याने भारतातील अल्तमशच्या राजाला कायदेशीर मान्यता देऊन, राजचिन्हे, राजवस्त्र दिले. इस्लामी जगतात या खालिफाला मान होतो. त्याच्या मान्यतेमुळे अल्तमशच्या सत्तेला कायदेशीर मान्यता प्राप्त झाली.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- अल्तमशचे कार्य सांगा.

### २.४.५ अल्तमशच्या कार्याचे मुल्यमापन:

अल्तमश हा १२१० मध्ये सत्तेवर आला. १२३६ मध्ये सिंधवर शेवटची स्वारी केली, त्यावेळी आजारी पडला. तिथेच मरण पावला. एकूण २६ वर्षाच्या काळात अल्तमशने राज्यात शांतता, सुव्यवस्था निर्माण केली. आपल्या राजकीय सत्तेला कायदेशीर मान्यता मिळवली. अल्तमश एक शूर सैनिक, दूरदृष्टीचा सेनापती व राज्यकर्ता असून, अनेक वेळा तुर्की राजवट वाचवण्याचा प्रयत्न केला. शासन व्यवस्थेतील गोंधळ, भ्रष्ट्राचार नष्ट करून राज्यात शांतता, सुव्यवस्था निर्माण केली. ऐबकने कुतुबमिनारचे जे बांधकाम सुरू केले होते. ते अल्तमशने पूर्ण केले. तसेच कुवत-उल-इस्लाम या मशिदीचा विस्तार केला. हौस-ए-राजसी नावाचा तलाव बांधला. सर हेगच्या मते "गुलाम घराण्यातील सर्वश्रेष्ठ सुलतान

म्हणजे अल्तमश होय." डॉ. ईश्वरी प्रसादच्या मते तुर्की साम्राज्याचा खऱ्या अर्थाने संस्थापक अल्तमश होय.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- अल्तमशच्या कार्याचे मुल्यमापन करा.

### २.४.६ भारतातील मुस्लीम सत्तेचा संस्थापक कोण?:

८ व्या शतकामध्ये महंमद-बीन-कासीम याने सिंध प्रांतात सत्ता स्थापना केली. परंतु ती लवकर नष्ट झाली. धर्मप्रसार करणे, लुटमार करणे हे दोन उद्दिष्ट्ये असल्याने महंमद-बीन-कासीमला संस्थापक मानता येत नाही. महंमद गझनीने प्रदेशही जिंकला परंतु तो गझनी सामाज्याचा एक भाग म्हणूनच होता. तो भारतात कधीच राहत नव्हता. त्यामुळे त्याला संस्थापक समजणे चुकीचे वाटते. गझनी प्रमाणेच घोरीचे ही तसेच असल्याने त्याला संस्थापक मानता येत नाही.

ऐबकने खऱ्या अर्थाने भारतात सत्ता स्थापन केली. तो भारतातच राहत होता. राज्यकारभार करत होता. परंतु त्याने स्वतःला सुलतान पद न घेता सिपहसालर पद धारण केले. स्वत:च्या नावाने खुतबा वाचला नाही. नाणी पाडली नाही. त्यामुळे ऐबकने सत्ता निर्माण करूनही त्याला सत्तेचा संस्थापक मानता येत नाही. ऐबकनंतर त्याचा मुलगा आरामशहा सत्तेवर आला. त्याने सुलतान पद धारण केले. नाणी पाडली. खुतबा वाचला. परंतु त्याच्या कारकिर्दित सर्वत्र गोंधळ, भ्रष्ट्राचार सुरू होता. त्यामुळे संस्थापकाची जी भूमिका अपेक्षित असते ती आरामशहाने पार पाडली नाही. त्यामुळे त्याला सत्तेचा संस्थापक मानणे योग्य ठरत नाही.

गुलाम घराण्यातील श्रेष्ठ सरदार अल्तमशने भारतात सत्ता ताब्यात घेतली. नाणी पाडली. खुतबा वाचला. सुलतान पद धारण केले. राज्यात शांतता सुव्यवस्था निर्माण केली. शिवाय त्याच्या सत्तेला खलिफाने मान्यता दिली. त्यामुळे धार्मिक व कायदेशीर दृष्ट्या त्याची सत्ता निर्माण झाली. त्यामुळे सत्तेचा संस्थापक अल्तमशला करणे योग्य ठरते.

ऐबकने सत्ता ताब्यात घेतली. प्रदेश प्राप्त केला. म्हणून त्याला केवळ राज्य स्थापन करणारा किंवा राज्य संघटीत करणारा म्हणावे लागते तर कायदेशीर गोष्टीचा विचार करताना मुस्लीम सत्तेचा संस्थापक समजावे लागते.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- भारतातील मुस्लीम सत्तेचा संस्थापक कोण स्पष्ट करा.

## २.५ रझिया सुलतान

मध्ययुगीन कालखंडात किंवा सुलतानशाही काळातील पहिली आणि शेवटची स्त्री सुलतान म्हणजे रझिया सुलतान होय. रझिया अतिशय शुर, पराक्रमी, धाडसी आणि प्रगतीवादी विचारांची होती. केवळ स्त्री म्हणूनच समाजाकडून तिला विरोध झाला. तिच्याकडे असणाऱ्या गुणांमुळेच अल्तमशने युवराज म्हणून तिची घोषणा केली.

### २.५.१ रझियाचा परिचय व राज्याभिषेक:

अल्तमशनंतर फिरोजशहा सत्तेवर आला. त्याच्या मृत्यूनंतर रझियाने नोव्हेंबर १२३६ मध्ये स्वतःचाराज्याभिषेक केला या प्रसंगी 'रझियूतीउद्दीन' अशी पदवी घेतली. तिला प्रशासनाचे चांगले ज्ञान व अनुभव होता. दरबारात तिने बुरखा कधीच वापरला नाही. नेहमी पुरुषी पोशाख वापरत असत. त्यामुळे विविध प्रांताच्या सुभेदारांनी विरोध केला. कारण इस्लाम साम्राजयात एका स्त्रीने राजकारभार करणे, हे त्यांना मान्य नव्हते. त्यामुळे तिच्या विरोधात हळूहळू वातावरण निर्माण झाले.

### २.५.२ रझियाचे कार्य : बंडखोरांचा बिमोड:

रझियाने राज्यकारभार हाती घेतल्या नंतर अनेक प्रांतातील सुभेदारांनी विरोध केला. त्यामध्ये हंसी, लाहोर, मुलतान, बदाऊन इ. सुभेदारांनी तसेच दिल्लीचा वजीर निजाम उल-मुल्क महंमद जुनैदी यांचा समावेश होता. या सर्व सुभेदारावर रझियाने आक्रमण करून पानिपत केले. मुहम्मद जुनैदी याचा पराभव केला तो जंगलात पळून गेला. या संघर्षाच्या वेळी औधचा राज्यपाल नासुरउद्दीनने मदत केली. दिल्लीच्या मौलवी लोकांनी बंड केले. तयाचे नेतृत्व नुरूदउद्दीन या धर्मगुरूने केली. त्यांनी रझियाच्या विरोधात प्रचार केला. एक दिवस जामा, मशिदीमध्ये नमाज पडत असताना, रझियाने सैन्य पाठवून, त्याला कैद केले व त्याचा बिमोड केला.

### २.५.३ रझियाचे असमाधानकारक धोरण:

रझिया शुर, पराक्रमी, राजकारणी व कल्याणकारी असून तिच्या धोरणामुळे लोक असमाधानी व नाराज होते कारण:

१) रझिया अहंकारी तडफदार स्त्री होती. तिची राज्यकारभारातील हुशारी चाळीससगणी सरदारांच्यावर प्रभाव पाडू शकली नाही. चाळीसगणी सरदार तिच्यावर नाराज होते.

२) रझिया पराक्रमी होती. तरीपण तिच्या वर्तनामुळे सनातनी मुस्लीम समाज दुखावलेला होता. कारण तिने कधीच बुरखा वापरला नाही. जनानखाण्यात राहत नव्हती. दरबारात उघडपणे राज्यकारभार करीत होती. एखाद्या राजाप्रमाणे शिरस्त्राण धारण करत असे. युध्दाच्या वेळी सैन्याचे स्वतःच नेतृत्व करत असे. या धोरणामुळे मुस्लिम समाज नाराज होता.

३) रझिया आणि हबशी सरदार जमालुद्दीन याकुब खान यांच्याशी असणारे प्रेमसंबंध. याकुब हा गुलाम असून अश्वशाळेचा प्रमुख होता. एक स्त्री म्हणून याकुबवर प्रेम करणे सोपे होते. परंतु एक सुलतान या नात्याने याकुबशी प्रेम करणे अयोग्य आहे, असे मुस्लिम समाजाला वाटत होते. याकुबच्या सल्ल्याने राज्यकारभार रझिया करत असल्याने सरदार, अमीर, मुल्ला, मौलवी हे लोक नाराज होते.

४) रझियाने शांतता प्रस्थापित केल्यानंतर राज्य कारभार करण्यास सुरूवात केली. सुभेदार, राज्यपाल, वजीर इ. महत्वाच्या पदांवर तिने स्वतःची माणसे नियुक्ती केली.

त्यामुळे पूर्वी काम करणारे सर्व अधिकारी नाराज झाले. त्यांनी रझियाच्या कारभाराला विरोध केला.

५) रझियाने नवीन आधिकाऱ्याच्या मदतीने आपली अनियंत्रित निरकुंश सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. याउलट, अमीर मालिक यांना सुलतानाचे निमंत्रण नको होते. त्यातूनच संघर्ष सुरू झाला. त्यामुळे रझियाच्या विविध धोरणामुळे, स्वभावामुळे, वर्तनामुळे मुसलमान समाज अधिकारी वर्ग नाराज झाला.

### २.५.४ रझियाचा पाडाव:

रझियाचे शासन विषयक धोरण, तिचे वर्तन आणि याकुबशी असलेले प्रेमसंबंध. यामुळे सरदार, अमीर, अमराव, मुल्ला, मौलवी ही मंडळी नाराज झाली. रझियाच्या विरोधात लोकांनी बंड केले. त्यांचा नेता मलिक अल्तुनिया बनला. लाहोरचा सुभेदार करीबखान यानेही बंड केले. रझियाचे त्याचा पराभव केला. त्यानंतर अल्तुनिया याने बंड केले. रझिया त्याच्या विरोधात सैन्यासह गेली. अल्तुनियाने याकुबला ठार केला व रझियाला कैद केले. सर्व बंडखोरांनी अल्तनियास रझियावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी सोपविली. सर्व बंडखोर दिल्लीकडे गेले. रझिया तरूण, सुंदर होती. तिने तारूण्याचा आणि सौंदर्यांचा उपयोग करून अल्तुनियाला प्रेम जाळ्यात ओढले. परिणामी दोघांनी लग्न केले. संयुक्तपणे दिल्लीवर चाल केली. या मोहिमेत दोघांचा पराभव झाला. त्यामुळे ते जंगलात पळून गेले. हिंदू दरोडेखोरांनी त्या दोघांना १५ ऑक्टोबर १२४० मध्ये ठार मारले. तिच्या मृत्यूबरोबर एका राजवटीचा अस्त झाला.

### २.५.५ रझियाच्या कार्याचे मुल्यमापन:

मध्ययुगीन कालखंडातील धुरंधर व सत्ताधीश पहिली व शेवटची स्त्री म्हणून रझिया सुलतानचा उल्लेख करावा लागतो. ती अतिशय महत्वाकांक्षी, कारस्थानी होती. मोगल कालखंडमध्ये नुरजहानची रालकीय सत्ता होती. परंतु तिला राजकीय मान्यता नव्हती. त्यामुळे खऱ्या अर्थाने मध्यकाळातील पहिली स्त्री म्हणूनच उल्लेख करावा लागतो. डॉ.ए.एल. श्रीवास्तवच्या मते : अल्तमशच्या घराण्यातील सर्व लोक राज्यकारभार सांभाळण्यास असमर्थ होते. परंतु रझियाने राजकारणावर आपली पकड बसविली. सर्वांवर नियंत्रण ठेवले. अमीर, मलिक यांच्यावर नियंत्रण ठेवणारी पहिलीच सत्ताधारी तुर्की व्यक्ती म्हणजेच रझिया होय. गोपाळ सखाराम सरदेसाईच्या मते राज्यकारभार चालवण्यास ती समर्थ होती. परंतु स्त्रीने रज्य करावे ही कल्पनाच तुर्की लोकांना सहन झाली नाही. या कारणमुळे तिच्या सत्तेला विरोध होत गेला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- रझियाचे धोरण स्पष्ट करा.

## २.६ बल्बन

गुलाम घराण्याची सत्ता कुतुबुद्दीन ऐबक यांनी स्थापन केली. कायदेशीर मान्यता अल्तमशच्या कालखंडात मिळाली. बल्बनने आपल्या राजकीय सत्तेचा दरारा सामान्य

जनतेपासून ते सरदार, सेनापती उमरावपर्यंत निर्माण केला. बल्बन हा अनियंत्रित राज्यसत्तेचा पुरस्कर्ता होता. त्याने प्रधानमंत्री म्हणून ही उत्तम दर्जाचे कार्य केले. त्याचा फायदा सुलतान झाल्यानंतर झाला.

### २.६.१ बल्बनचा परिचय:

बल्बनचे मुळ नाव बहाउद्दीन होते. इलबरी/जमाली तुर्की जमातीच्या १० हजार सैन्याचे खान होते. लहानपणी बल्बनला लुटारूंनी पळवून नेऊन, दिल्लीच्या जमालद्दीन या व्यापाराला विकले. त्याने त्याला शिक्षण दिले. या व्यापराने त्याला अल्तमशला विकला. अल्तमशने त्याच्याकडील गुण पाहून तयाला पदावरती नियुक्त केले. तो चाळीसगणी सरदारांचा सदस्य बनवला. स्वतःचा खसबारदार (वैयक्तिक सचिव), म्हणून त्यांची नियुक्ती केली. खास रक्षक दलामध्येही त्याची नियुक्ती केली. रझिया सुलतानच्या काळात अमीर-ए-शिकार या विभागाचा तो प्रमुख होतो. स्वतःचया कर्तबगारीवर तुर्की सरदारांच्यांत वर्चस्व निर्माण केले. रझियाने सत्तेवर बसणे त्याला पसंत नव्हते. म्हणून त्याने तिच्या विरोधात काम केले. १२४५ मध्ये त्याने मुघलाचा पराभव केला. बहरानशहा याला सत्तेवर बसविले. त्यामुळे त्याने त्याला प्रधान म्हणून नियुक्त केले.

### २.६.२ पंतप्रधान या नात्याने केलेली कामगिरी (१२४६-१२६६):

नासीरउद्दीन बल्बनच्या मदतीने सुलतानपदावर विराजमान झाला. त्यामुळे अप्रत्यक्ष राज्यकारभाराची सुत्रे बल्बनच्या हाती आली. त्यामुळे महत्वाच्या पदावर बल्बनने स्वतःच्या व्यक्तीची नियुक्ती केली. १२४५ मध्ये मोगलांचा, १२४६ मध्ये खोकर टोळ्याचा बंदोबस्त केला. त्यामुळे दरबारात बल्बनचे वर्चस्व वाढले. गंगा खोयामध्ये हिंदू-राजाने स्वातंत्र्य जाहीर केले. बल्बनने त्यांच्यावर स्वारी केली. हजारो हिंदू लोकांची कत्तल केली. हजारो स्त्री, पुरूष, मुले यांना कैद केले. गुलाम म्हणून विकले. त्यामुळे गंगेच्या खोऱ्यात बल्बनची दहशत निर्माण झाली. त्यानंतर मेवाड, रणथंबोर हा प्रदेश जिंकून घेतला. मोठ्या प्रमाणात जाळपोळ लुटालूट केली. १२४८ मध्ये बल्बनने आपलया मुलीचे नासीरउद्दीन बरोबर लग्न केले. त्यामुळे बल्बनला नायब-ए-मामलीक (सुलतानाचा प्रतिनिधी) म्हणून नियुक्त केले. बल्बनचे वर्चस्व आमिरांना सहन झाले नाही. त्यांनी विरोधात धोरण स्वीकारले. या बंडखोर लोकांचे नेतृत्व इमाल उद्दीन रैहान याने केले. त्याने बल्बनच्या विरोधात सुलतानाला भडकवले. परिणामी बल्बनला वजीर पदावरून कमी करून, रैहानला वजीर (पंतप्रधान) या पदावर नियुक्त केले. रैहान हा भारतीय वंशाचा मुसलमान म्हणजेच बाटलेला मुसलमान आहे. असा अपप्रचार तुर्की लोकांनी करून, रैहानला सत्तेवरून दूर केले. पुन्हा बल्बनलाच वजीर पदावर बसवले. तयाने या काळात अनेक निर्णय घेतले. सुलतान १२६६ मध्ये मरण पावल्यानंतर बल्बनने राज्याची सर्व सुत्रे हाती घेतली. १२ फेब्रुवारी १२६६ रोजी स्वतःचा राजाभिषेक करून सुलतान पदाची सुत्रे हाती घेतली.

### २.६.३ सुलतान या नात्याने बल्बन समोरील अडचणी:

१) खोकरा व मेवाती टोळ्यांनी सतत बंडखोरी (आक्रमण), केल्याने, राज्यातील कायदा सुव्यवस्था ढासळलेली होती.

२) सतत होणारी आक्रमणे, बंड, भ्रष्ट्राचार, यादवी युध्द या सर्व घटनांमध्ये राज्यांची आर्थिक व्यवस्था उद्‌ध्वस्त झालेली होती.

३) राज्यकारभारात मदत व्हावी या हेतूने अल्तमशने चाळीसगणी संघटनेची स्थापना केली. परंतु ही संघटना प्रत्येक निर्णयाच्या वेळी विरोध करत असल्याने निर्णय घेता येत नव्हता.

४) दिल्लीच्या मुल्ला, मौलवी यांचा राजकारणावर वर्चस्व होते. त्यामुळे त्यांचा सल्ल्याने निर्णय घ्यावा लागत होता.

५) ऐबकच्या कालखंडापासून रजपुतांनी स्वतःची सत्ता निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यांच्या बंडखोरीमुळे राज्यात अस्थिरता निर्माण झाली.

६) अल्तमशच्या कालखंडापासून मुगलांनी भारतावर दरवर्षी आक्रमण करण्यास सुरूवात केली. तयामुळे राज्याची अर्थव्यवस्था, प्रशासन कोलमडले.

७) अल्तमशच्या कालखंडापासून सर्व सुलतान अकार्यक्षम दुबळे निघाल्याने राज्यसत्तेचा दरारा नष्ट झालेला होता.

८) राज्यात सतत संघर्ष, युध्द यादवी यामुळे प्रशासन व्यवस्थेत अस्थिरता निर्माण झाली. त्यामुळे प्रशासन यंत्रणा दुबळी बनली.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- बल्बन समोरील अडचणी स्पष्ट करा.

### २.६.४ बल्बनचे सुलतान या नात्याने कार्य:

**१) सुलतानपदाचे महत्व:** बल्बन अनियंत्रित सत्तेच्या सिध्दांताचा पुरस्कर्ता होता. पृथ्वीतलावरील सुलतान म्हणजे परमेश्वराचा अंश किंवा प्रतिनिधी आहे. त्याचा शब्द,त्याची आज्ञा म्हणजेच ईश्वरांची आज्ञा होय. सुलतानाची आज्ञा न पाळणे म्हणजे देवद्रोह आहे असे मानत. दरबारी लोकांच्यात हसणे, गप्पा मारणे, दारू पिणे, टींगल करणे, मोठ्याने बोलणे यावर बंधने लादली. तुर्की रितीरिवाजाप्रमाणेच दरबाराचे कामकाज चालत असत. मुल्ला, मौलवी यांचे दरबारी वर्चस्व कमी करून, राजकीय क्षेत्रात सुलतानाचे वर्चस्व वाढवले.

**२) चाळीसगणी संघटनेचे विर्सजन:** चाळीसगणी संघटनेचा बिमोड केल्याशिवाय, राज्यकारभाराची पुनर्रचना आपल्याला करता येणार नाही. आणि योग्य पध्दतीने कारभार होऊ शकणार नाही. हा विचार करून सत्ता बळकट करण्यासाठी प्रथम उपाययोजना केल्या. त्या पुढीलप्रमाणे.

१) मोठ्या किंवा महत्वाच्या पदावर आपल्या विश्वासतील व्यक्तीची नियुक्ती केली.

२) शुध्द रक्तच्या आणि उच्च कुळातील तुर्की लोकांचीच महत्वाच्या जागेवर नियुक्ति केली.

३) कनिष्ट वंशातील लोकांना उच्च जागेवरून कमी केले.

४) क्षुल्लक कारणावरून कठोर शिक्षा देण्यास सुरूवात केली.

५) चाळीसगणी यंघटनेतील सरदारांच्या जाहागिरांची चौकशी करून, जहागिऱ्या जप्त केल्या.

६) चाळीसगणी सरदारांच्या गटात केवळ तरूण वर्गालाच प्राधान्य दिले.

७) राज्यातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सरदार एकमेकांशी जास्त मिसळणार नाही. यासाठी त्यांच्यावर अनेक बंधने घातली. या माध्यमातून चाळीसगणी संघटनेचे विसर्जन केले.

**३) प्रशासन व्यवस्था:** बल्बनने सुत्र हाती घेतल्यानंतर राज्यकारभार स्थिर करण्याचा प्रयत्न केला. यासाठी प्रशासन व्यवस्थेत बदल केला. सरदार, वतनदार यांच्या जाहांगिरी काढून घेतल्या व त्यांना पगार दिला. कारण वर्गात चैनी, आळस अर्काक्षमता होती. ती दूर करण्याचा प्रयत्न केला.

**४) शत्रूचा बिमोड:** दिल्ली जवळच्या जंगली प्रदेशात मेवाती लोक राहत होते. दिल्ली व जवळच्या प्रदेशात त्यांनी मोठ्या प्रमाणत धुमाकूळ घातला. लुटमार, खुन याचे प्रमाण वाढलेले होते. त्यामुळे दिल्ली लोकांना त्रास होत असे. दिल्लीचे लोक, व्यापारी, दरवाजा बंद करून राहात असे. याचा बिमोड करण्यासाठी बल्बनने मोहीम हाती घेतली. आसपासच्या प्रदेशातील जंगल नष्ट करून लष्करी छावण्या उभ्या केल्या. मेवातीचा बिमोड केला.

**५) गंगा-यमुना खोऱ्या व इतर हिंदूचा बंदोबस्त:** गंगा व यमुना नदीच्या खोऱ्यात लुटारू, बंडखोर यांनी धुमाकुळ घातला. बल्बनने यावर उपाय म्हणून या प्रदेशातील जंगल नष्ट केले. अनेक लुटारूंना ठार मारले. लष्करी छावण्या निर्माण केल्या व या प्रदेशात शांतता, स्थैर्य निर्माण केले.

**६) कंदहारचे बंड:** गंगा-यमुना नदीच्या खोऱ्यात शांतता प्रस्थापित केल्यानंतर बल्बनने आपला मोर्चा कंदहारकडे वळवला. अनेक खेडी जाळून टाकली. लाखो बंडखोरांना ठार मारले. त्यांच्या बायका मुलांना पकडून अत्याचार करून गुलाम बनविले. त्यामुळे या बंडखोरांनी माघार घेतली. अनेक हिंदू सत्ताधिशांची सत्ता कायमची नष्ट झाली.

**७) शेरखानचा बंदोबस्त:** शेरखान चाळीसगणी सरदारातील एक प्रभावी सदस्य होता. बल्बनचा अत्यंत प्रामाणिक आणि एकनिष्ठ असणारा सेवक होता. तो शूर धाडसी पराक्रमी होता. परंतु बल्बनने त्याला विष देऊन ठार मारले व त्याचा बिमोड केला.

**८) बंगामधील तुगरीलबगेचा बंदाबस्त:** तुगरीलबेग हा अत्यंत शूर सरदार आणि चांगला शासक होता. बल्बनच्या अत्यंत विश्वासू गटातील एक अधिकारी होता. परंतु त्याच्या चिटणीसाच्या सल्ल्यानुसार बल्बन विरोधात बंड पुकारले. बल्बन यावेळी आजारी होता. त्याचवेळी बल्बन मरण पावला, अशी खोटी बातमी पसरवली व आजनगरवर आक्रमण करून अमाप संपत्ती लुटली व स्वतःला सुलतान म्हणून जाहीर केली.

स्वतःच्या नावाने नाणी पाडली. खुतबा वाचला. बल्बनने सुभेदार अमीरखान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठवले. परंतु पराभव झाला. तयानंतर मलिकतीरनीती या सरदाराच्या नियंत्रणाखाली सैन्य पाठविले. पराभव झाला. त्यामुळे बल्बन स्वतः मोहिमेवर गेला. त्याने खानाच्या छावणीवर एकाकी हल्ला करून त्याचा खून केला व तुगरील खान याचा बंदोबस्त केला.

९) **मोगलांचा बंदोबस्त:** मोगल आक्रमणापासून दिल्ली साम्राज्याला धोका असल्याने हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी दिल्लीत कायमचे लष्कर उभारले. या सैन्याच्या व्यवस्थेसाठी दिवाण-ए-आरिज या पदाची निर्मिती करून त्यावर इमाद-उल-मुल्ला याची नियुक्ती केली. सैन्यात वाढ केली व त्यांचे पगार वाढविले. सरकारी घोड्यांना डाग देण्याची प्रथा सुरू केली. जहांगिरी पध्दत बंद करून सैनिकांना पेंन्शन देण्यास सुरूवात केली. राजपुत्र मुहम्मद यांच्या मृत्युनंतर बल्बनच्या प्रकृतीवर परिणाम झाला. त्याच्याच दु:खामुळे बल्बन खचत गेला आणि १२८७ मध्ये मरण पावला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- बल्बनचे कार्य सांगा.

### २.६.५ बल्बन काळातील प्रशासन व्यवस्था:

१) **सत्तेचे केंद्रिकरण:** बल्बन अनियंत्रित सत्तेचा पुरस्कर्ता असून सर्व सत्ता आपल्या हाती असावी, या दृष्टीने त्याने प्रयत्न केला. राजपदाला सर्वोच्च स्थान मिळविण्यासाठी त्याने क्षुल्लक कारणावरून अमीर, उमराव यांना कठोर शिक्षा दिली. व सत्तेचे केंद्रिकरण केले.

२) **वैभवशाली दरवार:** बल्बनचा दरबार इराणी धरतीवर असून, आशिया खंडात त्याचा दरबार प्रसिध्द होता. तुर्की पध्दतीने दरबाराची सजावट होती. दरबारात शिष्टाचार व नियम याचे कठोर पालन केले जात असे. वैभवशाली सजावट दरबाराची केलेली होती. दरबारात अंगरक्षक असून, राजाला शोभेल असा पोषक होता.

३) **सैन्य व्यवस्था:** तलवारीवर राज्यकारभार चालवण्याचा कालखंड असल्याने, बल्बनने लष्करावर लक्ष केंद्रित केले. लष्करी ताकद वाढवली. सैन्याची पुनर्रचाना केली. सैन्य भरती, वेतन, युध्द सामुग्री व शिस्त या संदर्भात नियम केले. घोडदळ, पायदळ यांची निर्मिती केली. सैनिकांना जहागिरी जमीन ऐवज रोख वेतन देण्याची पध्दत सुरू केली. जुन्या किल्ल्याची दुरूस्ती केली. दिल्लीमध्ये स्थायी सैन्य कायम स्वरूपात ठेवले.

४) **गुप्तहेर खाते:** राजसकारभार सुरळीत चालण्यासाठी बल्बनने प्रचंड प्रमाणत पैसा, शक्ती खर्च केले. राजधानीची शहरे, सरकारी कार्यालय, सरदारांच्या घरी, सार्वजनिक ठिकाणी गुप्तहेरांची नेमणूक केली. राज्यात घडणाऱ्या घटना-कटकारस्थान याची माहिती राजाला पुरवणे. गुप्तहेर खाते म्हणजे राज्य यंत्रणेतील महत्वाचा घटक असून, या खात्यात विश्वासातील व्यक्तीची नेमणूक केली. गुप्तहेराने दिलेली बातमी ती खरी की

खोटी आहे याची छाननी करणे. योग्य बातमी दिल्यास बक्षीस देणे व खोटी बातमी दिल्यास शिक्षा करणे.

५) **न्याय व्यवस्था:** बल्बन अत्यंत न्यायप्रिय सुलतान असून सर्वांना न्याय मिळावा म्हणून न्याय खात्यातील गोंधळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला. वंश, पद याचा विचार न करता गुन्हेगाराला शिक्षा देण्यात येत असे.

६) **वायव्य सिमा व्यवस्था:** या प्रदेशातून सतत आक्रमण होत असे, त्यामुळे राजधानीला धोका निर्माण झाला. म्हणून या प्रदेशातील किल्ल्याची दुरूस्ती, नवीन किल्ल्यांची निर्मिती, स्वतंत्र लष्करांची निर्मिती इ. सुधारणा करून या प्रदेशाचे संरक्षण केले.

७) **राज्याचा जमाखर्च:** बल्बनने राज्याचे एकूण महसूल गोळा करून, याचा अंदाज घेतला. तसेच या पैशातून सैन्य, प्रजा, व्यापार यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे राज्याचा महसूल जास्तीत जास्त कसा वाढेल याचा विचार बल्बनने केला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- बल्बनच्या प्रशासकीय सुधारणा सांगा.

### २.६.६ बल्बनची योग्यता:

बल्बनने प्रारंभी मुख्यप्रधान म्हणून अतिशय चांगले काम केले. सुलतान या नात्याने जवळजवळ १० वर्षे कारभार केला. राज्यातील गोंधळ नष्ट करून, शांतता, स्थैर्य निर्माण केले. दैवी सिध्दांत पुरस्कार करून, अनियंत्रित सत्ता निर्माण केली. तलवार आणि रक्त या तत्वावर कारभार किंवा राज्य चालते. म्हणून सर्व शक्ती यावर केंद्रित केली. बल्बन केवळ साम्राज्य संस्थापकच नव्हे तर तो एक प्रशासक होता. तो सुन्नी पंथीय असून इस्लाम धर्मानुसार सर्व नीतिनियम पाळत असे. बल्बनने स्वत:च्या घराण्याची सत्ता स्थापन केली. परंतु त्याच्या नंतरचे उत्तराधिकारी प्रभावी नसलयाने सत्ता नष्ट झाली. इ. स. १९९० मध्ये गुलाम घराण्याचा शेवट झाला.

## २.७ सारांश

महंमद घोरीने भारतावर आक्रमण करून प्रदेश जिंकून घेतला. या प्रदेशांवर आपला प्रतिनिधी म्हणून ऐबकची नियुक्ती केली. १२०६ मध्ये घोरी मरण पावल्यानंतर ऐबकने आपली सत्ता स्थापन करून गुलाम घराण्याची सुरूवात केली. ऐबक, अल्तमश,बल्बन यांची घाराणे स्वातंत्र होती. परंतु ते गुलाम असल्याने त्यांच्या राजकीय सत्तेच्या काळास गुलामांचा काळ म्हणतात. अल्तमशने आपल्या सत्तेला राजकीय, कायदेशीर व धार्मिक स्वरूपाची मान्यता मिळाली. त्याची मुलगी रझिया अतिशय शुर, पराक्रमी व प्रशासन चालवण्यास योग्य होती. परंतु एका स्त्रीने राज्य करावे हे तुर्की लोकांना आवडले नाही. बल्बनने अनियंत्रित राज्य सत्तेचा पुरस्कार करून साम्राजयात शांतता, स्थैर्य निर्माण केले. जलालउद्दीन खिलजीने घराण्याचा शेवट करून खिलजी घराण्याची सत्ता स्थापन केली.

## २.८ प्रश्न

१) अल्तमशच्या कार्याचे मुल्यमापन करा.

२) बल्बनने प्रस्थापित करण्यासाठी केलेल्या प्रशासकीय सुधारणेचा आढावा घ्या.

३) टिपा लिहा.

   १) कुतूबुद्दीन ऐबक

   २) रझिया सुलतान

   ३) बल्बनचा दैवी सिध्दांत

४) अल्तमशने राज्याचे अपहरण केले का?

## २.९ संदर्भ

१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****

# ३

# सुलतानशाही (खिलजी घराणे)

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ अल्लाउद्दीन खिलजी

३.२.१ अल्लाउद्दीन खिलजीचा परिचय

३.२.२ अल्लाउद्दीन खिलजी समोरील अडचणी

३.२.३ राज्यातील बंडाची कारणे उपाय

३.२.४ हिंदुविरोधी धोरण

३.२.५ अल्लाउद्दीन खिलजीचा उत्तरेकडील साम्राज्यविस्तार

१) गुजरातवर स्वारी

२) रणथंबोरवर स्वारी

३) चितोडवर स्वारी

४) मावळा संघर्ष

५) मारवाडवर विजय

६) जलोरवर स्वारी

३.२.६ अल्लाउद्दीन खिलजीचा दक्षिणेकडील साम्राज्याविस्तार

**अ) दक्षिण भारतावरील स्वारीची कारणे**

१) सैन्याला कामात गुंतवून ठेवणे

२) संपत्ती प्राप्त करणे.

३) देवगिरीवर सुड घेणे.

४) लष्करी आत्मविश्वास निर्माण करणे.

५) देवलदेवीची प्राप्ती

६) खंडणी मिळविणे

**ब) दक्षिण भारतावरील आक्रमणे**

१) देवगिरीवर स्वारी

२) वारंगळवर स्वारी

३) द्वारसमुद्रावर स्वारी

४) मदुरेवर स्वारी

५) पुन्हा देवगिरीवर स्वारी

**क) अल्लाउद्दीनच्या दक्षिण स्वारीच्या विजयाची कारणे**

**ड) दक्षिण स्वारीचे परिणाम**

१) अल्लउद्दीन खिलजीची प्रतिष्ठा वाढली

२) राजकीय शहाणपणाची भूमिका

३) उदार धोरण

४) संपत्ती प्राप्त

५) आर्थिक परिस्थिती सुधारली

६) राजकीय फायदा मिळाला.

७) दक्षिणेत दारिद्रय वाढले.

८) दक्षिण भारतात इस्लामचा प्रसार

९) विजय क्षणीक ठरला.

३.२.७ अल्लाउद्दीन खिलजीचा शेवट

३.३ सारांश

३.४ प्रश्न

३.५ संदर्भ

## ३.० उद्दिष्टे

१. अल्लाउद्दीन खिलजीचे उत्तर व दक्षिण धोरणाची माहिती मिळवणे.

२. महंमद-बिन-तघलकचे अभिनव प्रयोगाची माहिती मिळवणे.

३. फिरोजशहा तुघलकच्या सुधारणेचे स्वरूपाची माहिती घेणे.

## ३.१ प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडात ऐबकने सुलतानशाहीची स्थापना केली. सुलतानशाही घराण्यामध्ये गुलाम घराण्याने सत्ता उत्तर भारतात स्थिर केली. तर अल्लाउद्दीन खिलजीने उत्तरेबरोबरच प्रथम दक्षिण भारतात सत्ता स्थापना केली. त्याबरोबर भाव नियंत्रण हा प्रयोग त्याने अंमलात आणला. खिलजी हिंदूविरोधी असल्याने हिंदूवर अन्याय झाला. महंमद-बिन-तघलक याने अभिनव प्रयोगाच्या माध्यमातून सत्ता टिकवण्याचा व सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. फिरोजशाह तुघलकने युद्धापेक्षा सामाजिक व प्रशासकीय सुधारणा करून सत्ता टिकवण्याचा प्रयत्न केला.

## ३.२ अल्लाउद्दीन खिलजी

१२९० मध्ये जलालउद्दीन खिलजी याने कैकुबाद याला ठार मारून गुलाम घराण्याचा शेवट केला. आणि खिलजी घराण्याची दिल्लीवर सत्ता स्थापन केली. जलालउद्दीन खिलजी याने १२९० मध्ये दिल्लीचे सिंहासन घेतले, परंतु विजयनगरच्या स्वारीनंतर त्याचा पुतण्या व जावई अल्लाउद्दीन खिलजी याने जलालउद्दीन खिलजीला ठार मारून, दिल्लीचे सिंहासन ताब्यात घेतले. १२९६ ते १३१६ या काळात दिल्लीची सत्ता

अल्लाउद्दीन खिलजीच्या ताब्यात होती. त्याने अनेक धाडसी निर्णय घेतले तसेच प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले. त्याच्या सुधारणामुळेच दिल्लीची सत्ता मजबूत झाली.

### ३.२.१ अल्लाउद्दीन खिलजीचा परिचय:

अल्लाउद्दीन खिलजीचा जन्म १२६६ मध्ये झाला. लहानपणीच वडील मृत्यु झाल्यामुळे, त्याचे चुलते जलालउद्दीन खिलजीने त्यांचे संगोपन केले. स्वत:च्या कन्येचा विवाह त्याच्याबरोबर करून, त्याला जावई बनवले. अल्लाउद्दीन खिलजीला जलालउद्दीनचे मवाळवादी धोरण पसंत नव्हते. आक्रमण विचारांचा असल्याने तरूण वर्ग त्याच्याकडे आकर्षक झाला. दिल्लीची सत्ता मिळावी ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. दक्षिणेत देवगिरीवर १२९४ मध्ये स्वारी करून प्रचंड संपत्ती मिळविली. स्वतःचा राज्याभिषेक केला. या घटनेमुळे अनेक सरदारांनी अल्लाउद्दीन खिलजीच्या धोरणास विरोध केला. परंतु प्रचंड पैसा वाटून विरोधकांचा विरोध कमी केला.

### ३.२.२ अल्लाउद्दीन खिलजी समोरील अडचणी व निराकरण:

१) **वारसा हक्काचे निश्चित नियम नव्हता:** इस्लामी सत्तेमध्ये राजाच्या मृत्युनंतर त्याचा गादीचा वारस निश्चित नसे. त्यामुळे त्यांच्या अनेक लोकात संघर्ष होऊन गादी मिळवण्याचा प्रयत्न केला.

२) **दिल्ली ताब्यात घेतली:** कडा येथे अल्लाउद्दीन खिलजीने जलालउद्दीनला ठार मारले व स्वतःला सुलतान म्हणून घोषित केले. परंतु दिल्ली ताब्यात नव्हती ती मिळविण्यासाठी दिल्लीकडे वाटचाल केली. जलालउद्दीन खिलजीची पत्नी मलकाजहान हिने आपल्या मुलांना दिल्लीला बोलवून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळी तिचा मुलगा कद्रखान रूकउद्दीन इब्राहीम याने दिल्ली सिहांसन ताब्यात घेतले. त्यामुळे त्याचा दुसरा भाऊ अरकली खान नाराज झाला. अल्लाउद्दीन खिलजीने अरकलीखान याची मदत घेऊन, कद्रखान रूकउद्दीन इब्राहीम याचा दिल्लीच्या सीमेवर पराभव केला. त्याने दिल्ली ताब्यात घेऊन. २ ऑक्टोबर १२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीमध्ये राज्याभिषेक केला. त्यानंतर जलालउद्दीनची मुले आणि पत्नी यांना पकडले. पत्नीला सोडून इतराचे डोळे काढले.

### ३.२.३ राज्यातील बंडाची कारणे-उपाय:

#### अ) राज्यात बंड किंवा क्रांती का होते?:

१) अकार्यक्षम गुप्तहेर खाते असल्याने सुलतानाला राज्यातील घडामोडीची माहिती मिळत नसे. त्यामुळे सुलतान व प्रजा यांच्यात दुरावा निर्माण झालेला होता.

२) राज्यातील अमीर, उमराव आणि उच्च पदस्थ अधिकारी हे विवाह, मेजवानी व इतर कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येत असे. ते सुलतानाच्या विरोधात कट कारस्थान करत.

३) राज्यातील अधिकारी वर्ग मोठ्या प्रमाणात दारू पित असे. मद्यपान करणारे लोक सुलतानाच्या विरोधात लोकांच्या समोर बोलत असत त्यामुळे लोकांच्या मनात सुलतानाबद्दल आदर उरला नाही. राज्यातील अमीर, उमराव अधिकारी यांच्याकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती होती. यामुळे कष्ट कमी करावे लागत असे. रिकाम्या वेळी सुलतानाच्या विरोधात टीका करत असे.

**ब) क्रांती बंड होऊ नये यासाठी उपाय:**

१) **गुप्तहेर खात्याची पुनर्रचना:** सभेदार, अमीर, सरकारी कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, राजधानी व इतर मोठी शहरे याठिकाणी अल्लाउद्दीन खिलचीने गुप्तहेर खात्याची पुनर्रचना केली. आपल्या विश्वासातील लोकांची नियुक्ती केली. राज्यातील सर्व प्रकारच्या घडामोडीची माहिति दररोज मिळाली पाहिजे. बातमीची सत्यता शोधण्याचा प्रयत्न केला जात असे. सत्य बातमी असल्यास त्याला योग्य ते बक्षीस दिले जात असे. खोटी बातमी दिल्यास कठोर शिक्षा देत असे, या धोरणामुळे गुप्तहेर खाते कार्यक्षम बनले.

२) **मद्यपान यावर नियंत्रण:** अल्लाउद्दीन खिलजीने संपूर्ण राज्यात दारूबंदी जाहीर केली. स्वतःही दारू पिणे बंद केले. दरबारात दारू पिऊन येण्यास सर्वांना बंदी घातली. सार्वजनिक ठिकाणे, सार्वजनिक कार्यक्रमच्या वेळी दारू विक्री बंद केली. दारू बंदीचा नियम तोडल्यास कठोर शिक्षा दिली जात असे. यामुळे लोक चोरून दारू पिऊ लागले, हे समजल्यानंतर काही प्रमाणात दारू बंदी शिथील केली.

३) **अमीर सुभेदार यांच्यावर नियंत्रण:** सुलतानाच्या विरोधात कट कारस्थान करणारी खऱ्या अर्थाने हीच मंडळी होती. त्यामुळे त्यांच्यावरच नियंत्रण ठेवले. त्यानुसार एकमेकांच्या घरी जाणे, एकत्र मेजवाणीला येणे. लग्नाचे व्यवहार करणे. इ. साठी सुलतानाची परवानगी घेतल्याशिवाय निर्णय घेऊ नये.

४) **आर्थिक शोषण आणि मालमत्तेचे अपहरण:** ज्या-ज्या लोकांच्याकडे जास्त संपत्ती होती. त्यांच्याकडून काढून घेतली. केवळ त्यांना लागणारी संपत्ती शिल्लक ठेवली. हे लोक जास्तीत-जास्त कष्ट कसे करतील, यांच्याकडे लक्ष दिले होते. जहागिरी, वतन नष्ट केले. पेन्शन बंद केले या अधिकाऱ्यांचे पगार ही कमी केले. त्यामुळे स्वतःच्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी त्यांना कष्ट करावे लागत. परिणामी सुलतानाविरोधी कट कारस्थान करणे, लोकांना भडकवणे, निंदा करणे, दारू पिणे या सर्वांवर मर्यादा पडल्या.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- राज्यातील बंडाची कारणे सांगा.

### ३.२.४ अल्लाउद्दीन खिलजीचे हिंदूविरोधी धोरण:

अल्लाउद्दीन खिलजी हा कट्टर सुन्नी पंथीय मुसलमान होता. इस्लाम रीति-रिवाजाच्या तो काटेकोरपणे पालन करत असे. दररोज नमाज पडत असे. हिंदूची पिळवणूक करत असे.

त्याच्या मते हिंदू, सरदार अधिकारी याच्याकडे प्रचंड संपत्ती आहे. त्यामुळे ते बंड करतात, म्हणून हिंदू विरोधी धोरण अमंलात आणले ते म्हणजे:

१) हिंदूची संपत्ती सरकार जमा केली.

२) खोत, (सरकारी तिजोरीत शेतसारा भरणारा मुकादम गावचा प्रमुख) यांचे अधिकार रद्द केले.)

३) उत्पादनाच्या ५०% शेतसारा भरणे.

४) पशू, घरे, कुरणे यावर कर आकारणे.

५) हिंदूवर जिझीया कर आकारला.

६) मसलमानापेक्षा हिंदकडन जास्त जकात आकरली.

७) कर देण्यास उशीर केल्यास कडक शिक्षा

या धोरणामुळे हिंदू अतिशय गरीब बनले. यांना स्वतःच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवता येत नसल्याने ते कटकारस्थान करत नसे. झियाउद्दीन बरनी म्हणतो की, या करांमुळे हिंद चौधरी, खोत, मुकादम एवढे गरीब बनले की, त्यांना बसायला घोडा, वापरायला चांगले कपडे व जवळ बाळगण्यासाठी शस्त्रे मिळत नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांच्या बायका दुसऱ्याचया घरी जाऊन हलकी सलकी काम करू लागले. हिंदूंना लाकडे फोडणे, दुसऱ्याच्या घरी पाणी भरणे, यासारखी हलवया स्वरूपाची कामे करावी लागत असे.

### ३.२.५ अल्लाउद्दीन खिलजीचा उत्तरेकडील साम्राज्य विस्तार:

**१) गुजरातवर स्वारी:** गुजरात प्रदेश नैसर्गिक दृष्ट्या सुपीक आणि समृद्ध होता. जागतिक व्यापारी बंदर व व्यापारी पेठ असल्याने आर्थिक सुबकता मोठ्या प्रमाणात होती. गुजरात मध्ये बघेल वंशीय राजा राजकर्णसिंह सत्ताधीश होता. तो प्रदेश मिळविण्यासाठी अल्लाउद्दीन खिलजीने नुसरतखान व उलघूखान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठविले. या संघर्षाच्या वेळी रायकर्ण सिंह याची पत्नी कमलादेवी व मुलगी देवलदेवी पळून देवगिरीच्या आश्रयाला गेले. पळून जात असतानाच वाटेत कमलादेवीला पकडले आणि दिल्लीला पाठवले व तिच्या बरोबर अल्लाउद्दीनने लग्न केले. त्यानंतर देवलदेवीला दिल्लीला आणले व आपला मुलगा ख्रिजखान यांच्या बरोबर लग्न केले. नुसरतखान आणि उलूघखान यांनी गुजरातचा प्रदेश, राजधानी ताब्यात घेतली.

**२) रणथंबोरवर विजय:** चव्हाण वंशीय राजा हमीरदेव हा राजा होता. गुजरात मधून पळून आलेल्या मुसलमानांना त्याने आश्रय दिला. त्यामुळे नुसरतखान आणि उघलूखान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठविले. या संघर्षात गोफणीचा दगड लागून ठार झाला, आणि पराभव झाला. त्यामुळे अल्लाउद्दीन खिलजी स्वतः या मोहिमेवर गेला. अनेक दिवस लढा चालू होता. पण जिंकणे अशक्य होते. त्यामुळे हमीरदेवचा दिवाण रणमल्ल

याला प्रचंड पैसा देऊन फितूर केले. किल्ल्यांचे दरवाजे उघडले. त्यामुळे हमीरदेवचा पराभव झाला. अनेक रजपूत स्त्रियांनी जोहार केला.

३) **चितोडवर स्वारी:** मेवाडमध्ये गुहिलोत महाराणा रत्नसिंह होता. त्याची पत्नी पधिनी आपल्या सौदर्यांसाठी संपूर्ण देशभर प्रसिद्ध होती. तिच्या प्राप्तीसाठी सुलतानाने स्वारी केली. त्याला शरण येण्यासाठी खिलजीने चितोडला वेढा दिला. पण रत्नसिंहाचा पराभव न करता आल्याने, खिलजी नाराज झाला. खिलजीने रत्नसिंहाला निरोप पाठविला की, मी राजधानीचा वेढा उचलून जातो. केवळ पद्मिनीचे रूप मला आरशात पाहू दे. तुमिही माझ्याबरोबर चर्चा करण्यासाटी या. त्यामुळे रत्नसिंह आणि त्यांचे लष्कर गाफील राहिले. रत्नसिंह त्याच्या भेटीला येताच कैद केले. त्याच्या सुटकेसाठी पद्मिनीची मागणी केली. पद्मिनीने ७०० लष्करासह त्याच्याकडे जाण्याचा निर्णय घेतला. पद्मिनी येत आहे, या खुशीत खिलजी आणि त्याचे लष्कर बेसावध राहिले. पद्मिनी येताच रत्नसिंह आणि अल्लाउद्दीन खिलजी यांच्यात संघर्ष झाला. अल्लाउद्दीन खिलजीने तीव्रतेने लढा दिला व रत्नसिंहाचा पराभव केला. या पराभवामुळे पद्मिनीने व किल्ल्यांवरील स्त्रियांनी अब्बु रक्षणासाठी जोहार केला. पद्मिनी मरण पावली हे समजताच, अल्लाउद्दीन खिलजी खूप चिडला. त्याने हिंदूची कत्तल केली. जाळपोळ, लुटालूट केली.

४) **माळवा संघर्ष:** माळव्याचा राजा हरनंद याचा ऐन-उल-मुल्क याने पराभव केला त्यामुले मांडू धार, चंदेरी ही ठिकाणे ताब्यात घेतली व माळवा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला.

५) **मारवाडवर विजय:** मारवाड जिंकल्याशिवाय सर्व राजस्थान आपल्या ताब्यात येणार नाही म्हणून, अल्लाउद्दीन खिलजीने स्वारी केली. मारवाडचा राजा शितलदेव असून त्याने शिवाना किल्लांचा आश्रय घेतला. अल्लाउद्दीनने हल्ला चढविला. शितलदेव शरण आला. सर्व प्रदेश ताब्यात घेतला.

६) **जलोरवर स्वारी:** जलोरचा राजा कन्हेरदेव होता. आपण अल्लाउद्दीन खिलजीचा सहज पराभर करू अशी फुशारकी मारली. म्हणून अल्लाउद्दीन खिलजीने त्याची मुलगी गुल-ई-भिस्त हिच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठविले कन्हेरदेवचा पराभव होत असतानाच तिचा अचानक मृत्यु झाला. त्यामुळे कन्हेरदेवचा विजय झाला. खिलजीने कन्हेरदेववर हल्ला करून पराभव केला. तो प्रदेश ताब्यात घेतला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- अल्लाउद्दीन खिलजीचे उत्तरेकडील धोरण सांगा.

### ३.२.६ अल्लाउद्दीनचा दक्षिणेकडील साम्राज्य विस्तार:

अल्लाउद्दीन खिलजीने सुत्र हाती घेतल्यानंतर आपले सर्व लक्ष उत्तरेत केंद्रीत केले. शांतता निर्माण झाल्यानंतर आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी आणि सैनिकांना काम देण्याच्या काम देण्याच्या उद्देशाने दक्षिण भारतावर स्वारी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण स्वारीची कारणे पुढीलप्रमाणे:

**अ) दक्षिण भारतावरील स्वारीची कारणे:**

१) **सैन्याला कामात गुंतवून ठेवणे:** दिल्ली ताब्यात घेतल्यानंतर साम्राज्यात शांतता निर्माण करावी आणि बंडखोर व मोगल आक्रमणे यांचा पायबंद घालण्यासाठी प्रचंड स्थानिक सैन्याची निर्मिती केली. परंतु आता सर्व प्रश्न संपलेले होते. सैन्यापुढे काम नव्हते. त्यांना कामात गुंतवून ठेवण्यासाठी अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेवर स्वारी केली.

२) **संपत्ती प्राप्त करणे:** दक्षिण भारतात चार बलाढ्य सत्ता होत्या. त्याच्याकडे प्रचंड संपत्ती होती. परंतु ते सतत आपापसात संघर्ष करत असे. त्यामुळे राष्ट्रीय व लष्करीदृष्ट्या दुबळे बनलेले होते. याचा फायदा घेऊन संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने दक्षिण भारतावर स्वारी केली.

३) **लष्करी आत्मविश्वास निर्माण करणे:** अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर स्वारी केली. देवगिरीचा पराभव केला. त्यामुले खिलजीच्या मनात लष्करी आत्मविश्वास निर्माण झाला. म्हणूनच दक्षिण भारतावर स्वारी केली.

४) **देवगिरीचा सुड घेणे:** अल्लाउद्दीन खिलजीने गुजरातवर स्वारी केली व जिंकून घेतले. त्यावेळी गुजरातचा राजा कर्णसिंह याने देवगिरीची मदत आणि आश्रय घेतलेला होता. देवगिरीचा सुड घेण्याच्या उद्देशानेच देवगिरीवर आक्रमण केले.

५) **देवलदेवीच्या प्राप्तीसाठी देवगिरीवर स्वारी केली:** अल्लाउद्दीन खिलजीने कमलादेवी बरोबर लग्न केले. तिची मुलगी देवलदेवी देवगिरीच्या आश्रयाला होती. कमलादेवीने तिच्या भेटीची इच्छा व्यक्त केलेली होती. म्हणूनच अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेवर स्वारी केली.

६) **खंडणी मिळविण्यासाठी देवगिरीवर स्वारी केली:** देवगिरीचा राजा रामदेवराय याने सुत्र हाती घेतल्यानंतर सुलतानाला दरवर्षी देणारी खंडणी बंद केली. ही खंडणी मिळविण्यासाठी खिलजीने स्वारी केली.

७) **संपूर्ण देशावर सत्ता निर्माण करणे:** उत्तर भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर दक्षिण भारतावर स्वारी करावी. राजांना आपले मांडलीक बनवून संपूर्ण देशांवर एक छत्री सत्ता निर्माण करावी. या उद्देशाने स्वारी केली.

**ब) दक्षिण भारतावरील आक्रमणे:**

१) **देवगिरीवर स्वारी:** अल्लाउद्दीन खिलजीने १२९४ मध्ये देवगिरीवर स्वारी केली. रामदेवरायचा युद्धात पराभव केला. दोघांच्यात झालेल्या तहानुसार रामदेवराय यादव याने खंडणी देण्याचे मान्य केले. परंतु नंतरच्या काळात खंडणी देण्याचे बंद केले. शिवाय गुजरातचा राजा रायकर्णसिंह याची मुलगी देवलदेवी ही देवगिरीच्या आश्रयाला होती. रामदेव याने आपला मुलगा शंकरदेव याच्याशी देवलदेवीचे लग्न करण्याच्या प्रयत्न होता. अल्लाउद्दीन खिलजीची पत्नी कमलदेवी हिची तीव्र इच्छा होती की, आपली मुलगी देवलदेवीला भेटावे. त्यामुळे देवगिरीवर स्वारी केली. या स्वारीचे नेतृत्व

गुजरातचा सुभेदार अलमखान याने केले. देवगिरीचा पराभव झाला. देवलदेवीला पकडून दिल्लीला पाठवले. मलिक ख्रिजखानच्या नेतृत्वाखाली रामदेवरायचा बंदोबस्त करण्यासाठी फौज पाठविली. काफूरने त्यांचा पराभव करून, त्याला पकडले व दिल्लीला कैदी म्हणून पाठविले. अल्लाउद्दीन खिलजीने 'राय-ए-रायन' पदवी देऊन, त्याचा सन्मान केला. त्याचे राज्य पुन्हा दिले.

२) **वारंगळवर स्वारी:** देवगिरीच्या पराभवानंतर तेलंगम किंवा तेलगू राज्यावर स्वारी केली. तेलगूची राजधानी वारंगळ असून काकतीय वंशीय राजा प्रताप रूद्रदेव दुसरा हा सत्ताधीश होता. मलिक काफूरने रामदेव रायच्या मदतीने त्याच्यावर हल्ला. चढविला. दिर्घकाळ संघर्ष झाला. हिंदूची कत्तल झाली म्हणून प्रतापसिंहने मलिक बरोबर तह केला. प्रचंड संपत्ती दिली. दरवर्षी खंडणी देण्याचे मान्य केले.

३) **व्दारसमुद्र राज्यावर स्वारी:** मलिक काफूरने देवगिरी, वारंगळ यो दोन राज्यावर आक्रमण करून, प्रचंड संपत्ती मिळविली. धन (संपत्ती) प्राप्तीसाठीच मलिक काफूरला श्रीमंत, समृद्ध असलेल्या द्वारसमुद्र या राज्यावर आक्रमण केले. यावेळी होयसाळ घराण्यातील वीर बल्लाळ तिसरा राजा होता. त्याने काफूरला विरोध केला. परंतु पराभव झाला. प्रचंड संपत्ती लुटली. मलिक काफूरने धर्मवेडेपणाने हिंदूची अनेक मंदिरे पाडली. वीर बल्लाळ तिसरा याने मोठी खंडणी देऊन व दरवर्षी खंडणी देण्याचे मान्य करून खिलजीचे मांडलिकत्व स्वीकारले.

४) **मदुरेवर स्वारी:** मलिक काफूरने द्वारसमुद्रानंतर आपला मोर्चा मदुरेकडे वळविला. तेथे पांड्य घराण्याची सत्ता असून वीरपाड्य व सुंदरपाज्य या दोन भावात सत्ता संघर्ष सुरू होता. वीर पाड्य गादीवर बसल्याने सुंदर पांड्य याने अल्लाउद्दीन खिलजीकडे मदत मागितली. मलिक काफूर आणि सुंदर पाड्य या दोघांनी वीर पाड्यावर आक्रमण करून पराभव केला. सुंदर पाड्य गादीवर बसला. सुंदर पाड्यांने प्रचंड संपत्ती देऊन खंडणी देण्याचे ही मान्य केले.

५) **देवगिरीवर स्वारी:** रामचंद्रदेव याचा मृत्यु १३१० मध्ये झाला. त्यानंतर त्याचा मुलगा शंकरदेव सत्तेवर आला. त्याने खंडणी देणे बंद केले. म्हणून मलिक काफूरने त्याच्यावर स्वारी केली. या संघर्षात शंकरदेव ठार झाला. परिणामी महाराष्ट्रात जाळपोळ, कत्तल मोठ्या प्रमाणात सुरू झाली. त्यामुळे रामदेवरायचा जावई हरपाळदेव याला सत्तेवर बसवले, आणि नंतरचा मलिक काफूर दिल्लीला गेला.

**क) अल्लाउद्दीनच्या दक्षिण स्वारीच्या विजयाची कारणे:**

१) अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण भारतावर पहिलीच स्वारी केलेली होती. त्यामुळे या नव्या प्रदेशातील आक्रमणाचे आव्हान सैनिक, सेनापती यांच्या समोर होते. हे नवे आव्हान जिद्दीने पेलण्याची भूमिका सर्वांनीच घेतल्यामुळे खिलजीचा विजय झाला. मलिक काफूर व इतर सरदार धर्म भावनेने प्रेरीत झालेले होते. या प्रेरणेनच प्राण अपर्ण करण्यास तयार होते. या भूमिकेमुळेचा त्याचा विजय झाला.

३) मलिक काफूराला युद्धाचा भरपूर अनुभव होता. शिवाय तो स्वतः शुर, धाडशी, पराक्रमी सेनापती होता. युद्ध कौशल्याचा व अनुभवाचा उपयोग त्याने दक्षिण स्वारीत केला. या मलिक काफूरच्या अनुभवामुळे दक्षिण विजय प्राप्त झाला.

४) अल्लाउद्दीन खिलजी व मलिक काफूरने कुटनीती वापरण्यात मागे पुढे पाहात नसे. केवळ विजय हाच त्यांचा हेतू होता. त्यामुले मलिक काफूरने दक्षिण स्वारीत कुटनीतीचा वापर केल्याने विजय मिळाला.

५) दक्षिणेत प्रचंड संपत्ती, समृद्धी असल्याने वर्षानुवर्षे दक्षिणेतील राजे सुखी, चैनी, विलासी आणि आळशी जीवन जगत होते. त्यामुळे त्यांना युद्धाचा अनुभव नव्हता. याचा फायदा घेऊन विजय मिळविला.

६) दक्षिणेतील राजे आपापसात भांडत होते. त्यामुले ते दुबळे बनले. दुसऱ्याची सत्ता कमकुवत करणे यावर जास्त भर होता. अडचणीच्या वेळी मदत न करणे या सर्व परिस्थितीचा फायदा मलिक कपूरने घेतला व विजय मिळविला.

७) दक्षिणेतील सैन्यात शिस्त, जिद्द व प्रशिक्षण याचा अभाव होता युद्ध साहित्य, युद्ध रणनीती, युद्ध पद्धती जुनीच होती. स्वार्थी फितुरी या दुर्गुणामळेच दक्षिणेतील राजाच पराभव झाला.

**ड) दक्षिण स्वारीचे परीणाम**:

**१) अल्लाउद्दीन खिलजीची प्रतिष्ठा वाढली:** मध्ययुगीन कालखंडामध्ये दक्षिण भारतावर आक्रमण करणारा पहिला सुलतान अल्लाउद्दीन खिलजी होय. या आक्रमणामुळे संपूर्ण देशावर त्याची सत्ता प्रस्थापित झाली. परिणामी अल्लाउद्दीन खिलजीची प्रतिष्ठा वाढली.

**२) राजकीय शहाणपणाची भूमिका:** दक्षिण भारतातील राजे दिल्लीपासून अतिशय दूर होते. साम्राज्यला जोडणे चुकीचे होईल, म्हणून त्यांना मांडलिक बनविले. त्यांच्याकडून दरवर्षी खंडणी गोळा केली. राजकीय स्वातंत्र्य त्यांना दिले. ही भूमिका राजकीय शहाणपणाची असल्याची दिसून येते.

**३) उदार धोरण:** अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण भारतात सत्ता निर्माण केली असले तरी, दक्षिणेतील राजांना माणुसकीने वागवले. देवगिरीचा राजा रामदेवराय, द्वारसमुद्राचा राजा वीर बल्लाळ तिसरा यांचे दिल्लीत भव्य स्वागत केले व सन्मानाने परत पाठवले. या उदार धोरणामुळे खिलजीची प्रतिष्ठा वाढली.

**४) संपत्ती प्राप्त:** अल्लाउद्दीन खिलजीचे दक्षिणेवर आक्रमण करण्याचे मुख्य उद्दिष्ट्य संपत्ती प्राप्त करणे हे होते. तो हेतू सफल झाला.

**५) आर्थिक परिस्थिती:** अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेतून मिळवलेल्या प्रचंड संपत्तीचा उपयोग लष्कर निर्मितीसाठी खर्च केला. अनेक सुभेदारांना त्यातील पैसा वाटून दिला. त्यामुळे त्यांची सहानुभूती मिळाली. उत्तरेतील अनेक राजाना एकत्र करण्यात मदत

झाली. आर्थिक परिस्थिती सुधारली. त्यामुळे राज्यकर्ते, जनता सुखी समाधानी जगू लागली.

६) **राजकीय फायदा मिळाला:** दक्षिण विजयामुळे राजकीय फायदा झाला. दक्षिणेतील सत्ता ही प्राचीन परंपरेने चालत आलेले असून, त्यांचा पराभव केल्याने दक्षिणेकडून उत्तरेकडे होणाऱ्या आक्रमणाची भिती कमी झाली. त्यामुळे अल्लाउद्दीनने आपले सर्व लक्ष उत्तर भारतात केंद्रित केले. दक्षिण स्वारीमुळे अल्लाउद्दीन खिलजीला राजकीय फायदा मिळाला.

७) **दक्षिणेत दारिद्रय वाढले:** अल्लाउद्दीनने दक्षिणेत स्वारी केली. मलिक काफूरने प्रचंड लूट, जबरदस्तीने व मोठ्या प्रमाणात खंडणी आकारली. ही खंडणी देण्यासाठी राज्यकर्त्यांनी जनतेवर वेगवेगळ्या प्रकारचे कर आकारून पैसा गोळा केला. त्यामुळे दक्षिणेत दारिद्रय वाढले.

८) **दक्षिण भारतात इस्लामाचा प्रसार:** दक्षिण भारतात हिंदूचेच राज्य होते. अल्लाउद्दीनने आक्रमण केले. मलिक काफूर मंदिरे फोडली. लोकांची कत्तल केली. या बरोबर इस्लाम धर्माचा आणि संस्कृतीचा प्रसार झाला.

९) **विजय क्षणीक ठरला:** खिलजीने संपत्तीची लूट करणे, हा प्रमुख हेतू डोळ्यासमोर ठेवला. प्रचंड संपत्ती प्राप्त करून तो दिल्लीला गेला. खंडणी दरवर्षी घेतली. परंतु काहीने खंडणी देणे बंद केले, तसेच राजकीय वर्चस्व झुगारून दिले. परिणामी खिलजीचा दक्षिणेतील विजय क्षणीक ठरला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण धोरणाचे परिणाम सांगा.

### ३.२.७ अल्लाउद्दीन खिलजीचा शेवट:

अतिशय कष्ट, वाढते वय, अतिमदय यामुळे अल्लाउद्दीन खिलजीची प्रकृती बिघडली. आजारी असताना त्याची पत्नी, मुले यांनी त्याची काळजी घेतली नाही. त्यामुळे तो अतिशय दुःखी झाला. यावेळी त्यानी आलमखान व मलिक काफूर यांना बोलवून घेतले. सर्व परिस्थिती सांगितली. अल्लाउद्दीन खिलजीचा शेवट जवळ आला आहे. याचा फायदा घेऊन मलिका काफूरने अल्लाउद्दीन खिलजीला सांगितले. तुमचा भाऊ, पत्नी, मुले तुम्हाला ठार मारणार आहेत. आणि सत्ता मिळविणार आहेत. त्यामुळे अल्लाउद्दीन खिलजीने या तिघांनाही कैद केले. याचा फायदा घेऊन देवगिरी, चित्तोड येथील राजांनी स्वातंत्र्य जाहीर केले. याचा धक्का खिलजीला बसला आणि १३१६ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

अल्लाउद्दीन खिलजीची योग्यता पाहत असताना, तो पराक्रमी, यशस्वी सेनापती, कुशल राजकारणी आणि यशस्वी राज्यकर्ता होता. संपूर्ण भारतावर एक संघ राज्य तयार करणारा, नवीन प्रशासन निर्माण करणारा धाडसी होता. म्हणून बाजार भाव नियंत्रित करणारा, पंडीतावर वर्चस्व निर्माण करणारा तो पहिला सुलतान. अल्लाउद्दीन खिलजी स्वतः निरक्षर

होता. लिहिता वाचता येत नव्हते तरी त्याच्या दरबारात विद्वान साहित्यिक, पंडीत होते. स्थापत्य कलेत ही त्याने कार्य केले.

## ३.३ सारांश

गुलाम घराण्यानंतर दिल्लीच्या सिंहासनावर खिलजी व तुघलक घराण्याची सत्ता स्थापन झाली. अल्लाउद्दीन खिलजीने प्रशासनात आपला दरारा निर्माण केला. त्याबरोबर उत्तर-दक्षिण भारतावर सत्ता स्थापन करणारा पहिला सुलतान होता. महंमद तुघलकने अभिनव प्रयोगाच्या माध्यमातून आर्थिक सुधारण्याचा व प्रशासकीय बदल करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये अपयश आल्याने त्याच्यावर टिका झाल्या. फिरोजशहा तुघलकने अनेक सामाजिक सुधारणा करून स्थैर्य निर्माण केले.

वरील प्रमाणे पाहिल्यास सय्यद घराण्याने ३७ वर्षे दिल्लीच्या गादीवर राज्य करण्याचे कसेबसे प्रयत्न केले. परंतु त्यांचे सुलतान अत्यंत अकार्यक्षम, चैनी व विलासी निघाल्यामुळे शेवटच्या सुलतान अलाउद्दीन आलम शाहाने आपली सत्ता बहालोल लोदीच्या हाती दिली. त्यानंतर आलेल्या लोदी घराण्याने दिल्लीवर ७६ वर्षे राज्य केले व बऱ्यापैकी स्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न केले. परंतु अंतर्गत बंडाळ्या, उठाव यांनी त्यांना नकोसे केले व शेवटी इ.स. १५२६ मध्ये पानीपतचे पहिले युद्ध होऊन मुघल आक्रमक बाबरने इब्राहीम लोदीचा पराभव करुन नवी घराणे शाही “मुघल साम्राज्य” या नावाने स्थापन केली.

## ३.४ प्रश्न

१) अल्लाउद्दीन खिलजीने राज्यातील बंडखोरी कमी करण्यासाठी कोणते उपाय योजले?

२) अल्लाउद्दीन खिलजीचा साम्राज्य विस्तार स्पष्ट करा.

३) अल्लाउद्दीनची महसूल व बाजारभाव नियंत्रण धोरण स्पष्ट करा.

## ३.५ संदर्भ


१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयंसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****

# ४

# सुलतानशाही (तुघलक, सैय्यद व लोदी घराणे)

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ महंमद तुघलक

४.२.१ महंमद तुघलकचा परिचय

४.२.२ महंमद-बिन-तुघलकचे कार्ये (अभिनव प्रयोग)

१) गंगा-यमुना खोऱ्यात करवाढ

२) आदर्श कृषि योजना

३) राजधानी बदलण्याचा प्रयोग

४) चलन व्यवस्थेत बदल

४.२.३ महंमद-बिन-तुघलकच्या योजनांच्या अपयशाची कारणे

१) सुलतान स्वतःच जबाबदार

२) धर्मगुरू मध्ये विरोध

३) योजना काळाच्या पुढच्या

४) बुद्धिमान व प्रामाणिक अधिकाऱ्यांचा अभाव

५) प्रजेचा विरोध

६) नैसर्गिक आपत्ती

७) परदेशी मुसलमानांचे आगमन

८) विशाल साम्राज्य

९) एकपात्री कारकिर्द

४.२.४ महंमद-बिन-तुघलक वरील आरोप

१) वेडा होता काय

२) रक्तपिपासू

३) नास्तिक

४) परस्पर विरोधी गुणांचा पुतळा

४.३ सय्यद घराणे

४.४ लोदी घराणे

४.५ सारांश

४.६ प्रश्न

४.७ संदर्भ

## ४.० उद्दिष्टे

१. अल्लाउद्दीन खिलजीचे उत्तर व दक्षिण धोरणाची माहिती मिळवणे.

२. महंमद-बिन-तुघलकचे अभिनव प्रयोगाची माहिती मिळवणे.

४. फिरोजशहा तुघलकच्या सुधारणेचे स्वरूपाची माहिती घेणे.

## ४.१ प्रस्तावना

कुतुबुद्दीन ऐबकापासून भारतात गुलाम घराण्याची सुलतानशाही सुरू झाली. यात अल्लाउद्दीन, रझिया सुलतान, बल्बन अशा विविध राज्यकर्त्यांनी राज्य केले. त्यानंतर खिलजी वंश प्रस्थापित झाला. खिलजी वंश कमजोर होताच महंमद-बिन तुघलकाने सत्ता बळकावली. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात महंमद-बिन-तुघलक ओळखला जातो तो त्याने केलेल्या विविध अभिनव प्रयोगांसाठी. परंतू हे प्रयोग फसल्यामुळे राज्याची तिजोरी रिकामी झाली. तुघलकाच्या अत्याचारामुळेही हिंदू व मुस्लिम प्रजा त्रस्त झाली होती. त्यातून संपूर्ण देशात तुघलकाविरूद्ध बंडाळया माजल्या. या बंडाळयातूनच विजयनगर व बहामनी साम्राज्याचा उदय झाला.

तुघलक साम्राज्याच्या नाशानंतर फार कमी काळ दिल्लीच्या गादीवर सय्यद घराणे प्रस्थापित झाले. त्यानंतर इ.स. १४५१ ते १५२६ या काळात सुलतानशाहीतील शेवटचे घराणे म्हणजे लोदी घराण्याने राज्य केले. याच घराण्यातील शेवटचा सुलतान इब्राहीम लोदी याचा बाबरने पराभव करून मोगल वंश प्रस्थापित केला आणि हिंदुस्थानच्या राजकारणाला नवीन वळण लागले.

## ४.२ महंमद तुघलक

गियासुद्दीन तुघलक याने १३२० मध्ये खिलजी घराण्याची सत्ता नष्ट करून दिल्लीची सत्ता हाती घेतली आणि तुघलक घराण्याची स्थापना केली. १३२० ते २४ या काळात दिल्लीवर राजवट (सत्ता) स्थापन केली वयोवृध्द् असल्याने सौम्य स्वभाव होता. याच्या कारकिंदित अस्थिर परिस्थिती होती. त्याच्या सौम्य धोरणामुळे तरुण पिढी नाराज होती. याचा फायदा महंमद तुघलकला झाला व त्याने १३२५ मध्ये दिल्लीचे सिंहासन ताब्यात ळघेतले.

### ४.२.१ महंमद-बिन-तुघलकचा परिचय:

गियासुद्दीन तुघलकचा मोठा फकरूद्दीन जूनाखान उर्फ उलूघखान हा लहानपणापासूनच शुर, धाडसी होता. सैनिकी जीवनाची आवड होती. युद्ध कौशल्य रणनीती आणि लढवय्ये शिपाई म्हणून तो चमकला. तो महत्त्वाकांक्षी असून त्याची स्मरण शक्ती अतिशय तीव्र होती. उत्तम लेखक, वक्ता, वैद्य, गणिततज्ञ, युद्धकला, राज्यकारभार याचे उत्तम ज्ञान असल्याने अष्ट पैलू होता. अमीर-ए-आखूर (घोडदळ प्रमुख) या पदावर काम केले. खुसरोशहाच्या विरोधात गियासुद्दीन ने उठाव केला, त्यावेळेला पित्याला मदत केली. वडिलांच्या काळात १३२३ मध्ये वारंगळवर स्वारी केली. विजय मिळाला. यावेळी फकरुद्दीन जूनाखान उर्फ

उलुघखान याने महंमद बिन-तुघलक हा किताब धारण केला. या प्रसंगी प्रचंड दानधर्म केला अनेक मित्रांना पदव्या, पदे दिली. विविध सुधारणाचे उद्देश डोळ्यासमोर ठेवून, महंमद-बिन-तुघलक याने १३२५ मध्ये दिल्लीची सुत्रे हाती घेतली. त्याच्या विविध धोरणांमुळे त्यांच्यावर अनेक टिका झाल्या.

## ४.२.२ महंमद-बिन-तुघलकचे कार्य (अभिनव प्रयोग):

१) **गंगा-यमुना नदीच्या खोऱ्यातील करवाढ:** महंमद-बिन-तुघलक याने सुत्र हाती घेतल्यानंतर शेती सुधारणा, जमा खर्च, महसुल वाढ इ. सुधारणा करण्याच्या उद्देशाने सर्व प्रांतीय सुभेदारांना आदेश दिला की, आपले महसुल व्यवस्थेचे दप्तर (रजिट्रेशन) तपासण्यासाठी दिल्लीला आणावे. त्यानुसार सर्व प्रांतीय दप्तर तपासण्यात आले. त्यानंतर महसुल व्यवस्थेसाठी प्रत्येक सुभेदाराने एक रजिस्टर ठेवावे व त्याची तपासणी दरवर्षी करून घ्यावी. परंतू या धोरणाला अपयश आले. राज्याभिषेक झाल्यानंतर प्रचंड द्रव्य लोकांना वाटले. त्यामुळे राज्याची तिजोरी रिकामी झाली. ही भरण्यासाठी. गंगा यमुना खोऱ्यात सुपिकता असल्याने शेतसारा वाढविण्याचे धोरण स्वीकारले. त्यानुसार या खोऱ्यातील सुभेदाराला आदेश देण्यात आला. या आधिकाऱ्यांनी सक्तीने कर वसुल केला. याचवेळी या खोऱ्यात प्रचंड दुष्काळ पडला. लोकांचे हाल होत होते. सुलतानाच्या धोरणानुसार सरकारी अधिकारी सक्तीने कर वसूल करत होते. हे धोरण म्हणजे सुलतानाच्या वेडेपणाचे किंवा लहरीपणाचे होते. कारण प्रचंड दुष्काळ असतानाही सक्तीने शेतसारा वसूल केला जात होता. परंतु दुष्काळाची माहिती सुलतानाला मिळताच, त्याने दुष्काळावर उपाययोजना केल्या. त्या वर्षाचा शेतसारा माफ केला. लोकांना अन्नधान्य पुरविले, कपडे, द्रव्य यांचा पुरवठा केला. दुष्काळग्रस्त भागातील लोकांसाठी विहिरी, तलाव, धरणे, रस्ते याची कामे सुरू केली. दुष्काळासंदर्भात केलेल्या उपाययोजना पाहताच महंमद-बिन-तुघलक हा वेडा किंवा लहरी नसून तो शहाणा होता हे दिसून येते.

दुष्काळाची माहिती उपलब्ध झाल्याने सुलतानाने शेतसारा वाढीचे धोरण स्वीकारले हे जरी सत्य असले तरी, दुष्काळाची माहिती मिळताच उपाय योजना केल्या. यावरून हे सिद्ध होते की महम्मद-बिन-तुघलक वेडा नव्हता. केवळ सरकारी अधिकाऱ्याच्या चुकीच्या धोरणामुळे त्याच्यावर आरोप करण्यात आले.

२) **आदर्श कृषि योजना:** महसुल व्यवस्थेत वाढ व्हावी व शेतीचे उत्पादन वाढवावे, या उद्देशाने महंमद-बिन-तुघलकने “दिवाण-ए-कोहि" हा स्वतंत्र विभाग स्थापन केली. त्याचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सरकारी मदत देऊन जमीन जास्तीत - जास्त लागवडीखाली आणणे हा होता. यासाठी ६० चौ. मैलांचा प्रदेश निवडला. यावर वेगवेगळे प्रयोग राबवण्यात आले. निरनिराळे पिके घेतली. फळेझाडे लावली. २ वर्षात ७० लाख टंका एवढा खर्च केला. पण त्या तुलनेने खर्चापेक्षा उत्पादन कमी आले. कारण निवडलेली जमीन ही नापिक होती. या योजनेसाठी ३ वर्षाचा दिलेला कालखंड अपूर्ण होता. शिवाय अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला. त्यामुळे जमिनीमध्ये प्रत्यक्ष तेवढा खर्च झालाच नाही. त्यामुळे योजना अपयशी ठरली. परिणामी सुलतानाची लोकप्रियता ढासळली.

महंमद-बिन-तुघलकने जी जागा निवडली ती पूर्णपणे नापिक होती. शिवाय दिलेला कालखंड हा कमी असल्याने या काळात जास्त उत्पादनाची अपेक्षा करणे हे वेडेपणाचे लक्षण होते. जर अधिकारी वर्गाने प्रामाणिकपणे कष्ट केले असते व उत्पादन वाढीसाठी विविध योजना केल्या असत्या, तर कदाचित उत्पादन वाढले असते. केवळ आधिकाऱ्याच्या चुकीच्या धोरणामुळे ही योजना अपयशी ठरली. त्यामुळे त्याला वेडा म्हणता येणार नाही.

**३) राजधानी बदलण्याचा प्रयोग:** महंमद-बिन-तुघलकने राजधानी स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला तो म्हणजे दिल्ली वरून देवगिरीला राजधानी हलविण्यात आली. त्याची कारणे पुढील प्रमाणे.

**राजधानी स्थलांतराची कारणे:**

१) देवगिरी हे ठिकाण साम्राज्याच्या मध्यावरती होते. त्यामुळे सर्व साम्राज्यावर नियंत्रण ठेवता येईल या अपेक्षेतून राजधानी बदलली.

२) सीमा प्रदेशातून सतत मोगलांचे आक्रमण होत होते. राजधानी सुरक्षित ठेवावी या उद्देशाने महमंद-बिन-तुघलकने राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

३) दिल्लीमधील लोक सुलतानाची प्रचंड निंदा करत होते. त्यामुळे त्याचा स्वाभिमान दुखावलेला होता. दिल्लीतील लोकांना शिक्षा करावी या उद्देशानेच राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

४) सतत दोन वर्षे दिल्ली परिसरात प्रचंड दुष्काळ पडलेला होता. लोकांचे हाल होत होते. त्यामुळे राजधानी बदलण्याचा निर्णय सुलतानाने घेतला.

५) गंगा-यमुना नदीच्या खोऱ्यात दुष्काळ पडलेला असतना करवाढ केली. त्यामुळे या खोऱ्यातील लोकांनी बंड केले. परिणामी त्यांना शिक्षा करावी या उद्देशाने राजधानी बदलली.

६) खिलजीच्या कालखंडात दक्षिण भारतात मुस्लिम सत्तेची स्थापना झालेली होती. तेथे आपले वर्चस्व कायमचे रहावे ही इच्छा होती. परंतु दिल्लीपासून हा प्रदेश दूर होता. दळण-वळणाच्या साधनांचा अभाव होता. त्यामुळे जर दक्षिणेत बंड किंवा उठाव झाल्यास त्यावर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. यासाठीच राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

७) मोगलांनी पंजाब ताब्यात घेतले तर राजधानी दिल्लीवर आक्रमणाचा धोका होता. तसेच दिल्लीचे महत्त्व ही कमी होऊ लागले परिणामी राजधानी बदलण्याचा निर्णय घेतला.

दिल्ली ते देवगिरी हे अंतर ७०० मैलांचे होते. यावेळी दिल्ली वासियांना आदेश दिला की, 'चलो देवगिरी' त्यामुळे दिल्लीतील सर्व लोक ४० दिवसात ७०० मैल अंतर कापून देवगिरीला पोहोचले. यावेळी दिल्लीमध्ये एक आंधळा, एक लंगडा राहिलेला होता. त्यामुळे सुलतानाने आदेश दिला की, आंधळ्याला ठार मार, लंगड्याची तंगडी दौलताबादला

पाठवा. या प्रवासात हजारो लोक मरण पावले. सर्व लोक देवगिरीला पोहोचले. येथील उष्ण हवामान लोकांना सहन झाले नाही. त्यामुळे लोकांचे अतोनात हाल झाले. लोकांच्यात असंतोष निर्माण झाला. दिल्लीवरून राजधानी हलविल्यामुळे सिमा प्रदेश धोक्यात आला. त्यामुळे राजधानी बदलणे गैरसोयीचे वाटले. त्यामुळे सुलतानाने आदेश दिला की, 'चलो दिल्ली'. यावेळीही प्रवासात हजारो लोक ठार झाले. परिणामी राजधानी बदलण्याचा प्रयोग अपयशी ठरला. राजधानी बदलण्याचा निर्णय बरोबर होता. परंतू त्याने सर्व लोकांचे, प्राणीमात्राचे स्थलांतर केले. म्हणून त्याला लोक वेडा म्हणत होते. परंतु संरक्षणाच्या हेतूने राजधानी बदल्याचा प्रयोग हा अतिशय योग्य होता. हा त्याचा निर्णय त्याच्या शहाणपणाचं लक्षण होत.

४) **सोन्या ऐवजी तांब्याची नाणी चलनामध्ये आणली:** मध्ययुगीन कालखंडामध्ये चलन व्यवस्थेत सुधारणा करणारा पहिला सुलतान महम्मद-बिन-तुघलक होय. राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर प्रचंड पैसा लोकांना वाटला. त्यामुळे तिजोरीवर ताण पडला. अतिशय महत्त्वाकांक्षी आणि विविध योजना राबविण्याचा छंद होता. यासाठी पैशाची गरज होती. सोन्याऐवजी चांदीची नाणी बनवणे अशक्य होते त्यामुळे व्यवहारात सोन्याच्या नाण्याऐवजी तांब्याची नाणी आणली. धातू चलन व्यवस्थेत अनेक बदल झाले. चीन, इराण या देशात कागदी चलन सुरू करण्यात आले. परंतु जगाच्या बाजारात त्याचे स्थान कमी होते. या संभाव्य धोका टाळण्यासाठी सुलतानाने सोन्याऐवजी तांब्याची नाणी बाजारात आणली. १ सोन्याचे नाणे – १०० तांब्याची नाणी, सुलतानाने आदेश दिला लोकांनी तांब्याची नाणी दरबारात जमा करावी व सोन्याचे नाणे घेऊन जावे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीतील सोन्याची नाणी कमी झाली. तांब्याची नाणी वाढली. जागतिक बाजारपेठेत तांब्यांच्या नाण्याला किंमत नसल्याने त्याची योजना अपयशी ठरली.

### ४.२.३ महंमद-बिन-तुघलकच्या योजनांच्या अपयशाची कारणे:

१) **सुलतान स्वतःच जबाबदार:** सुलतानाच्या योजना अतिशय चांगल्या होत्या, परंतु सुलतान अतिशय उतावळ्या स्वभावाचा. योजनेवर कधीही गंभीरपणे विचार केला नाही. निर्णय घेतला की. तात्काळ अंमलबजावणी करत असे. आवश्यक समजुतदारपणा, व्यरहारिकपणा बुद्धी, माणसांचे पारख करण्याची कला नव्हती. तो विलक्षण हेकेखोर असून, अतिशय रागीट होता. त्याच्या या स्वाभावाचा परिणाम या योजनेवर झाला. त्यामुळे योजना अपयशी झाली.

२) **धर्मगुरू किंवा स्वकियांच्यामध्ये विरोध:** महमंद-बिन-तुघलकने धर्मक्षेत्रात उदारमतवादाचा पुरस्कार केला. राजकारणात धर्माचे, उलेमाचे वर्चस्व नष्ट केले. अनेक उलेमाना कठोर शिक्षा केली. त्यामुळे हा वर्ग सुलतानाच्या विरोधात गेला. त्याने सामान्य जनतेमध्ये सुलतानाचा अपप्रचार केला. त्यामुळे लोकांच्याकडून विरोध झाला. परिणामी राजसत्तेला धर्मगुरू, सामान्य जनता यांचे प्रेम मिळाले नाही.

३) **योजना काळाच्या पुढच्या होत्या:** सुलतानाच्या योजना काळानुरुप नव्हत्या. त्या सर्व सामान्य लोकांना सहज समजणाऱ्या नव्हत्या. योजनेच्या उद्देश चांगला होता, परंतु प्रजेला न समजल्याने त्यांचे सहकार्य मिळाले नाही. तांब्याच्या नाण्याचा प्रयोग न

समजल्याने लोकांनी त्याला सहकार्य केले नाही. त्यामुळे सुलतानाला कठोर निर्णय घ्यावा लागला. परिणामी लोक अधिक चिडले, त्यामुळे योजना अपयशी ठरल्या.

४) **बुद्धीमान व प्रामाणिक अधिकाऱ्यांचा अभाव:** महंमद-बिन-तुघलक प्रचंड क्रूर असूनही, त्याच्या काळात प्रशासन आणि लष्कर यंत्रणेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारी आणि अप्रामाणिक अधिकारी वर्ग होता. त्याने सुलतानाच्या योजनेला कधीही साथ दिली नाही. प्रशासकीय योजनेचे अपयश आले. त्यामध्ये लाचलुचपत भ्रष्टाचारी अधिकारी जबाबदार होते. ज्या विविध योजना राबविण्यासाठी पैसा उपलब्ध केला. त्यातला बराचसा पैसा अधिकाऱ्यांनी खावून टाकला. परिणामी पैशाअभावी योजना पूर्ण करता आल्या नाहीत. त्यातूनच अपयश आले.

५) **प्रजेचा विरोध:** सुलतानाने नवीन योजना अंमलात आणल्या, यासाठी पैशाची गरज होती. त्यामुळे त्याने अनेक नवीन कर प्रजेवर आकारले. या कर वाढीच्या संकटामुळे प्रजा अतिशय दु:खी झाली. परिणामी सुलतानाच्या योजनेला त्यांनी विरोध दर्शविला. त्यामुळे सुलतानाला प्रजेला विश्वास संपादन करता आला नाही.

६) **नैसर्गिक आपत्ती:** सुलतानाने ज्या योजना अंमलात आणल्या, त्याला निर्सगाने ही साथ दिली नाही. गंगा-यमुना खोऱ्यामध्ये कर वाढ केली. त्याचवेळी दुष्काळ पडला. आदर्श कृषि योजनेच्या वेळी प्रचंड पाऊस, बर्फ पडल्यामुळे उत्पादन प्राप्त झाले नाही. या नैसर्गिक आपत्तीमुळे योजना अपयशी ठरली.

७) **परदेशी मुसलमानांचे आगमन:** परदेशातून अनेक मुसलमान स्वतःचे नशीब शोधण्यासाठी भारतात आले. इराक, इराण, अरबस्थान, तुर्कस्थान येथून अनेक मुसलमान आले. त्यांच्यावर विश्वास ठेवून सुलातानाने दरबारात मानाची पदे, अधिकार दिले. त्यांच्यावर विश्वास ठेवला परंतु, आपल्या अनुभवाचा ज्ञानाचा उपयोग करून याच मुसलमानांनी सुलतानाविरोधात बंडखोरी केली.

८) **विशाल साम्राज्य:** सुलतानाच्या काळात प्रचंड साम्राज्य होते. दळणवळणाच्या साधनांचा अभाव असल्याने सर्व साम्राज्यावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. सर्व साम्राज्यावर नियंत्रण शांतता, सुरक्षितात राखण्यासाठी प्रचंड पैसा खर्च केला त्यामुळे योजना अपयशी ठरली.

९) **परस्पर विरोधी गुणांचे महत्त्व:** महमंद-बिन-तुघलक परस्पर विरोधी गुणांचा पुतळा होता. एकाच वेळी बौद्धिक मानसिक गुणाचे चित्रण दिसते. त्याच वेळी त्याच्या स्वभावातील स्थैर्य, लहरी, अंधविश्वास यासारख्या दुर्गुण ही निर्माण होत असे. अशा परस्पर गुणांमुळे योजना अपयशी झाल्या.

१०) **एकपात्री कारकिर्द:** विशाल साम्राज्य आणि त्याचे रक्षण करणे साधी गोष्ट नव्हती. प्रत्येक ठिकाणी स्वतःच निर्णय घ्यावा. लागत होता. एका व्यक्तीच्या कर्तुत्वाला, कार्याला मर्यादा असते. सुलतानाचे ही याचप्रमाणे घडल्याने, त्याच्या सर्व योजना अपयशी ठरल्या.

### ४.२.४ महंमद-बिन-तुघलकवरील आरोप:

महंमद-बिन-तुघलकाची कारकींद ही वादग्रस्त कारकिंद ठरली. त्याच्यवरती भाष्य करणारे इतिहासकारांनी आरोप केले. रक्तपिपासू, लहरी, वेडेपणा, नास्तिक इ. आरोप आहे.

१. **महंमद-बिन-तुघलक वेडा होता काय?:** एलफिस्टन म्हणतो की महमंद-बिन तुघलक थोड्या प्रमाणात वेडा होता. बर्नी म्हणतो की ईश्वराने निर्मिलेला अद्भूत प्राणी म्हणजेच महंमद-बिन-तुघलक होय. महंमद-बिन-तुघलक स्वभावाने उदार, दानशूर होता. तसाच तो कठोर दंडविधान आणि दैनंदिन जीवनात क्रूर कार्य करणारा होता. दररोज त्याच्या वाड्यात मनुष्यवधाच्या घटना घडत असत. त्यामुळे त्याला इतिहासकार वेडे म्हणतात. परंतु ते चुकीचे आहे. त्याच्या योजनेमधील प्रतिभा, बुद्धी याचा विचार केल्यास तो अतिविद्वान होता. त्याची बौद्धिक विचारक्षमता समजण्याइतपत सामाजिक परिवर्तन झालेले नव्हते. त्यामुळे लोक त्याला वेडा किंवा लहरी म्हणत होते.

२. **महंमद-बिन-तुघलक रक्तपिपासू होता:** महमंद-बिन-तुघलक हट्टी, रागीट, उग्र स्वरूपाचा व सत्तीचा विलक्षण भोक्ता होता. आपल्या आज्ञा पाळाव्यात ही त्याची अपेक्षा होती. जो पाळत नसे त्याला कठोर शिक्षा दिली जात असे. त्यामुळे बर्नी म्हणतो, मानवी रक्ताची चटक लागलेली होती. मानवी रक्त सांडवण्यात त्याला आनंद वाटत होता. त्याचा एकही दिवस असा जात नव्हता की, त्यादिवशी मनुष्य वध झालेला नाही. बतुता म्हणतो की, महंमद-बिन-तुघलक रक्तपिपासू असून सृष्टीच्या प्रारंभापासून आतापर्यंत असा माणूसच जन्मलेला नाही. राजमहालाच्या प्रवेशद्वारावर रोज मनुष्यवधामुळे रक्ताची गंगा वाहत होती.

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारत, युरोपात शिक्षेसाठी मृत्युदंडाचीच पद्धत होती. त्या रीतिरिवाजानुसार त्याने अमंल बजावणी केली. बरनी हा उलेया होता. उलेमाचे कारभारातून वर्चस्व कमी केल्याने तो दुःखी होता. त्यामुळे तो सुलतानबद्दल चांगले लिहिण्याचे अपेक्षाच नाही. राज्यात सर्वत्र बंडखोरी होती. तिचा शेवट करणे गरजेचे होते. सर्व बंडखोराच्यावर दहशत बसविण्यासाठी रक्तपात केला. त्याच चुकीचे काय लहान मुल असो अथवा मोठा असो. सर्वांना सारखाच न्याय दिलेला होता. त्यामुळे त्याला रक्तपिपासू म्हणणे चूकीचे वाटते.

४. **महंमद-बिन-तुघलक नास्तिक होता काय?:** महंमद-बिन-तुघलकला काफीर (धर्म बुडविणारा, धर्माच्या विरोधात असणारा) नास्तिक असे म्हटलेले आहे. बरनी म्हणतो, सुलतानाला इस्लाम बद्दल आकर्षण उरले नव्हते. त्याचे आचरण इस्लाम विरोधी होते. बतुता म्हणतो, सुलतान दिवसातून पाच वेळा नमाज पडत असून त्याचा कुराणाचा चांगला अभ्यास होता. धार्मिक कृत्यांच्या बाबतीत अतिशय जागृत होता. सुलतान इस्लाम धर्माचा कट्टर अनुयायी होता. नमाज न पडणाऱ्या मुसलमानांना तो कठोर शिक्षा करत होता. तरीपण उलेमानी त्याला नास्तिक ठरवला. सुलतानाच्या सहिष्णू धोरणाचा अर्थच त्याला समजला नाही. त्यामुळेच त्याच्यावर आरोप केलेच आहेत.

४. **परस्पर विरोधी गुणांचा पुतळा:** डॉ.ईश्वरी प्रसाद म्हणतात, महंमद-बिन तुघलकचे व्यक्तीमत्व अद्भूत होते. त्याच्या परस्पर विरोधी गुण एकत्र होते. एकीकडे राजा कठोरपणे रक्तपात व दुसरीकडे दान धर्म, एकीकडे काटेकोरपणे न्याय व्यवस्था तर दुसरीकडे प्रजेवर अतिशय कर लादून त्यांचे शोषण केले जात असे. महंमद-बिन-तुघलकचे व्यक्तीमत्व हे दैवी, प्रतिभासंपन्न, व्यवहारी, मुर्ख बरोबर नास्तिक औदार्या बरोबर पाशवी कृत्य आदर्शवादाबरोबर निर्भयता असा परस्पर गुणांचा संचय असलेले व्यक्तिमत्व होते. मध्ययुगीन काळात तो सर्वात विदवान, प्रतिभाशाली असून त्याच्या योजना मुर्खपणाच्या नव्हे तर कुशाग्र बुद्धीच्या व्यापक दृष्टीच्या होता त्या लोकांना समजल्या नाहीत. त्यामुळे अपयशी ठरल्या.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- महंमद तुघलकची राजधानी बदलण्याचा प्रयोग सांगा.

## ४.३ सय्यद घराणे (इ.स.१४१४-१४५१)

फिरोजशहा तुघलकचे वारस अत्यंत दुर्बल, चैनी, विलासी, अकार्यक्षम निघाले, त्याचा फायदा प्रांतिक गव्हर्नरांनी उठविला व अनेक ठिकाणी बंड करण्यास सुरूवात केली. त्यातूनच छोटी छोटी स्वतंत्र राज्ये निर्माण झाली. तशातच इ.स. १३९८ मध्ये तैमूरने भारतावर आक्रमण केले. सिंधू, सतलज या नद्या ओलांडून त्याने भटनेरच्या किल्ला जिंकला व पुढे दिल्लीकडे कूच केली. त्यामुळे त्याने रस्त्यामध्ये येणाऱ्यांची कत्तल करून विध्वंस करण्यास सुरूवात केली. डिसेंबर १३९८ मध्ये तैमूर दिल्लीमध्ये पोहोचल्यावर (कोणताही विरोध न होता) आपल्याबरोबरच आणलेल्या १ लाख हिंदू युद्धबंद्यांकडून पुढील धोका टाळण्यासाठी त्यांची अमानुष कत्तल केली दिल्लीचा

सुलतान नासिरुद्दीन महमूदने प्रतिकार करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला परंतु त्याला युद्धभूमीतून पळून जावे लागले. पुढे तैमूरने दिल्ली वासीयांची खुलेआम कत्तल केली व शहर सतत पाच दिवस लुटून घेतले. त्याने आपल्या सोबत अगणित संपत्ती लुटून नेली. तैमूरचा मुख्य उद्देश लुटपाट हाच असल्यामुळे पंधरा दिवसांनी त्याने दिल्ली सोडली. समरकंदला परतत असताना त्याने फिरोझाबाद, मीरत, हरिद्वार, कांगडा आणि जम्मू ही शहरे लुटली. परंतु आपल्या पाठीमागे त्याने मुलतान, लाहोर आणि दिपलपूर यांचा राज्यपाल म्हणून खिज खान याची नेमणूक केली.

तैमूरच्या या आक्रमणाने तुघलक घराण्याची सत्ता तर गेलीच परंतु प्रशासनव्यवस्था पूर्णपणे कोलमडली. अराजक व अनागोंदी माजली. त्यामुळे ही सत्तेची पोकळी भरून काढण्यासाठी कोणताही सक्षम प्रशासक नव्हता. तैमूर गेल्यानंतर ताबडतोब नुसरत शाहाने दिल्ली काबीज केली परंतु मल्लू इक्बालने (शूर सरदार) त्याला हाकलून लावले आणि नसिरूद्दीन महसूद यास दिल्लीत परतण्याचे आमंत्रण दिले. परंतु नासिरुद्दीनने परतण्यास नकार दिला आणि आपली सत्ता व सुल्तानशाही पुनर्स्थापित करण्याऐवजी त्याने आपणास चैन विलास व व्यभिचारामध्ये झोकून दिले. इ.स. १४१२ मध्ये नासिरूद्दीनचा मृत्यू झाल्यानंतर दिल्लीमधील सरदारांनी दौलत खान लोदी ह्यास आपला सुलतान घोषित केले. केवल दोन

वर्षाच्या काळातच खिज्रखानाने दौलत लोदीचा पराभव केला व दिल्लीची सत्ता काबीज केली.

### **१. खिज्र खान (इ.स. १४१४-१४२१):**

खिज्र खान हा सय्यद घराण्याचा संस्थापक होता. खिज खानचा समकालीन इतिहासकार सरहींदी याने आपल्या 'तारीख-ई-मुबारकशाही' या ग्रंथामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खिज्र खान हा मोहम्मद पैगंबरांच्या घराण्यातील होता म्हणून त्याने स्वतःस 'सय्यद' म्हणवून घेतले. त्याने स्वतःस सार्वभौम सत्ताधीश न मानता तैमूरचा मुलगा व वाहस शाह रूख याचाच प्रतिनिधी मानून राज्यकारभार केला. आपली संपूर्ण कीरकीर्द त्याने दिल्लीच्या आजूबाजाच्या प्रांतातील विशेषतः दुआबातील सततचे बंड शमविण्यामध्येच घालविली. दिल्लीची सत्ता काबीज केली.

### **२. मुबारक शाह (इ.स.१४२१-१४३४):**

खिज्र खानानंतर त्याचा मुलगा मुबारक शाह दिल्लीच्या गादीवर आला. मात्र त्याने राजाचा किताब धारण केला. त्यालाही बंड व उठावांना सामोरे जावे लागले. त्याने पंजाबातील खोकर, काटेहार, दुआब, मेवाड आणि ग्वाल्हेर येथील हिंदू यांच्याविरोधात मोहिमा राबविल्या. प्रशासक म्हणून मुबारक शाह कनवाळू सुलतान होता. त्याने विद्ववानांना आपल्या दरबारी आश्रय दिला. त्याच्या काळातील अत्यंत मौल्यवान माहिती देणारा ग्रंथ 'तारीख-इ-मुबारकशाही' लिहिणारा सरहींदी हा विद्वान इतिहासकार त्याच्याच दरबारात होता. इ.स. १४३४ मध्ये त्याच्या असंतुष्ट व महत्वाकांक्षी सारवर उल-मल्क नावाच्या वजिरानेच त्याचा कपटाने खून केला.

### **४. मुहम्मद शाह (इ.स.१४३४-१४४५):**

मुबारक शाहच्या खूनानंतर वजिराने सुल्तानाचा पुतण्या व दत्तक पुत्र मुहम्मद शाह यास सिंहासनावर आरूढ केले. परंतु राजकीय परिस्थिती, सततचे बंड व जौनपूर आणि माळवा यांच्याविरूद्ध आक्रमक धोरण स्वीकारल्यामुळे अधिकच गोंधळाची होत गेली. सरहींदचा अफगाण राज्यपाल बहलोल लोदी याने मुहम्मद शाह यास या परिस्थितीमध्ये मदत केली आणि सुल्तानाची मर्जी जिंकली. परंतु बहलोल लोदी महत्त्वाकांक्षी असल्याने त्याने सुल्तानाविरूद्ध लगेच बंड गेले आणि दिल्लीची सत्ता काबीज करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

### **४. अलाउद्दीन आलम शाह (इ.स.१४४५-१४५१):**

सय्यद घराण्याचा शेवटचा सुलतान अलाउद्दीन आलम शाह हा आपल्या पित्यानंतर गादीवर आला. परंतु तो आपल्या वडीलांपेक्षाही अकार्यक्षम असल्यामुळे सय्यद घराण्याची सत्ता अकाली नष्ट होण्यामध्ये त्याने हातभार लावला. इ.स. १४५१ मध्ये त्याने स्वतःच दिल्लीची सत्ता बहलोल लोदी याच्या हाती दिली आणि बदाऊनमध्ये गेला. आपल्या मृत्यूपर्यंत त्याने तेथेच आपले जीवन चैन-विलासात व्यतीत केले.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- मुहम्मद शाहच्या कारकीर्दीवर प्रकाश टाका.

## ४.४ लोदी घराणे (इ.स.१४५१-१५२६):

दिल्लीच्या गादीवर जवळजवळ पंचाहत्तर वर्षे लोदी घराण्याचे राज्य केले. ते मूळ अफगाण वंशाचे होते व अत्यंत शूर, धाडसी, निडर आणि स्वाभिमानी होते. परंतु त्यांच्यामध्ये अनेक गट होते. लोदी हे अफगाण वंशातील एक कूळ होते. तुर्की सरदारांच्या तुलनेत अफगाण सरदारांना अधिकारशाहीच्या अमलाखील राहणे आवडत नव्हते. याउलट आपआपल्या वंश-कुळाच्या स्वतंत्र गटाचे सरंक्षण करून हितसंबंध

जोपासण्याकडेच त्यांचा कल असे. १३ व्या शतकाच्या दुसऱ्या अर्धकात सुलतानशाही सैन्यामध्ये मोठ्या प्रमाणात अफगाण सैनिकांची भरती झाली होती. खिल्जी आणि तुघलक सुलतानांच्या काळात त्यांच्यापेकी अनेक जण महत्त्वाच्या सरकारी व लष्करी पदांवर काम करीत होते. फिरोजशाह तुघलकाच्या काळात तर खूप मोठ्या प्रमाणात अफगाण सरदारांना जाहागीरी (इक्ता) बहाल करण्यात आल्या होत्या. लोदींनी मुलतान व सरहींद या प्रांतामध्ये आपले वर्चस्व स्थापन केले होते. अफगाण (सरकारची) राज्यकर्त्यांची प्रशासनव्यवस्था लोकशाही होती. आपल्यापेक्षा दर्जा आणि शक्ती यांनी वरचढ असलेल्यास आपला सार्वभौम राजा मानण्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती. त्याऐवजी आपल्या जमातीच्या व कुळाच्या प्रमुखास ते ('Primus inter pares') म्हणजे (first among equals) “समानांमध्ये पहिला" म्हणून मान्यता देत असत. त्यामुळेच अफगाणांची राजेशाहीची संकल्पना ही मूळातच क्षीण होती आणि म्हणून आपल्या जमातीचा किंवा कुळाचा प्रमुख, जो कोणी शक्तीशाली, बलाढ्य असेल तोच गादीवर आरूढ होत असे.

### १. बहलोल लोदी (इ.स.१४५१-१४८९):

बहलोल लोदी हा लोदी घराण्याचा संस्थापक असून तो शाहू खेल कुळातील होता. त्याने अफगाण किंवा पठाण राज्याची स्थापना केली व सय्यद घराण्याचा शेवट झाला. बहलोल स्वतः समर्थ व महत्त्वाकांक्षी होता. तरीही सुलतानशाहीत गेलेली सत्ता व प्रतिष्ठा पूर्ववत येणे अवघड आहे याची त्याला जाणीव होती. त्यामुळेच सुलतानशाहीतून फुटून स्वतंत्र झालेले प्रांत लढाया करून पुन्हा जिंकण्यातील अडचणी त्याला माहित होत्या. म्हणून त्याने तो नाद सोडून दिला. तरीही मुलतान, मेवाड व दुआब प्रांतात झालेले उठाव त्याने मोडून काढले.

बहलोल लोदीच्या कारकीर्दीतीत सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे त्याने जौनपूरचे शार्की राज्य जिंकले व सय्यद घराण्याचा अधिकृत दावेदार महमूद शाह याचा दिल्लीवरील हल्ला परतवून लावला. पुढे हुसेन शाह बरोबर सुद्धा अनेक वेळा कधी शांती समझोता तर कधी युद्ध होऊन शेवटी इ.स. १४७९ मध्ये जौनपूर बहलोल लोदीच्या राज्याचा एक भाग म्हणून सामील करण्यात आले. त्याने आपला मुलगा बार्बाक शाह यास जौनपूरचा राज्यपाल म्हणून नेमले. पुढे त्याने काल्पी, धोलपूर आणि ग्वाल्हेर या प्रदेशांवर आपला जम बसविला.

बहलोल लोदीने अफगाण सरदारांबरोबर समान संबंध ठेवून त्यांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवले व आपले सिंहासन सुरक्षित राखले. बहलोल लोदी हा उदार, दानशूर, मानवतावादी

न्यायी आणि तत्पर होता. त्याला सुलतानी थाटमाट आवडत नसे. त्यामुळे त्याने जडजवाहीर व उंची कपड्यांच्या प्रदेर्शन केले नाह. तो जरी विद्वान नसला तरी त्याने आपल्या दरबारामध्ये विद्वानांना आश्रय दिला.

## २. सिकंदर लोदी (इ.स.१४८९-१५१७):

बहलोल लोदीचा दुसरा मुलगा निजाम खान याने 'सिकंदर शाह' या नावाने स्वतःस दिल्लीच्या गादीवर राज्याभिषेक करून घेतला व आपला राज्यकारभार सुरू केला. सिंहासनारूढ झाल्यावर ताबडतोब त्याने आपल्या विरोधकांचा बंदोबस्त करून स्वतःचे आसन स्थिर करण्याचा प्रयत्न केला. त्याने आपला काका आलम खान व त्याचा साथीदार इसा खान यांना शस्त्रे खाली ठेवण्यास लावले. त्याने आपला पुतण्या आझम हुमायून जो गादीसाठी इच्छूक होता त्याचाही बदोबस्त केला. तसेच दुसरा कट्टर विरोधक तातर खान याचाही पराभव केला.

आपले सिंहासन स्थिर केल्यानंतर सिंकंदर शाहाने आपले लक्ष आपला मोठा भाऊ बाईक शाहकडे वळविले. त्यावेळी बार्बाक शाह जौनपूर प्रांताचा राज्यापाल होता. सिकंदर शाहने त्याच्याशी सामोपचाराने घेऊन त्याचे वर्चस्व स्वीकारण्यास सांगितले. परंतु बार्बाक शाहने नकार दिल्यावर सिकंदर शाह ने त्याला खुले आव्हान दिले. त्याने बार्बाक शाहावर हल्ला करून त्याचा पराभव केला. परंतु पुन्हा त्याला जौनपूरचे राज्यपाल पद परत केले. परंतु त्या प्रांतातील पूर्वाश्रमीचा शीर्की राजा हुसेन शाह याने चिथावणी दिल्याने जहागीरदारांनी उठाव केला परंतु तो त्याला दडपता आला नाही. त्यामुळे तो जौनपूर सोडून पळून गेला. शेवटी सिंकदर शाहाने तो उठाव मोडून काढला व पुन्हा बाईक शाहास तेथे आपला राज्यपाल नेमला. त्यानंतर सिकंदर शाहाने बिहार आणि तिरहट जिंकून घेतले आणि बंगालच्या सुलातानाशी मैत्रीचा तह केला. इ.स. १५०५ मध्ये त्याने आगऱ्याची स्थापना केली.

बहलोल लोदीच्या मानाने सिकंदर शाहाने सुलतानशाहीची प्रतिष्ठा आणि शक्ती वाढविण्याचा निश्चय केला होता. त्यासाठी त्याने अनेक नियम व दरबारी शिष्टाचारांची अंमलबजावणी केली. त्यानंतर त्याने 'अमीरांवर' आपले नियंत्रण प्रस्थापित केले. त्याने प्रशासनाचा पुनआढावा घेतला व आर्थिक हिशोबावर व त्याच्या तपासणीवर भर दिला. आर्थिक हलगर्जीपणासाठी मोठा असो की छोटा हे न पाहता त्याने कडक शिक्षा ठोठावल्या. या शिवाय त्याने गुप्तहेर विभागाचे संघटन केले. एवढेच नव्हे तर सरदारांच्या निवासाच्या ठिकाणी त्याने गुप्तहेर नेमले.

सिकंदर शाह हा अत्यंत दक्ष प्रशासक होता. त्याने शेती व व्यापाराच्या विकासास उत्तेजन दिले आणि सार्वजनिक मार्गांची सुरक्षा वाढविली. तो न्यायी, प्रजाहीतदक्ष आणि दानशूर सुलतान होता. त्याने गरीबांना नेहमीच मदत केली. तो स्वतःच एक पर्शियन विद्वान होता. तो लोदी घराण्याचा सर्वांत महान सुलतान होता. त्याने संस्कृतमधील वैद्यकीय ग्रंथांचे पर्शियन भाषते भाषांतर केले व इतरही विद्वानांना राजाश्रय दिला. तरीसुद्धा त्याचा एक महत्त्वाचा दोष म्हणजे तो धार्मिकदृष्ट्या असहिष्णू होता. त्याने अनेक हिंदू मंदिरांचा विध्वंस केला. फिरोजशाह तुघलघाप्रमाणे त्यानेसुद्धा धर्मांतराला (हिंदूंचे मुस्लिमांमध्ये) प्रोत्साहन दिले. त्याने अनेक हिंदूचा छळ केला व त्यांच्यावर कडक निर्बंध लादले. बऱ्याच जणांना त्याने इस्लाम अथवा मृत्यू याबाबतीत हतबल करून धर्मांतर करावयास लावले. जर हिंदूंनी

धर्मांतर करण्यास नकार दिला तर त्यांना मृत्युस सामोरे जावे लागले. त्याच्या ह्या धर्मवेडेपणामुळे हिंदू प्रजा त्याच्यापासून दूर गेली होती.

### ४. इब्राहीम लोदी (इ.स.१५१७-१५२६):

दिल्लीच्या सुलतानशाहीवर राज्य करणारा लोदी घराण्याचा शेवटचा सुलतान म्हणजे सिकंदर शाहाचा मोठा मुलगा इब्राहीम लोदी होय. त्याच्यामध्ये आपल्या वडीलांचे गुण नव्हते व आपली राजकीय सत्ता तो मोठ्या जबरदस्तीने राबवू पाहात होता. त्याचा स्वभाव अतिशय तापट असल्याने त्याच्यामध्ये व त्याच्या अफगाण सरदारांमध्ये अनेकवेळा गैर समज निर्माण झाले. केंद्रीय प्रशासनाचे हुकूम पाळण्यास ते बऱ्याच वेळेस नकार देते होते. त्याचे आजोबा बहलोल लोदी यांनी आपल्यातील कौशल्य, मुत्सद्दीपणा यांच्या जोरावर अफगाण सरदारांना नियंत्रणामध्ये ठेवले होते तर सिकंदर शाहाने आपल्या व्यक्तिमत्वाच्या जोरावर त्यांच्यावर नियंत्रण मिळवले होते. परंतु इब्राहीम लोदीच्या अंगामध्ये आपल्या पूर्वजांसारखे मुत्सद्दीपणा, कौशल्य यांसारखे गुण नसल्यामुळे तो त्या बाबतीत असमर्थ ठरला. त्याच्या मते, त्याला वारसाहक्कानेच सुलतानपद मिळाले आहे. त्यामुळे त्याने कर्तबगार व स्वाभिमानी अफगाण सरदारांवर अनेक कडक बंधने लादली व नियम बनवले. त्यांच्या सुविधा रद्द केल्या. फिरिश्ता असे लिहितो, “इब्राहीम नेहमी म्हणत असे की, सभोवतालचे सर्व लोक ही सामान्य प्रजा आहे आणि सरकारचे नोकर आहेत. अफगाण सरदारांना दरबारामध्ये सुलतानाच्या बाजूला बसण्याची पूर्वीपासूनची व्यवस्था असताना इब्राहीमने त्यांना हातीची घडी घालून उभे राहण्याची सक्ती केली.” त्यामुळे या असंतुष्ट अफगाण सरदारांनी इब्राहीमचा लहान भाऊ जलाल यास गादीवर बसवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. परंतु जलालचे बंड इब्राहीमने मोडून काढले. त्याला पकडून ठार मारण्यात आले. इब्राहीमने अफगाण सरदारांचे बंड करण्याचे अनेक प्रयत्न पुढे हाणून पाडले.

ग्वाल्हेरने सिकंदर लोदीसह पूर्वीच्या सुलतानांचे वर्चस्व मान्य करण्यास नकार दिलेला होता. म्हणून इब्राहिम लोदीने ग्वाल्हेर जिंकण्याचे ठरविले. इब्राहिमने ग्वाल्हेर जिंकण्यासाठी मोठे सैन्य पाठविले. ग्वाल्हेरचा राजा विक्रमजीत याने हल्ल्याला तोंड देण्याचे प्रयत्न केले. परंतु त्याला यश मिळाले नाही आणि शेवटी त्याने किल्ला इब्राहिमच्या सैन्याच्या ताब्यात सोडून दिला. इब्राहिमचे ग्वाल्हेर दिल्ली सुलतानशाहीच्या साम्राज्यात सामील करून घेतले व विक्रमजीत यास शमसाबादची जहागीर देण्यात आली. ग्वाल्हेरच्या मोहिमेत यश मिळाल्याने इब्राहीमने शूरवीर राणा संग यांचे मेवाड जिंकण्याची मोहिम ठरविली मुस्लिम साधन स्त्रोतानुसार, इब्राहिमने मेवाड जिंकले होते. परंतु राजपूत इतिहासकारांच्या मते, राणा संगाने इब्राहीमचा पराभव केला होता.

पुढे इब्राहिम लोदीला अफगाण संघर्षास सामोरे जावे लागले. इब्राहिमने सरदारांची निघृण कत्तल केल्यावर सर्वत्र अफगाण सरदारांनी उठाव करण्यास सुरूवात केली. बहादूर शहाच्या नेतृत्वाखाली बिहार स्वतंत्र झाले. पंजाबाचा राज्यपाल दौलत खान

लोदी आणि इब्राहीमचा काका आलम खान यांनी इब्राहीमला दिल्लीच्या गादीवरून दूर करण्यासाठी भारतावर आक्रमण करावे असे निमंत्रन आपल्या दूतांकरवी काबूलचा राज्यकर्ता बाबर यास पाठविले. शेवटी इ.स. १५२६ मध्ये बाबरने भारतावर आक्रमण केले. इब्राहिम लोदीचा पराभव केला व त्याला ठार मारले. ते युद्ध 'पानीपतचे पहिले युद्ध' म्हणून

मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. या युद्धाने दिल्लीच्या सुलतानशाहीचा आणि लोदी घराण्याचा व मुघल साम्राज्याचा उदय झाला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- १) लोदी सुल्तान म्हणून प्रामुख्याने कोणास नेमले जाई?

प्रश्न- २) सिंकदर लोदीने सुलतानशाहीची प्रतिष्ठा कशी वाढवली?

## ४.५ सारांश

गुलाम घराण्यानंतर दिल्लीच्या सिंहासनावर खिलजी व तुघलक घराण्याची सत्ता स्थापन झाली. अल्लाउद्दीन खिलजीने प्रशासनात आपला दरारा निर्माण केला. त्याबरोबर उत्तर-दक्षिण भारतावर सत्ता स्थापन करणारा पहिला सुलतान होता. महंमद तुघलकने अभिनव प्रयोगाच्या माध्यमातून आर्थिक सुधारण्याचा व प्रशासकीय बदल करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये अपयश आल्याने त्याच्यावर टिका झाल्या. फिरोजशहा तुघलकने अनेक सामाजिक सुधारणा करून स्थैर्य निर्माण केले.

वरील प्रमाणे पाहिल्यास सय्यद घराण्याने ३७ वर्षे दिल्लीच्या गादीवर राज्य करण्याचे कसेबसे प्रयत्न केले. परंतु त्यांचे सुलतान अत्यंत अकार्यक्षम, चैनी व विलासी निघाल्यामुळे शेवटच्या सुलतान अलाउद्दीन आलम शाहाने आपली सत्ता बहालोल लोदीच्या हाती दिली. त्यानंतर आलेल्या लोदी घराण्याने दिल्लीवर ७६ वर्षे राज्य केले व बऱ्यापैकी स्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न केले. परंतु अंतर्गत बंडाळ्या, उठाव यांनी त्यांना नकोसे केले व शेवटी इ.स. १५२६ मध्ये पानीपतचे पहिले युद्ध होऊन मुघल आक्रमक बाबरने इब्राहीम लोदीचा पराभव करुन नवी घराणे शाही “मुघल साम्राज्य” या नावाने स्थापन केली.

## ४.६ प्रश्न

१) तुघलक घराण्याचा उदय कसा झाला ते सांगून महंमद-बिन-तुघलकाचे साम्राज्य विस्ताराचे धोरण स्पष्ट करा.

२) महंमद-बिन-तुघलक याच्या योजना काळाच्या पुढील असूनही त्यात त्याला यश का आले नाही?

३) महंमद-बिन-तुघलकाला इतिहासात ‘वेडा महंमद’ म्हणतात या विधानाशी आपण सहमत आहात काय? याचे विश्लेषण करा.

४) सय्यद घराण्याची माहिती लिहा.

५) लोदी घराण्याची स्थापना व विनाश यावर भाष्य करा.

## ४.७ संदर्भ

१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****

# ५

# दिल्ली सल्तनतकालीन प्रशासन

**घटक रचना**


५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ सुलतान कालीन केंद्रिय प्रशासन व्यवस्था

५.३ प्रांतीय प्रशासन

५.४ स्थानिक प्रशासन

५.५ सुलतानशाहीतील महसुल

५.६ सुलतानशाहीतील न्याय व्यवस्था

५.७ सुलतान कालीन सैन्य व्यवस्था

५.८ सारांश

५.९ प्रश्न

५.१० संदर्भ


## ५.० उद्दिष्टे

१) सुलमान कालीन केंद्रिय व प्रांतीय प्रशासनाची माहिती घेणे.

२) सुलतान कालीन महसूल व्यवस्थेचे वर्णन करणे.

३) सुलतान कालीन न्याय व्यवस्था व लष्कर व्यवस्थेतील माहिती सांगणे.

## ५.१ प्रस्तावना

१२०६ ते १५२६ हा कालखंड सुलतानाशाहीचा कालखंड मानला जातो. या काळात दिल्लीच्या सिंहासनावर गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी इत्यादी घराण्यातील सत्ताधिशांचे वर्चस्व होते. २१ एप्रिल १५२६ च्या पहिल्या पानिपत युद्धात लोदीचा पराभव होऊन सुलतानशाहीचा शेवट झाला. त्यांचे प्रशासन अतिशय उत्तम होते. या सुलतानशाहीच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती विविध साधनातून मिळते. ही साधने फारसी अरबी भाषते लिहिलेली आहे. हसन निझामीचा ताजुल-मासीर, मिनहाज-उस सिराजचा तबकाए-ए नासीरी, झियाउद्दीन बरनीचा-तारीख-ए-फिरोजशाही, अमीर खुस्रोचा खजायम-उल फतुह, शम्सए-सिराज अफीरचा-तारीख-ए-फिरोजशाही, मोरोवकोचा प्रवासी इन्नबतुताचा-किताब-उल-राहता, याहा-बिन-अहमदचा तारीख-ए-मुबारकशाही या ग्रंथाचा साधन म्हणून उपयोग होतो. त्याचप्रमाणे शासकीय पत्रव्यवहार, मांडलिक व सुभेदार यांचा पत्रव्यवहार, विविध कारणांसाठीचे विविध आदेश यांच्याआधारे मुलकी प्रशासन व्यवस्थेची माहिती मिळते. सुलतानशाही काळातील वास्तुकला, शिल्पकला यांच्या अवशेषांवरून

माहिती मिळते. सुलतानशाही काळातील प्रशासनाचे केंद्रिय प्रशासन, प्रांतीय प्रशासन व स्थानिक असे तीन विभाग आहेत.

## ५.२ सुलतान कालीन केंद्रिय प्रशासन व्यवस्था

**१) सुलतान आणि त्याचे कार्य:** भारतात राज्य स्थापन करण्यापूर्वी मुस्लिम राज्यकर्त्यांनी सुलतान ही पदवी धारण केली होती. त्याचा अनेक अर्थाने उल्लेख केला जातो. कुराणामध्ये सुलतानचा उल्लेख भाववाचक रूपात केलेला आहे. प्रथम हिजरी शताब्दींच्या शेवटपर्यंत प्रांताचा गव्हर्नरच्या रूपात उल्लेख केलेला आहे. खिलाफतीचे विभाजन झाल्यावर अनेक प्रांतात स्वातंत्र्य घोषित केले. त्यांनी सुलतान ही उपाधी धारण केली. भारतात महंमद गझनीच्या वेळी सुलतान म्हणजे स्वतंत्र शासक असा त्याचा अर्थ होता.

सुलतान हा स्वतःच्या प्रदेशात अध्यक्ष/प्रमुख, सर्वोच्य, सेनाध्यक्ष, विधिनिर्माता, मुख्य न्यायाधिश समजत होता. राज्याची सर्व शक्ती त्याच्या हातात होती. त्यामुळे तो अनियंत्रीत सत्ताधारी होते. मुस्लिम कायदा शास्त्रानुसार सुलतानाचे पुढीलप्रमाणे कार्य.

१) इस्लामाचे रक्षण करणे

२) लोकांचे वाद मिटवणे.

३) भूप्रदेशाचे संरक्षण करणे

४) फौजदारी कायदे लागू करणे व बनवणे

५) मुस्लिम राज्यावर आक्रमण करणारांशी युद्ध करणे.

६) काफिरांच्या विरोधी जिहाद पुकारणे.

७) सर्व कर एकत्रित करणे

८) सार्वजनिक कोषातून योग्य लोकांना भत्ता देणे.

९) न्याय व सार्वजनिक कार्य करण्यास मदत करणारा अधिकारी नेमणूक करणे.

सुलतान स्वतःला ईश्वराचा प्रतिनिधी मानत असे. सैद्धांतिक दृष्टिकोणातून असे समजले जाते की, सुलतानाने कुराणाच्या नियमानुसार शासन चालवावे. परंतु व्यवहारात सुलतानांची हिंदूबाबत ही निती वापरली नाही. त्यांच्यावर अनेक प्रकारचे अत्याचार केले. हिंदुची पवित्र स्थाने अपवित्र करणे. धर्माच्या नावावर अधिकार व कर लादणे. म्हणजे सुलतानाची सत्ता निरंकुश होती. सुलतान हा प्रशासन यंत्रणेतील सर्वश्रेष्ठ होता. शासनाची सर्व शक्ती त्याच्या हाती होती. सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे, बढती देणे, वेळप्रसंगी त्यांना पदच्युत करणे. त्याचा शब्द हा अंतिम निर्णय मानला जात असे. सुलतानाला राज्यकारभारात अनेक लोकांची गरज असे. आपल्या स्वार्थाच्या व हिताच्या रक्षणासाठी अमीरवर्गाची मदत गरजेची होती. उलेमावर्गाचा मुस्लिम समाजावर प्रभाव असल्याने, त्याची

मदत गरजेची होती. बल्बन, अल्लाउद्दीन खिलजी, नासिरूद्दीन, खुस्त्रोशाह, महंमद तुघलक या सुलतानांनी उलेमाच्या वर्चस्वाला विरोध केला.

सुलतान प्रशासनात सैनिकी प्रशासनाला महत्त्व होते. त्यांच्या मदतीने राज्यात शांतता सुव्यवस्था ठेवणे. प्रशासन चालवणे. युद्धाचे नेतृत्व करावे लागत असे. राज्याच्या उत्पादन वाढीसाठी कर बसवणे, अनेकांना शिक्षा करणे, न्यायदान करणे. न्यायदान क्षेत्रातील सर्वोच्च अधिकारी होता. त्यांना काझीची मदत घ्यावी लागत असे. बलबन हा पहिला सुलतान होता की, त्याने न्यायदानाकडे प्रथम लक्ष दिले. इब्ज बतुताच्या मते महंमद तघलक आठवड्यात दोन दिवस दिवान-ए-खान मध्ये न्यायालय भरवत असे. सुलतान आपल्या प्रजेवर प्रभाव पाडण्यासाठी भव्य दरबाराचे आयोजन करीत असे. दरबारात येणे-जाणे याचे नियमानुसार पालन करावे लागत. सुलतान शेकडो दास-दासी ठेवत असे. सरदार मंडळी अनेक भेटवस्तू देत असे. त्याचे एकंदरीत जीवन विलासमय असे. मुस्लिम उलेमा, मौलाना यांचा आदर करत असे. सैन्यांची मदत मिळावी या हेतूने "शरा"चे पालन करत असे. राज्यातील व्यवहारीक प्रश्न मजलिए-ए-आम किंवा मजलिए-ए-खलबतच्या समोर ठेवत असे. या दोन्ही सभा म्हणजे सुलतानाला माहिती व सल्ला देणाऱ्या लोकांच्या सभा होत्या. सभेमध्ये सुलतानाचे विश्वासपात्र लोक, मित्र, हितचिंतक नातलग, उच्चाधिकारी असे. राज्याचे चार मंत्री असे. या समितीचा सल्ला सुलतानाला बंधनकारक नसे. सुलतान दुर्बल असेल तर सभा प्रबळ असे.

२) **मंत्रिमंडळ:** सुलतानाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रीमंडळ असे. गुलाम घराण्याच्या काळात वजीर, अरीज-इ-मामलिक, दिवाण-ए-इन्शा, दिवाण रिसालत हे चारच मंत्री होते. कालांतराने या मंत्र्यांच्या संख्येत वाढ झाली. बलबनने मंत्र्यामध्ये कार्यांचे विभाजन केले.

I. **वजीर किंवा दिवाने वजारत:** सुलतान काळात वजीरचे पद स्थायी स्वरूपात होते. गुलामवंशाच्या प्रारंभापासून हे पद होते. तो राज्याचा प्रधानमंत्री व अर्थखात्याचा प्रमुख होता. त्याच्या कार्यालयात दिवाने वजारत असे म्हणत. राज्याच्या इतर विभागावर नियंत्रण ठेवणे. त्याला निश्चित असा पगार होता. राज्याला समृद्ध बनवणे. कर एकत्र करणे, अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करणे. कारखान्यातील वस्तूंच्या नोंदी ठेवले. घोडे, उंट, खेचर, अन्य प्राण्यांची नोंदी करणे, सैन्य व कलाकारं यांना एकत्र करणे, त्यांचा पगार देणे, वाढवणे धर्मसंस्थानांची, विद्वानाची देखभाल करणे. विधवा व अनाथ यांचे रक्षण करणे. सार्वजनिक प्रश्नासंदर्भात निर्णय घेणे. व्यापार व्यवस्थित करणे.

वजीराला त्याच्या कामात मदत करण्यासाठी नायब वजीर हा अधिकारी असे. लेखा-परीक्षा करण्यासाठी मुशरिफ-ए-मुमालिक (महालेखाकार) मुस्लफी-ए मुमालिक (महालेखा-परीक्षक) नावाचे अधिकारी होते. तकाबी कर्जाचे हिशोब मुजूमदार करत असे, जल्लाउद्दीन खिलजीच्या काळात दिवान-ए-वफ्फ हा विभाग सुरू केला. तो खर्च संम्बंधी पत्रांची पाहणी करत असे. अल्लाउद्दीन खिलजीने दिवाण-ए-अमीरा-मुस्तकहराज नावाचा विभाग अर्थ विभागाच्या अंतर्गत सुरू केला. महंमद तघलकने दीवाण-ए-अमीरा-कोही नावाचा विभाग स्थापन केला.

II. **दिवान-ए-आरिज/आरिज-ए-मुमालिक (सैन्य मंत्रालय):** राज्याच्या सैन्य विभागाला दिवाण-ए-आरिज/दिवाण-ए-अर्ज असे म्हणतात. त्याच्या प्रमुखाला आरिज-ए-मुमालिक/सेनापती म्हणत असे. आरिज-ए-मुमालिकचे प्रमुख कार्य सैन्याची भरती करणे, सैन्यात सुव्यवस्था राखणे, व शिस्त राखणे, सैन्य व घोडे यांचा दर्जा चांगला राखणे सुलतानाच्या कार्यक्रमात मदत करणे. त्याच्या आदेशानुसार सैन्याचे नेतृत्व करणे.

III. **दिवाण-ए-इन्शा / दरबारे-खास (पत्रव्यवहार मंत्रालय):** सुलतान काळात दिवाण-ए-इन्शा हा राज्याचा पत्र विभाग होता. त्याच्या प्रमुखाला दरबारे खास/हुबीर असे म्हणतात. याचे प्रमुख कार्य म्हणजे विदेशी राजांना, राज्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांना पाठवणारी पत्र तयार करणे. महत्त्वाच्या पत्रांची नक्कल आपल्याजवळ ठेवत असे सुलतानाचा महत्त्वाचा पत्रव्यवहार तोच पहात असे. पत्रव्यवहार मंत्रालयाला मिनहाजने दीवाण-ए-अशरफ ही संज्ञा दिली आहे. त्याचा अध्यक्ष दबीर-ए-मुमालिक होय. शाही घोषणा व पत्रांचा मसुदा तयार करणे. त्यांच्या मार्फत सुलतानाचे आदेश सर्वांना पाठवणे. या कार्यालयात अनेक सचिव असे त्यांना डबीर म्हणतात. डबीरच्या अध्यक्षाला सदरूल मुहक म्हणत असे. सुलतानाच्या खाजगी डबीरला डबीर-ए-खास म्हणत. त्याचे काम म्हणजे सुलतानाबरोबर रहाणे, पत्रव्यवहार पहाणे. फतहनामा लिहिण्याचे कामही तोच करत असे. साहिब-ए-दीवाण-ए-इंशा हा सुलतानाच्या घनिष्ठ संबंधात असून सर्व राजकीय रेकॉर्ड सांभाळत असे. दीवाण-ए-इंशाचे कार्य अतिशय गुप्त चालत असे. म्हणून याचा प्रमुख हा सुलतानाचा विश्वासातील असे.

IV. **दिवाण-ए-रसालत - (परराष्ट्रीय मंत्रायल):** या विभागाबाबत इतिहासकारांच्यात मतभेद आहेत. प्रो. हबीबुल्लाच्या मते, “परदेशी बाबींच्या संदर्भात हा विभाग होता. परदेशी पत्रव्यवहार, राजदूत पाठवणे व आलेल्या राजदूतांचे स्वागत करणे हे काम होते. डॉ.कुरेशी यांच्या मते, “या विभागाचा संबंध धार्मिक विषय व धार्मिक व्यक्ती, विद्वान यांना मदत करणे.” परंतु डॉ. आशीर्वादाला, प्रो. हबीबुल्ला यांना हे मान्य नाही.

V. **सद्रस-सुदूर (धर्मादाय खाते):** सुलतान काळात सदुस-सुदूर हा धार्मिक विभाग असून त्याचा प्रमुख मुख्य काझी होता. त्याचे प्रमुख कार्य म्हणजे प्रजा कुराणानुसार जीवन जगते का? हे पहाणे धर्मपंडित, धार्मिक संस्था, शाळा, गोरगरीबांना, अनाथ यांना आर्थिक मदत करणे.

VI. **दीवाण-ए-काझा (न्याय मंत्रालय):** सुलतान काळात न्यायदान करण्यासाठी स्वतंत्र विभाग असे त्याला दीवाए-ए-काझा असे म्हणत त्याचा प्रमुख मुख्य काझी असे. न्यायव्यवस्थेचे तो निरीक्षण करत असे. तो न्यायालय भरवत असे. इतर न्यायालयाकडून आलेली अपील तो एकूण न्याय देत असे.

VII. **वरीद-ए-मुमालिक (गुप्तहेर खाते):** सुलतान काळात हे खाते महत्त्वाचे होते. राज्यातील सर्व माहिती सुलतानाला पुरवणे. अन्य देशातील व राज्यातील घडामोडीची माहिती मिळवणे. ती सुलतानाला पुरवणे. इ. कामे करावी लागत असे. डाक चौकियांचा प्रबंध ते करत असे.

**VIII. शाही प्रबंधक:** हा सुलतानाच्या गृह विभागाच्या प्रमुख असे. त्याच्या नियंत्रणाखाली वकील-ए-दर, अमीर-ए-हाजिब, नकीब, सरजांदार, बरीद-ए मुमालिक, दीवाण-ए-बन्दगार इ. अधिकारी असे. ते अधिकारी व त्यांचे कार्य प्रमाणे.

१) **वकील-ए-दर:** शाही महाल कुटुंब आणि सुलतान यांची व्यक्तीगत सेवा करणे. स्वयंपाक घराची व्यवस्था करणे, सुखसुविधा पुरवणे, आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. त्याचा उच्चाधिकारी म्हणजे नायब वकिल-ए-दार होय.

२) **अमीर-ए-हाजिब:** वकील-ए-दरच्या नंतरचा दुसरा अधिकारी होय. त्यालाच अमीर-ए-हाजिब-ए-बारबक असे म्हणतात. हा दरबारातील विधीनायक होता. दरबारी उत्सवांची प्रतिष्ठा राखणे. सुलतान आणि अधिकारी व जनता यांच्या मध्यस्थीचे काम करणे. सुलतान अनुपस्थित असेल तेव्हा नायब बारबक हा अमीर केल्यास राजधानीमध्ये सुलतानाचा नायब म्हणून काम करत असे.

३) **नकीब:** दरबारी समारंभ मध्ये नकीब हा अधिकारी असे. तो राजकीय शोभायात्राच्या पुढे-पुढे चालत असे. त्यांच्या प्रमुखाला नकीब-उल-नकबा म्हणत. तो दरबाराच्या मुख्य दरवाजाच्या उंच चबुतरेवर बसलेला आहे.

४) **सरजांदार:** हा सुलतानाच्या अंगरक्षकांचा प्रमुख असे. डाव्याबाजूच्या अंगरक्षकाला सरजांदार-ए-मेमन तर उजव्या बाजूला असलेल्या अंगरक्षकाला सरंजादार-ए-मेसर म्हणत. बल्बनने सिस्तानी सैनिकांची या पदावर नियुक्त केले होते.

५) **दीवाण-ए-बन्दगान:** फिरोजशहा तघलकच्या काळात गुलामांची व्यवस्था करण्याच्या हेतूने हा विभाग सुरू केला. त्याचा प्रमुख अशहब-ए-दिवाण-ए बन्दगान होय. गुलामाची व्यवस्था करणे ही प्रमुख जबाबदारी होती.

६) **इतर विभाग:** सुलतानकाळात वरील विभाग, मंत्री यांच्या शिवाय अन्य विभाग मंत्री होते ते पुढीलप्रमाणे. दीवाण-ए, अमीर-कोही (शेतीमी), दीवाण-ए मस्तखराज (करवसुल खाते) मजलिस-ए-खलबत (सल्लागार मंडळ) अमीर-ए आखूर (पागाप्रमुख) मीर-ए-इमारत (मुख्य इंजिनियर) हाजीब (तहप्रबंधक) वकील-ए-दार (किल्ल्या बाळगणारा) शेख-अल-इस्लाम (मुख्यधर्मधिश) इ. शासकीय अधिकारी होते.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान कालीन केंद्रिय प्रशासन स्पष्ट करा. उत्तर:

## ५.३ प्रांतीय प्रशासन

सुलतानाची प्रांरभीची वर्ष हे साम्राज्य विस्तार व सुरक्षा या प्रश्नांची सोडवणूक करण्यात गेली. त्यामुळे संपूर्ण राज्याचे त्यांनी विभाजन इक्तामध्ये केले. फारसी शासनाच्या आदेशावर महम्मद गझनीने पंजाबमध्ये इक्ता सुरू केला. खलिफाने आपल्या राज्याचे विभाजन इक्ता मध्ये करून अमीर किंवा आमीलो (गव्हर्नर) यांनी नेमणूक केली. त्यांच्याकडे आवश्यक प्रशासन व्यवस्था, लष्कर, महसूल याची जबाबदारी सोपवली. गुलाम वंशाच्या

काळात प्रांतीय शासन व्यवस्थेचा साचा साधा सुधा बनवला त्याचा प्रमुख अधिकार सैनिकी होता. अब्बासी खलिफाने आपले राज्य इक्तादारकांच्या स्वाधीन केले. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात इक्ता बंद करून त्या ऐवजी सुबा तयार करण्यात आला. प्रारंभीच्या काळातील इक्ता म्हणजेच नंतरच्या काळातील सुबा किंवा प्रांत होय. खिलजीच्या काळात ११ तर महंमद तघलकच्या काळात २३ प्रांताची संख्या होती. या इक्तादारांचे तीन प्रकार केलेले होते.

**१) इक्तादारांचे प्रकार:**

I. **इमारत-ए-खास:** या प्रातांना अमर्यादित अधिकार होते. त्यांना राज्यपालाचा दर्जा होता. या इक्तादाराचे कार्य म्हणजे, सैनिकी कामकाज पहाणे. मक्का यात्रेची तयारी करणे. शुक्रवार व ईदच्या सार्वजनिक नमाजाचे नेतृत्व करणे. काफिरांच्या विरोधी पुकरणे. लुटीच्या संपत्तीची वाटणी सैनिक व सरकारी कोषात १/५ इतकी करणे. सार्वजनिक सुरक्षा राखणे. कर बसवणे व गोळा करणे इ. अधिकार होते.

II. **इमारत-ए-आम:** या वर्गातील इक्तादारांना मर्यादित अधिकार होते. केवळ सैनिकांची देखरेख करणे, बंडवाले व गुन्हेगारांना शिक्षा करणे. गृहसुरक्षा ठेवणे, त्यांना न्यायदान, नमाजाचे नेतृत्व, काजी-महसुल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार फौजदारी खटल्यात त्यांचा अधिकार होता.

III. **इमारत-ए-इस्तिला:** वरील दोन इक्तदार/गव्हर्नर शिवाय विधि-शास्त्रांचा तिसरा इक्तदार होता. हे पद अनाधिकार स्वरूपात प्राप्त झाले. ही व्यक्ती गव्हर्नर कायदा स्वीकार करण्यासाठी असे. एक प्रकारे इस्लामच्या आध्यात्मिक नेता असे. त्याला शपथ/प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. खलीफाच्या सम्मान व वैभवाची सुरक्षितता राखणे, सार्वजनिक स्वरुपात खलिफाचे प्रति समर्पण प्रदर्शन करणे. खलिफामार्फत धार्मिक पदावर, काजी व ईमामचा सन्मान राखणे. सुलतान काळात तीन प्रकारचे इक्तदारक गव्हर्नर होते. लखनौ दूर असल्यामुळे स्वतंत्र गव्हर्नर स्वरूप अधिकार दिले. बंगालमध्ये अर्ध-स्वतंत्र गव्हर्नर बलबनने नियुक्त केला. अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिन भारतात वार्षिक कर घेऊन त्यांना अंतर्गत स्वातंत्र्य दिले. याप्रमाणे तीन गव्हर्नरला मान्यता दिला.

२) **सुलतान काळात प्रांताचे वर्गीकरण:** सुलतान काळात राज्यविस्तार प्रक्रियेत प्रांताचे वार्गीकरण वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळ्या स्वरूपात झाले. बलबन, अल्लाउद्दीन खिलजी यांनी राज्यविस्तार करून नवे प्रांत निर्माण केले. मुबारकशाह खिलजीने दक्षिण राज्यावर प्रभाव टाकण्यासाठी मुस्लिम गव्हर्नरची नेमणूक करणयास सुरूवात केली. सुलतान काळात प्रशासन व्यवस्थेसाठी तीन प्रकारचे प्रदेश होते. या तीन प्रकारच्या प्रदेशातून तीन प्रांताचा जन्म झाला. ते पुढील प्रमाणे.

I. **मुलतान, पुर्व पंजाब किंवा दोआब प्रदेश:** हा प्रांत लहान असून सुलतानाचे नियंत्रण अधिक होते. या प्रांताच्या गव्हर्नरला वली किंवा मूक्ती म्हणत असे. हे इमारत-ए-आमचे अधिकार उपभोग असे.

II. **गुजरात, माळवा, बिहार व बंगाल प्रदेश:** हा प्रांत केंद्रापासून दूर सुलतानाच्या व्यक्तीगत नियंत्रणापासून मुक्त होता. या प्रांताच्या गव्हर्नरला वली किंवा नायब म्हणत असे कधी-कधी सुलतान ही संज्ञा धारण करत असे. इमारत-ए-खासचे अधिकार उपभोगात असे. बलबनच्या भाऊ बुरगखान याने सुलतान ही संज्ञा बंगालच्या गव्हर्नर असताना धारण केली होती.

III. **करद राज्य:** नाममात्र सुलतानाच्या नियत्रंणाखाली होता. हे स्वायत्तराज्य असून सुलतानाला कर देत असे. समकालीन इतिहासकार प्रांत या शब्दाचा उल्लेख करत नाही, तर राज्याचे विभाजन “इक्ता" व विलायन शब्दाने दाखवले आहे. हा शब्द मध्य अशियात प्रचलित होता. त्याला तुर्कांनी आपला बनवला. रेवर्टीच्या जहागीरच्या रूपात याचा उल्लेख केला आहे. इक्तामध्ये सुलतानाचा अधिकार होता. प्रो.कुरेशी यांच्या मते मुक्ती (इक्ताचा अधिकारी) शब्दाचा प्रयोग गव्हर्नरसाठी केला जात असे. वली शब्द केवळ असाधारण शक्ती असणाऱ्या गव्हर्नरसाठी आहे.

**३) प्रांतीय अधिकारी:**

i. **गव्हर्नर/मुक्ती/राज्यपाल:** सुलतान काळात प्रांताचा प्रमुख गव्हर्नर मुक्ती असे. त्याची नेमणूक केंद्र सरकारकडून होत असे. प्रांताचे लोक त्याच्या विरूद्ध सुलतानाकडे तक्रार करत असे. गव्हर्नरवर सर्व नियंत्रण सुलतानाचे असे. हा प्रांताच्या राजधानीमध्ये रहात असे. त्याच्या अनुपस्थितीत नायब काम पहात असे. अलतमशने कनौजला नायब गव्हर्नरची नियुक्ती केलेली होती. गव्हर्नरचे वेतन एकूण उत्पादनाच्या १/२० भाग कमिशन म्हणून दिले जात असे. सुलतानाच्या प्रांरभीच्या काळात गव्हर्नरच्या अधिकाराखाली सैनिक व महसूल विभाग होता. आपल्या प्रांतात शांतत, सुव्यवस्था राखणे, सुलतानाला गरजेप्रमाणे लष्कर पुरवणे. युद्धाच्यावेळी सैन्य पाठवणे. प्रजेकडून कर वसूल करणे. सुलतान कमकुवत असल्यास गव्हर्नर स्वतंत्रपणे वागत असे. बलबन व अल्लाउद्दीने खिलजी यांनी गव्हर्नरवर पूर्ण नियंत्रण ठेवले होते. महंमद तुघलक व फिरोजशहा तुघलकच्या काळात गव्हर्नर स्वतंत्रपणे वागत असे.

ii. **साहिब-ए-दिवाण:** हा प्रांताचा वित्त विभागचा अधिकारी असे. सुलतान, वजीराच्या शिफारशीनुसार त्याची नेमणूक होत असे. अर्थव्यवहार पहाणे हे त्याचे काम. जमा-खर्च तायर करणे, केंद्राला पाठवणे. त्याच्या मदतीसाठी मुस्तरिफ, कारकून होते.

iii. **ख्वाजा:** याची नियुक्ती इक्तामध्ये केली जात असे. परंतु त्या प्रदेशातला कोणत्याही प्रकारातील इक्ता/प्रांत म्हणत नाही. अश्या प्रदेशात त्याची नियुक्ती केली जात. या प्रेदशातील कराचा हिशोब ठेवणे. सुलतानाच्या आदेशानुसार केंद्रिय कोषागारात जमा करणे त्याची नियुक्ती वजीराच्या शिफारशीनुसार सुलतान करत असे. इक्तामध्ये त्याची उपस्थिती म्हणजे गव्हर्नरच्या अधिकारावर एक प्रकारचे नियंत्रण होते.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान कालीन प्रांतिय प्रशासनाची माहिती सांगा.

## ५.४ स्थानिक प्रशासन

१) **शिक (जिल्हा):** प्रांताचे विभाजन जिल्ह्यामध्ये केलेले होते. त्यास शिक असे म्हणत. त्याच्या प्रमुखाला शिकदार असे म्हणत. त्याचे काम आपल्या विभागात शांतता व सुव्यवस्था राखले होय.

२) **परगाणा:** शिकाचे विभाजन परगने मध्ये केलेले असे. त्यामध्ये साधारण ८४ ते १०० खेडी असे. त्याचा प्रमुख चौधरी असे. त्याच्या मदतीसाठी आमल व मुशरफ असे. आमलचे कार्य शांतता राखणे तर मुशरफचे कार्य महसूल वसूल करणे. याशिवाय एक खजाची, दोन कारकून एक कानूनगो इ. कर्मचारी होते. शेतकऱ्यांच्या अवस्थेची माहिती अधिकाऱ्यांना देण्यासाठी चौधरी हा अधिकार असे.

३) **ग्राम/खेड:** परगाण्याचे विभाजन गावात केलेले आहे. प्रशासनातील सर्वात शेवटचा घटक म्हणजे गाव होय. खेड्याचे प्रशासन स्वयंपूर्ण होते. हा सर्वांत छोटा इक्ता होता. कारभार पंचायत करत असे. प्रमुख मुकादम असे. खोत, चौधरी, पटवारी, चौकीदार इ. कर्मचारी होते. नम्बरदारचे कार्य वसुल गोळा करणे व शांतता राखणे. अल्लाउद्दीन खिलजीने शेतसारा वसुल करण्याच्या कामातून मुक्तता केली.

४) **नगरप्रशासन:** मोठ्या शहरास नगर म्हणत असत. नगराचा कारभार पाहण्यासाठी कोतवाल नावाचा अधिकारी असे. नगराचे प्रशासन, सुव्यवस्था इ. कामे करावी लागत असे. त्याच्या मदतीसाठी प्रशासकीय नोकरवर्ग असे.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- स्थानिक प्रशासन स्पष्ट करा.

## ५.५ सुलतानशाहीतील महसुल (REVENUE)

सुलतानशाही काळातील वित्त व्यवस्थेचा आधार म्हणजे शरा व अब्बासिद खलीफांची परंपरा होती. त्याच प्रमाणाने सुन्नी पंथीय पंडिताच्या हनफी संप्रदायावर आधारित आर्थिक धोरण होते. सुलतान कालीन उत्पन्नाची साधने दोन प्रकारची होती. धार्मिक स्वरूपाची व धर्म निरपेक्ष स्वरूपाची.

**१) धार्मिक स्वरूपाची साधने:**

i. **जकात:** हा प्रथम श्रेणीचा कर होता. हा केवळ मुसलमान वर्गाकडून वसूल केला जात असे. त्यालाच सामुहिक रूपात जकात असे म्हणतात. हा धार्मिक कर होता. व्यक्तीच्या एकूण उत्पन्नाच्या १/४ इतका हिस्सा द्यावा लागे, त्याला निसाब असे म्हणतात. त्याची वैशिष्ट्येपूर्ण तत्त्वे.

१) यावर सुलतानाचा पूर्ण अधिकार असे.

२) हा जीवनाच्या मौलिक आवश्यकतेपेक्षा अधिक आहे.

३) ऋणातून मुक्त होणे. जकातीपासून गोळा झालेला उत्पन्न सामाजिक कामे, मशिदीची दुरूस्ती, धार्मिक कार्य करणारे व गरीब लोकांना मदत दिली जात असे. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्या मुस्लिम लोकांकडून हा कर गोळा केली जात असे.

**ii. आयात-निर्यातकर:** आयत-निर्यात संबंधी वस्तुवरही व्यापारी कर बसवला होता. वस्तुच्या किंमतीच्या दोन टक्के मुसलमान व चार टक्के हिंदू व्यापाऱ्याकडून कर घेतला जात असे. घोडे आयातकर मुसमानाकडून ५ टक्के तर हिंदुकडून १० टक्के कर वसूल केला जात असे. इब्न बतूताच्या नुसार सुलतान आयात कराच्या स्वरूपात चौथाई वसूल करत असे. परंतु महमंद तुघलकने तो बंद केला. सिकन्दर लोदीने अन्न-धान्यावरील कर कमी केला. दांगानाह नावाचा कर लागू केला. तो फिरोज तुघलकने तो रद्द केला.

**२) धर्म निरपेक्ष कर:** सुलतान काळामध्ये भूमिकर (असर/उशर), खम्स, खरज, जिझिया इ. करांचा प्रामुख्याने समावेश होतो.

**i. भूमिकर (अशर/उशर कर):** हा महसूल उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. सर्व जमिन सुलतानाच्या ताब्यात होती. प्रारंभीच्या काळात उत्पन्नाचा पाचवा भाग शेतसारा घेत असे. अल्लाउद्दीन खिलजीने १/२ एवढा शेतसारा गोळा केला. साधारण शेतसारा उत्पन्नाचा १/१० टक्के भरावा लागत असे. सर्व जमिनीचे एकूण चार प्रकार होते.

१) खलिसा

२) इक्तमध्ये विभागलेली जमीन, 'मुक्ती'च्या मालकीची असते.

३) तालुक्यातील किंवा खेड्यातील हिंदू प्रमुखांच्या ताब्यात काही जमीन असे. ते स्वत: सुलतानाशी बांधील असत.

४) जमीनीचा चौथा प्रकार म्हणजे मुस्लिम विद्वान व संतांना दान दिलेली जमीन होय.

पहिल्या प्रकारातील जमिनीचा महसूल उपविभागातील अमिल नावाचा अधिकारी, चौधरी, मुकादम यांच्यामार्फत शेतकऱ्यांकडून गोळा करीत असे. केंद्र सरकारमध्ये भरत असे. 'इक्त' मधील महसूल मुक्ती गोळा करीत असे व आपला वाटा काढून घेत, उरलेला महसूल सरकारात जमा करीत असे. वक्फ जमीन किंवा इनाम जमिनीवर कर नसे.

**ii. खम्स कर:** युद्धातील लुटीच्या संपत्तीला खम्स म्हणतात. शराच्यानुसार सर्व लुटीच्या संपत्तीमध्ये १/५ भाग सरकारच्या खजिन्यात जमा करणे व उरलेला ४/५ भाग सैनिकाना समान वाटणे. सुलतानाने निवडलेल्या वस्तूना सफीयाह म्हणत असे. अल्लाउद्दीन खिलजीने. ४/५ हिस्सा सरकारात जमा केला व १/५ हिस्सा सैनिकांना वाटला. जमिनीमध्ये गडलेली संपत्ती प्राप्त झाली तर, ज्यांने शोधून काढली त्याला ४/५ व सरकारला १/५ हिस्सा दिला जात असे. ज्याने ही संपत्ती शोधून काढली. परंतु त्या जमिनीचा तो मालक नसे तर, जमिनीच्या मालकाला ४/५ हिस्सा दिली जात असे. एखादी मुस्लिम व्यक्ती पुत्रहीन मरण पावला तर, त्याची सर्व संपत्ती सरकार जमा केली जात. त्याचप्रमाणे सुलतानाला भेट, नजराणा इ. स्वरूपात वस्तू मिळत असे.

iii. **खिराज कर:** हा शेतीकर असून तो सुलताना मार्फत वसूल केला जात असे. मुस्लिमेत्तर शेतकऱ्यांच्या जमिनीवर ठेवलेल्या करास खिराज असे म्हणतात. तो कर १/१० टक्क्यांपासून १/२ टक्क्यापर्यंत ठेवलेला असे. अल्लाउद्दीन खिलजीने भूमिकर शिवाय घरकर, कुराणकर (गायरानकर) सुरू केला. अफीफच्या सूचीनुसार दिल्लीमध्ये किराजमीन, जजारी, दनमान हा कर लागू होता. किरा जमिन म्हणजे घर व दुकानावरील कर, तो गरीब व विधवाकडून वसूल केला जात असे. १.५० लाख टंका वार्षिक कर वाढला. जजारी म्हणजे प्रत्येक प्राण्याच्या कातडीवर कसाईकडून १२ जीतल कर गोळ करत दनगान म्हणजे जकात नाका कर.

iv. **जिजिया कर:** हा कर मुस्लिमेत्तर म्हणजे हिंदूवर बसविला होता. हिंदूंना जेरीस आणून धर्मांतरास भाग पाडावे. राज्याच्या खजिन्यात भर पडेल. या उद्देशाने हा कर आकारला जात असे. स्त्रिया, मुले, भिकारी, गुलाम, दरिद्री लोक यांना हा कर नसे. इतर लोकांच्या ऐपतीप्रमाणे तीन वर्गात हा कर वसूल केला जात असे. सर्वांत श्रीमंत लोकाकडून ४८ दिरहम, दुसऱ्या वर्गाकडून २४ तर तिसऱ्या वर्गाकडून १२ दिरहाम कर घेतला जात असे. (एक दिरहाम म्हणजे २५ ते ३० पैसे होय.) या करासंदर्भात अनेक इतिहासकारांच्यात मतभेद आहेत. डॉ. कुरेशीच्या मतानुसार मुस्लिम साम्राज्यात मुसलमानेत्तर, हिंदू, ख्रिश्चन वगैरे धर्मीयांना (म्हणजे जिम्मींना) सुरक्षित राहू देण्याचा जिम्मी (हमी) घेण्याबद्दलचा मोबदला होय. काहीच्या मते सैनिक सेवेच्या मोबदल्यात जिझिया घेण्यात येई.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान कालीन महसूल व्यवस्था सांगा.

## ५.६ सुलतानशाहीतील न्याय व्यवस्था

१) **मुसलमान कायद्याच्या आधारभूत गोष्टी:** मुसलमान कायदा कुराण, हदीस, हज्मा, कियास या चार गोष्टीवर आधारित आहे. इस्लामी कायद्याचा मुख्य व आधारभूत स्त्रोत म्हणजे कुराण होय. कुराण नंतरचा दुसरा आधार म्हणजे हदीस किंवा सुन्नाह आहे. एखाद्या घटनेचे कुराणातून समाधान होत नसेल. त्यामध्ये त्याचा उल्लेख नसे. अश्या वेळी मागील न्यायनिवाड्याच्या आधार घ्यावा लागत असे. कायद्यामध्ये प्रविण असणाऱ्या लोकांनी मुस्लिम समाजाच्या हितासाठी त्यांनी बनवलेले कायदे म्हणजे इज्मा होय. वेळोवेळी बऱ्याच कायदेसंहिता तयार करण्यात आल्या. यामध्ये शेवटची संग्रह म्हणजे फतवा-ए-आलमगिरी होय. धर्मशास्त्र हेच न्यायशास्त्रज्ञ होते.

२) **मुस्लिम कायदे:** इस्लामी धर्मशाळा संबंधीचे कायदे केवळ मुसलमानांना लागू असे. या कायद्याचे चार विभागात विभाजन केलेले असे.

१) **दिवाणी कायदे:** याच्या अंतर्गत इस्लामाचे धार्मिक कायदे केवळ मुसलमानासाठीच आणि व्यापारासंदर्भात सर्वांना समान कायदा असे.

२) **भूमि संबंधी कायदा:** अरबांची कर व्यवस्था भारतात सर्वांना लागू करणे.

**३) इस्लामी फोजदारी कायदा:** धार्मिक कायद्याच्या उल्लंघना संदर्भात हा कायदा होता. हा केवळ मुसलमानांना लागू होता.

**४) गैरमुसलमाना संदर्भात:** मुसलमान सोडून सर्वांना त्यांच्या धार्मिक व व्यक्तीगत कायद्यानुसार त्यांना कायदा लागू असे.

**३) न्यायलयाचे प्रकार:** सुलतानशाहीच्या काळात पाच प्रकारची न्यायालये होती. सर्व न्याय व्यवस्थेचा प्रमुख न्यायाधिश सुलतान असे. त्यात्या नियंत्रणाखाली न्यायदानाचे काम चालत असे. न्यायदानाच्या कार्यासाठी दिवाण-ए-काझ हे स्वतंत्र खाते होते. पाच प्रकारची न्यायालये म्हणजे पहिली तीन न्यायालये विशिष्ट प्रकारची होती.

**१) दिवाणी:** फौजदारी खटल्याचे न्यायालय

२) नोकरवर्गाच्या संदर्भातील न्यायालय

३) लष्करी स्वरूपाचे न्यायालय

४) प्रांतिय स्वरूपाचे न्यायालय

५) पंचायत न्यायलय

**४) न्याय व्यवस्थेतील अधिकारी:**

**अ) केंद्रिय न्यायव्यवस्थेतील अधिकरी:**

**१) सुलतान:** सुलतानशाही काळात न्यायसंस्थेचा प्रमुख सुलतान होता. तोच सर्वोच्च न्यायाधीश असे. व्यवहारात सर्व न्यायदानाचे कार्य काझीच्या मार्फत होत असे. कुराण व हदीसच्यानुसार न्यायदान केले जात असे. फौजदारी खटल्याचा निर्णय इस्लाम परंपरानुसार दिला जात असे.

**२) काझी-ए-मुमालिक:** न्यायदानासाठी दिवाण-ए-काझ स्वतंत्र विभाग असे. त्याचा प्रमुख वरिष्ठ काझी म्हणजे काझी-ए-मुमालिक असे. तो सामान्य दिवाणी व फौजदारी खटल्याबाबत मुख्य न्यायाधीश असे. त्याची नेमणूक सुलतान करत असे. सुलतानाचा दरबार आठवड्यातून दोन वेळा भरत असे. त्यामध्ये उच्च स्तरावरील व अपील केलेल्या खटल्याचा निकाल देत असे. सुलतानाला तो राज्याभिषेकांची शपथ देत असे. राज्याचे नियम बनवण्यासाठी सुलतानाला मदत करत असे.

**३) पंडित:** एखादा खटला हिंदू व्यक्तीगत कायद्याच्या अंतर्गत दिवाणी क्षेत्रातील असेल तर तो खटला पंडिता मार्फत चालवत असे. त्याचा दर्जा मुक्ती समान असे.

**४) दिवाण-इ-मझालिम**ः नोकरवर्गाचा खटला चालवण्यासाठी व कज्जांचा निकाल देण्यासाठी एक स्वतंत्र न्यायालय असे. त्याचा प्रमुख दीवाण-इ-मझालिम हा न्यायाधीश होता.

**ब) प्रांतीय न्याय व्यवस्थेतील अधिकारी:** सुलतान काळात प्रांतीय न्यायालय चार प्रकारची होती.

१) सुभेदाराचे/प्रांतधिकाऱ्याचे न्यायालय

२) काझी-ए-सुबा न्यायालय

३) दीवा ए-सुबा न्यायालाय

४) सदर-ए-सुबा न्यायालय.

**१) प्रांतधिकाऱ्याचे न्यायालय:** सुभेदार/प्रांतधिकारी हा सुलतानाचा प्रतिनिधी असे. म्हणून त्याचे न्यायालय हे प्रांतातील उच्च न्यायालय असे. खटल्याची सुनावणी एखह करत असे. अपील अटला काझी-ए-सुबा न्यायालयाकडे पाठवत असे. प्रांतातील इतर न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध प्रांतधिकाऱ्याच्या न्यायलयात अपील केले जात असे. त्याच्या निर्णया विरूद्ध केंद्रीय न्यायालयात अपील करणे प्रांतीय न्याय व्यवस्थेत मुक्ती/प्रांताधिकारी, मुन्सिब, पंडित, ददबक हे प्रमुख होते. पहिले तीन अधिकारी केंद्राशी संबंधीत होते.

**२) काजी-ए-सुब न्यायालय:** या विभागातील न्यायाधिकाराची नेमणूक केंद्रिय काझीकडून सुलतानामार्फत होत असे. प्रांतधिकाऱ्याला प्रशासनाचे काम असल्याने न्यायालय सुरू करण्यात आले. त्याच्या न्यायालयाच्या निर्णया विरूद्ध प्रांतधिकाऱ्यांच्या न्यायालयात अपील केले जात असे. हा दिवाणी व फौजदारी खटले चालवत असे. भूमिसंदर्भातील खटले त्याच्याकडे नसे. परगाण्याच्या काजीवर नियंत्रण ठेवणे. त्यांच्या निर्णयाविरूद्ध अपीलांची सुनावणी चालवणे. इक्तांची देखभाल करणे.

**३) दीवाण-ए-सुबा न्यायालय:** या न्यायालयात केवळ जमिन महसूल संबंधीचे खटले चालवले जात असे. याच्या निर्णयाविरूद्ध प्रांताधिकाऱ्याच्या अथवा केंद्रीय न्यायालयात आपील करता येत असे. जमीन महसूल संदर्भातील निर्णय अमील व इतर महसूल अधिकारी देत असे. त्यांच्या निर्णयाविरूद्ध या न्यायालयात आपील करत असे.

**४) सदर-ए-सुब:** प्रांतीय न्याय व्यवस्थेतील शेवटचे न्यायालय होय. याचे मुख्य कार्य प्रांतातील धार्मिक कार्याची देखभाल करणे. विद्वान व शिक्षण संस्थांना अनुदान देणे. धार्मिक वाद निर्माण झाल्यास ते सोडवले.

**क) स्थानिक न्यायव्यवस्था:** स्थानिक न्यायव्यवस्थेतमध्ये जिल्हा न्यायालय असे शिकदार प्रमुख असे. काजी, कोतवाल, ग्रामपंचायत निर्णय विरूद्ध या न्यायालयात अपील केले जात असे. तालुक्याच्या व शहरात न्यायदानासाठी काझी असे. राजधानी व मोठ्या शहरात कोतवाल हा न्यायदानाचे काम करत असे गावामध्ये पंचायत न्यायदानाचे कार्य करत असे.

**ड) मुहतसीब:** हा न्यायदानाचा अधिकारी होता. जे खटले सामान्य न्यायालयांच्या अधिकार क्षेत्रात येत नसत व ज्यात संबंधित व्यक्ती गुन्हा कबूल करीत नसे. अशा

खटल्यांचा न्याय निवाडा करत असे, गुन्हा कबूल करण्यात आला नाही तर तो खटला काझीकडे पाठविण्यात येई.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान कालीन न्याय व्यवस्थेचे वर्णन करा.

## ५.७ सुलतान कालीन सैन्य व्यवस्था

सुलतानांनी ज्या प्रदेशात आपले राज्य स्थापन केले. तो आचार-विचार, संस्कृती भिन्न होती. या देशातील राजपूत राजांशी व मोगलांशी त्यांना संघर्ष करावा लागत असे. त्यामुळे सुलतानाचे सदैव सैन्य तयार होते. सुलतानशाही अनियंत्रित राजेशाही किंवा एकतंत्री राज्यकारभार असलेली सत्ता होती. त्याचे अस्तित्व लष्करावर होते. सुलतानानी भारतात लष्काराच्या जोरावर राज्य स्थापन केले होते. त्यामुळे उत्तम दर्जाचे व बलवान लष्कर कसे असेल, हाच विचार सुलतानांनी केला होता. अमीर उमराव हे सुलतानाला लष्करासाठी सैनिक पुरवत असे. सुलतान काळातील सर्व सेना अमीर, वलिमा, इक्तादार यांच्या ३ तुकड्या व सुलतानाच्या नेतृत्वाखाली व्यक्तीगत सेना मिळून लष्कर असे.

### १) सुलतानाशाहीच्या काळातील लष्कराचे स्वरूप:

i. **नियमित लष्कर:** या लष्करात असलेले सैनिक हे कायम स्वरूपी सुलतानाच्या सेवेत असत. युद्ध असो अगर युद्ध नसो, हे सैनिक नोकरीत असे. या लष्कराला वजहिस म्हणत असे. सुलतान त्यांना पगार देत असे. हे सैन्य युद्ध प्रसंगी युद्धावर जात असे. इतरवेळी शांतता राखणे, बंड मोडून काढणे. सुलतानाच्या विरोधकांचा नाश करणे म्हणजे सुलतानाची सत्ता टिकवण्यासाठी याचा उपयोग होत असे.

ii. **अनियमित लष्कर:** युद्धाच्या प्रसंगी तात्पुरती सैन्यभरती केली जात असे. त्यांना अनियमित अथवा गैर वजहित लष्कर म्हणत असे. युद्ध संपले की त्याचा कार्यकाल संपत असे. कामावर असे पर्यंत त्यांना पगार मिळत असे.

iii. **राजधानी सेना / हश्म-ए-क्लब:** राजधानीमध्ये सुलतानाच्या हाताखाली लष्कर असे. त्यास हश्म-ए-क्लब असे म्हणत. खास तैनातीसाठी हे लष्कर असे. यामध्ये विश्वासून लोकांना प्रवेश असे. युद्ध प्रसंगी सुलतानाचे रक्षण करण्याची जबाबदारी या लष्कराकडे असे. एक प्रकारचे सुलतानाचे अंगरक्षक (जानदार) होते. सुलतानाच्या व्यक्तीगत गुलामामधून सर-ए-जानदारन याच्या मार्फत सैन्याची निवड करत असे. या लष्कराची संख्या सुलतानाच्या इच्छेनुसार असे.

### २) सुलतान काळातील लष्करी विभाग:

i. **घोडदळ:** सुलतानशाही काळात सर्वात महत्त्वाची सेना म्हणजे घोडदळ होय. मुस्लिम सैन्यात घोडदळ अत्यंत प्रभावी होते. डॉ. सुरेशीच्या मते- प्रभावी घोडदळ अभावी हिंदू राजे पराभूत झालेले आहेत. अल्लाउद्दिन खिलजीजवळ ४,७५००० घोडे होते. महंमद तुलघकचे ३,७०,००० सैन्य होते. सर्व सैन्याची संख्या ९ लाख होती. सैन्य संघटनेकडे प्रथम बलबनने लक्ष दिले. अल्लाउद्दीने खिलजीने सेनेचे केंद्रिकरण केले. फिरोजशहा तुघलकच्या काळात सैनिकी सेवा वंश परंपरागत करण्यात आली.

ii. **पायदल:** सर्वांत जास्त संख्या पायदळात होती. स्थिर युद्ध लढण्यासाठी पायदळ प्रभावी ठरत असे. यामध्ये बरेच गुलाम असत.

iii. **तोफखाना:** या विभागात तोफा, दोरूगोळी, येत असे. किल्ले जिंकण्यासाठी व शत्रूपक्षाची सैन्य रचना उद्ध्वस्त करण्यासाठी तोफखाना प्रभावी ठरत असे.

iv. **आरमार:** सुलतान काळात नाविक दल फार महत्त्वाचे नव्हते. सागरी भागावर आरमार ठेवत असे.

v. **किल्ले:** किल्ला हा सैन्याची महत्त्वपूर्ण शक्ती व राज्याची सुरक्षा असे. या काळात किल्लांचे महत्त्व अतिशय होते. कारण सतत मोगलांचे आक्रमण होत असे. बलबनने उत्तर-पश्चिम सीमनेवर कम्पिल, पटियाली, भोजपूर येथे किल्ले निर्माण करून शक्तीसाठी रक्षक सेना ठेवली होती. अल्लाउद्दीन खिलजीने या किल्लाचा जीर्णोद्धार केला व नवे किल्ले निर्माण केले. प्रत्येक किल्ल्यावर एक आदेशक किंवा कोतवाल असे. तो किल्ल्याची निगा राखत. किल्ल्यावर अनेक मुफरिद असे. त्याचे स्वरूप इंजीनियरसारखे असे. प्रत्येक किल्ल्यावर काजी किंवा मीरदार असे. किल्ला अतिशय विश्वासपात्र व योग्य मीरदाराच्या ताब्यात असे. किल्ल्यावर एख गुप्त मार्ग असे. संकटकाळी तेथून सुरक्षित जाता यावे.

३) **सैन्यरचना व अधिकारी:** सुलतान काळात लष्कराचा कोणीही कायमचा सेनापती नसे. सुलतान स्वतः त्याचा अध्यक्ष व सेनापती असे. प्रत्येक युद्धाच्या वेळी एका सेनानायकाची निवड केली जात असे. त्याचा काळ युद्ध समाप्ती बरोबर संपत असे. सैन्याची व्यवस्था व संघटना रझिया शासन काळात फक्त सेनापतीचा नियुक्ती केलेली होती. सैन्याची व्यवस्था व संघटन करण्यासाठी आरिज-ए मुमालिक व नायब आरिज-ए-मुमालिक हे अतिशय महत्त्वाचे अधिकारी होते. त्यांच्या मार्फत सैनिकांची हजेरी, नोंदी, घोड्यांना डाग देणे, इतर व्यवस्था करणे. अल्लाउद्दीन सदैव युद्धावर नायबला पाठवत असे. त्याचे काम रसद व इतर वस्तूंचा पुरवठा करणे. लुटीचा हिशोब सुलतानाला देणे. आरिज नंतरचा महत्त्वाचा अधिकारी अमीर-ए-आखूर होय. हे पद अतिशय विश्वासातील महत्त्वाच्या व्यक्तीकडे दिले जात. हा जास्त काळ राजधानीत सुलतानाबरोबर असे. सैनिकाजवळ एक घोडा असेल तर त्यास याक आस्प असे म्हणत तर त्याच्याजवळ दोन घोडे असतील त्यास दोन अस्प म्हणत असे. दहा घोडेस्वारांची एक तुकडी असे, त्याचा प्रमुख सरखेल असे. दहा सरखेलावर एक सिपाहसालार असे. दहा सिपाहसालार वर एक अमीर असे. दहा अमिरावर एक मलिक असे. खान हा एक लाख सैन्याचा प्रमुख असे. आरीज-ए-मुमालिक हा युद्धखात्याचा मंत्री असे.

४) **लष्कराची संघटना व शस्त्र:** सुलतानशाही काळात सैन्याचे व्यवस्थापन अतिशय चांगले होते. घोडदळातील सैनिकांची वेशभूषा, आणि शस्त्र तुर्की आदेशावर आधारित होते. घोडा, चौगान खेळास समर्थ असे सैनिक आपल्या सुरक्षेतेसाठी कवच व सिर-रक्षक असे. प्रत्येक सैनिकाजवळ दोन तलवारी, एक खंजीर, तुर्की कमान आणि किस्म असे. रकाब व तरकश अश्या दोन तलवारी असे. हत्तीसेन महत्त्वाची असून प्रभावी होती. बलबन एका हत्तीला ५०० घोडे स्वारीच्या समान मानत असे. महमंद

तघलकजवळ ३ हजार होते. हत्तीला युद्धाचे प्रशिक्षण दिले जात. हत्तीचा उपयोग सैनिक, लाकूड, सामान वहातुकीसाठी करत असे. हत्तीची देखभाल करण्यासाठी शहना-ए-फील अधिकारी असे. पायदल सेनेला पायक म्हणत असे.

सुलतान काळात विविध प्रकारची शस्त्र होती. अग्निबण, भाले, स्फोटक पदार्थ, तोफा (संग-ए-मगरिबि) इ. शस्त्र शत्रूवर मार करण्यासाठी असे. त्याच प्रमाणे तलवार, भाला, खंजीर सुरंग इ. युद्धात उपयोग केला जात असे.

५) **युद्ध संघटना व्यवस्था:** युद्धाच्या वेळी रसद व इतर व्यवस्था बजारोमार्फत केली जात होती. सुलतानाची युद्धनिती परंपरागत होती. युद्ध क्षेत्राची निवड करताना भूप्रदेश, हवा, सूर्य याची काळजी घेत असे. सैन्याची मध्य, उत्तर, दक्षिण म्हणजे भागात व हरावल व चन्दावळच्या स्वरूपात नियोजन केले जात असे. जेव्हा सुलतान स्वतः युद्धाचे नेतृत्व करतो. तेव्हा तो मध्यभागी असे सभोवती उलेमा वर्ग असे. त्याच्या मागे-पुढे धनुर्धारी असे. सर्वांत आघाडीवर हत्तीची तुकडी असे. त्याच्यानंतर घोडेस्वार, त्यानंतर पायदल सैनिक असे. त्यांच्यामध्ये मोकळी जागा असे, त्यातून घोडेस्वार जाऊन शत्रूवर आक्रमण करत असे.

वजीक (स्काऊट) सेना महत्त्वाची असे. हे लष्कराचे डोळे होते. ते गुप्तपणे फिरत असे. शत्रू पक्षात जाऊन बातमी मिळवणे. हे त्यांचे कार्य होते. लष्कराबरोबर एक दवाखाना असे. सुलतानाजवळ दोन प्रकारचे ध्वज असे.

१) डाव्या पक्षात काळा रंगाचा ध्वज, तो अब्बासिद खलिफाचा प्रतिक होता.

२) उजव्या पक्षात लाल रंगाचा ध्वज, तो घोरीचा प्रतिक होता. कुतूबउद्दीन ऐबकने ध्वजावर नव-उदिन चंद्र, परदार, साप, सिंहाची आकृती कोरली होती. फिरोजशहाच्या ध्वजावर परदार साप कोरलेला होता. गियासुद्दीन तुघलक व नासिरूद्दीन खुशरावने माशाचे चित्र कोरले होते. तघलकाच्या काळात एका खानाला ७ व एका अमीराला ३ ध्वज दिले जात असे.

६) **पोलिस व्यवस्था:** सुलतानकाळात पोलिस व्यवस्था कोतवालाकडे सोपवलेली होती. केंद्रिय व प्रांतीय राजधानी, मोठ्या शहरात शांतता राखणे हे काम होते. शहरात चोऱ्या, दंगे, धोके होऊ नये, यासाठी रात्री गस्त घालणे राजमार्गावर पहारा देणे इ. कामे करावी लागत. साम्राज्यात सर्वत्र गुप्तहेरांचे जाळे असे. सर्वप्रकारची माहिती सुलतानाला देणे. सुलतान काळातील प्रशासन व्यवस्थेचे स्वरूप अशा प्रकारचे होते. प्रत्येक क्षेत्रात सुलतानाचा शब्द हाच शेवटचा मानला जाई.

## ५.८ सारांश

सुलतानशाही काळातील सुलतान, त्यांचे कार्य यांचा अभ्यास केल्यावर या काळातील राजकीय प्रशासन कसे होते, याचा अभ्यास करणे तेवढेच महत्वाचे ठरते. सुलतान काळात केंद्रीय व्यवस्था ही सर्वात उच्च दर्जाची मानली जात होती व या व्यवस्थेचा मुख्य सुलतान असे व त्याच्या हाताखाली विविध प्रांतावर नियंत्रण करण्यासाठी प्रांतीय प्रशासन होते. यातही विविध विभागांकडून प्रांतांची कामे व नियंत्रण केले जाई. इक्तापद्धत ही प्रांतांवर लादलेली होती. शेवटचे प्रशासन म्हणजे स्थानिक प्रशासन ज्यात नगर व ग्राम प्रशासनाचा

समावेश होत असे. प्रशासन व्यवस्थेतील महत्वाचे इतर घटक म्हणजे महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था, सैन्यव्यवस्था, सुरक्षाव्यवस्था, पोलीसव्यवस्था या सर्वांचा अभ्यास या प्रकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो.

## ५.९ प्रश्न

१) सुलतान काळातील केंद्रिय प्रशासनाचे वर्णन करा.

२) सुलतान काळातील प्रांतिय प्रशासनाची माहिती सांगा.

३) सुलतान काळातील महसुल व्यवस्था स्पष्ट करा.

४) सुलतानशाही काळातील न्यायव्यवस्थेचे टिकात्मक वर्णन करा.

५) सुलतानशाहीतील लष्कर व्यवस्थेचे स्वरूप सांगा.

## ५.१० संदर्भ

१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयंसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****

# ६

# विजयनगर व बहामनी साम्राज्य

**घटक रचना**


६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ बाहमनी राज्य

६.३ महमूद गवान

६.४ विजयनगरची स्थापना (१३३६)

 ६.४.१ संगम घराणे

 ६.४.२ सलुवा घराणे

 ६.४.३ तुलुवा घराणे

 ६.४.४ विजय नगर सम्राज्याची प्रशासन व्यवस्था

 ६.४.५ सामाजिक व आर्थिक परिस्थिती

 ६.४.६ कला व स्थापत्यकला आणि साहित्य

६.५ सारांश

६.६ प्रश्न

६.७ संदर्भ


## ६.० उद्दिष्टे

१. बहामनी राज्याची माहिती मिळवणे.

२. विजयनगर साम्राज्याची घराणेशाही समजून घेणे.

३. कृष्णदेवरायची कारकीर्द अभ्यासणे.

४. कृष्णदेवराय नंतरच्या विजनगरचा आढावा घेणे.

६. विजयनगर व बहामनी साम्राज्याचे प्रशासन समजून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

विजयनगरचे साम्राज्य हे आपल्या सांस्कृतिक वेगळेपणामुळे बराच काळ उजेडात नव्हते. परंतु उत्तर भारतातील सुलतानशाहीमुळे दक्षिण भारतातील या साम्राज्यावर सुदधा त्याचा परिणाम झालेला आपणास दिसून येतो. अलाउददीनखीलजीचा सेनापती मलीक काफूरचे प्रथमच दक्षिण भारतावर स्वारी केली व तेथील देवगिरी, वारंगळ, द्वारसमुद्र, मुदुराई या राज्यांवर सुल्तानशाहीचा अंमल बसविला. या राज्यांनी फारसा प्रतिकार केला नसला तरीही विजयनगर सारख्या बलाढय साम्राज्याने सुलतानशाही समोर एक आव्हान उभे केले

व वेगळी अशी आपली एक छाप पडली. त्यामुळेच या साम्राज्याचा आपणास स्वतंत्रपणे अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

महंमद बिन तुघलकाच्या कार्यकाळात निर्माण झालेल्या विघटनवादी शक्तींमुळे विजयनगर साम्राज्याच्या स्थापनेस बळकटी मिळाली. विजयनगरच्या स्थापनेविषयी अनेक मतप्रवाह प्रचिलत आहेत. काही तज्ज्ञांच्या मते, विजयनगर साम्राज्याची स्थापना हरिहर व बुक्क यांनी केली व त्याच्या समर्थनार्थ "राज कालिनर्णय" आणि "विद्यारण्य कालज्ञान" या ग्रंथात आलेल्या तपशीलचा आधार दिला जातो. रॉबर्ट सेवेल याने जवळ जवळ सात प्रकारच्या पारंपरिक ऐतिहासिक पुराव्यांचा आधार येऊन विजयनगर साम्राज्याच्या उदयाची माहिती आपल्या 'Forgotten Empire' या ग्रंथात दिली आहे.

## ६.२ बाहमनी राज्य

तुघलक साम्राज्याच्या काळात अनेक बंड झाले. मुहमद-बिन-तुघलकाच्या काळात अनेक परदेशी अधिकाऱ्यांनी (अमीर-इ-सदाह-शत अमीर) त्याच्याविरूद्ध बंड पुकारले आणि दौलताबाद येथे स्वतंत्र राज्य निर्माण केले. त्यांच्यामधील दख्खनचा राजा इस्माईल मुख (अफगाण) यास "नासिर-उद-दीन शाह" नाव धारण करुन आपला सुलतान म्हणून घोषित केले. परंतु वाढत्या वयामुळे त्याने थोड्या काळानंतर (इ.स.१३४६-४७) जफर खान यास "अबुल मुझफ्फर अल्लाऊद्दीन बहामन शाह" (१३४७-१३५८) या नावाने सत्ता बहाल केली. त्याने आपली राजधानी गुलबर्गा येथे नेली. फिरिश्ताच्या मत, "बहामन" हे नाव त्याने आपला पूर्वीच्या मालक गंगू जो ब्राह्मण होता त्याच्याप्रती आदर म्हणून धारण केले. परंतु अधिक विश्वसनीय ग्रंथानुसार म्हणजे निजामुद्दीनच्या "तबकात-ई-अकबरी" नुसार झाफर खान ने आपले नाव आपला पर्शियन राजा "बहामन" याच्यानावानुसार घेतले असल्याचे मानले जाते.

१) **अलाउद्दीन बहामन शाह (१३४७-१३५८):** बहामन शाहचा बराचसा काळ हा युद्ध व तह यांच्यामध्येच खर्ची झाला. त्याने बंडखोरांचा नायनाट केला आणि आपला प्रदेश वैनगंगेपासून कृष्णपर्यंत आणि गोव्यापासून दाभोळ ते भोगिर पर्यंत विस्तारला. त्याने सुद्धा संरजामशाही प्रशासन राबविले. त्याने आपले राज्य प्रमुख चार "तरफ" किंवा प्रांतांमध्ये विभागले. त्यामध्ये १) गुलबर्गा २) दौलताबाद ३) बिदर आणि ४) वहाड, यांचा समावेश होता. त्यांचा कारभार आपले निष्ठावान आमीर (गव्हर्नर) यांच्याकडे सोपविला होता. इ.स. १३५६ मध्ये अलाउद्दीन बहामन शाहने आपल्या राज्यास इजिप्तच्या खलिफाकडून मान्यता मिळविली होती.

२) **मुहम्मद शाह-प्रथम (इ.स.१३५८-७५):** अलाउद्दीन बहामन शाहच्या गादीवर त्याचा मुलगा मुहम्मद शहा-प्रथम हा आला. त्याने आपले आसन स्थिर करण्यासाठी आठ जणांचे मंत्रिमंडळ नेमले. त्याच्यात आणि विजयनगर-वारंगळ राज्यामध्ये सतत संघर्ष चालू होता. आणि त्याचाच परिणाम म्हणून मुहम्मद ने विजयनगर-वांरगळ यांचा पराभव करून त्यांना खंडणी देण्यास भाग पाडले होते. वारंगळच्या राजाकडून त्याला गोवळकोंड्याचा किल्ला मिळाला होता. परंतु विजयनगर साम्राज्याबरोबर अजूनही संघर्ष चालूच होता.

३) **मुजाहिर शाह (१३७५-७७):** त्याने आपल्या वडिलांचेच युद्ध करण्याचे धोरण अवलंबिले. त्याने एकदा विजयनगरला वेढा दिला होता. परंतु त्याच्यावर ताबा मिळवू शकला नाही. थोड्याच काळात दाऊद खान ने त्याचा खून केला.

४) **मुहमद शाह द्वितीय (१३७८-१३९७):** मुजाहिदनंतर बहामन शाहचा नातू मुहमद शाह द्वितीय गादीवर बसला. तो अत्यंत विद्वान, शांतीप्रेमी आणि विद्या व कलेचा आश्रयदाता होता. त्याच्या काळात विजयनगर बरोबरचे संबंध शांतीपूर्ण राहिले. तो प्रजा-कल्याणकारी होता. दुष्काळाच्या काळात त्याने गुजरात व माळवा येथून धान्य आणण्यासाठी १००० बैलगाड्यांची व्यवस्था केली होती. त्याच्यामृत्यूनंतर त्याची मुले गियासुद्दीन आणि शमसुद्दीन हे क्रमाने गादीवर बसले परंतु त्याची कारकीर्द अल्पकाळ टिकली.

५) **ताजुद्दीन फिरोज खान (शाह) इ.स.१३९७-१४२२:** शमसुद्दीन कमजोर असल्यामुळे बहामशाहाचा नातू फिरोज खान गुलबर्गा येथे आला, त्याने सुलतानास कैद केले व स्वतःस राज्याभिषेक (१४ फेब्रु.१३९७) केला. विजयनगरच्या पहिल्याच युद्धामध्ये त्याने हरीहर द्वितीय कडून युद्ध खंडणी वसूल केली. त्याने आपल्या दुसऱ्या मोहिमेमध्ये देवराय द्वितीय यांच्याबरोबर युद्ध करून करून त्याला मुलगी देण्यास भाग पडले व हुंडा म्हणून बंकापूर घेतले. परंतु तिसऱ्या मोहिमेमध्ये त्याला विजयनगरच्या सैन्याकडून पराभव पत्करावा लागला.

६) **अहमद शाह (१४२२-१४३५):** इ.स. १४२२ मध्ये फिरोज खानचा भाऊ अमहद शाह गादीवर आला. त्याने इ.स. १४२५ मध्ये आपली राजधानी गुलबर्गावरून बिदर येथे हलविली. विजयनगर बेचिराख करून टाकले. बरेचसे युद्धकैदी आणि अमाप संपत्ती घेऊन तो परतला. एक मुसलमान झालेला ब्राह्मण राज्यात उच्च पदावर मजल मारली त्याचा मुलगा अहमद याने अहमदनगरची निजामशाही स्थापन केली. इ.स. १४२४ मध्ये अहमद शाह ने तेलंगात आपल्या राज्यात समाविष्ट केले. चार वर्षांनी त्याने माळव्याच्या होशंग शाहवर विजय मिळवला.

७) **अलाउद्दीन अहमद शाह द्वितीय (इ.स.१४३५-१४५७):** त्याने सुद्धा विजयनगरविरूद्ध मोहिमा राबविल्या. कोकणाविरूद्ध मोहिम राबवून त्याच्या प्रमुखाचा पराभव केला. त्याने संकमेश्वरच्या राजाची मुलगी विवाहात देण्यास भाग पाडले. परंतु राणीबेगम आणि तिचा पिता खानदेशचा नसीर खान रागावले गेले. त्याने इ.स. १४३७ मध्ये वहाडवर आक्रमण केले परंतु पराभव होऊन तो बुऱ्हानपूरपर्यंत पळाला. अहमद शाह जरी आक्रमक असला तरी तो कला व विद्येचा भोक्ता होता. त्याने स्थापत्य व बिदरला मोफत इस्पितळ बांधले.

८) **हुमायुन (१४५७-१४६०):** अल्लाउद्दीन अहमदशाहचा वारस हुमायुन हा अत्यंत जुलमी राजा होता व तो “जालिम” म्हणूनच प्रसिद्ध आहे. त्याच्यानंतर त्याचा अजाण मुलगा निजामशाह गादीवर बसला.

९) **निजामशाह (इ.स. १४६१-६३):** निजामशाह आठ वर्षाचा असतानाच गादीवर बसला परंतु त्याची आई बेगम नर्गिस, ख्वाजा जहान आणि महमूद गवान हे त्रिकूट त्याच्या

नावाने कारभार (defacto) पाहात होते. त्याच्या काळात ओरिसा, वारंगळ यांच्या हिंदू राजांनी आणि माळव्याच्या सुलतान महमूद खिल्जी यांनी बहामनी राज्यावर आक्रमण केले. परंतु महमूद गवानची क्षमता आणि गुजरातच्या महमूद बघेरा याच्या मध्यस्थीमुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

**१०) मुहमद शाह तृतीय (इ.स.१४६३-१४८२):** मुहमद शाह फक्त नऊ वर्षांचा असल्यामुळे पुन्हा कारभारी मंडळींनी (Council of Regency defactor) कारभार पाहण्यास सुरूवात केली. परंतु त्यांच्यापैकी ख्वाजा जहानने इतर दोघांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला आणि बेगम राणीच्या आदेशावरून त्याचा खून करण्यात आला. परंतु सुल्तान १५ वर्षांचा बेगमने निवृत्ती घेतली आणि महमूद गवान हा सुल्तानाचा एकमेव सल्लागार कारभारी (defcto) बनला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- बहामनी राज्याचा आढावा घ्या.

## ६.३ महमूद गवान

महमूदचा जन्म इ.स.१४११ मध्ये पर्शियातील "गवान" येथे झाला. तो देखील सरदार घराण्याचा असून त्यावेळच्या सुलतानाकडून सरदारकी नष्ट झाल्यानंतर इ.स.१४५६ मध्ये तो व्यापारी म्हणून बिदर येथे आला. त्याने अल्लाउद्दीन अहमद शाह द्वितीयकडे नोकरी पत्करली. हुमायुनच्या काळात तो मुख्यमंत्री आणि विजापूरचा राज्यपाल झाला. निजामशाहच्या काळात तो सुद्धा एक कारभारी म्हणून होता. तर मुहमद शाह तृतीयच्या काळात जवळजवळ २५ वर्षे तो अप्रत्यक्ष सुलतान म्हणूनच (defacto) होता. महमूद गवानच्या समर्थ मार्गदर्शनामुळे बहामनी राज्य शक्तीशाली व वैभवशाली बनले. त्याने अनेक अवघड लढाया जिंकल्या आणि पूर्वीच्या कोणत्याही सुलतानापेक्षा बहामनी राज्याचा सीमाविस्तार केला. कोकण आणि गोव्यावर कब्जा मिळवल्यामुळे राज्याची सीमा पश्चिम समुद्रापर्यंत तर गोदावरी कृष्णा खोऱ्यावर ताबा मिळविल्यामुळे पूर्व समुद्रापर्यंत पसरली. विजयनगरने फूस दिल्यामुळे बेळगावच्या राजाने बंड केले. परंतु ते गवानने मोडून काढले. इ.स.१४७८ मध्ये गवानेने ओरिसावर हल्ला केला आणि कोंडाविदूचे बंड मोडून काढले. दक्षिणेकडे विजयनगर कडून मिळविलेल्या कांचीपर्यंत बहामनी राज्याचा विस्तार झाला होता.

महमूद गवानने प्रशासकीय सुधारणा राबवून स्थिर करण्याकडे सुद्धा लक्ष दिले. त्याने दख्खनी आणि इरानी अमीरांमध्ये समन्वय राखण्याचे प्रयत्न केले. कारण त्यांच्याकडे हेवेदावे, श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना, अविश्वास नेहमीच असे. त्यामुळे वारंवार गटबाजीची शक्यता होती. म्हणून गवानेने कोणत्याही एका गटाला (परदेशी शिया आणि भारतीय सुन्नी) प्राधान्य देण्याचे बंद केले.

गुलबर्गा, दौलताबाद, तेलंगणा आणि वहाड हे राज्याचे चार प्रांत राज्यकारभाराच्या दृष्टीने अवघड जात असल्यामुळे गवानेने त्या प्रत्येकाचे दोन प्रांतामध्ये विभाजन करून त्यावर स्वतंत्र राज्यपाल नेमले. केंद्रसत्ता बळकट करण्यासाठी गवानेने प्रांतिय राज्यपालांचे

(तरफदार) अधिकार कमी केले. बऱ्याच प्रमाणात परगण्यांचे रूपांतर केंद्रशासनाच्या अख्यारित केले व महसूल जमा करण्यसाठी विशेष अधिकारी नेमले. स्थानिक राज्यपालांच्या ताब्यात फक्त एक किल्ला देण्यात आला आणि इतर भागात सुलतानाच्या अख्यारितील अधिकारी नेमले गेले. त्याच्यामागे बंडखोरी कमी करण्याचा हेतू होता. महसूलात सुधारणा करण्यासाठी त्याने पद्धतशीर सर्वेक्षण आणि जमीनीची मोजणी करण्याचे आदेश दिले. सैन्याचे पुनर्संघटना केले. सैनिकांचे वेतन वाढविणे. अर्थ, न्याय, शिक्षण याबरोबर प्रत्येक विभागमध्ये गवानेने जाणीवपूर्वक लक्ष ठेवले होते.

आपल्या लष्करी व प्रशासकीय गुणांनी एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त केली. त्याने बिदर येथे मदरसा काढले. त्यामध्ये ग्रंथालय स्थापन करून ३००० पुस्तके वाचनास ठेवली. तो गणिताचा स्वतःएक महान विद्वान होता तो कवी व लेखक असून दोन पुस्तके त्याने लिहिल्याचे आढळते. त्याची राहणी साधी असून तो नेहमीच गरीब व गरजूंना मदत करण्यास तत्पर असे.

महसूद गवानच्या विविध सुधारणा, सक्षम कारभार, वैभव स्थैर्य, प्रतिष्ठा यामुळे त्याच्याविरुद्ध शत्रुत्वाची विशेषतः दख्खनी अमीरांमध्ये भावना निर्माण झाली. त्यांनी त्याच्याविरूद्ध कारस्थान रचले. त्यांनी त्याच्याविरूद्ध राजद्रोह केल्याचे खोटे निवेदन सुलतानास दिले. शेवटी इ.स. १४८१ मध्ये त्याचा वध करण्यात आला. परंतु सुल्तानास लवकर त्याची चूक कळली आणि तो अत्यंत दु:खी झाला.

गवानच्या मृत्यूनंतर बहामनी राज्याला एक प्रकारे घरघर लागली. मुहमद शाह (III) च्या नंतर महमूद शाह (इ.स. १४८२-१५१८) गादीवर आला तो अकार्यक्षम होता. त्यामुळे प्रांतिक राज्यपालांनी आपल्या स्वार्थासाठी गैरफायदा घेण्यास सुरूवात केली. दख्खनी आणि परदेशी आमीरांमध्ये भांडण चालूच होते. थोड्याच अवधीत प्रांतिक राज्यपालांनी स्वतःचे राज्य घोषित केले. त्यामुळे बहामनी राज्य छोटे बनले व फक्त राजधानीच्या आजूबाजूच्या प्रदेशात सुलतानाचा अधिकार उरला.

मुहूमदशाहच्या मृत्यूनंतर तीन सुलतान लागोपाठ गादीवर बसले. परंतु ते कासिम बहीर उल-मुकालिक याच्या हातचे बाहुले बनेल. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अमिर अली बरीदने सुद्धा सुलतानांवर नियंत्रण प्रस्थापित केले. बहामनी राज्याचा शेवटचा सुलतान कलिमुल्ला शाह होता. इ.स.१५२७ मध्ये त्याच्या मृत्यूनंतर बहामनी सुलतानशाहीचा अंत झाला. बहामनी राज्याच्या उर्वरित अवशेषांमधून स्वतंत्र अशी छोटी छोटी पाच मुस्लिम राज्ये अस्तित्वात आले. त्यामध्ये-

१) विजापूरची आदिलशाही

२) अहमदनगरची निजामशाही

३) वहाडची इमादशाही

४) गोवळकोंड्याची कुतुबशाही आणि

५) बिदरची बरीद शाही.

अशाप्रकारे बहामनी सत्तेचा अंत झाला.

## ६.४ विजयनगरची स्थापना (१३३६)

हरिहर व बुक्क हे एकूण पाच भाऊ असून (हरिहर, कंपाना, बुक्क, मराप्पा आणि मुद्दाप्पा) ते दक्षिणेकडील काकतीय राजा प्रतापरुद्र देव द्वितिय ह्याच्या सेवेत होते. इ.स. १३२३ मध्ये काळातील राज्यावर सुलतानशाहीने कब्जा मिळविल्यानंतर हरिहर बुक्क हे कांपिली (अनेगुंडी) राजाकडे मोठ्या हुददयावर काम करु लागले. परंतु इ.स. १३३५ मधे मुहमद बिन तुघलक विरुद्ध गुरशासने बंड केले व त्याचा पाठलाग करीत मुहमद बिन तुघलक कांपिलीमध्ये दाखल झाला. त्याने कांपिलीचा पाडाव केला व हरिहर व बुक्क यांना कैदी म्हणून दिल्लीस नेले. तेथे त्यांचे इस्लाम धर्मांत परिवर्तन केले गेले व पुन्हा कांपिली येथे राज्यकारभारावर देखरेख ठेवण्यास पाठविले. परंतु कांपिलीमध्ये आल्यावर दोघा भावांनी पुन्हा इस्लामचा त्याग गेला आणि त्यांनी विजयनगरची स्थापना केली. धर्म परिवर्तनामध्ये त्यांना गुरु विद्यारण्यस्वामींनी मदत केली व हिंदु धर्म पुनरुज्जीवन व प्रसार करण्यासाठी त्यांच्यावर जबाबदारी सोपविली. हरिहराने भगवान “विरुपाक्ष" च्या नावाने राज्य करण्यास प्रारंभ केला व तुंगभद्रा नदीच्या काठी विजयनगर नावाची नवीन राजधानी निर्माण केली. अशाप्रकारे इ.स. १३३६ मध्ये हरिहर व बुक्क यांनी विजयनगर साम्राज्याची स्थापना केली.

### ६.४.१ संगम घराणे:

हरिहर व बुक्क हे दोघेही संगम घराण्यातील होते. हरिहरची स्थापनेनंतरची कारकीर्द पाहणे आवश्यक आहे.

१) **हरिहर-प्रथम (१३३६-१३५६):** हरिहर एक एक बलवान व महत्वाकांक्षी राजा होता. त्याने आपल्या राज्याचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला. इ.स.१३४२ मध्ये त्याने होयसळांचा प्रांत जिंकला. त्याबरोबर पेनुगोंडाचा अभेदय किल्लाही जिंकला. दरम्यान होयसळ राजा वीर बल्लाळ तृतिय याचा खान फंदफितुरीने मदुराचा सुल्तान घियासुद्दीने दमधन शाहने केला. त्यामुळे होयसळ राज्याचे विघटन झाले. त्यावर विजयनगर राज्याने हल्ला केला. वीर बल्लाळ तृतियचा पुत्र विरुपाक्ष बल्लाळ राजधानीतून पळून गेला तरीही होयसळ प्रजेने हरिहरच्या सेनेचा तीव्र प्रतिकार केला. हरीहरने आपले राज्य उत्तरेला कृष्णेपासून ते कावेरीपर्यंत आणि पूर्व व पश्चिम महासागरांच्या मधील प्रदेशात विस्तारले होते. उत्तरेकडे मात्र बहामनी राज्यांनी त्याला वरपर्यंत येऊ दिले नाही.

हरीहर हा समर्थ प्रशासक होता. त्याने आपल्या राज्याची प्रांतांमध्ये विभागणी केली होती व आपल्या विश्वासातील, नात्यातील व्यांक्तिंना त्यांनी सरदार म्हणून नेमले होते. त्याने कृषी क्षेत्रास प्रोत्साहन दिले. तसेच राज्याच्या संरक्षणासाठी किल्लांच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले. उदा. बदामी, उदयगीरी आणि गुटी. हरीहरचा मृत्यू इ.स. १३५६ मध्ये झाला.

२) **बुक्क प्रथम (१३५६-१३७७):** हरीहरच्या मृत्युनंतर बुक्क प्रथम हा विजयनगरच्या गादीवर आरुढ झाला. त्याच्या कारकीर्दीत त्याने विजयनगरची राजधानी इमारत बांधून पूर्ण केली. आपले राज्याचे एकीकरण करणे व स्वतःचे स्थान स्थिर करणे हे त्याच्यापुढे एक मोठे आव्हान होते. त्यासाठी त्याने हरीहरच्या मुलांच्या जागी आपल्या

स्वतःच्या मुलांना सरदार म्हणून नेमले. आपल्या कारकीर्दीत त्याने दक्षिणेकडील तमिळ राज्यावर स्वारी केली. त्यासाठी आपल्या मुलाला पाठविले व राज्य जिंकले. बुक्क राज्याच्या काळातच बहामनी राज्याबरोबर विजयनगरचे वितुष्ट आले. त्या राज्याचा संस्थापक अल्लाद्दीन हसन बहामन शाह मृत्यू पावल्यावर त्याचा पुत्र मुहमद शाह बहामनी सत्तेवर आला परंतु त्याची सत्ता अस्थिर होती. ह्याचा फायदा बुक्क प्रथम याने घेण्याचे ठरवले व तेलंगाना राज्याशी संधान बांधले. त्यांनी बहामनी राजाकडे तेलंगाना व इतर प्रदेशाची मागणी केली. त्यावेळी बहामनी राजाने त्यास नकार दिला तेव्हा बुक्क प्रथम ते आपली २०, हजाराची फौज तेलंगाना राज्याच्या मदतीस धाडली. त्या युदधाची परिणती बुक्कच्या फायदयात झाली व त्याला कृष्णा-तुंगभंद्र खो यातील काही प्रांत मिळाला.

खऱ्या अर्थाने पाहिल्यास बुक्क हाच विजयनगर साम्राज्याचा खरा निर्माता मानला जातो. तो कुशल प्रशासक होता. तसेच, हिंदु धर्माचा रक्षक होता. त्याने "स्वतःस" "वेदमार्ग प्रतिष्ठापक" हा किताब धारण केला होता असे जरी असले तरी सर्वधर्म सहिष्णू वृत्तीस राजा होता. त्याने तेलंगु साहित्याच्या निर्मितीस प्रोत्साहन दिले व त्यासाठी आपल्या दरबारात सुप्रसिद्ध तेलगू कवी “नचना सोमा” यास राजाश्रस दिला.

३) **हरिहर द्वितीय (१३७७-१४०४):** बुक्क प्रथमच्या मृत्यूनंतर विजयनगरच्या गादीवर त्याचा वारस पुत्र हरिहर द्वितीय स्थानापन्न झाला. राज्याभिषेका वेळी त्याने स्वतः “महाराजाधिराज” हा किताब धारण केला. त्याने कोकण प्रांत केरळ, तलुवा, आंध्रा, कुटक इत्यादी राजांना जिंकले आणि आपले स्थान स्थिर केले. त्याचा मुलगा विरुपाक्ष ओरेया याने तामिल बंड मोडले आणि सिलोम आक्रमण करुन तेथील राजाकडून खंडणी ठरवून घेतली. हरीहर द्वितीयच्या काळात सुदधा बहामनी राज्याबरोबरचे विजयनगरचे संबंध तणावाचेच होते. इ.स.१३७७ मध्ये मुजाहिदु शाहने (बहामनी) विजयनगरवर आक्रमण केले. परंतु बहामनी सैन्याचा पराभव झाला व रस्त्यामध्येच सुलतानाचा खून झाला. त्याचा फायदा घेत हरिहर द्वितियने कोकण व कर्नाटकावर स्वारी केली. तसेच त्यांनी गोवा बंदराचाही ताबा मिळविला. त्याचबरोबर चौल व दाभोळ बंदरेही आपल्या अंमलाखाली आणली. हरीहर द्वितिय व त्याच्या मग वारंगळकडे मोर्चा वळविला आणि त्यांचाही पराभव केला. अशाप्रकारे हरिहर द्वितियने विजयनगरचा विस्तार केला.

इ.स. १४०४ मध्ये हरिहर द्वितियच्या मृत्यू नंतर त्याचा तीन मुलांमध्ये (विरुपाक्ष प्रथम, बुक्क द्वितिय आणि देवराय प्रथम) सिंहासनासाठी संघर्ष सुरु झाला. हा संघर्ष जवळजवळ दोन वर्षे चालू होता.

पित्याच्या मृत्यूनंतर विरुपाक्ष प्रथम ने स्वतःस ताबडतोब राज्याभिषेक करवून घेतला आणि त्याची सत्ता जेमतेम एक वर्ष टिकली. त्याची सत्ता बुक्क द्वितियने नष्ट केली व लगेच बुक्क द्वितियची सत्ता देवराय प्रथम याने इ.स. १४०६ मध्ये काबीज केली.

४) **देवराय प्रथम (१४०६-१४२२):** राजा देवराय प्रथम याची कारकीर्द पूर्णपणे युध्द मोहिमांनी व्यापली आहे. शेजारील बहामनी राज्य, राजकोंडा आणि कोंडाविडूचे रेडडी यांच्याबरोबर त्याला सतत युध्द करुन आपल्या साम्राज्याचे रक्षण करावे लागले.

त्याने नवीन राज्य राजमुंद्री यांच्याशी वैवाहीक संबंध जोडून बहामनींचा मित्र वेल्मा या राजास शह दिला. तरीही फिरिश्ता या इतिहासकाराच्या मते बहामनी सुलतान फिरोझशहाने विजयनगरवर आक्रमण केले. देवरायने शांततेचा तह केला आणि आपली मुलगी सुलतानास विवाहाने दिली. त्याचबरोबर बंकापूरचा किल्लाही त्याला दिला. परंतु काही वर्षानंतर देवरायने बहामनी राज्यावर हल्ला केला व बहामनी सैन्याचा पराभव केला. त्यातच त्याचा संघर्ष ओरिसाचा गजपती भानुदेव चतुर्थ याचेशी झाला आणि त्याने राजमुंद्रीच्या राज्यावर हल्ला केला. त्याच्या मदतीसाठी देवरायने आपले सैन्य धाडले. युध्द काही झाले नाही, परंतु गजपती आणि देवराय यांचे मध्ये सतत संघर्ष चालू राहीला.

देवरायने आपल्या घोडदळाकडे विशेष लक्ष पुरवले तसेच पोर्तुगिजांशी संबंध स्थापति करुन घोडयाची आयात-निर्यात सुरु केली. आपल्या सैन्यात तुर्की धनुर्धारी नेमले. त्याच्या कारकीर्दीत विजयनगर विद्येचे माहेरघर बनले होते.

त्याने आपल्या दरबारात विद्वान, कलाकार, तत्वबेत्ते यांना राजाश्रय दिला होता. देवराय हा शैव पंथाचा अनुयायी होता. त्यासाठी त्याने देवळे बांधली. इ.स. १४२२ मध्ये देवरायचा मृत्यू झाला व त्याच्या गादीवर रामचंद्र (मुलगा) बसला. त्याने काहीच महिने सत्ता उपभोगल्यावर त्याचा भाऊ विजय प्रथम हा गादीवर आला. त्याने इ.स. १४२२-१४२६ पर्यंत राज्य केले. परंतु त्याने आपल्या राज्याकारभाराची सूत्रे देवराय द्वितिय या आपल्या मुलाकडे दिलेली होती.

५) **देवराय द्वितीय (१४२६-१४४६):** देवराय द्वितिय सत्तेवर आल्यावर त्याने १४२८ मध्ये कोंडाविदु राज्यावर आक्रमण केले, ओरिसावर हल्ला केला, एवढेच नाही तर केरळ राज्यापर्यंत मजल मारली. मात्र झामोरिन (कालिकत) त्याच्या अंमलाखाली आला नाही. अब्दुर रज्जाक या पर्शियन दूताच्या मते देवराय. द्वितियची सत्ता सिलोनपासून गुलबर्गापर्यंत आणि ओरिपासून मलबारपर्यंत पसरली होती. तर नुनीझ इतिहासकाराच्या मते देवरायला क्वीलॉन, सिलोन, पुलिकत, पेगू आणि तेनासिरम येथून सुध्दा वार्षिक खंडणी प्राप्त होत होती. आपल्या शेजारील बहामनी राज्याबरोबर देवरायचे संबंध शत्रूत्वाचे होते. त्यामुळे बहामनी सुलतानाने आपली राजधानी गुलबर्गावरुन बिदरला हलविली. कारण गुलबर्गा विजयनगरपासून अत्यंत जवळ होते. मधल्या सहा-सात वर्षांच्या काळात विजयनगरमध्ये पूर्ण शांतता होती. परंतु बहामनी सुलतान अहमदशाहच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र अल्लाउद्दीन गादीवर आल्यावर पुन्हा दोन राज्यांत संघर्षाला सुरुवात झाली. इ.स. १४३५-३६ आणि १४४३-४४ मध्ये दोन युध्द झाली. काही वेळस देवरायास पराभव सुध्दा पत्करावा लागला होता. त्याने आपल्या सैन्यात मुस्लिम घोडदळास नेमले आणि त्यांना पूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले. राजा देवराय द्वितिय हा संगम घराण्यातील अत्यंत पराक्रमी राजा होता. त्याने कलावंत व विद्वानांना आपल्या दरबारात आश्रम दिला होता. त्याच्या कार्यकाळात इटालियन प्रवासी निकोलो कोन्ती याने विजयनगरला इ.स. १४२०-२१ मध्ये भेट दिली होती. तर अब्दुर रज्जाक (पर्शियन) या दूताने १४४२ मध्ये विजयनगरला भेटी दिली. त्यांची वर्णने विजयनगर साम्राज्याची माहिती आपल्याला देतात.

राजा देवराय द्वितिय याच्या मृत्यूनंतर त्यचा मुलगा विजयराय द्वितिय (१४४६ १४४७) गादीवर आला.

त्याचा वारसा त्याच्या मुलाने (माल्लिकार्जून) १४४७-६५ पर्यंत चालविला. परंतु तो अकार्यक्षम, चैनी व विलासी होता. त्याचा परिणाम विजयनगरमध्ये अराजक माजले. या परिस्थितीचा फायदा शेजारील ओरीसाच्या राजाने घेतला व विजयनगरवर आक्रमण केले. त्यानंतर त्याचा चुलतभाऊ विरुपाक्ष द्वितियने त्याच्याकडून सत्ता काबीज केली आणि १४६५-८५ पर्यंत राज्य केले. परंतु तोही गोंधळाची परिस्थिती दूर करु शकला नाही. बहामनी मंत्री महमूद गवान याने विजयनगरवर आक्रमण केले. तो थोपवू शकला नाही. विरुपाक्षचा त्याच्याच मुलाने खून केला. त्यानंतर त्याचा भाऊ गादीवर आला व त्याने आपल्या थोरल्या भावाचा वध केला. तो चैन व विलासात रममाण झाला आणि राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले. या सर्व परिस्थितीत चंद्रगिरीचा (चितोड) प्रमुख सरदार सलुवा नरसिंह यास विजयनगर वाचविण्यासाठी सत्ता आपल्या ताब्यात घ्यावी लागली व नवीन घराणे शाहीचा उदय झाला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- देवराय दुसरा याची माहिती सांगा.

### ६.४.२ सलुवा घराणे:

नरसिंह हा सलुवा घराण्याचा संस्थापक मानला जातो. त्याने इ.स. १४८५-१४९० पर्यंत राज्य केले. त्याने विजयनगर साम्राज्याला वाचविले खरे परंतु अंतर्गत विरोधही फार मोठ्या प्रमाणात त्याला सहन करावा लागला. त्यामुळे त्याला आपली शक्ती आणि वेळ याच बंदोबस्तासाठी खर्ची घालवावा लागला. त्याने अंतर्गत बंडाळीवर नियंत्रण मिळविले परंतु परकीय आक्रमणे तो थोपवू शकला नाही. पुरुषोत्तम गजपतीने बहामनी राज्यासह विजयनगरवर आक्रमण केले व नरसिंहाला युध्दकैदी बनविले. उदयगिरीचा किल्ला व काही प्रदेश दिल्यावर त्याची सुटका झाली.

### ६.४.३ तुलुवा घराणे:

इ.स. १४९० मध्ये सलुवा नरसिंहचा मृत्यू झाला. त्यावेळी त्याने नरसा नायक (१४९०-१५०३) यास काळजीवाहू प्रशासक नेमले. नरसा नायकने पांडय, चोल चेरा यांचे बंडे मोडून काढले. तसेच तो बिदर व विजापूर राज्यांबरोबर लढला. नरसा नायकनंतर त्याचा मुलगा विर नरसिंह काळजीवाहू प्रशासक झाला. त्याने नामधारी राजा इम्मादी नरसिंहाचा खून केला व नवीन घराणे स्थापन केले. विर नरसिंहने स्थापन केलेले घराणे इतिहासात "तुलुवा घराणे" म्हणून प्रसिध्द आहे. कारण नरसा हा "तुलुवा इश्वर" चा मुलगा होता. विर नरसिंह याने पाच वर्षे (१५०५-१५०९) राज्य केले. त्याच्या राज्यात बंडाळी माजली होती. परंतु ती सर्व मोडून काढण्यात तो यशस्वी झाला.

### १) कृष्णदेवराय (१५०९-१५२६):

कृष्णदेवराय हा अत्यंत पराक्रमी राजा होता. त्याबरोबर तो कला व स्थापत्याचा आश्रयदाता होता. आपल्या दरबारात त्याने विविध क्षेत्रांतील विदवानांना राजाश्रय दिला होता. तो निष्णात लढवय्या होता व पराक्रमी सेनापती आणि कुशल प्रशासक होता. त्याच्या कार्यकाळात विजयनगरचे साम्राज्य हे प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोचले होते. त्याने जेव्हा सिहांसन धारण केले तेव्हा विजयनगर अस्थिर व अनागोंदी बंडाळी यांनी ग्रासले होते. परंतु त्या सर्व अडचणींवर मात करून त्याने विजयनगरला वैभव व स्थैर्य प्राप्त करुन दिले. कृष्णदेवराय हा कुशल व देखणा पुरुष होता. रॉबर्ट हेवेलच्या मते, - “कृष्णदेवराय हा केवळ कायदेशीर राजाच नव्हता तर तो सार्वभौभ, सर्वशक्तिमान आणि प्रभावी व्यक्तिगत गुणांचा पुतळाच होता. तो स्वतः कठोर व्यायाम करत असे आणि युध्दकौशल्यांचा सराव नियमितपणे करीत असे. तो निष्णात घोडेस्वार होता आणि अनेक युध्दात त्यान स्वतः सैन्याचे नेतृत्व केलेले होते. तोशूर, मुत्सद्दी, सौजन्यशील, उदारमतवादी आणि सर्वांच्या आदरास पात्र होता. "कृष्णदेवराय" एक सुसंस्कृत सहिष्णु, स्वातंत्र्यवादी राजा होता. शिलालेखांच्या संदर्भानुसार तो संस्कृत आणि तेलुगू साहित्याचा आश्रयदाता होता. त्याच्या दरबारात विदवान कवी नेमलेले होते आणि ते “अष्टदिग्गाज" म्हणून प्रसिध्द होते. तो आपल्या प्रजेच्या हितार्थ व कल्याणार्थ नेहमीच तत्पर असे.

**कृष्णदेवराय आणि युध्दमोहिमा:** कृष्णदेवराय सिंहासनारुढ झाल्याबरोबर त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यात बहामनी राजे, ओरिसाचा गजपती राजा, अंतर्गत बंडाळ्या, कुतुबशाह, पोर्तुगिज राज्य इ. ठिकाणी युध्द मोहिमा करुन राज्य स्थिर करावे लागले. त्याने पुढील युध्दमोहिमा राबविल्या.

१) **मैसूरची मोहिम:** आपल्या साम्राज्य विस्तारासाठी कृष्ण-देवरायने वेम्मत्तुरचा (मैसुर) गंग राजाच्या विरुध्द मोहिम सुरु केली. त्यात त्याचा पूर्ण पराभव झाला आणि विजयनगरच्या सैन्याने शिवसमुद्रमचा किल्ला आणि श्रीरंगपटनम आपल्या ताब्यात घेतले.

२) **बहामनीविरुध्द मोहिम:** सुरुवातीच्या काळात बहामनी राजांपासून विजयनगरचे संरक्षण करण्याची महत्वपूर्ण कामगिरी पार पाडावी लागली. मुस्लिम सत्ता दरवर्षी "जिहाद"ज्या माध्यमातून शेजारील हिंदू राष्ट्रांवर आक्रमणे करत असत. त्यानुसार इ.स. १५०९ मध्ये बहामनी राजा (बिदर) महमुद शाह याने विजयनगरवर आक्रमण केले. हे आक्रमण कृष्णदेवरायने यशस्वीपणे थोपविले आणि बहामनी सैन्याचा पराभव केला.

पराभूत सैन्याचा प्रमुख विजापूरचा आदिलशह युसुफ याचा पाठलाग कृष्णदेवरायने केला व तो ही युध्दात मारला गेला. विजयनगरचे सैन्य विजापूरमध्ये घुसले त्यामुळे तेथील जनता अनिभज्ञपणामुळे एकदमच गोंधळून गेली. त्याचा फायदा उठवित कृष्णा-तुंगभद्रा खोरे आणि रायचूर (१५४२) काबीज केले. पुढच्या मोहिमेमध्ये त्याने गुलबर्गा काबीज केले आणि तेथील प्रमुख “बशिद-इ-मुमालिक” (सैन्यांचा प्रमुख) याचा पराभव केला. पुढे कृष्णदेवरायने बिदरचा बरीदशाहचा पराभव केला व त्याच्या जागी

सुलतान मुहमद शाह हयांस सिंहासनावर बसविले. अशाप्रकारे त्याने बहामनींचा बंदोबस्त केला.

३) **ओरिसा मोहिम:** ओरिसाच्या गजपतींनी विजयनगरची दोन राज्ये जिंकून घेतली होती. ती म्हणजे उदयगिरी आणि कोंडाविदू गंग राजाच्या (उमात्तूर) पाडावानंतर कृष्णदेवरायने इ.स.१५१३ मध्ये विजयनगरचे सैन्य उदयगिरीच्या किल्याला वेढा देण्यासाठी पाठविले व स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. गजपती राजा प्रतापरुद्रने सुध्दा हा वेढा उठविण्यासाठी आपले सैन्य पाठविले. परंतु गजपती सैन्याचा पराभव झाला व त्यांना कोंडाविदूपर्यंत हाकलून लावले. एक वर्ष वेढा दिल्यानंतर उदयगिरीच्या किल्लयावर विजयनगरच्या सैन्याने ताबा मिळविला. आपल्या विजयानंतर कृष्णदेवराय आपल्या दोन राण्यांसह परतला. रस्त्यामध्ये त्याच्या दोन राण्यांनी (तिरुमाला देवी आणि चिन्ना देवी) तिरुपती देवस्थानला भेट दिली व दर्शन घेतले.

उदयगिरीच्या पाडावानंतर विजयनगर सैन्याने आपला मोर्चा कोंडाविदूकडे वळविला. रस्त्यामध्ये त्यांनी अनेक किल्ले आपल्या ताब्यात मिळविले. उदा. कांडूकुर, विनुकोंडा, नागार्जुनकोंडा, तांगेडा इ. कोंडाविदूचा वेढा चालविण्यामध्ये जेव्हा विजयनगरचा सेनापती सलुवा टिम्मा अपयशी ठरला तेव्हा कृष्णदेवरायने स्वतः वेढ्याचे नेतृत्व केले आणि शेवटी किल्ला ताब्यात मिळविला. त्यात गजपतींचा वारसपुत्र विरभद्र व त्याची राणी यांना कैद केले गेले आणि कोंडाविदूचा कब्जा सलुवा टिम्मा ह्याला दिला.

कोंडाविदूच्या विजयानंतर विजयनगरचे सैन्याने विजयवाडाच्या किल्लास वेढा दिला. तोही किल्ला ताब्यात घेतला. त्यानंतर कृष्णदेवराय कोंडापलीकडे आपला मोर्चा वळविला. प्रतापरुद्रचे सैन्य पराभूत झाले. आता कृष्णदेवरायला तेलंगणाकडे कूच करणे अत्यंत सोपे झाले. त्याच्या सैन्याने नालगोंडा आणि वारंगळ काबीज केले. त्यानंतर तो कलिंग देशाकडे वळला. राजमुंद्री ताब्यात आले आणि वेंगीवरही कब्जा मिळविला. कृष्णदेवराय आता कटकमध्ये घुसला. नाईलाजाने प्रतापरुद्र देव ह्यास तह करावा (१५१८) लागला. तहातील अटींनुसार गजपती राजाने आपली मुलगी कृष्णदेवरायास विवाहात दिली आणि बदल्यामध्ये गजपती राजाला आपला सर्व जिंकलेला मुलुख परत मिळाला.

४) **गोवळकोंडयाची मोहिम:** जेव्हा कृष्णदेवराय ओरिसाच्या गजपतींविरुध्द युध्दात गुंतला होता, त्याचा फायदा घेऊन गोवळकोंड्याचा कुली कुतबशहाने आपल्या शेजारील राज्यांवर हल्ले केले आणि त्याने बराच प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. उदा. तेलंगाना, पांगल, गुन्दूर, वारंगळ, कोंडापल्ली, एल्लोर, राजमुंद्री इ. त्याने ओरिसाच्या गजपतींकडून कृष्णा आणि गोदावरी यांच्यामधील प्रदेशही ताब्यात घेतला. त्याचबरोबर त्याने विजयनगरच्या साम्राज्यातसुध्दा आक्रमण चालू केली. तसेच त्याने मोठ्या सैन्यासह कोंडाविदुवर चाल करुन किल्ला ताब्यात घेतला. सलुवा टिम्माचा विजयनगरमध्ये होता आणि त्याचा पुतण्या नंदीन्डला गोवा वेढा हटवू शकला नाही. जेव्हा ही बातमी कृष्णदेवराय ह्यास कळली तेव्हा त्याने ताबडतोब

सलुवा टिम्मा ह्यास मोठ्या सैन्यासह कोंडाविदुकडे पाठविले. कुतुबशाही सैन्याचा दारुण पराभव झाला आणि बरेचसे सैन्यास कैदेत टाकले गेले.

५) **विजापूरची लढाई (१५२०):** कृष्णदेवराय हा ओरिसा गजपतींशी लढत असल्याचे कळल्यावर विजापूरचा सुल्तान इस्माईल आदिलशाहने कृष्ण-तुंगभद्रा खोयावर आक्रमण केले आणि रायचूरवर कब्जा मिळविला. सलुवा टिम्मा कोंडाविदूवरुन विजयी होऊन आल्यावर कृष्णदेवरायने विजापूरच्या सुल्तानाविरुध्द मोर्चा वळविला. त्याचा सामना करण्यासाठी सुल्तानाने देखील कृष्णदेवरायविरुध्द सैन्य जमविले. रायचूर या ठिकाणी १९ मे १५२० रोजी युध्द झाले आणि विजापूरच्या आदिलशाही सुल्तानाचा दारुण पराभव झाला. सुल्तान युध्दभूमीतून पळून गेला परंतु त्याच्या सैन्याने रायचूरचा ताबा सोडला नव्हता. परंतु कृष्णदेवरायने पोर्तुगिजांच्या मदतीने किल्लयावर जोरदार भडीमार केला व किल्ला ताब्यात घेतला. परतीच्या वेळी कृष्णदेवरायने विजापूर शहरावर छापा टाकला व त्याचा ताबा घेतला. गुलबर्गा किल्ल्याला जमीनदोस्त केले. अशाप्रकारे बहामनींची दुसरी राजधानी सुध्दा विजयनगरच्या ताब्यात आली. कृष्णदेवरायने तेथील सुल्तान शाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा अयशस्वी प्रयत्नसुध्दा केला.

६) **विजयनगर-पोर्तुगिज संबंध:** कृष्णदेवराय पोर्तुगिजांचे महत्व ओळखून होता. कारण पोर्तुगिजांनी अरबांचा, पर्शियन व्यापाऱ्यांचा पराभव केला होता व इजिप्तचे नाविक दल देखील नष्ट केले होते. अरेबिया आणि पर्शियन आरवातात घोडयांच्या व्यापारावर पोर्तुगिजांचीच मक्तेदारी होती. म्हणूनच कृष्णदेवराय पोर्तुगिजांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवून होता. त्याने त्यांच्याकडूनच चांगल्या जातीचे घोडे खरेदी केले होते आणि बहामनींशी यशस्वी लढाच्या केल्या होत्या तसेच पोर्तुगिजसुध्दा कृष्णदेवरायबरोबर संबंध ठेवण्यास उत्सुक होते. त्यांनी नेहमीच बहामनींविरुध्द कृष्णदेवरायला मदत केली. पोर्तुगिज गव्हर्नर अबुबर्कने ताबडतोब विजयनगरदरबारात आपला दूत पाठवला व कृष्णदेवरायने कालिकतचा राजा झामोरीन हयाच्याविरुध्द सहकार्य देण्याचे आश्वासन मागितले. परंतु कृष्णदेवरायने आपल्या स्वकीय राजाविरुध्द मदत देण्याचे नाकारले आणि घोडयांच्या व्यापारातही पडण्याचे टाळले. पोर्तुगिज गव्हर्नर अल्मेडा याने कृष्णदेवरायकडे भाटकळचा किल्ला उभारण्याची परवानगी मागितली. परंतु इ.स. १५२३ मध्ये जेव्हा पोर्तुगिजांनी गोवा काबीज केला तेव्हा कृष्णदेवरायने सलुवा टिम्मा याच्या नेतृत्वाखाली छोटेखानी फौज पाठविली परंतु त्यांना पोर्तुगिजांविरुध्द यश मिळाले नाही. तरीसुध्दा पोर्तुगिजांबरोबर विजयनगरचे संबंध सलोख्याचे होते. नुनीज या इतिहासकाराच्या मते, कृष्णदेवरायने आपल्या सहा वर्षाच्या राजकुमाराला राज्याभिषेक केला व स्वतः प्रधानमंत्री बनला. परंतु केवळ आठ महिन्याच्या कारकीर्दीनंतर राजकुमार तिरुमलादेव आजारी झाला आणि त्यातच त्याचे निधन झाले. असे म्हटले जाते की सलुवा टिम्मा ह्याच्या पुत्र टिम्मा दंडनायक हयाने त्याच्यावर विषप्रयोग केला म्हणून कृष्णदेवरायने टिम्मा दंडनायक व त्याचा भाऊ सलुवा गुंदराज हयांना कैद केले. टिम्मा दंडनायक व गुंदराज यांना पकडून त्यांचे डोळे काढण्याचे आदेश दिले. शेवटी त्याने आपला सावत्रभाऊ अच्युतराय हयास आपला वारस नेमले. जेव्हा कृष्णदेवराय आदिलशहाच्या ताब्यातील बेळगाववर आक्रमण करण्याचे तयारीत होता तेव्हा तो गंभीर आजारी पडला आणि त्यातच इ.स. १५२९

मध्ये त्याचे निधन झाले. कृष्णदेवराय हा अत्यंत पराक्रमी योद्धा व सेनापती होता. तसाच तो मुत्सद्दी, कुशल प्रशासक आणि दूरदृष्टीचा राजा होता. तो कलेचा भोवत्ता व आश्रयदाता होता. त्याने प्रतिकूल परिस्थितीतही अनेक राजा होता. तो कलेचा भोवत्ता व आश्रयदाता होता. त्याने प्रतिकूल परिस्थितीतही अनेक लढाया जिंकल्या. त्याने आपल्या राज्याच्या कानाकोपऱ्याचा दौरा केला आणि व्यक्तिगतरित्या लोकांची गाहाणी समस्या, सूचना ऐकून घेतल्या व त्यांचे निराकरण केले. त्याच आधारे त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. त्याचे साम्राज्य पूर्ण मद्रास प्रांत, म्हैसूर आणि दक्षिणेकडील इतर राज्यांत विस्तारले होते. ते कटक व मुंबईजवळील सालसेट पर्यंत पसरले होते. त्याने आपल्या दरबारात विद्वान व कलाकारांना राजाश्रय दिला होता. त्याचा दरबार "अष्टिदग्गजांनी" भरला होता. त्यात विविध कवी व लेखकांचा समावेश होता. कृष्णदेवराय स्वतः एक महान लेखक व कवी होता. त्याचे "अमुक्तमाल्यदा" हे तेलुगू भाषेतील काव्य अत्यंत सपन्न समृद्ध असे आहे. त्याच्या कार्यकाळात स्थापत्य कलेचाही मोठ्या प्रमाणात विकास झाला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- कृष्णदेवराच्या कार्याचा आढावा घ्या.

## २) अच्युतराय (इ.स १५२९-१५४२):

कृष्णदेवराच्या मृत्यूनंतर विजयनगरच्या हासास सुरुवात झाली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा सावत्रभाऊ अच्युतराय गादीवर बसला. त्याची संपूर्ण कारकीर्द अंतर्गत संघर्ष व परकीय आक्रमणांचा मुकाबला करण्यातच गेली. त्याने विजापूरचा इस्माईल आदिलशाहकडून रायचूर इ.स. १५३५ मध्ये परत मिळविले. तसेच त्याने ओरिसाचे गजपती व गोवळकोंडयाच्या सैन्याची यशस्वी मुकाबला केला. तसेच भावणकोरची बंडाळी मोडण्यातसुध्दा अच्युतरायला यश झाले. त्याच्याविरुध्य कृष्णदेवरायचा जावई रामराय याने आपले दोन बंधु तिरुमला आणि वंकटाद्री यांच्या मदतीने अच्युतरायचा पुतण्या सदाशिवराय हयास गादीसाठी भडकाविले व त्यांचा बंदोबस्त करण्यात त्याला यश आले. शेवटी इ.स. १५४२ मध्ये त्याचे निधन झाले.

## ३) सदाशिवराय आणि रामराय (इ.स. १५४३-१५७०):

अच्युतरायच्या मृत्यूनंतर त्याचा अज्ञान मुलगा वेंकट प्रथम गादीवर बसला. परंतु कृष्णदेवरायचा पुतण्या सदाशिवराय याने सुध्दा सत्ता-स्थापनेसाठी दावा केला. त्यामध्ये वेंकट प्रथमचा विरोधक शलकाराजू याने त्याचा वध केला. त्यातच गोवळकोंडयाचा विजापूरच्या राज्यकारभारात हस्तक्षेप वाढल्याने अधिकच गोंधळाची स्थिती निर्माण झाली. शलाकाराजूचा उपद्रव अधिक वाढू लागल्याने रामरायने त्याला नष्ट केले व सदाशिवरायला गादीवर बसवून तो त्याचा प्रभारी शासक (de bacto ruler) बनला.

रामराय अत्यंत सक्षम व पराक्रमी, महत्वाकांक्षी व संधीसाधू आणि उदधट प्रशासक होता. विजयनगरची सत्ता खऱ्या अर्थाने त्याच्याच हाती होती. इ.स. १५४३ मध्ये रामरायने अहमदनगरचा बुरहान निजाम शाह आणि गोवकोंडयाचा कुतुबशाहबरोबर विजापूरवर आक्रमण करण्यासाठी संधान बांधले. विजापूरच्या अली आदिलशाहने संकट सोडविण्याची

जबाबदारी आपला विश्वासू व चाणाक्षमंत्री आसद खानवर सोपविली. आसद खानने मोठ्या चतुराईने अहमदनगरच्या निजामशहाला काही प्रांत देऊन आपल्या बाजूला वळविले आणि विजयनगरची झालेला करार मोडण्यास भाग पाडले. मग त्याने गोवळकोंडयाच्या कुतुबशाहकडे मोर्चा वळविला आणि त्याचा पराभव केला.

इ.स. १५५७ मध्ये इब्राहिम आदिलशहाच्या मृत्यूनंतर हसन निजाम शाहने विजापूरवर आक्रमण केले. आदिलशाहने गोवळकोंडा आणि विजयनगरशी मैत्री करुन अहमदनगरवर आक्रमण केले. विजयनगरच्या हिंदु सैन्याने अहमदनगरमधील मुस्लिमांवर अत्याचार केले आणि तो प्रदेश बेचिराख करुन टाकला. त्याचा परिणाम मुस्लिम भावना दुखावण्यात झाला आणि दक्षिण भारतातल्या मुस्लिम सत्तांनी विजयनगर पूर्णपणे नष्ट करण्याचा विडा उचलला.

### ४) तालिकोटची लढाई (इ.स १५३५):

दक्षिण भारतातल्या मुस्लिम सत्तांना विजयनगरच्या हिंदु साम्राज्याचे वैभव पाहवत नव्हते. गोवळकोंडयाचा इब्राहिम कुतुबशाह याने विजयनगरच्या विरोधात सर्व मुस्लिम सत्तांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतला. त्याने अहमदनगरच्या निजामशहाला त्याची (चांदबिबा) मुलगी हिचे विजापूरच्या आदिलशाहबरोबर लग्न करण्यासाठी पाठपुरावा केला. तसेच लग्नातील हुंडा म्हणून विजापूरच्या आदिलशहास सोलापूरचा किल्ला देण्यास सांगितले. त्याच्या बदल्यात आदिलशाहने आपली मुलगी निजामशहाच्या मोठ्या मुलाला विवाहात दिली. वहाडच्या सुल्तान इमादशहास सदर विजयनगरच्याविरोधातील युतीसाठी पाचारण केलेले नसले तरी तोही विजयनगरचा विरोधकच होता. शेवटी २५ डिसेंबर, १५६४ रोजी या चारही राज्यांच्या सुलतानांनी विजयनगरकडे लढाईसाठी कूच केली आणि कृष्णा नदीच्या पात्रामध्ये तालीकोट शहराजवळ दोन्ही सैन्याची गाठ पडली.

रामरायने सदर राज्यांच्या युतीस तेवढेसे महत्व दिले नाही कारण यापैकी कोणत्याही राज्याने विजयनगरवर हल्ला केलेला नव्हता. विजयनगरच्या वैभवसंपन्न प्रजेला या संकटाचा किंचितही मागमूस नव्हता. परंतु या संयुक्त सैन्याचा मुकाबला करण्यासाठी कसेतरी रामराजा यास तयार करण्यात आले. मग त्याने आपला भाऊ तिरुमाला यास २००० घोडदळ, एक लाख पायदळ आणि ५०० हत्तीदळ देऊन कृष्णेच्या पात्रातील प्रमुख प्रवेशद्वारांवर पाठवले. तसेच आपल्या दुसऱ्या भावास दुसरा फौजफाटा दिला आणि स्वतःसुध्दा उरलेल्या सैन्याचे नेतृत्व करीत दुसऱ्या बाजूने निघाला.रस्त्यामध्ये कानडी, तेलगू, मैसूरी आणि मलबारी सैन्यसुध्दा विजयनगरच्या बाजूने सामील झाले. संयुक्त सैन्यास विजयनगरचे सामर्थ्य माहित असल्यामुळे त्यांनी सुध्दा भरपूर तयारी केली होती. निजामशाह सैन्याचे नेतृत्व करीत होता आणि त्याच्या उजव्या बाजूस अली आदिलशाह आणि डाव्या बाजूस कुतुबशाह सैन्याचे बाजू सांभाळत होता. दोन्हीकडील सैन्य संख्या एवढी प्रचंड होती की, दक्षिणेमध्ये असे युध्द केव्हाही झालेले नव्हते.

विजयनगरच्या सैन्याचे संयुक्त सैन्यावर जोरदार हल्ला चढवला व त्यांना मागे ढकलीत हजारोची कत्तल केली. रामराय अत्यंत आनंद साजरा करीत असतानाच शत्रसैन्याच्या तोफखान्याचे रामरायच्या सैन्यास मोठ्या प्रमाणात गारद केले. त्या पाठोपाठ शत्रू-सैन्याच्या घोडदळाने रामरायच्या सैन्यात प्रवेश केला आणि त्यांची दाणादाण उडवून दिली. रामराय

यास कैद केले गेले आणि हुसेन निजामशहाने अमानुषपणे त्याचे शीर घडावेगळे केले. आपल्या राजाचा वध झाल्याची बातमी पसरताच रामरायचे सैन्य दाहीदिशांनी सैरावरा पळू लागले. शेवटी युध्दाचा अंत विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचा पराभव आणि हिंदुची अमानुष कत्तल होण्यामध्ये झाला. त्यानंतर लुटालूट व जाळपोळ करण्यात आली. मुस्लिम सैन्याने विजयनगर शहर पूर्णपणे लुटून नेले. सेवेलेच्या मते जवळजवळ ५५० हत्ती आणि त्यांच्या पाठीवर लुटलेली संपत्ती शत्रू सैन्याने लादून नेली. तसेच विजयनगरचे सोने-हिरे जडित सिंहासनसुध्दा लुटून नेले. सदाशिवराय यास तुरुंगात टाकले गेले आणि राजाचे सर्व नातेवाईक दक्षिणेकडील पेनुकोंडा किल्लामध्ये आश्रयास पळून गेले तेथे वास्तव्यास असलेल्या जनतेला लूटमार आणि रक्तपातास सामोरे जावे लागले. विजयनगर पूर्णपणे बेचिराख झाले. त्याचे वैभव कायमचे नष्ट झाले आणि दक्षिणेतील एका वैभवशाली हिंदु साम्राज्याचा विनाश झाला. त्यादृष्टीने तालिकोटच्या लढाईस दक्षिस भारताच्या इतिहासात अत्यांत महत्वाचे स्थान आहे.

त्यानंतर विजयनगरच्या साम्राज्याचे विघटन होऊन त्यातून छोटी छोटी राज्ये निर्माण झाली. रामरायचा भाऊ तिरुमाला याने इ.स. १५७० मध्ये पेनुकोंडा येथे नवीन घराण्याची स्थापना केली आणि इ.स. १५७८ पर्यत राज्य केले.

### ६.४.४ विजय नगर सम्राज्याची प्रशासन व्यवस्था:

विजयनगरचे साम्राज्य हे मूलतःच मुस्लिम प्रभावापासून दक्षिणेतील संस्कृती, धर्म, राजकीय प्रणाली सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने निर्माण झाले होते. आपल्या सव्वा दोनशे वर्षांच्या कालावधीमध्ये विजयनगर हे भारतीय संस्कृतीचे एक प्रमुख केंद्र बनले होते. जवळजवळ विजयनगरचे सर्वच राजे हे भारतीय संस्कृतीला उत्तेजन देणारे होते. त्यांच्या दरबारात त्यांनी धर्म, संस्कृती, साहित्य, कला, स्थापत्य इत्यादींना राजाश्रय दिला होता. त्यादृष्टीने आपणास विजयनगरच्या प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१) **शासन स्वरुप:** विजयनगरच्या प्रशासनाचे स्वरूप हे प्रामुख्याने हिंदु संस्कृतीचे रक्षण आमि मुस्लिम सत्तेच्या प्रभावापासून विजयनगरचे संरक्षण करण्यास शक्तिशाली लष्करी व्यवस्था निर्माण करणे हे होते. विजयनगरचे राज्य हे धर्मनिष्ठ होते आणि पुरोहित वर्गाच्या सल्ल्यानुसार राजकीय निर्णय घेतले जात असत. त्यांनी आपल्या प्रशासनात स्थिर राज्यव्यवस्था, शांती आणि कायदा सुव्यवस्था आणि जुन्या पंरपरांचे पुनरुज्जीवन करण्यास सुरूवात केली.

२) **सम्राट आणि त्याची मंत्रिपरिषद:** राजा हा सर्व प्रशासनाचा प्रमुख असून केंद्रीय प्रशासनव्यवस्था ही सरंजामशाली (जमीनदार वर्ग) संघटनेवर अवलंबून होती. राजाला त्याच्या मदतीसाठी मंत्रीपरिषद, प्रादेशिक (प्रांतिक) राज्यपाल, लष्कर प्रमुख, पुरोहित वर्ग आणि साहित्यिक मंडळी सदैव तत्पर असत. राजा हा सर्व क्षेत्रांमध्ये कर्मचारी वर्ग, मंत्रिपरिषद यांची नेमणूक करीत असे. तत्कालीन मध्ययुगीन इतर सम्राटांप्रमाणेच विजयनगरचा राजासुद्धा एकाधिकारशाहाचा पुरस्कर्ता होता. सम्राट हा स्वतःच कायद्याचा उगमस्थान, सर्वोच्च प्रशासनप्रमुख, सरसेनापती आणि सर्वोच्च न्यायप्रमुख असे. त्याने कोणत्याही तंट्याबाबत दिलेला निर्णय हा अंतिम असे. राज्याच्या काही भागामध्ये विशेषतः ब्राह्मण समाजात वधु पित्याकडून (Bride-price)

धन घेण्याची प्रथा होती. त्याविरोधात देवराय द्वितीय याने ब्राह्मण प्रतिनिधींची बैठक बोलावून ही प्रथा बंद करण्याची आणि 'कन्या दान' करण्याची प्रथा चालू केली. तसेच अशा प्रकारे हुंड्याचा स्वरूपात आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाईचे संकेत दिले. राजाने अनेक प्रकारचे जमीनविवादसुद्धा शांततेच्या मार्गाने पुढाकार घेऊन सोडविले.

**३) प्रशासनातील प्रमुख अधिकारी वर्ग:**

१) पंतप्रधान किंवा महाप्रधान किंवा शिरप्रधान (राजाचा सल्लागार)

२) मुख्य खजिनदार

३) सुवर्ण प्रमुख (सोन्याच्या खजिन्याचा रक्षक)

४) पोलिस प्रमुख (दरोडे, चोरी यांची नोंद ठेवणे, कायदा-सुव्यवस्था)

प्रशासनातील वरील अधिकारी वर्गास वेगवेगळ्या प्रमाणात राजाकडून जहागिर बहाल केली जाई. एवढे जरी असले तरीही भ्रष्टाचार व लाचखोरी प्रशासनात शिरलेली होती.

**४) राजदरबार:** विजयनगरच्या राजांनी आपला भव्य राजदरबार निर्माण केला होता आणि त्याच्या व्यवस्थेसाठी वारेमाप पैसा खर्च केला जात होता. राज्याच्या वैभवशाली व भरभराटीचे प्रतिक म्हणजे राजाचा दरबार असे. राजदबारामध्ये सरदार, विद्वान, पुरोहित, ज्योतिषी, संगीतकार व इतर कलाकरांना प्रवेश असे. राजदरबाराद्वारे मोठ्या थाटा-माटात व उधळ पट्टीत अनेक प्रकारचे सण उत्सव साजरे केले जात असत. राजदरबाराद्वारे वर्षामध्ये प्रमुख चार प्रकारचे सण-उत्सव केले जात असत. त्यामध्ये नुतन वर्ष दिपावली, महानवमी आणि होळी यांचा समावेश होता.

**५) प्रांतिक प्रादेशिक प्रशासन:** विजयनगरच्या साम्राज्याचे विभाजन जवळजवळ २०० प्रांतांमध्ये केले होते. प्रांतांचे विभाजन पुन्हा 'नाडू' किवा 'कोट्टम' मध्ये आणि पुन्हा 'नाडू' किंवा 'कोट्टम'चे विभाजन छोटी छोटी शहरे व खेडी यात केले होते.

**प्रांतिक प्रशासन:** प्रत्येक प्रांतांच्या प्रमुखास व्हाईसरॉय म्हटले जाई आणि त्याची नेमणूक राजघराण्यातील व्यक्ती किंवा एखादा प्रभावशाली सरदार यांच्यामधून केली जाई. प्रांतांची प्रशासन व्यवस्था केंद्राप्रमाणेच असे. व्हाईसरायला आपले स्वतःचे सैन्य बाळगावे लागत असे आणि आपल्या प्रांतिक अधिकार क्षेत्रामध्ये राजाप्रमाणेच एकाधिकार शाहीने वागत असे तरीही त्याचे स्थान एखाद्या सरंजामदाराप्रमाणेच असे. परंतु आपल्या कामाचा पूर्ण हिशेब त्याला सम्राटाकडे सादर करावा. लागत असे. तसेच युद्धाच्यावेळी सम्राटाला आपल्या सैन्यानिशी मदत करावी लागत असे. ज्यावेळी त्याने राजाचा विश्वासघात केला किंवा लोकांचा छळ केला तेव्हा त्याला कडक शिक्षा केली जाई.

**६) स्थानिक प्रशासन:** प्रांताचा सर्वाच खालचा घटक म्हणजे गाव किंवा खेडे होय. त्याच्या कारभार उत्तरभारतातील 'गाव' पंचायतीप्रमाणेच चालवला जाई आणि त्याचा वंश परंपरागत अधिकारी 'अयागार' असे हे अधिकारी (अयागार) एकूण बारा जणांचे मंडळ असे. त्यांना जमिनीची तुकडा दिला जात असे किंवा शेतकऱ्यांच्या धान्यातला

एक ठराविक हिस्सा कामाचा मोबदला म्हणून दिला जात असे. त्यांच्यापैकी काही जग न्यायनिवाडा करीत असत. त्याचप्रमाणे राज्याचा महसूल जमा करणे आणि खेड्यामध्ये कायद सुव्यवस्था राखण्याचेसुद्धा काम त्यांना करावे लागे.

७) **महसूल प्रशासन:** राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत जमीन महसूल होते. उत्पन्नाच्या इतर साधनांमध्ये खंडणी, भेटवस्तू आणि 'महानवमी' उत्सवादरम्यान जकातकर, व्यवसायकर. गृह, बाजार व परवाने इ. कर वसूल केले जात. बंदराच्या विकाराद्वारे फार मोठा महसूल जमा होई. अंतर्गत व्यापार व वाणिज्य सुद्धा एक उत्पन्नाचे सांधन बनले होते. महसूलाचा भरणा रोखीने किंवा वस्तूविनिमयाने सुद्धा केला जाई.

जमिनीचे काळजीपूर्वक सर्वेक्षण केल्यावरच जमिनीचा महसूल वसुल केला जाई. जमिनीचे तिच्या उत्पादनानुसार तीन प्रकार केले जात. त्यामध्ये

१) ओलिताखालील जमिन

२) कोरडवाहू जमिन आणि

३) जंदल व्याप्त जमिन असे.

इतिहारकार नुनिज याच्या मते, शेतकऱ्याला आपल्या स्थानिक प्रमुखास ९/१० एवढे उत्पादन द्यावे लागे आणि त्यातील अर्धे उत्पादन तो राजाकडे जमा करीत असे. महसूल प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'आठवणे' नावाचा विशेष विभाग कार्यरत होता. असंख्या कारांमध्ये 'विवाह कर' हा संपूर्ण राज्यामध्ये प्रचलित होता. परंतु सलुवा टिम्मने तो रद्द केला. एवढेच नाही तर काहीच्या मते 'वेश्या व्यवसाय कर' सुद्धा वसुल केला जाई. त्यामुळेच शेतकरी हा विजयनगरच्या साम्राज्यात करांच्या ओझ्याने दबला गेला होता. परंतु कृष्णदेवरायने हा अन्याय काही प्रमाणात दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु इतर कमजोर राजांच्या कारकीर्दीत जनतेचे पुन्हा शोषण चालू झाले.

राज्याचा महसूल दोन प्रकारच्या खजिन्याने नियंत्रित केला जाई. प्रथम दैनंदिन जमाखर्च आणि दुसरा मोठ्या प्रमाणावरील अमानत ठेवी आणि सोन्याच्या वस्तू एका तिजोरीत असत ज्या नेहमी कुलूपबंद आणि जेव्हा राजाला अत्यंत तातडीची गरज असेल तेव्हाच उघडली जात असे.

खर्चामध्ये राजदरबाराचे व्यवस्थापन, त्याचा थाट-माट, सैन्याचे व्यवस्थापन आणि दानधर्म ह्या प्रमुख बाबी असत. कृष्णदेवराय याने 'अमुक्तमाल्यदा' या आपल्या ग्रंथामध्ये असे लिहिले आहे की, राज्याच्या खजिना चार भागामध्ये ठेवणे आवश्यक आहे. पहिल्या १/४ भागामध्ये राजदरबार आणि दानधर्म तर दुसरा व तिसरा भाग सैन्यासाठी तर शेवटचा १/४ भाग राखीव धन म्हणून तिजोरीत ठेवावा.

८) **न्यायव्यवस्था:** राजा हा न्यायव्यवस्थेचा प्रमुख स्त्रोत आणि शेवटचा न्यायधिश असे. तसे ठराविक व्यवस्थापन अस्तित्वात नसले तरीही ताबडतोब उपलब्ध माहिती व पुराव्यांच्या आधारावर न्यायदान केले जाई. विशेषतः हिंदु कायद्याप्रमाणेच व परंपरेप्रमाणे न्यायदान केले जात असे. तसेच हिंदु चालीरिती रिवाजांचे उल्लंघन

केल्यास कडक शिक्षा केली जाई. नागरी कायद्याचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जाई.

तरीही फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्ये कठोर शासन केले जात असे. सत्य उघड करण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केला जाई आणि कडक शिक्षा केली जाई. चोरी, व्याभिचार आणि देशद्रोह यांना मृत्युदंड किंवा हातपाय कापण्याची शिक्षा दिली जाई. ब्राह्मणांना मृत्युदंड माफ होता. स्थानिक पातळीवर 'नायक' आणि 'गौडा' यांना न्यायदान करण्याचा अधिकार दिला गेला होता.

९) **सैन्यव्यवस्था:** विजयनगरचे लष्करी व्यवस्थापन संरजामदारी स्वरूपाचेच होते. राजाचे स्वतःचे खडे सैन्य असे आणि युद्धाच्यावेळी प्रांतिय गवर्नर राजाला सैन्याचा पुरवठा करीत असत. पेस याच्या मते, इ.स. १५३० च्या युद्धामध्ये कृष्णदेवरायच्या सैन्यात ७,०३६०० पायदळ, ३२,६०० घोडदळ आणि ५५१ हत्तीदळ यांचा समावेश होता. त्यांबरोबरच छावणी दार, स्वयंपाकी, मदतनीस ही बरोबर हजारोंच्या संख्येने होते. नुनीज याने सुद्धा तशीच आकडेवारी दिली आहे त्यामुळे त्यामध्ये काही प्रमाणात अतिशयोक्ती वाटते. असे असते तरी आपल्या शेजारच्या मुस्लिम सत्तांकडून सततच्या धोका व युद्धजन्य परिस्थिती यामुळे विजयनगर साम्राज्याकडे शक्तीशाली लष्कर होते असे म्हणावे लागते.

लष्कराप्रमाणेच कार्यक्षम पोलिस प्रशासन आणि गुप्तहेर विभाग कार्यरत होता. राजाला नेहमीच राज्यामधील व शेजारील प्रदेशांतील बातम्यांची खबर दिली जात असे. त्यामुळे गुप्त कारस्थाने, आपापसांतील भांडणे, गव्हर्नरांचे (प्रादेशिक) बंड इ. विषयी योग्य माहिती गुप्तहेर विभागाकडून दिली जाई. रात्रीची गस्तपथके पाठवली जात असत. रस्ते सुरक्षित असत. त्यामुळे अब्दुल रज्जाकसारख्या इतिहासकाराने विजयनगरच्या कायदा-सुव्यवस्थेची स्तुती केली आहे.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- विजयनगरची प्रशासन व्यवस्था सांगा.

### ६.४.५ सामाजिक व आर्थिक परिस्थिती:

विजयनगरचे साम्राज्यांतर्गत समाजव्यवस्था विषमतेवर आधारित होती. अल्पसंख्य समाज हा राजा. त्याचे आप्तेष्ट, सरदार नोकरवर्ग, व्यावसायिक-व्यापारी यामध्ये होता तर बहुसंख्य समाजामध्ये गरीब जनता, कामगारवर्ग, मजूर, शेतकरी इ. चा समावेश होता. त्यामुळे राजदरबाराचा भव्य-थाट माट आणि गरीब जनता ही एक विरोधाभासी समाज व्यवस्था विजयनगरमध्ये आपल्याला आढळते.

दक्षिण भारतातील मुस्लिम संत्तांनी 'द्वंद्व' युद्धाची कल्पना प्रचलित केली होती. त्याचे अनुसरण विजयनगर साम्राज्यात सुद्धा केले. जाई. द्वंद्व युद्धात जो कोणी जिंकेल त्यालाच हरलेल्याची, किंबहुना द्वंद्वामध्ये मृत झालेल्याची संपत्ती वाटून दिली जाई. हे द्वंद्व खेळण्यास मंत्र्याची परवानगी असावी लागे.

हिंदुच्या उच्चभ्रू समाजात 'सती' प्रथा प्रचलित होती. असे असले तरी स्त्रियांची अवस्था बऱ्यापैकी होती. कारण आपणास स्त्री पैलवान, स्त्री ज्योतिषी, स्त्री हिशोबनीस, स्त्री कारकून यांची माहिती मिळते. याचा अर्थ स्त्रिया शिक्षणामध्ये पुढारलेल्या होत्या हे आपणास आढळून येते.

वेश्याव्यवसाय ही सर्वसामान्य प्रथा होती आणि वेश्यागृहे मोठ्या प्रमाणात शहराच्या ठिकाणी असत. त्याच्याकडे व्यापारी व इतर धनाढ्यांचा सतत वावर असे. परंतु सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वेश्यांना भाग घेता येत असे आणि उच्च अधिकारी व सरदार त्यांच्याबरोबर उघडपणे नाचगाणे करत असत.

विजयनगरच्या साम्राज्याला मुस्लिम सत्तांकडून सतत धोका असला तरी विजयनगरने सर्वधर्मसमानतेचे तत्व पालन केले होते. प्रत्येकाला राज्यात आपल्या धर्म परंपरेनुसार, पंथानुसार जीवन व्यतीत करण्याचे स्वातंत्र्य होते. याउलट मुस्लिम राजांमध्ये असे धार्मिक स्वतंत्र्य असल्याचे क्वचितच आढवून येते असे काही इतिहासकारांचे मत असल्याचे दिसते.

इटालियन प्रवासी निकोलो कोंती याने इ.स. १४२० मध्ये विजयनगरला भेट दिली. तो लिहितो की, विजयनगरचा परीघ हा ६० मैलांचा असून सभोवताली भिंतीचे कुंपण होते. तसेच शहरामध्ये ९०००० शस्त्रधारी जवान आहेत.

पर्शियन राजदूत अब्दुल रज्जाक याने विजयनगरला इ.स. १४४२-४३ दरम्यान भेट दिली. त्याच्या मते, राजाच्या तिजोऱ्या सोन्याने ओतप्रोत भरलेल्या होत्या. तेथील सर्व लोकांच्या गळ्यात, कानात, नाकात, हातात, बोटात, सोन्याचे दागिने होते. विजयनगर शहराच्या बाबतीत आपल्या डोळ्याने असे शहर पाहिले नाही आणि या पृथ्वीतलावरदेखील असे अस्तित्वात असू शकत नाही.

पोर्तुगीज प्रवासी डोमिंगो वेस याच्या लिखाणानुसार “विजयनगर हे जगातील सर्वात समर्थ शहर असून तेथे सर्व प्रकारचे तांदूळ, गहू धान्य कडधान्य, प्राण्यांचे खुराक यांचा एकाच ठिकाणी सुसज्ज साठा असल्याचे आढळून येते. बाजारपेठ नेहमीच गजबजलेली दिसते. या शहरात प्रत्येक जाती धर्माचे लोक वास्तव्य करीत होते.”

यावरून आपल्या असे लक्षात येते की, विजयनगरचे साम्राज्य हे भरभराट व वैभवशाली होते.

विजयनगरमध्ये उद्योग व्यवसायची भरभराट झालेली होती. कृषिविकास व जलसिंचन विकास झाला होता. उद्योगांमध्ये कापडउद्योग, खाणकाम, धातूकाम, सुंगधी द्रव्ये इ. चा विकास झाला होता. उद्योग - व्यापार हा संघटित असून सागरी व्यापाराचाही विकास झाला होता. अब्दुल रज्जाक याच्या मते, विजयनगरमध्ये जवळजवळ ३०० बंदरे होती. उदा. हजोवर, भटकळ, मंगलोर, कालिकत, कोचिन, क्विलॉन, कावल, नेगापटम, सेंट थोम, पुलिकत इ.

अरब, पोर्तुगिज यांच्याशी परदेश व्यापार चाले. त्यामध्ये प्रमुख म्हणजे मलाया, बर्मा, चीन, पर्शिया, ॲबिसिनिया, द. आफ्रिका आणि पोर्तुगाल यांचा समावेश होतो.

विजयनगरमध्ये सोन्या-चांदीची उत्तम नाणी पाडली जात. सोन्याच्या नाण्यांना 'वराह' आणि त्याचे वजन ५२ ग्रेन होते. नाण्याच्या एका बाजूला बैल, हत्ती, हिंदु देवता, 'गंडबेरूंड' द्विगरूड तर दुसऱ्या बाजूला त्यावेळच्या राजाचे नाव असे.

विजयनगरमध्ये जातिसंस्थेचे अस्तित्व सर्वमान्य असल्याचे दिसते. अल्लासनी पेड्डाना हा महान कवी आपल्या 'मनुचरित्रमु' या काव्यसंग्रहात विजयनगर साम्राज्यात प्रमुख चार जातींचे अस्तित्व असल्याचे लिहितो. त्यामध्ये – १) विठ्ठलू (ब्राह्मण), २) राजुलू (क्षत्रिय), ३) मोतीकिराटालू (वैश्य) आणि ४) नालावजातिवरु (शुद्र).

वरील प्रमुख जातींची कार्ये व समाजातील स्थान मनुस्मृती मध्ये दर्शविल्याप्रमाणेच असून शुद्रांची अवस्था गुलामापेक्षाही दयनीय होती.

सामान्य जनता आणि राजा मांसाहारी होते. पशू यज्ञ सर्वत्र प्रचलित होते. ब्राह्मण, जैन व शैव पूर्ण शाकाहारी होते. सुरूवातीच्या काळातील राजे शिवाजी पूजा करत 'विरूपाक्ष' ही त्यांची कौटुंबिक देवता होती. परंतु नंतरच्या काळात त्यांनी शैव पंथातून वैष्णव पंथात शिरकाव केला. कृष्णदेवराय हा विष्णू व शिवाचा भक्त होता. अच्युतराय वैष्णवी होता. त्याचप्रमाणे जैन धर्माचे सुद्धा अस्तित्व होते आणि त्यांना राजाश्रय मिळून सहिष्णु वागणूक मिळत होती.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- विजयनगरची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सांगा. उत्तर

**६.४.६ कला व स्थापत्यकला आणि साहित्य:**

विजयनगरच्या काळात कला, साहित्य, स्थापत्य यांना दक्षिण भारतीय शैलीने प्रभावित केले होते व त्याची भरभराट झाली होती. देवळे व त्यांचे स्थापत्य अत्यंत विकसित व उच्च श्रेणीचे होते.

विजयनगरला संपूर्ण तटबंदी असून उंच उंच व मजबूत प्रवेशद्वारे होती. त्यांची स्थापत्य शैलीही पूर्वीच्या चोल, चालुक्य, पांड्य आणि होयसल राजांच्या शैलीवर आधारित होती. प्रवेशद्वारे ग्रॅनाइटची असून गोपुरे विटा, लाकूड यांपासून बनवलेली होती. गोपुरांवर मानवी व दैवी आकृत्या कोरलेल्या असत गोपुरांच्या वरती 'शालाशिखर' बांधले जाई. स्त्री देवतेच्या देवभामध्ये गर्भगृहाची रचना केलेली असे. विजयनगरच्या स्थापत्य शैलीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तेथील स्तंभरचना होय पुढील पाय उंच करून उभे राहिलेल्या घोड्यांच्या आकृत्या कोरलेल्या आढळतात.

विजयनगरची प्रमुख मंदिर स्थापत्य हम्पी, श्रीरंगम, केमालापुरम, तोडापत्री, लेपाक्षी, भटकळ इ. ठिकाणी आढळते. त्यामध्ये प्रमुख देवता म्हणजे विठ्ठलस्वामी, हजारा रामस्वामी, कृष्णस्वामी, भुवनेश्वरी, अच्युतराय, विरूपाक्ष, कोदंडर्मा इ. होत.

विजयनगरच्या स्थापत्य केलेचे आणखी एक उत्तम उदाहरण म्हणजे सिंहासनाचा मंच जो कृष्ण देवरायने बांधलेला होता. त्याची सर्वात खालची थर १३२ फूट लांब तर सर्वात वरचा

थर ७८ फूट लांब होता. आणि तो अनेक प्रकारच्या नक्षीकामानी सजविलेला होता. एक हजार स्तंभ असलेला मंडप म्हणजे स्थापल्यशास्त्राचा उत्तम नमूना होय.

१) **शिल्पकला:** अतिशय उत्तम शिल्पकला विजयनगरमध्ये असलेली दिसून येते. त्यामध्ये सूर्यनारायण, गुलगंगी महादेव (विष्णू), विठ्ठलस्वामी मंदिरातील कृष्णमूर्ति, स्त्रीदेवी कालायदामन, योगी नगसिंह, मंदिरातील कृष्णमूर्ति, स्त्रीदेवी कालायदामन, योगी नरसिंह, कोडलकालू गणपती, या देवतांच्या नमूनेदार शिल्पे आहेत. त्याच प्रमाणे नृत्यांगना, ढोलवादक, झांजवादक आणि द्वारपाल यांची सुद्धा शिल्पे उत्तम मूर्तीकलेचा नमूना आहेत. ही सर्व शिल्पे हम्पी येथे आढळतात. तसेच कुव्वत येथील मदनिकांची शिल्पे, लेपाक्षी येथील शिवशिल्पे इ. अत्यंत उल्लेखनीय आहेत.

२) **रंगकला:** विरूपाक्ष मंदिराच्या कल्याणमंडपावरील छतावर रंगवलेले चित्रे आणि त्यांचा मुख्य विषय धार्मिक ओळी हा आहे. तसेच लेपाक्षीचे विरभद्र मंदिरातील चित्रांमध्ये आपल्या अनेक धार्मिक बाबींचे अस्तित्व जाणवते. त्यामुळेच लेपाक्षी चित्रकलेला 'दक्षिणेतील अंजिंठा लेणी' म्हटले जाते.

३) **संगीतकला:** विजयनगर राजांनी नृत्य व संगीतकलेला राजाश्रय दिला होता. कर्नाटक संगीताची भरभराट संपूर्ण राज्यामध्ये झाली होती. महान विद्वान विद्यारयन आणि रामनाथ्य यांनी आपले संगीतविषयक ग्रंथ संस्कृतामध्ये लिहिले तर पुरोंदरा दासा यानी ते कन्नडमध्ये लोकप्रिय केले. नृत्यमहाल हा राजमालास जोडूनच असे. त्याचा उपयोग नृत्यासाठी व नृत्यांगनांना वेगवेगळे कलाप्रशिक्षण देण्यासाठी केला जाई.

४) **साहित्य:** लष्करीदृष्ट्या बलाढ्य विजयनगर हे सांस्कृतिकदृष्ट्या तितकेच प्रगत होते. वेदांतदेशिका हा तामिळ आणि सांस्कृतमधील (१२६८-१३६९) उत्तम साहित्यिक होता. त्याचे कृष्णाच्या जीवनावर आधारित महाकाव्य 'यादवअभ्युदयम' प्रसिद्ध अहो. 'हंस संदेश' हे कालिदासाच्या काव्यपर आधारित आहे. तर 'संकल्पसूर्योदय' हे दहा अंकी नाटक प्रसिद्ध आहे. त्याच दरम्यान 'तत्वमुक्तकल्प' हे तात्विक आणि धार्मिक प्रश्नावर आधारित मिमांसा आहे. माधव विद्यारण्यसुद्धा एक प्रसिद्ध साहित्यिक होते. त्यांनी संपूर्ण मिमांसादर्शन लिहिले. त्याचे 'पंचदांसी' है १५ प्रकरणांचे अदवैत तत्वज्ञानावर आधारित वाङ्मयसुद्धा प्रसिद्ध आहे. पाराशर स्मृतीवर आधारित 'पाराशर माधवीय' हे भाष्य आणि 'सर्वदर्शनसंग्रह' हे १६ प्रकरणांचे टिकात्मक तत्त्वज्ञान याच काळात लिहिले गेले.

विजयनगरच्या राजाश्रयाला माधव आणि त्याचे भाऊ सायन्ना आणि भोगनाथ हे होते. माधवने 'वेदभाष्य', 'सायन्ना ने व्याकरण, कविताशास्त्र आणि औषधे यावर तर भोगनाथ ने कविता रचल्या.'

कृष्णदेवराय स्वतः आश्रयदाता आणि संस्कृतच तेलुगूमधील ग्रथांचा कर्ता आहे. त्याचे संस्कृतामध्ये 'जांबवतीकल्याणम' आणि 'उषा परिणयम्' ही नाटके लिहिली. अप्पाय दीक्षिता (१५२०-१५९२) संस्कृतचा महान लेखक होता आणि त्याने जवळजवळ शंभर पेक्षा जास्त रचना केल्या.

रेड्डीनी १४ व्या शतकामध्ये एररा प्रागदा आणि श्रीनाथ यांना राजाश्रय दिला होता. 'उत्तर हरिवंश' चा लेखक नाचना सोमा (१३५५-१३७७) बुक्क प्रथम च्या दरबारात होता. सलुवा नरसिंह ने 'जैमिनी भारतानु' आणि 'श्रीरंग शाकुंतल' चा लेखक पिना विरभद्र (१४५०-१४८०) राजाश्रय दिला.

कृष्णदेवरायचा कालखंड हा तेलगु साहित्यासाठी सर्वात गौरवशाली होता. त्याने राजाश्रयाबरोबरच 'अमुक्तमाल्यदा' सारखे महाकाव्यसुद्धा लिहिले. विक्रमादित्याच्या नवरत्नदरबाराप्रमामेच त्याच्या दरबारात अष्टरत्ने होती. त्यामध्ये अल्लासनी पेड्डाना, नंदी तिम्मना, अय्याला राजू, रामभद्रैय्या दुर्जती, मदयगिरी मल्लाना, सुरण्णा, रामराजा भूषण आणि तेनाली रामकृष्ण यांचा समावेश होता.

अशाप्रकारे विजयनगर साम्राज्यामध्ये सर्व कला गुणांचा समतोल विकास होऊन त्यांनी उच्च आस्वादाची शिखरे पदाक्रांत केली होती.

## ६.५ सारांश

विजयनगरचा साम्राजाची स्थापना हरिहर वा बुक्क यांनी केली. तरीही त्यांना राज्याला स्थैर्य प्राप्त करुन देता आले नाही. विजयनगरवर संगम, सलुवा, तलुवा इ. घराण्यांनी राज्य केले असून कृष्णदेवराय हा अत्यंत पराक्रमी राजा होऊन गेला. त्याच्या कारकीर्दीमध्ये विजयनगर साम्राज्य वैभव व भरभराटीच्या अत्युच्च शिखरावर पोचले होते. तो कलेचा भोक्ता होता. त्याच्याच कार्यकाळात राजकीय सांकृतिक स्थापत्य कलेचा विकास झाला. त्याच्या नंतरच्या राजाना मुस्लिम सत्तेचे आक्रमण थोपविता आहे नाही. आणि शेवटी १५६५ च्या तालिकोटच्या लढाईत विजनगर साम्राज्याचे वैभव पूर्णपणे लयास गेले. त्याचे विघटन होऊन छोटी छोटी राज्ये अस्तित्वात आली.

## ६.६ प्रश्न

१) विजयनगर साम्राजाच्या उत्कर्षात कोणकोणत्या वंशांनी महत्वाची कामगिरी केली?

२) बहामनी साम्राज्याचा उदय व विकास सांगा.

३) विजयनगर साम्राज्याचा शेवट कसा झाला?

४) विजयनगर आणि बहामनी साम्राज्याची प्रशासन व्यवस्था कशी होती?

५) विजयनगर व बहामनी साम्राज्याने विविध क्षेत्रात केलेली प्रगती लिहा.

## ६.७ संदर्भ

१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयंसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****

# ७

# सल्तनतकालीन सामाजिक व आर्थिक जीवन

**घटक रचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ मध्ययुगीन काळातील सामाजिक जीवन

७.२.१ समाज रचना

७.२.२ मध्ययुगीन काळातील स्त्रीजीवन

७.२.३ मध्ययुगीन काळातील गुलामगिरी

७.३ मध्ययुगीन काळातील आर्थिक जीवन

७.३.१ मध्ययुगीन काळातील कृषी व्यवसाय

७.३.२ मध्ययुगीन काळातील उद्योगधंदे

७.३.३ सुलतान काळातील व्यापार

७.३.४ सुलतान काळातील चलन व्यवस्था

७.४ सारांश

७.५ प्रश्न

७.६ संदर्भ


## ७.० उद्दिष्टे

१. मध्ययुगातील समाज रचनेची माहिती देणे.

२. मध्ययुगातील स्त्रीजीवन समजावून सांगणे.

३. गुलामगिरीची पद्धतीची माहिती देणे.

४. मध्ययुग काळातील आर्थिक परिस्थिती समजावून देणे.

## ७.१ प्रस्तावना

सुलतान काळातील सामाजिक जीवनामध्ये समाजरचना, स्त्रीजीवन गुलामगिरी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. समाजरचनेमध्ये सत्ताधारी वर्ग, मध्यम वर्ग, सामान्य जनता असून त्यांचे रहाणीमान, मनोरंजन व त्यांचे अधिकार यामुळे त्यांचे समाजातील स्थान निश्चित झाले. स्त्रीजीवनामध्ये समाजामध्ये पारंपारिक बंधने तसेच धार्मिक सांस्कृतिक क्षेत्रातील स्त्रीची भूमिका स्पष्ट होती. गुलामगिरीचा उगम-विकास आणि गुलामांची स्थिती याची माहिती सामाजिक जीवनामध्ये येते. तसेच शेती व्यवसाय, उद्योग धंदे, व्यापार आणि चलन यांचा आर्थिक जीवनामध्ये विचार करावा लागतो.

## ७.२ मध्ययुगीन काळातील सामाजिक जीवन

इस्लामधर्मामध्ये सर्व जनतेला समान मानले जाते. भारतात मुस्लिमांची सत्ता स्थापन झाल्यानंतर समाजात अनेक वर्ग तयार झाले. त्याची विभागणी सर्वसाधारणपणे तीन गटात केलेली आहे. ती म्हणजे-

१) शासक / सत्ताधारीवर्ग (अहल-ए-दौलत)

२) मध्यम / अर्थव्यवस्थेशी निगडीत वर्ग

३) सर्वसाधारण जनतेचा वर्ग

वरील प्रत्येक वर्गाचे जीवन, रहाणीमान, खाना-पिना, मनोरंजन विविध सण, उत्सव यामधील त्यांचे स्थान अथवा सहभाग याचा विचार यामध्ये करावा लागणार आहे.

### ७.२.१ समाज रचना:

**अ) सत्ताधारीवर्गाची रचना (अहल-ए-दौलत):**

**१) सुलतान:** मध्ययुगात सत्ताधारी वर्ग हा सर्वात महत्त्वाचा वर्ग होता. त्यामध्ये सुलतानाला सर्वश्रेष्ठ स्थान होते. सुलतान राज्याचा सर्वोच्च व निरंकुश पदाधिकारी होता. तो सार्वभौम शासक होता. राज्याचे कार्यकारी, कायदे, न्याय, सैनिक त्याच्या हाती होते. त्याच्या नावाने खुतबा वाचला जात असे. नाण्यावर त्याचे नाव कोरले जात असे. सुलतान स्वतःला खलिफाचा प्रतिनिधी / नायब मानत असे. परंतु त्याच्या राज्यकारभार खलिफाचा हस्तक्षेप नसे. त्यामुळे सुलतानाची शक्ती व्यापक होती. मंत्र्याच्या मदतीने राज्यकारभार करत असे. मंत्र्यांची नेमणूक बढती बडतर्फ तो स्वतः करत असे. सुलतानांला निरंकुर सत्तेसाठी इतरांची मदत घ्यावी लागत असे. त्यामुळे या धोरणालाही मर्यादा होती. व्यक्तिगत कायदा आणि धर्माचा प्रभाव, उमरावांची मदत, प्रशासनाचे सार्वजनिक अधिकारी व कर्मचारी, मुसलमानांची कमी संख्या इ.

सुलतान अतिशय विलासी-वैभवात जीवन जगत असे. रत्नजडित, सिंहासन असे. छत्र, दुरवाश सायवान त्याचे राज्यचिन्ह होते. राज्याभिषेकाच्यावेळी प्रचंड पैसा खर्च करत असे. अल्लाउद्दीनने राज्याभिषेकाच्या वेळी सोने-चांदीची खिरापत वाटली होती. फिरोजशहा, महंमद तघलक, गादीवर आल्यानंतर मोठ्या शानदारमध्ये उत्सव साजरे केले. राजदरबारात प्रवेश करताना वाद्य वाजवत असे. त्यावेळी दरबारातील सर्वजण उभे राहत असे. सुलतान सिंहासनावर बसल्यानंतर महालातील कर्मचारी एका स्वरात बिस्मिलाह म्हणत असे. सुलतानाचे मधुर संगीताच्या तालावर दर्शन घेत असे.

दरबारात सुलतानाचे मनोरंजनासाठी अनेक कलाकार, कलाबाज, नादिम, भाँड, संगीततज्ञ आणि विदुषक होते. दास-दासी असे. दरबारात कवी, ज्योतिषी असे. नादिमांचे कार्य सुलतानाला प्रसन्न करणे. ती प्रतिभासंपन्न किंवा, अत्याधिक व्यवहारकुशल होता. त्याचा सुलतानावर विशेष प्रभाव असे. सरजानदार सुलतानाची रक्षण करत असे सर आबदार सुलतानाच्या स्नानाची तयारी करत असे. भोजनाचा चारशनीगीर शराब देण्यासाठी साकी

ए-खास याची नेमणूक केलेली असे. सुलताना प्रमाणेच मोगल काळात बादशाहाचे जीवन होते.

२) **अमीर-उमराव वर्ग:** सुलतान काळात सुलतानानंतरचे दुसरे पद म्हणजे उमराव होय. त्याचा सत्ताधारी वर्गात समावेश होता. सैनिक आणि असैनिक असे दोन प्रकारचे अमीर होते. प्रारंभीच्या काळात अमीरामध्ये अफगान, तुर्क, मंगोल, अरब यांचा समावेश होता. तुघलक सुलतानांनी ही भारतातील सामान्य घरातील लोक व परदेशी लोक यांची नेमणूक या पदावर केली. गुलामाची ही नेमणूक झाली. गुलाम वंशीय सुलतान जन्माने तुर्क होते. या वर्गातील सभासदांचा सामाजिक दर्जा त्यांच्या लष्करी पदावरून ठरत असे. सरखेल, सिपाहसालार, अमीर, मलिक, खान अशी त्यांची चढती पदे होती. यांच्यात सर्वांत श्रेष्ठ मानले जात त्याला

उलूग-खान-ए-आजम ही उपाधी दिली जात असे. अमीरच्या खालचे सैनिकी अधिकारी सिपहसालार, सरखेल होय. शाही दरबाराच्या भू-विभागाचा कर एकत्र करणारा अमीर अधिकारी होता. चांगले काम करणाऱ्या अमीराला ख्वाजाजहां, इमाइउल-मुलक, सदर-ए जहाँ, अददाम-उल-मुलक इ. उपाधि दिल्या जात असे. अमीरासाठी मरातिबचे पद सम्मानाचे पद होते. राज्याची जमीन इक्तामध्ये विभागून त्याची देखभाल अमीर करत असे. अमीराला त्याच्या पदानुसार सुलतान वस्त्र, तलवार, घोडा, हत्ती इ. प्रदान करत असे. खान दहा आणि अमीर दोन घोडे ठेवत असे.

सुलतानाचा सहकार्य शासक म्हणून अमीरला ओळखले जाते. त्यांचा वाढता प्रभाव सुलतानाला चिंतेचा विषय होता. इल्तुतमिशने अमीराच्या सहकार्याने सत्ता प्राप्त केली. परंतु आपल्या सत्तेच्या सुरक्षिततेसाठी चाळीस अमीरांचा गट स्थापन केला. अल्तमशच्या नंतर त्यांनी सुलतानाला गादीवर बसवले व दूरही केले. जल्लालउद्दीन व अल्लाउद्दिन खिलजीने अमीरावर पूर्ण नियंत्रण ठेवले. सय्यदवंशाच्या काळात प्रांतीय गव्हर्नर बहलोल लोदीने लोदी वंशाची स्थापना केली. अमीरने त्याला दूर करण्याचा प्रयत्न केला. अमीर दौलतखानने इब्राहिम लोदीला दूर करण्यासाठी बाबरची मदत घेतली. बाबराने मोगल वंशाची स्थापना केली.

३) **जहागीरदार व जमीनदार:** मध्ययुगीन समाजव्यवस्थेत जहागीरदार व जमीनदार यांना महत्त्वाचे स्थान होते. कनौजच्या गुर्जर प्रतिहारांच्या काळापासून उत्तर भारतात हे वंशपरंपरागत होते. राजपूतांनी त्यांना मांडलिक बनवले होते. त्यांच्या कडून खंडणी वसूल करत होते. तेच धोरण सुलतान काळात राबवले.

४) **सरकारी अधिकारी वर्ग:** सुलतान, अमीर यांच्या बरोबर अन्य सरकारी अधिकारी वर्ग होता. शासनाच्या व्यवस्थेसाठी वेगवेगळे विभाग केले होते. कोणत्याही अधिकाऱ्याचे वेतन वाढवण्याचे स्वातंत्र्य सुलतानाला होते. सुलतान जलालुउद्दीन खिलजीने आपल्या मित्राला वेतन वाढ म्हणून वकील-ए-दार या पदावर नियुक्त केले आणि त्याचे वेतन १ लाख जीतल केले. महमंद तघलकने काही अमीरांचे वेतन प्रतिवर्ष २० हजार टंकावरून ४० हजार टंका केले. कार्यालयीन कर्मचारी प्रतिवर्षी १० हजार टंका असे. सदर जहान व शेख-उल इस्लामचे वेतन १०,००० टंका प्रतिवर्ष होते. फिरोज सुलतानाचा प्रसिद्ध वजीर खानजहाँ मकबूलला शेतसाऱ्याच्या स्वरूपात १.५ लाख

टंका प्राप्त होत असे. मुतसाहिबला एक गावाच्या स्वरूपात पगार दिला जात असे. फिरोज तघलकचा मंत्री मलिक शाहीन जवळ जवाहीर सोडून ५० हजार टंका रोख संपत्ती होती. मियाँ मुहम्मद जवळ ३०० मण सोने होते.

छोटे-छोटे सेनाधिकारी, सिपाह किंवा वसूल गोळा करणारा मुकादम होता. अल्लाउद्दीन खिलजीने सैनिकांचा पगार २३४ टंका प्रतिवर्षी केला. मुकादमला कमीशन मिळत असे. महमंद तघलकचे घरेलू गुलामाला दोन मण प्रति महिना धान्य व १० टंका वेतन आणि वर्षात चार कापड जोड्या असे. फिरोजशहाने गुलामाला १०० टंका वेतन दिले. सरकारी नोकरीमध्ये भरपूर पगार मिळत असे. त्यामुळे त्यांची एकूण परिस्थिती चांगली होती.

५) **बुद्धीजीवी / धर्म व्यवस्थेशी निगडीत वर्ग:** या वर्गामध्ये काझी, उलेमा, सय्यद, धार्मिक नेते आणि साहित्यिक यांचा समावेश होतो. समाजामध्ये या वर्गाला मानाचे स्थान होते. यांच्यातही सत्ताधारी लोक असे. समाजावर व सरकारवर या वर्गाचा मोठा पगडा होता. काझी व उलेमा यांचा समाजावर मोठा प्रभाव होता. सय्यद, अरब आणि इराणी लोकांची काझी व इमाम म्हणून नेमणूक केली जात असे.

अ) **काझी:** मुस्लिम समाजात न्यायदानाचे काम करणाऱ्या न्यायाधिशाला काझी म्हणत असे. मुख्य काझी राजधानीतील खटल्यांचे न्यायदानाचे काम करत असे. त्याच्या हाताखाली इतर काझी व विविध प्रांतात व शहरात काझी असे. प्रमुख काझीकडे सद्र-उस-सुदूर न्यायदानाबरोबर धार्मिक खातेही असे. त्या मार्फत तो धार्मिक देणगी, न्यायदान, इस्लामिक कायदा व त्याचे पालन योग्य होते की नाही ते पाहावे. सर्व मुस्लिम दिवसातून पाचवेळा नमाज पढतात की नाही, रमझानचे उपवास करतात की नाही इ. लक्ष ठेवणे. न्याय देताना मुस्लिम शरीयत आणि हदीसनुसार न्यायदान करावे. त्याला मुस्लिम कायद्याचे ज्ञान चांगले माहित असावे. त्यांचा राज्यकर्त्यांवर प्रभाव असे.

ब) **उलेमा:** सुलतान काळात न्याय, धर्म व शिक्षण संबंधीत उच्च पदावर उलेमाची नेमणूक केली जात असे. समाजातील अत्यंत महत्त्वाचा वर्ग होता. मुस्लिम समाजाचा उलेमा धर्मगुरू / पादरी होता, त्याला दस्तार-बंदा असेही म्हणत असे. उलेमामध्ये सर्वश्रेष्ठ योग्यता असलेल्या उलेमाला शेख-उल-इस्लाम असे म्हणत. समाज व बुद्धिजीवी वर्गात सर्वात जास्त म्हणजे सुलताना पेक्षाही जास्त प्रभाव असे. सर्व सुलतान उलेमाचा सल्ला घेत असे. उलेमा हे पद वंश परंपरागत अथवा एक विशिष्ट जातीसाठी नसे. उलेमाला कुराण, हदीस व इतर धर्मग्रंथाचे संपूर्ण ज्ञान असे. सर्वांत चांगल्या उलेमाकडे सुलतान व उमराव वरचेवर भेटीसाठी जात असे. सर्वांत वाईट उलेमा सुलतान व उमरावांना भेटण्यासाठी जात असे, असे मत 'तारीखे फनुद्दीन मुबारक शाह' या ग्रंथात मोडले आहे.

उलेमाचे प्रमुख कार्य म्हणजे कायद्याचे स्पष्टीकरण किंवा सर्वसाधारण त्या संदर्भात मार्गदर्शन करणे. उलेमामध्ये प्रामुख्याने तुर्की मुसलमान असे. अल्लाउद्दीन खिलजी, महमंद तघलकने त्यांना विशेष स्थान दिले नाही. परंतु फिरोजशहाच्या काळात त्यांनी आपले पूर्वीचे स्थान प्राप्त केले. उलेमामध्ये उलेमा अखिरत व उलेमा-ए-दुनिया असे दोन प्रकार होते. उलेमा-ए-अखिरत अतिशय धार्मिक, एकांतप्रिय व सर्वसंग परित्याग करून पवित्र

जीवन जगणारे विद्वान होते. उलेमा-ए-दुनिया सर्व व्यावहारिक गोष्टीमध्ये रस घेत. काझी, मुफ्ती, सद्र-ए-जहान, शेख-उल-इस्लाम इ. अधिकारपदे यांच्याकडे असे.

दिल्ली सुलतानाशाहीच्या प्रारंभीच्या काळात उलेमाचा मोठा प्रभावही होता. सुलतान व मंत्रीमंडळाला सल्ला देणे, आपले कार्य आहे असे, समजत असे. सुलतान दैवी पुरूष आहे असे मानून समाजात सुलतानाचे महत्त्व उलेमाने वाढवले. त्यामुळे प्रारंभीच्या काळात सुलतानावर उलेमाचा प्रभाव होता. सुलतान नासिरूद्दीनने सफलता प्राप्तीसाठी उलेमाची मदत घेतली. उलेमाशी चांगले संबंध ठेवण्यासाठी सुलतान जात असे. नाहीतर आपल्या राज्यात अनेक अडचणी निर्माण होतील. अल्लाउद्दीन खिलजी, महमंद तघलक, बहलोल लोदीच्या काळात उलेमाचे महत्त्व कमी झाले. फिरोजशहा तघलक, सिकंदर लोदीच्या काळात उलेमाला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले.

६) **शासक वर्गाचे विलासी जीवन:** मध्ययुगीन काळात शासक वर्गाचे जीवन अतिशय चैनी-विलासी होते. ते आवश्यक व अनावश्यक खर्चही प्रचंड करत असे. आपल्या वैभवाचे प्रदर्शन जनतेला दाखवत असे. अत्यंत किंमती वस्त्र व अलंकार वापरत असे. सुलतान एक कुला (लांब टोपी) ऋतुनुसार उच्च किंमतीचा काबा (सदरा) वापरत असे. या शिवाय अंगरखा, फरगुल, कुरता, लटवा, गाउन (दुगला) वापरत असे. आमीर/उमराव लोक खिलात वस्त्र वापरत असे. ते वर्षातून एकदा सुलतानाकडून मिळत असे. याशिवाय काबा, सलवार, सदरा वापरत असे. उमरावांच्या खांद्यावर सफेदा पांढरी चादर, कानात बाळी, हातात सोन्याचे कडे वापरत असे. मुलांच्या कमेरला सोन्या-चांदीच्या करगोठा (साखळी) असे. चमेली, सेवटी, मोसरी, अंबर-ए-आसव तेल डोक्याला लावत असे. पुरूषांना अंगठीचा छंद होता. विविध प्रकारचे अलंकार स्त्रीया वापरत असे.

सुलतान काळात खाण्या-पिण्याच्या मोठ्या सवयी होत्या. उच्च लोक चपाती, उच्च प्रतिचा तांदुळ, दुध व दुधाचे विविध पदार्थ, दारू इ. चा उपयोग करत असे. उत्सव, सण यावेळी विशेष पार्टी आयोजित करत असे. काही पदार्थ परदेशातून मागवत असे. मांसाहारी जेवणासाठी अनेक स्वादिष्ट मसाल्यांचा उपयोग करत असे. अमीर/उमराव लोकांच्या जीवनात मिठाईला स्थान होते. दिल्ली, आग्रा मिठाईची प्रसिद्ध केंद्र होती. देशी-विदेशी फळांचा जेवणात उपयोग करत असे. काबूलमधून चेरी, समरकंदमधून नाशपती, सेब, अफगणिस्तानातून अंजीर, आयात करत असे. थंडीमध्ये सुखा-मेवा खात असे. खजूर, किशमिश, पिस्ता, काजू इ. मेवा श्रीमंत लोक खात असे. शासक लोक नशेसाठी दारू बरोबर भांग, अफू, आवडीनुसार घेत असे. उमराव लोक भांगामध्ये कापूर, अंबर, मुश्क इ. मिळसून घेत असे. कधी-कधी भांगात हरी सुपारी मिसळत असे.

७) **शासक वर्गाचे मनोरंजन:** मध्ययुगात सत्ताधारी वर्ग चैनी-विलासी जीवनजगत असे. त्यांच्या जीवनात आनंद अधिक प्रिय होता. त्यासाठी ते चांगले वाईट याचा विचार करत नसे. ते अनेक उपपत्नी, रखली, दासी ठेवत असे. ते वेगवेगळे मादक द्रव्य घेत असे. डॉ. अशरफने मनोरंजन साधनाचे तीन प्रकार सांगितले आहेत.

१) **सैनिक किंवा शारीरिक खेळ:** मुध्ययुगात श्रीमंत व शासक वर्गाचा प्रिय खेळ म्हणजे चौगान/पोलो होय. याची सुरूवात मुसलमानाने केली. कुतुबद्दीन टेबलकला त्याची

आवड होती. त्यातच त्याचा मृत्यु झाला. शिकार करणे हे दुसरे साधन होते. वाघाची शिकार करणे, विशेष गौरवाचे मानले जात. शिकार कार्याचे नियोजन व सुविधा करण्यासाठी अमीर-ए शिकार विभाग स्थापन केलेला होता. त्याचा मुख्य अधिकारी आरिजन-ए-शिकार असून खस्सादरन व मिहतरन हे कर्मचारी असे. दिल्ली जवळ शाही शिकार-गाह हा २४ मैलाचा परिसर होता. शिकार करण्यासाठी काही जनावरांना प्रशिक्षण दिले जात असे. घोडदौड हा खेळ असे. मासे पकडण्याचा छंद काही सुलतानाला होता. फिरोजशहा तुघलकने मासे पकडल्याचा उल्लेख आहे. घोडे, बैल, कुत्रे या पशुची दौड/शर्यत लावणे. चित्ता, हरिण, हत्ती, कोंबडे यांची झुंज.

**ब) सुलतान काळातील मध्यमवर्ग / अर्थव्यवस्थेशी निगडीत वर्ग:**

सुलतान काळात शासक वर्गाच्या नंतरचा मध्यम वर्ग होय. त्यांची आर्थिक परिस्थिती मध्यम होती. शासक वर्ग व सामान्य जनता यांच्या मधला वर्ग होय. मध्यम वर्गामध्ये व्यापारी, व्यवसायी, सावकार सरकारी कर्मचारी, लेखन करणारा वर्ग इ.चा समावेश होता.

१) **व्यापारीवर्ग:** समुद्रकिनाऱ्यावर राहणारे व्यापारी वर्ग अतिशय श्रीमंत होता. अंतर्गत व परदेशी व्यापारात त्यांचे महत्त्वाचे स्थान होते. पुरेसे भांडवल, साहस, धैर्य आणि चिकाटी असलेला व्यापारी वर्ग होता. व्यापारी वर्गामध्ये प्रामुख्याने बंजारा, बनिया, मुलतानी आणि खुरासानी लोकांचा समावेश होता. त्यांना भाट, दलाल/अडते, बंजारी प्रामुख्याने राजस्थानातील होते. व्यापारी मालाची वाहतुकीचे काम करत असे. खुरासनी व्यापाराच्या निमित्ताने खुरासान व इतर जवळच्या राज्यातून भारतात आलेले मुस्लिम व्यापारी होते. ते सर्व भारतभर व्यापार करत असे. बनिया व्यापारी लोक गुजरात, दख्खन, मलबार कोचीनसह पश्चिम किनाऱ्यावर व्यापार करत असे. बनिया गुजराथमधील असून बहुतेक जन जैन होते.

२) **दलाल/अडते:** व्यापाऱ्यांच्या दृष्टीने दलाल वर्ग महत्त्वाचा होता. ते व्यापाऱ्याला सर्व प्रकारची मदत करत असे. व्यापारीमाल, मालाची चढ-उत्तार, बंदरात करून घेणे. जकात भरणे, स्थानिक बाजारपेठेत माल पाठवणे इ. सेवा करत असे. पटनामध्ये ६ हजार दलाल होते. ढाक्यामध्ये पैसे न मोजता त्याचे वजन केले जात असे.

३) **सावकार:** व्यापाराबरोबरच महत्त्वाचा सावकारवर्ग होता. कर्ज व भांडवल पुरवणारा वर्ग म्हणजे सावकार वर्ग होय. त्यासाठी सावकाराच्या पेढ्या होत्या. एका प्रकारच्या नाण्याचे दुसऱ्या प्रकारच्या नाण्यात रूपांतर करून देणे. म्हणजे चलन बदल करणे. धातुची व नाण्यांची त्यांना पारख होती. हुंडी वटवणे इ. कामे करत असे.

४) **मध्यम वर्गाचे जीवन:** मध्यम वर्ग जेवणामध्ये तांदूळ, चपाती, विविध प्रकारच्या भाज्या व दूध व दुधाचे पदार्थ वापरत असे. मुसलमान व राजपूत लोक विशेष मांसाहार घेत असे. अनेक लोक दारू पित असे.

क) **सामान्य वर्ग किंवा सर्वसामान्य जनता:** शासकवर्ग व मध्यम वर्ग सोडून उरलेली सर्व लोक सामान्य वर्गामध्ये समावेश होतात. यामध्ये कारागीर, दुकानदार, छोटे व्यापारी, शेतकरी, मजूर यांचा समावेश होतो. यांची स्थिती अतिशय दयनिय होती. शेतकरी व मजूर लोक झोपडीमध्ये राहत असे. त्यांची घरे मातीची असे. घर सजावटीचे साहित्य

नसे. घरात एक किंवा दोन चादर असे. असे वर्णन पैलसर्टने केलेले आहे. धर्मांतर केलेल्या व्यक्तींची अवस्था अतिशय खराब होती.

सामान्य लोकांची आर्थिक स्थिती चांगली नसे. सुती लंगोटी वापरत असे. बंगालचे स्त्री पुरुषास धोतरा शिवाय दुसरे वस्त्र नसे. झाडाच्या पानाने शरीर झाकत असे. स्त्रीया साडी व कुरता पायजमा वापरत असे. स्त्री-पुरूष अलंकार वापरत नसे. थोडेफार चांदीचे अलंकार वापरत असे.

जेवणामध्ये उत्तर भारतात चपाती, दक्षिण भारतात तांदुळ प्रामुख्याने असे. गुजराती लोक दही-भात असे, खिचडी अनेक लोक खात असे. एकच लग्न करत असे. जर त्या स्त्रीला मुल प्राप्त होत नसेल तर दुसरे लग्न करत असे. गरीब लोकांचे मनोरंजन म्हणजे श्रीमंत लोकांचा सुविधा पुरविणे. उदा. शिकारीच्या वेळी ढोल वाजवणे, पक्षांची शिकार करणे, बैलांची दौड, खाण्यासाठी मासे पकडत असे. गरीब लोक, कुत्रे,कोंबडे, मेंढे, तीतर इ. झुंजी लावत असे. ताशाचा खेळ सर्वच लोक खेळत असे. हिंदू लोक दिवाळी, दसरा, रक्षाबंधन, शिवरात्र, मुस्लिम लोक ईद, नौरोज इ. उत्सवात भाग घेत असे.

### ७.२.२ मध्ययुगीन काळातील स्त्रीजीवन:

मध्ययुगीन काळात हिंदू-मुस्लिम स्त्रीजीवनामध्ये फार मोठा फरक नव्हता. पुरूषाच्या तुलनेने स्त्रीयांना दुय्यम स्थान होते. बालपणी वडिलांनी, तरूणपणी पतीने आणि विधवाकाळात मोठ्या मुलाने संभाळ करणे. मुलीचा जन्म अशुभ मानत असे. राजपूत लोक मुलीच्या जन्मानंतर काही वेळात तिला ठार मारत असे. स्त्रीया चार भिंतीच्या आत राहात असे. तिच्यावर अनेक बंधने असत. मुस्लिम स्त्रीया पुरूषांच्या नियंत्रणाखाली असे. परंतु पुनः विवाहाचे स्वातंत्र्य होते. मुली मैत्रीण व भावांच्या बरोबर खेळत असे. लग्नानंतर आपल्या नवऱ्याबरोबर राहात असे. तुर्की स्त्रीया कधी-कधी मस्जिदमध्ये धर्मोपदेश ऐकण्यासाठी जात असे. त्यांच्या पेक्षा पारसी स्त्रीयांना स्वातंत्र्य होते.

#### अ) सामाजिक रूढी व परंपरा:

१) **विवाह:** हिंदुमध्ये साधारण बालविवाहाची पद्धत होती. धर्मशास्त्रानुसार मुलीचे लग्नाचे वय ८ ते १२ वर्षे असावे. स्वतःच्या जीवन साथीदाराची निवड करण्याचे स्वातंत्र्य नसे. विवाह हा एक संस्कार मानलेला असे. विवाहाचे बंधन तोडणे शक्य नसते. पती-पत्नीवर सामाजिक धार्मिक ऋण फेडण्याची जबाबदारी असते. लग्न आपल्या जातीत करत असे. हिंदूच्या आंतरजातीय विवाह होत नसे. हुंडापद्धत होती मुस्लिम स्त्रीयांची विवाहबाबत हिंदू स्त्रिया सारखीच अवस्था होती. फक्त मुस्लिम स्त्रीयांचा विवाह सख्खे भाऊ सोडून कोणाशी, कोणत्याही जातीशी विवाह होत असे. कधी-कधी पुरूष पैश्याच्या लोभामुळे आपल्या पेक्षा जास्त वयाच्या मुलीशी लग्न करत असे. आंतरराष्ट्रीय विवाह होत असे.

२) **बहुविवाह पद्धत:** मध्ययुगात स्त्रीयांना उपभोगाची वस्तू मानलेली असल्याने त्यांना सन्मान नसे. त्यामुळे बहुविवाह होती. राजघराण्यातील व्यक्ती, सरदार, दरबारी श्रीमंत यांच्यात बहुपत्नी पद्धत रूढ होती. अनेक स्त्रीया असणे हे पुरूषाच्या प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असे. काही वेळा पहिल्या पत्नीला मुलगा झाला नाही म्हणून अनेक विवाह

केले. त्यामुळे सवती सवतीमध्ये वाद निर्माण होत असे. कुराणामध्ये चार पत्नी ठेवण्याची परवानगी दिलेली आहे. तरीही मुस्लिम लोक इतर काही स्त्रीया ठेवत असे. घरामध्ये कोणी सुंदर दासी आली तर, तिलाही महत्त्व प्राप्त होते. तिच्या पुढे पत्नीची उपेक्षा/हाल केले जात. रझियाची उपमाता शाहतुर्कन पहिली दासी होती. ती सौंदर्यामुळे राणी बनली.

३) **विधवाची स्थिती:** मध्ययुगात विधवा हिंदू स्त्रियांची स्थिती अत्यंत केविलवाणी होती. त्यांच्यावर अनेक प्रकारची धार्मिक बंधने होती. तिच्या आयुष्यातील सर्व आनंद नष्ट झालेला होता. तिला प्रतिष्ठा नसे. आशा-आकांशा-शुन्यात असे. तिचे आयुष्य अतिशय कष्टमय, अपमानित, लाचारीचे असे. फार तर पतीच्या संपत्तीतून तिचा उदर निर्वाहाची सोय केलेली असे. पतीच्या संपत्तीतील हिस्सा मिळत नसे. अलंकार सौंदर्यप्रसाधने वापरू नये. चांगली वस्त्रे परिधान करू नये. सार्वजनिक ठिकाणी कोणाच्या नजरेस कारणाशिवाय पडू नये. सती जाणे हे आदर्श स्त्रीचे लक्षण मानले जात असे. विधवा स्त्रीयांचे दर्शन अमंगल मानले जात असे. जयपूर कोटा, जयपूर संस्थानाने विधवा स्त्रीयांना नियमीत मदत केली व विधवा पूर्नविवाहचा प्रयत्न केला, परंतु अपयश आले. धर्मशास्त्राला मान्य नसले तरी राजस्थानात घटस्फोटाच्या काही घटना घडल्या. विधवेच्या पूर्नर्विवाहाला धर्मशास्त्राने बंदी घातल्यामुळे समाजामध्ये अनैतिकतेला चालना मिळत असे. बालविवाहामुळे बालविधवेचे मोठे प्रमाण होते. घटस्फोट, केशवपन, सती, विधवा पूर्नविवाह या गोष्टी वरिष्ठ वर्गात अधिक होत्या.

४) **पडदा पद्धत:** भारतामध्ये पडदा पद्धत केव्हा सुरू झाली. याबाबत इतिहासकारांचे मतभेद आहेत. मिस कपूर व डॉ. आलतेकरच्या मते, प्राचीन भारतात स्त्री स्वातंत्र्य होती. मुसलमानांच्या माध्यामातून ही प्रथा भारतात सुरू झाली. डॉ.वाहिद मिर्जाच्या मतानुसार भारतात बाहेरील मुसलमान येण्यापूर्वीही प्रथा सुरू होती. त्याचा प्रारंभ उत्तर भारतात काही सामाजिक रिती-रिवाज व राजपूत प्रभावाने झाला.कारण या काळात मंगोल लोकांचे आक्रमण झाली. डॉ. आशीर्वादीलालच्या मतानुसार हे ऐतिहासिक दृष्ट्या योग्य नाही कारण आवश्यकतेनुसार राजपूत स्त्रिया युद्धात लढल्या आहे. आणि राजपूतांच्या इतिहासात तसा संकेत नाही.

भारतात पडदा पद्धत होती परंतु, ती बाल्यावस्थेत होती. मोगल आक्रमणाने तिचा प्रसार झाला. भारतीयांनी आपल्या रक्षणासाठी त्याचा उपयोग केला. तुर्कशासन, पदाधिकारी, उमराव, हिंदू रूपवती तरूणीला घेऊन जात असे व अत्याचार करत असे. त्यामुळे सुरक्षा करण्यासाठी पडदा पद्धत प्रचलीत झाली. मुसलमानांच्यात रिती रिवाजाचा एकभाग होता.

ग्रामीण स्त्रीया विशेष पडदा पद्धत वापरत नसे. त्या साडीचा पदर तोंडावर घेत असे. उच्च घराण्यातील, खानदानी स्त्रीया पडदा वापरत असे. ते प्रतिष्ठा मानत. डोली किंवा पालखीत बसून जात असे. रजिया बेगमने पडदा वापरला नाही. फिरोजशहा तुघलकने पडदा पद्धतीचे समर्थन केले. दरग्यात जाण्यास त्याने स्त्रीयांना बंदी केली.

५) **सतीप्रथा:** मध्ययुगीन समाजात सतीप्रथा विचित्र होती. पतीच्या चित्तेवर पत्नीने स्वतःला जाळून घेणे म्हणजे सती जाणे होय. प्रथम राजपूत मध्ये सर्वात जास्त होती. उच्च वर्गाच्या लोकातही प्रथा होती स्त्रीया सती दोन प्रकारात जात असे. मरणाबरोबर

मरण देणे म्हणजे नवऱ्याच्या चितेत उडी टाकणे. मरणानंतर मरण म्हणजे अनुमरण होय. अनुमरण म्हणजे जेव्हा स्त्री गर्भवती असते. त्यावेळी ती मुलाला जन्म देईल, त्यानंतर ती सती जाते. सती प्रथेचे कारण हिंदू समाजात विधवा स्त्रियांचीस स्थिती अतिशय वाईट असे. आज देशभरात पसरलेल्या सतीचे दगड या सतीप्रथेची साक्ष देतात. अनेक राज घराण्यातील स्त्रीयाही सती गेल्या होत्या. महाराणा प्रताप, मेवाड राजसिंह, मारवाड मालदेव, जसवंतसिंग, बिकानेर, राजसिंह, कोट्याचा भिमसिंह, जैसलमेरचा अमरसिंह यांच्या पत्नी सती गेल्या होत्या.

६) **जोहार प्रथा:** राजपूत जातीतील स्त्रिया आपल्या चारित्र्याचा अधिक विचार करत असे. त्या कारणामुळे जोहार प्रथा सुरू झाली. राजपूत लोक युद्धात असे. तेव्हा विजय प्राप्ती होणार नाही असे समजते तेव्हा शत्रूच्या हाती पडण्यापेक्षा त्यांच्या पत्नी कपाळाला कुंकू लावून स्पर्श करून अग्निला आपला देह अर्पणकरत असे. राजपूत लोक जोपर्यंत युद्ध व जीवंत आहे तोपर्यंत लढत असतात. जोहाराची अनेक उदा. इतिहासात आहे. कम्पिल राजा आणि महंमद तघलक युद्ध, अल्लाउद्दीन खिलजी रणथांबोरचा राजा हम्मीरदेव यांच्यातील युद्ध, अल्लाउद्दीन खिलजी वचितोड रत्नसिंह यांच्यातील युद्ध. या प्रसंगी राजपूत स्त्रियांना जोहार केला.

७) **देवदासी प्रथा:** मंदिरात देवदासीची प्रथा होती. त्याच्या माध्यमातून वेश्या व्यवसाय चालत असे. सार्वजनिक, धार्मिक समारंभाच्यावेळी वेश्यांना गायन व नृत्यासाठी बोलवले जाई. या स्त्रिया संगीत, काव्य, चेटूक, हेरगिरी यामध्ये निपूण होत्या. बिकानेर, जेसलनेर येथे अतिशय सुंदर होती. समाजोपयोगी कामासाठी त्यांनी खर्च केला. मारवाडचा अजितसिंह मृत्यु पावल्यानंतर त्याच्या रखेली सती गेल्या.

८) **स्त्रीशिक्षण:** सुलतान काळात स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र सोय केलेली नव्हती. मुस्लिम स्त्रीयासाठी शिक्षणाची खास सोय केली जात असे. हिंदू अनेक स्त्रीया राज्यकारभारात होत्या. अवतसुंदरी, देवलशनी, रूपमती, पद्मावती, मीराबाई चांगल्या शिकलेल्या स्त्रीया होत्या. अवतंसुंदरीने प्राकृत काव्याचा शब्दकोश तयार केला. मीराबाईने कृष्णभक्ती संबंधी अनेक काव्य रचले. या काळात नृत्य, संगीत, चित्रकला यांचेही शिक्षण स्त्रीयांना दिले जात असे.

मुस्लिम स्त्रीयांसाठी होन्नावर येथे मकबरे स्थापन केले. सामान्यपणे मुलींना घरी शिक्षण दिले जात. अभ्यासक्रमामध्ये मोठा भाग धार्मिक होता. बिबी हाफिजा जमाल हिला कुराण मुखोद्गत होते. मजलिसमध्ये स्त्रीया भाग घेत असे. रझिया सुलतान गादीवर बसली होती. तिने युद्धाचे नेतृत्व केले. घोडेस्वार, युद्धशाळा आणि राजकारण याचे शिक्षण तिला मिळाले होते. सुलतान व उमराव आपल्या घरी शिक्षणाची व्यवस्था करत असे. अल्तमशची पत्नी शाहतुर्कन आणि जलालउद्दीन खिलजीची पत्नी भसकेजहाँ राज्याच्या प्रशासन कार्यात दक्ष होत्या. यावरून स्त्रीयांना शिक्षणांची व्यवस्था होती.

ब) **सामाजिक व राजनैतिक क्षेत्रातील स्त्रियांची भूमिका:** सुलतान काळात मुस्लिम स्त्रियांनी समाजाच्या विविध क्षेत्रात कार्य केले. विविध कला क्षेत्राच्या विकासात स्त्रीयांचे योगदान होते. सुलतानाच्या आईला अधिक सन्मान असे. त्याच्या नंतर सुलतानाची मुख्य बेगमला मान असे. राजकीय घराण्यातील स्त्रीयांना मोठ्या-मोठ्या

पदव्या दिलेल्या असे. उदा. मसके-जहाँ, मुखदुमेजहाँ, अलतमशची पत्नी शाह तुर्कन मोठी महत्त्वाकांक्षी स्त्री होती. राजकारणावर तिचा प्रभाव निर्माण करण्यासाठी रझियाची हत्या करण्याचे षडयंत्र केले होते.

रझियाने सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रीत केली. अनेक रूढी प्रिय अमीरांना सुलतान पदावर एक स्त्री नको होती. रझियाने बुरखा पाळला नाही. खुले दरबारात बसणे, घोड्यावर फिरणे हे पसंत नव्हते. जल्लाउद्दीन खिलजीची पत्नी मसके-जहाँने अल्लाउद्दीनचे घरगुती जीवन अतिशय दुःखी केले. अल्लाउद्दीन खिलजीने जलालुद्दीनच्या हत्येनंतर मसके-जहाँ व तिच्या सर्व मुलाला ठार मारले.

अल्लाउद्दीन खिलजीची पत्नी कमलादेवी ही रायकर्ण बघेलची पूर्वीची पत्नी होती, तिने आपली मुलगी देवलदेवी हिला आपल्या जवळ असावी असे. सुलतानाला सांगितले. तेव्हा अल्लाउद्दीनने देवगिरीवर स्वारी केली. अल्लाउद्दीनच्या काळात अनेक हिंदू स्त्रीयांचे लग्न राजकीय मुसलमान कुटुंबाशी झाले. फिरोजशहा तुघलकची आई हिंदू होती. मुस्लिम स्त्रियांनी संगीत क्षेत्रात प्रगती दाखवली. जलालुद्दीन खिलजीच्या शासनात फतुहा व नसरत खातून या दोन प्रमुख नायिका होत्या. फिरोजशहा तुघलक व सिकंदर लोदीने मुस्लिम स्त्रीयांनी संताच्या मशिदीकडे जाण्यास बंदी केली.

सुलतान काळात हिंदू स्त्रियांची राजकीय व सामाजिक स्थिती चांगली होती. हर्षवर्धनाची बहिण राजश्रीने पतीच्या निधनानंतर भावाला राज्यकारभारात मदत केली. राजपूत काळात राजकीय कुटुंबातील मुलींना प्रशासन कार्याचे प्रशिक्षण दिले जात होते. यावरून असे दिसते की, स्त्रीया पुरूषांच्या अधीन नव्हत्या. काश्मीर व दक्षिण भारतात अशीच परिस्थिती होते. काकतीय राज्यातील कदम्बाने ४० वर्ष राज्य केले. राजमहालांत स्त्रिया परिचारिका म्हणून कार्य करीत होत्या. स्त्रीयांची अंगरक्षक म्हणून नियुक्ती केली जाई. हर्षवर्धनाच्या काळात स्त्रीयांची देखभाल करण्यासाठी प्रतिहारी पदावर त्यांची नियुक्ती केली जाई. ती राजकीय छत्र व पुष्पदान धारण करत होती. ती पाने व फुले महालातील लोकांना पुरवत असे. राजमहालातील उत्सवास संगीत व नृत्य यामध्य भाग घेत असे. कधीकधी स्त्रीयांचा उपयोग शत्रूच्या प्रदेशात गुप्तहेर म्हणून उपयोग केला जात असे. ती राजाबरोबर शिकारीला जात होती.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- मध्यकाळातील स्त्रीजीवन स्पष्ट करा.

### ७.२.३ मध्ययुगीन काळातील गुलामगिरी:

मानवी स्वभावाची प्रवृत्ती अशी आहे की, आपण इतरांपेक्षा खूप श्रेष्ठ आहोत. आपल्या पुढे दुसरा कोणीही जाऊ नये. यामध्ये तो आनंदी असतो. या स्वभाव प्रवृत्तीमुळे लहान-मोठा, उच्च-निच, श्रीमंत-गरीब असा समाजात भेद निर्माण झाला आहे. जो समर्थ व शक्तीशाली आहे तो सर्वांच्या पुढे जातो. या प्रभूत्व प्राप्तीच्या लालसेने समाजात भेद निर्माण झाले. त्यातूनच प्राचीन काळापासून समाजात दास/गुमालगिरी पद्धतीचा उदय झाला. तिचा मध्ययुगीन काळात खऱ्या अर्थाने विकास झाला.

भारतात प्राचीन काळापासून हिंदू समाजात गुलामगिरी पद्धत होती. गौरीशंकर ओझा यांच्या मतानुसार प्राचीन रोम, ग्रीस मध्ये ज्या प्रकारची अमानुष वागणूक दिली जात होती. त्याप्रमाणे भारतात नव्हती. भारतात गुलामांना माणूसकीची वागणूक दिली जात असे.

**अ) हिंदू समाजातील गुलामगिरीची पद्धत:**

**१) गुलामगिरीचे प्रकार:** प्राचीन भारतातील गुलामगिरीचा उल्लेख मनुस्मृती, नारदस्मृती, विष्णुस्मृती विशिष्ट आपस्तंभ, कौटिल्य, गौतम यांच्या साहित्यातून मिळतो. नारदस्मृतीमध्ये १५ प्रकारचे गुलाम तर मनुस्मृतीमध्ये ७ प्रकारचे गुलाम सांगितले आहे.

१) युद्धकैदी

२) पोटासाठी गुलामगिरी

३) गुलामांच्या पोटी जन्मलेली

४) विकत घेतलेला

५) कुणीतरी भेट दिलेली

६) पूर्वजांकडून वंशपरंपरेने मिळालेली.

७) शिक्षा म्हणून गुलाम बनलेला.

पराशरमाधव, विवादचंद्र, विवाहचिंतामणी, व्यवहारकंद या मध्ययुगीन ग्रंथांमध्ये गुलामाचे चार प्रकार सांगितले आहेत.

१) गुलामाच्या घरात जन्मलेला

२) विकत घेतलेला

३) कुणीतरी दिलेली

४) वंशपरंपरेने चालत आलेला गुलाम.

स्मृतीकारांनी व मध्ययुगीन ग्रंथकारांनी गुलामाशी कसे वागावे या संदर्भात नियम सांगितले आहे. ज्याने स्वतःला गुलाम म्हणून विकत घेतले आहे. अश्या सर्व गुलामांना त्यांचा मालक स्वातंत्र्य देऊ शकतो. एखाद्या गुलामाने संकटसमयी मालकाचा जीव वाचवला तर, त्याला मुक्त करावे असे पराशरमाधवाने सांगितले आहे. एखाद्या गुलाम स्त्रीला मालकापासून मुलगा झाला आणि मालकाला मुलगा नसेल तर त्या मालकाने त्या गुलाम स्त्रीला व मुलाला गुलामगिरीतून मुक्त करावे. असे विवादरानाकर, विवादचंद्र, विवादचिंतामणी या ग्रंथात सांगितले आहे.

२) **दक्षिण भारतातील गुलामगिरीचे स्वरूप:** दक्षिण भारतामध्ये गुलाम वेगवेगळ्या नावाने ओळखले जात. महाराष्ट्रात-कुणबी, कर्नाटकात-बेसावग, तोंडाईमंडलमध्ये-परेयान या नावाने ओळखले जातात. विजयनगर राज्यात गुलामाची संख्या मोठी

होती. असे निकोलद डी. कोटीने सांगितले आहे. तेथे कर्जदार हा सावकाराचा गुलाम होता. एलिसच्या मते. विजयनगरमध्ये संपूर्ण कुटुंबच मालकाने गुलाम बनत असे. विजयनगरच्या राजवाड्यात हजारो गुलाम असत. कावेरी नदीच्या काठावरती मलबार व कॅनरा या तोंडाईमंडलम प्रदेशात गुलामगिरी मोठ्या प्रमाणात होती. शेतीचे काम व घरकाम करणारे दोन प्रकारचे गुलाम होते. त्यामधून गुलाम जाती निर्माण झाल्या. त्या जातीचे वैशिष्ट्ये म्हणजे त्या कोणत्यातरी जमीनदार, मिरासदारांशी जोडलेल्या असत. काही गुलाम कुटुंबाचे सर्वाधिकार मिरासदाराकडे असे. शेतीवर काम करणाऱ्या गुलामांच्या जातीमध्ये पाली, पालेर, पारैयर इ. प्रमुख जाती होत्या.

महाराष्ट्रात पुरूष गुलामाला पोरगा तर स्त्री गुलामाला कुणबीण किंवा बटिक असे म्हटले जात. गुलामांची खरेदी-विक्री, गहाण ठेवणे. तसेच कामाची क्षमता. शरीरप्रकृती, रंग, गुण इत्यादीवरून गुलामाची किंमत ठरत असे. स्त्री गुलामाचा मोठा व्यापार चालत. त्यामध्ये शुद्रवर्णीय हिंदू व काही वेळा मुस्लिम स्त्रीचा समावेश असे. या स्त्रीया अविवाहित असे. मालकाच्या मृत्युनंतर संपत्तीप्रमाणे गुलामाची वाटणी होत असे. सरकारकडील गुलाम भाड्याने दिले जात. गुजरात, खानेदशातून गुलामांची विक्री होत. बुंदेलखंड, कराड, सातारा, सिन्नर, तेलंगणातून पेशव्याकडे गुलाम पाठवत असे.

३) **मालक-गुलाम संबंध:** भारतामध्ये मालक-गुलाम यांचे संबंध सलोख्याचे व माणूसकीचे होते. हिंदूशास्त्रात गुलामांना माणूसकीची वागणूक द्यावी असे, सांगितले आहे. गुलामाची विक्री करताना जवळच्या / घरातील नात्याची ताटातूट होणार नाही याची काळजी घ्यावी. विशेषतः महाराष्ट्रात आई-मुल एकत्र गुलाम म्हणून विक्री होत असे. दक्षिणेतील मिराशी जमिनीशी जोडलेल्या गुलामांना हक्क व सवलती होत्या. घरपट्टी, शेतपट्टी गुलामाना असे. खेड्यात छोटे अधिकार पद असे. त्यांना तात्पुरत्या इनाम जमिनी मिळत असे. विशेष सण, लग्न प्रसंगी कपडे व पैसे बक्षिस म्हणून मिळत असे. महाराष्ट्रात दिवाळीला साडी, पादत्राणे भेट देत असे. महाराष्ट्रात सरकारी स्त्री गुलामाचे वय व सेवा याचा विचार करून स्वातंत्र्य दिले जात. उर्वरित जीवनामध्ये उदरनिर्वाहाची सोय करून, जमीन इनाम दिल्याचा उल्लेख आहे.

ब) **मुस्लिम समाजातील गुलामगिरी:** मुसलमानाच्या आक्रमणामुळे भारताची आर्थिक परिस्थिती नाजूक बनली. त्यामुळे अनेक लोक जीवन जगण्यासाठी गुलाम बनले. मुस्लीम समाजाचे गुलाम हे अविभाज्य अंग होते. या काळात उमराव व धनिक वर्गात गुलाम बाळगणे. हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात. सरदार लोक युद्ध किंवा ऐषआरामात जीवन जगत असे. शारीरिक कष्टाची कामे करणे त्यांना कमीपणाचे वाटत होते.

१) **गुलामगिरीची कारणे:** मुस्लिमकाळात विविध कारणामुळे लोक गुलाम बनत असे. युद्धाच्या वेळी युद्धकैद्यांना गुलाम बनवत. एखाद्या गावावर हल्ला करून गावातील स्त्री पुरूषांना गुलाम बनवत असे. दुष्काळाच्या वेळी नाईलाजास्तव आई-वडिल मुलांना विकत असत. सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी किंवा इतर संकटाच्यावेळी लोक स्वतःला गुलाम म्हणून विकत असत. किंवा सावकाराकडे कर्जापोटी गुलाम म्हणून काम करत असे. याशिवाय परदेशातून गुलामांची आयात केली जात. आसाममधील

गुलाम ताकद, सहनशक्तीसाठी विशेष प्रसिद्ध होते. मुस्लिम स्त्रीयांच्या सेवेसाठी विशिष्ट प्रकारच्या गुलामांची खरेदी १३ व्या शतकात बंगालमधून केली जात असे.

**२) गुलामाचे प्रकार:**

**१) खरेदी केलेला गुलाम:** घरातील सर्व प्रकारच्या कामासाठी खरेदी केलेले गुलाम होय. यांना शारीरिक त्रास सहन करावा लागत असे.

**२) दान केलेले दास/ सौंदर्यवती गुलाम:** याप्रकारातील गुलाम आपल्या रूपाने, लावण्यात कौशल्याच्या आधारावर सन्मान प्राप्त करत असे.

**३) बंदी गुलाम**

**४) आत्मविक्रेता गुलाम**

या चार प्रकाराशिवाय इतरही प्रकार आहे. त्यामध्ये गुहजात गुलाम (घराच्या दासीपासून जन्मलेला) अनाकालभूत (अचानक मृत्युतून वाचलेला गुलाम) ऋणदास (कर्ज न फेडणारा गुलाम) काही हिजडे गुलाम म्हणून ठेवत असे. त्यांची नेमणूक अंत:पुरामध्ये केली जात असे.

**३) स्त्री गुलाम:** मध्ययुगीन काळात स्त्रीयांची गुलाम म्हणून विक्री केली जात असे. अमीर खुस्रोने आपल्या एझाझ-ए-खुसरदी या ग्रंथात गुलामाचे विवेचन केले आहे. त्याच्यामते तुर्की गुलाम मुली गोऱ्या आणि नाजूक असतात. चिनीमुली सुगंधित असतात. भारतीय मुली सौम्य स्वभावाच्या असतात. स्त्री गुलामाचे दोन प्रकारे केलेले आहे. एक म्हणजे घरकाम व कष्टाचे काम करणारी, दुसरी श्रीमंत लोकांचे मनोरंजन करणे किंवा उपभोगासाठी वापरली जाणारी स्त्री गुलाम होय. रूपवती तरुण स्त्री गुलामाची खरेदी केवळ कामवासना तृप्तीसाठी केलेली असे. तिला मानाची वागणूक मिळत असे. ती गृहस्वामीनी बरोबर स्पर्धा करत असे.

**४) गुलामांची खरेदी किंमत:** मध्ययुगात गुलामांचा खुलेआम बाजार भरत असे. पुरूष गुलामाची किंमत त्याची ताकद व सौंदर्य यावरून ठरत असे. कष्ट करू शकणाऱ्या पुरूष गुलामाची किंमत १० ते १५ टंका असे तो सुंदर असेल तर २० ते २५ टंका असे. काहीवेळा सोन्याच्या दिनारमध्ये केलेली असे. मलीक कपूरल एक हजारी (एक हजार दिनार किंमतीचा) म्हणत असे. स्त्री गुलामाची किंमत तिची काम करण्याची क्षमता व सौंदर्यावर ठरत असे. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात काम करणाऱ्या स्त्री गुलामाची किंमत प्रते १२ टंका असे. सुंदर गुलाम स्त्रीची किंमत २० ते ४० टंका असे. काही वेळा हा किंमत २००० टंका तर काहीवेळा २००० टंका होत असे.

**५) गुलामांची वाढती संख्या:** महमंद गझनीने आक्रमण करून गुलामाची संख्या वाढवली. त्याने १०१७ मध्ये कनोजमधून प्रचंड लोकांना गुलाम बनवले. त्याची मोजणी केली नाही. हसन निजामीच्या मतानुसार ११९७ मध्ये तुर्की सैन्यांनी गुजराथवर आक्रमण करून २० हजार लोकांना गुलाम बनवले. कुतुबद्दीन ऐबकने १२०२ मध्ये कलिंजरवर विजय मिळविल्याने ५० हजार लोकांना गुलाम बनवले. अल्लाउद्दीनच्या काळात

शाही गुलाम ५० हजार तर फिरोजशहा तघलकच्या काळात लाख गुलामांची संख्या होती.

६) **शाही गुलाम:** सामान्य दासांच्या तुलनेने शाही दासांची स्थिती अधिक चांगली होती. शिक्षण व राजनितीचे डाव-पेच याची माहिती आहे, असे गुलाम उच्च पद प्राप्त करत असे. त्याला बन्दगान-ए-खास असे म्हणत. जेव्हा सुलतानाचा मुलगा अयोग्य असेल तेव्हा शाही गुलाम राज्यकारभार संभाळत असे. महमंद घोरीला विचारले की आपला उत्तराधिकारी कोण? माझे हजारो मुले आहेत. तेच माझे उत्तराधिकारी असतील. आणि माझे नाव चालवतील. घोरीचे गुलाम नासिरूद्दीन कुबेचा, ऐबकने स्वतंत्र राज्य निर्माण केले. अल्तमश पहिला गुलाम होता नंतर सुलतान बनला. बलबन आपल्या बुद्धीमत्तेमुळे सुलतान झाला. मलिक काफूर व खानेजहाँ मकबूल यांनी आपल्या सामर्थ्यांवर उच्च पद प्राप्त केले. हसन गंगू बहामनी हा गुलाम सुलतान बनला. त्याने नव्या राज्याची स्थापना केली. मलिक काफूर व खुस्रोशाह हे उत्तम सेनापती व प्रशासक होते. या दोघांनी काहीकाळ सुलतानपद संभाळले.

इतर गुलामही आपल्या धन्याशी/मालकाशी प्रामाणिक असत. धन्याची सर्वप्रकारची सेवा करत असे. चांगले गुलाम त्यांच्या शौर्यासाठी, सौंदर्यासाठी, आकर्षकतेसाठी, विश्वसनीयतेसाठी आणि वेगवेगळ्या कलांचे ज्ञान असल्यामुळे प्रसिद्ध होते. कारागीर कारखान्यात गुलाम म्हणून काम करत असे. त्याचा मोबदला मिळत असे. अफीफच्या मते काही गुलामांना शिष्यवृत्त्या देण्यात आल्या होत्या. काहींना गावे जहागीर म्हणून दिली होती.

७) **गुलाम प्रथेचा फायदा:** सुलतान काळात मुसलमानांना जे यश प्राप्त झाले. त्यामध्ये गुलामाचे योगदान आहे. गुलामांना पुढे/उच्च पदावर जाण्याची संधी असल्याने गुलाम होणे गौरवाची बाब मानत असे. अनेक शाही गुलाम सुलतान व अनेक मोठ्या पदावर गेले. ऐबक, अलतमश, बलबन, मलिक काफूर, खुस्रोशहा, हसन गंगू यांनी राजमुकूट व राज्य मिळवणे. त्यामुळे उच्चवंशीयच्या बरोबरीने हे गुलाम असे. अलतमशने चाळीस गणी सरदारांचा / गुलामांचा गट स्थापन करून त्यांच्या मदतीने कारभार केला.

८) **सुलतानशाहीच्या पतनातील गुलामाचे योगदान:** सुलतानांना गुलाम बाळगण्याचा मोठा छंद होता. गुलामशिवाय आपल्या सुखी जीवनाची कल्पना करत नसे. तुर्की शासनाच्या काळात हिंदूची परिस्थिती गुलामापेक्षा वाईट होती. त्यांच्या काळात तुर्कीशासक व सरदार पाहिजे त्या हिंदू मुलीला आपली पत्नी बनवत असे. त्या भितीने हिंदूची अतिशय वाईट अवस्था झाली होती. हिंदू खोत, मुकादम यांच्या बायका मुसलमानाच्या घरी काम करत असे. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात हिंदुच्या घरात सोने-चांदी पाहण्यासाठीही नसे. या धोरणामुळे बुरखा पद्धत निर्माण झाली. स्त्रीयांचे सर्व स्वातंत्र्य नष्ट झाले. कोणी तरुणी बुरखा न घेता जात असेल तर, तिला वेश्यालयात पाठवत असे. आणि तिच्यावर त्या व्यवसायाची बळजबरी केली जात असे. याप्रमाणे गुलामाचे जीवन होते. याची संख्या प्रचंड होती.

सुलतान काळात गुलामाला बढती / उच्चपदे दिली नाहीत ते सुलतानाच्या हासाला कारणीभूत ठरत असे. मलिक काफूरने अल्लाउद्दीन खिलजीला विष देऊन ठार मारले त्यांच्या मुलाचे डोळे फोडले, तर काफूरला मारले असते तर, खिलजीचा वंश नष्ट झाला

नसता. याप्रमाणे गुलामाचे शासनाला विरोध केला. शाही गुलामाला धन-वेळ मिळत असे त्यामुळे ते विलासीजीवन जगत असे. सुलतानाला न मिळणाऱ्या रूपवती गुलामाजवळ असे. त्यासाठी आपल्या मालकाला हटावण्याचे षडयंत्र रचत असे. गुलामामध्ये विश्वासपात्रता व इमानदारीचा अभाव होता. त्यामुळेच सुलतानशाहीचा ह्रास झाला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- मुसलमान समाजातील गुलामगिरी स्पष्ट करा.

## ७.३ मध्ययुगीन काळातील आर्थिक जीवन

मध्ययुगीन काळातील आर्थिक जीवनाचा विचार करता, कृषि उत्पादने, उद्योग धंदे, व्यापार, चलन व्यवस्था, पेढी व्यवसाय यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. १२०६ ते १५२६ या काळात गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी या घराण्यांची १५२६ ते १७०७ पर्यंत मोगलांची राजकीय सत्ता होती या घराण्यातील अनेक सुलतानांनी आर्थिक जीवन विकसित करण्याचा प्रयत्न केला.

### ७.३.१ मध्ययुगीन काळातील कृषी व्यवसाय:

मध्ययुगीन काळातील शेती व्यवसाय व पिके यांची माहिती समकालीन अनेक ग्रंथातून मिळते. कापूस, ऊस, निळ, धान्य, कडधान्य, फळे, पालेभाज्या इ. उत्पादने घेतली जात. १७ व्या शतकात तंबाखू, मका यांचे उत्पादन सुरू झाले. सुलतानकाळात एकूण उत्पादनाच्या १/६, पासून ते १/२ पर्यंत शेतसारा घेतला जात असे. सुलतान काळात निरनिराळ्या शासकीय अधिकाऱ्यांना, सतांना, धर्मादाय संस्थांना जमिनी दान दिल्या. मठ, मंदिरे, मशिदी, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था यांना करमुक्त अथवा नाममात्र कराने दान दिल्या जात असत.

### ७.३.२ मध्ययुगीन काळातील उद्योगधंदे:

देशाच्या आर्थिक जीवनात उद्योगधंद्यांना महत्त्वाचे स्थान आहे. सुलतान शाहीच्या काळातमध्ये विविध प्रकारच्या मालाला कमी मागणी होती. उद्योगधंदे मध्यम दर्जाचे आणि साध्या प्रकाराचे असल्याने कच्चा मालालाही विशेष मागणी नव्हती. तत्कालीन कारागीर, स्थानिक लोकांच्या गरजांना व परदेशी निर्यातीला पुरतील इतक्याच वस्तु तयार करीत असावेत. सुलतान काळातील महत्त्वाचे उद्योग म्हणजे कापड, रेशीम, लोकर, रंगकाम, नीळ उत्पादन, धातू उद्योग, साखर, चर्म इतर उद्योग होते.

१) **कापड उद्योग:** मध्ययुगीन भारतातील उद्योग व्यवसायामध्ये कापड उद्योग हा सर्वात महत्त्वाचा व लोकप्रिय उद्योग होता. दिल्ली, आग्रा, बनारस, सोनारगाव, पाटणा, लाहोर, मुलतान, खंबायत, सुरत, ठठ्ठा, ब-हाणपूर, देवगिरी, महादेवनगरी अशा अनेक शहरात कापड उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू होता. या सर्वामध्ये कापड उत्पादन करणे व त्याची निर्यात करणे यासाठी गुजराथ व बंगाल हे राज्य प्रसिद्ध होती. श्रीमंत लोक तलम, मलमल, सॅटीन, किनखाप (जरीचे कापड) व सर्वसामान्या लोक जाडेभरडे कापड वापरत होते. बंगाल विभागातील दभ्का येथे उत्तम प्रतिचे व तलम,मलमल

तयार होत असे. देवगिरीचे कापड तलम, हलके व मजबूत असून पाण्यासारखे होते. उत्कृष्ट दर्जाच्या तलम मलमलीच्या उत्पादनासाठी दिल्ली प्रसिद्ध होती. खंबायत हे सुती कापडासाठी प्रसिद्ध होते. खंबायत छापील सुती कापड, मखमल,सॅटीन, तलम, जाडे भरडे इ. प्रकाराचे कापड तयार होत असे. महुआन व बर्थेमाने बैराम, नामीने, लिझनी, दौहार, सिनाबाफ इ. मलमलीचे प्रकार सांगितले आहेत.

२) **रेशीम उद्योग:** मध्ययुगात श्रीमंत लोक रेशीम कापड वापरत होते. रेशीम कापडासाठी पाटणा, मुर्शिदाबाद, काश्मिर, बनारस, कासिमबाजार, धोराघाट ही ठिकाणे प्रसिद्ध होती. रेशीम कापड विणण्यासाठी गुजराथ प्रसिद्ध होते. रेशीम व रेशीम कापड व्यवसायकांना मोठे उत्पादन मिळवून देणारे ठिकाण म्हणजे खंबायतमधील होय. अल्लाउद्दीन खिलजीने खंबायता रेशीम उद्योग स्वतःच्या ताब्यात ठेवला होता. रेशीम गालिच्यासाठी सुरत प्रसिद्ध होते. आसाममध्ये खासी व मणिपूरी जमाती रेशीम व्यवसायासाठी प्रसिद्ध होत्या. तुस्सार नावाचे कापड ओरिसामध्ये तयार केले जात असे.

३) **लोकर उद्योग:** सुती कापड, रेशीम कापड याच्या तुलनेने लोकरीचा उद्योग लहान होता. लोकर उद्योगासाठी राजस्थान, लाहोर, काबूल, काश्मीर, आग्रा, फत्तेपूर सिक्री, अमृतसर, पाटणा, जौनपूर, बहाणपूर ही ठिकाणे प्रसिद्ध होती. उत्तम प्रतीची लोकर आयात होत असे. शाली, ब्लँकेटस इतर लोकरीकपड्यासाठी काश्मीर प्रसिद्ध होते. फत्तेपूर सिक्री रेशीम गालिचा तयार करण्यासठी प्रसिद्ध होते.

४) **कपड्याचे रंगकाम उद्योग:** ज्या प्रमाणात कापड व्यवसायात प्रगती झाली त्याच प्रमाणे रंगकाम उद्योगात प्रगती झाली. भडक व चमकणाऱ्या रंगाचा जास्त समावेश होता. रंगासाठी म्हणून नीळ उद्योग सुरू झाला. नीळ उत्पादन लाहोर ते अवधपर्यंतचा पट्टा होता. गुजराथ, कासीम. बाझार. अहमदाबाद, गोवळकोंडा ही प्रमुख केंद्र रंगकाम उद्योगाची होती.

५) **धातु उद्योग:** प्राचीन काळापासून भारतात धातू उद्योग प्रसिद्ध आहे. सुलतान काळामध्ये गोदावरी नदीकाठी दिमदुर्ती, शिशा टेकड्या, लोहखनिजासाठी प्रसिद्ध होत्या. गुजराथ, गोवळकोंडा, सियालकोट, मुलतान, लाहोर. मेवाड ही उत्पादन केंद्र होती. सुलतान काळात लोखंड व पोलाद याचा उपयोग केला जात होता. युद्ध साहित्य, शेती अवजारे बनवण्यासाठी लोखंडाचा उपयोग होत असत. पोलाद, लोखंडी विविध वस्तु उत्पादनासाठी मेवाड. लाहोर, गुजराथ, गोवळकोंडा ही ठिकाणे प्रसिद्ध होती. धनुष्यबाण, विशिष्ट प्रकारचे खंजीर, गुजराथ व मेवाड मध्ये बनवले जात. सर्वोत्कृष्ट बंदुकांसाठी मेवाड व सिलायकोट ही केंद्र प्रसिद्ध होती. सोने, चांदी यांचे दागिने व मिश्र धातूची भांडी बनवत असे. नाजुक कलाकुसरीची व सोन्याच्या अलंकार निर्मितीसाठी गुजराथ प्रसिद्ध होते. भारतीय अनेक कारागीर तैमुरलंगने आपल्या बरोबर समरकंद या ठिकाणी नेले होते. गुजराथ, आसाम, बनारस, आग्रा या ठिकाणी सोने-चांदी यांचे कलाकुसरीची दागिने तयार होत होते. बिहार,राजस्थान, लखनऊ या ठिकाणी तांब्याच्या खाणी होत्या. त्यामुळे या ठिकाणी तांबे पितळ या धातू कामाची प्रगती झाली.

६) **कापद उद्योग:** चिनी लोकांनी सर्वप्रथम कागदाचा शोध लावला. तुतीच्या झाडाचे धागे, तागाचे धागे, अंबाडीचे धागे, कापडच्या चिंध्या यांचा उपयोग कागद तयार करण्यासाठी केला जात होता. अरब लोकांनी कागद निर्मितीची कला चिनी लोकांकडून घेतली. परंतु अरबांनी तुतूच्या धाग्याऐवजी काथ्याचा उपयोग केला. मध्ययुगाच्या काळात भारतात कागद उद्योग सुरू झाला. चीन, अरब, समरकंद येथील कारागीरांच्या मदतीत उद्योग सुरू केला. झाडाच्या सालीपासून व कापडाच्या चिंध्यापासून भारतात कागद तयार केला जात होता. काश्मीर, दिल्ली, सियालकोट, अवध, गया, बिहार, बंगाल गुजराथ ही कागद उद्योगाची प्रसिद्ध केंद्र होती. बंगालमध्ये झाडाच्या सालीपासून पांढरा कागद तयार होत. कागद मऊ व चमकणारा होता. गुजराथमधील शामी कागद हा गुळगुळीत व रेशमी होता. सर्वोत्कृष्ट कागद काश्मीर कागद होता.

७) **साखर उद्योग:** ऊस उत्पादनासाठी लाहोर ते दिल्लीचा पट्टा, बंगाल, बिहार, हे प्रदेश प्रसिद्ध होते. सर्वोत्तम साखर म्हणजे कंड असून, ती पांढरी शुभ्र व दाणेदार होती. ही साखर परदेशात पाठवत होते. त्यामुळे बंगालला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत होते.

८) **चामडे उद्योग:** मध्ययुगात चामडे उद्योगाची प्रगती झालेली होती. चामड्याच्या अनेक वस्तु बनविल्या जात असत. घोड्याचा लगाम, खोगीर, तसेच विविध प्रकारच्या पिशव्या व पुस्तकांची बांधणी, तलवारीचे म्यान, पादत्राणे, पाण्याची पखाल, गोफण, बैलाचा पट्टा इ.चामड्याच्या होत्या. दिल्ली, बंगाल, गुजराथ, आसाम, सिंध हे प्रदेश चामडे उद्योगाची केंद्र होती. चामडे म्हणून म्हैस, बैल मेंढी, रेडा या प्राण्याच्या कातड्याचा उपयोग केला जाई.

९) **काच उद्योग:** मध्ययुगात श्रीमंत लोकांच्या घरात काचेच्या अनेक वस्तु होत्या. बांगडी, मणी, आरसा, थाळी, पिकदाणी इ. वस्तुंचा उद्योग गुजराथ, गोरखपूर आग्रा, बिहार इ. ठिकाणी चालत होता.

१०) **बांधकाम उद्योग:** मध्ययुगात बांधकाम उद्योगात मोठी प्रगती झाली होती. अल्लाउद्दीन खिलजी फिरोज शहा तुघलकाच्या काळात बांधकाम उद्योगाची प्रगती झाली होती.

११) **भांडी व इतर वस्तु:** मध्ययुगीन भारतात कलाकुसरीची नक्षीदार भांडी प्रसिद्ध होती. काश्मीर, दिल्ली, बनारस, आसाम, या ठिकाणी उद्योग चालत होता. बांबूच्या वस्तु, सुगंधी द्रव्ये, डिंक, जडजवाहीर हस्तीदंत, खेळणी इ. व्यवसाय प्रगत होते. बंगाल व गुजराथ विभागात पोवळ्याचे काम केले जात होते. सिध व काश्मीर भागात उत्तम गालिचे, गुजराथ नकली जवाहिरा तयार करण्यासाठी दिल्ली, हस्तिदंत कामासाठी प्रसिद्ध होते.

### ७.३.३ सुलतान काळातील व्यापार:

भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन, वायव्य सरहद्द प्रांतातून अरब तुर्क यांनी आक्रमण केली. महमद गझनी, महमंद घोरी यांनी संपत्ती, मायभूमी नेली. घोरीच्या

मृत्युनंतर भारतात सुलतानशाही सत्ता स्थापन झाली. त्यांच्या काळातील व्यापार-वाणिज्य याचा विचार करताना अनेक घटकांचा विचार करावा लागतो.

१) **व्यापारी मार्ग:** मध्ययुगीन काळात भारताचा परदेशीव्यापार समुद्र व जमिनीमार्ग चालत असे. तांबडा समुद्र, आफ्रिकेच्या पूर्व किनारा, मलाक्का बेट, चीन, प्रशांत महासागर, या सागरीमार्गाने व्यापार चालत होता. बराच व्यापार खुष्कीच्या मार्गाने चालत होता. अफगाणिस्तान, मध्य आशिया, इराक, इराण बगदाद, अलेक्झांडिया या ठिकाणी व्यापार सुरू होता.

२) **परदेशी व्यापार-आयात-निर्यात:** परदेशामधून चैनीच्या वस्तुची आयात होत होती. चीन व इराककडून जरीचे सामान, रेशीम याची आयात महंमद तघलकच्या काळात होती होती. इराक, तुर्कस्तान, इराण मधून उच्चप्रतीचे घोडे आणले जात. मक्का व एडममधून सोने, चांदी, केशर, गुलाबपाणी, तांबे, पारा, तुरटी इ. वस्तु गुजराथमध्ये आयात होत असत. चीन, मलाक्का, दीव येथून रेशीम आणले जाई. लिमोडारा येथून पांढरा, दुधी, तांबडा या रंगाच्या दगडी वस्तू गुजराथमध्ये आयात होत असत.

भारतामधून निर्यात होणाऱ्या वस्तुमध्ये अन्नधान्य (गहू, बाजरी, तांदूळ इतर प्रकारचे धान्य) कापड इराणला पाठविले जात. मलमल, विविध रंगी कापड, सुवासिक तेल, मलम, जस्त अफू, निळीच्या वड्या, धान्य, साखर, कापूस, आले, सुंठ, मासे हे पदार्थ बंगालमधून इराण, तुर्कस्तान, आफ्रिका व इतर देशात निर्यात होत. विविध रंगाच्या दगडापासून अंगठी, लहान तलवार, खंजिराच्या मुठी बनविल्या जात. या वस्तु गुजराथ मधून तांबड्या समुद्रमार्गे कैरो, पोर्तुगाल व इतर युरोपीयन देशात पाठवला जात होता. गुजराथमधून मसाल्याचे पदार्थ, रेशीम, औषधे, कस्तुरी, चीनी मातीच्या वस्तु युरोपात पाठवत होते.

३) **व्यापारी केंद्र बंदरे:** मध्ययुगीन प्रमुख व्यापारी केंद्र म्हणजे दिल्ली, मुलतान, लाहोर, जौनपूर, बनारस, अलाहाबाद, अजमेर, आग्रा, पाटणा, अहमदाबाद होती, बोरावल, सोमनाथ, सोरठ, मंगरोळ, दीव, गोधा, भावनगर, भडोच, खंबायत, सुरत, रावेर ही गुजराथमधील पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे प्रसिद्ध होती. वाहतुकीसाठी भावनगर हे ठिकाण प्रसिद्ध होते. खंबायतला नेहमी भरती येत असल्याने ते धोकादायक बंदर होते. सुरत सुरक्षित बंदर होते.

४) **अंतर्गत व्यापार:** किनाऱ्यावरील व्यापार, आणि देशाच्या आतील व्यापार असे अंतर्गत व्यापाराचे दोन प्रकार होते. पर्टेनेक्सी येथून बंगाल व भारताच्या इतर भागात गहू, घोडे, कापड हा माल पाठवला जाई, तर इतर ठिकाणाहून नारळ, गुळ, मसाल्याचे पदार्थ या ठिकाणी येत असत. सोरठ व गुजराथमधून घोडे, गहू, कापड इ. वस्तू भारतात विविध ठिकाणी पाठवत तर इतर ठिकाणाहून वेलदोडे, मेण, नारळ हे येथे येत असत. दीव मधून मलबार, गोवा, दाभोळ या ठिकाणाशी व्यापार चालत. दीव येथून सुपारी, लोखंड, मिरे, सुंठ, मसाल्याचे पदार्थ, चंदन, रेशीम इ. वस्तु येत असे. येथून रेशमी कापड, अफू, घोडे जात वंबायत व मलबार येथे साखर विविध प्रकारचे कापड आणले जात होते. स्थनिक व्यापारात दररोज अथवा आठवड्याला भरणाऱ्या बाजाराचा समावेश होता.

५) **व्यापारी वर्ग (जमाती):** सुलतान काळात मोठा व्यापार करणाऱ्या जमातीमध्ये बंजारी, बनिया, मुलतानी, खुरासनी यांचा समावेश होता. या व्यापाऱ्यांना भाट, दलाल, महाजन यांची मदत होत होती. बंजारी लोक रजपुतान्यामधील होते. ते व्यापारी मालाची वाहतूक करत. दळणवळणासाठी बैलगाड्या, घोडे, यांचा वापर करत. शेजारील देशामधून व्यापारासाठी भारतात आलेले खुरासानी लोक होते. ते व्यापारासाठी भारतात फिरत असत. गुजराथ, मलबार, कोचीन, आणि पश्चिम किनाऱ्यावर व्यापार करणारे गुजराथमधील बनिया लोक होते.

६) **वस्तुंची किंमत:** वस्तुची किंमत ही त्या वस्तुच्या मागणी व पुरवठ्यावर अवलंबून होती. युद्ध काळात वस्तुची किंमत कमी-जादा होत होती. परदेशातून येणारी मागणी, वाहतुक, दळणवळणाची सोय, व्यापाऱ्याचे परस्पर संबंध, कारागीर, पतपुरवठा, दुष्काळ. परकीय आक्रमणे, राजांचे परस्पर संबंध याचा व्यापारी धोरणावर पर्यायाने वस्तुच्या किंमतीवर परिणाम होत होता.

७) **वजन-मापे:** धान्याचे मोजमाप करण्यासाठी मण हे अधिकृत माप होते. एक मण म्हणजे ४० शेर होते. एक शेर २४ तोळ्यांचा होता. काही ठिकाणी ८० तोळ्यांचा एक शेर होता. एक तोळा म्हणजे १८० ग्रेनचा होता. एकशेर म्हणजे अंदाजे एक किलोग्रॅम एवढा होय. फिरश्ताच्या मते एक मणामध्ये ९६० तोळे होते.

८) **सुलतान काळातील पेठी व्यवसाय:** सुलतान काळातील पेढीव्यवसाय संदर्भात अमीर खुश्रो, बरनी यांनी माहिती दिली आहे. सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या इक्तावर पेढीवाले कर्जे देत असे. हुंड्या म्हणजे पैशाच्या विनिमयाचे रोख मिळत. पेढीवाले दरमहा व्याज घेत असे. सुलतान काळात समस्सुक हा रोख्याचा प्रकार होता. तर कर्जाऊ रकमा देणारे साहू होते. महाजन हे पेढीवाले होते. १ टंकासाठी दरमहा १ जिनल व्याज घेत असे.

### ७.३.४ सुलतान काळातील चलन व्यवस्था:

सुलतान काळातील चलन पद्धतीत प्रचलित परंपराचा स्वीकार केला होता. नाण्यावर पशु पक्षी किंवा देव देवतांच्या मूर्ती कोरल्या होत्या. त्या बंद करून त्या ऐवजी नाण्याच्या मुख्य बाजूवर कलिमा, खलिफाचे नाव, पदवी कोरलेली होती. नाण्याच्या मागील बाजूस सुलतानाचे नाव, बिरूद, वर्ष, टांकसाळीचे नाव कोरलेले होते. नाण्यावरील अक्षरे अरबी किंवा फारसी भाषेतील होती. सैन्याचे नाणे १७५ ग्रेन तर चांदीचे नाणे १७८ ग्रेन वजनाचे होते.

दिल्ली सुलतानकाळात नाण्यासाठी चांदीचा उपयोग केला. अगदी प्रारंभीला नाण्याच्या एका बाजूस बैल अथवा इतर चिन्हे होती. महंमद गझनीच्या चांदीच्या नाण्यावर हिंदू स्वरूपाची चिन्हे होती. मुख्य बाजूस अरबी लिपी होती. मागील बाजूस त्याचे भाषांतर, राजाचे नाव, वर्ष होते. चांदीच्या नाण्याला टंका म्हणत असत. महंमद घोरीने लक्ष्मीचे चित्र असणारे नाणे कोरले. सुरवातीस तांबे व मिश्र धातूचा उपयोग नाण्यासाठी केला.

१२११ ते १२३६ या काळात अल्तमशने नाण्याचे प्रथमच प्रमाण ठरवले. सुरूवातीस टंका आकाराने लहान, गोळा होता. नाण्याच्या एका बाजूस घोड्यावर बसलेल्या राजाचे चित्र

होते. त्याच्या मागील बाजूस सर्वश्रेष्ठ सुलतान, जगाचा व धर्माचा सूर्य, विजयी लोकांचा पिता असे. अल्तमशने कोरले होते. चांदीच्या नाण्याचे वजन १६५ ग्रेन होते. १२२८ मध्ये बगदादच्या खलिफाकडून अधिकार मिळाले. त्यामुळे दुसरे नाणे पाडले. या नाण्याच्या दोन्ही बाजूस अक्षरे कोरली. एका बाजूला मजकूर होता तर हा मजकूर वर्तुळाच्या आत होता. नाण्याचे वर्ष व टंकासाळीचे नाव कोरणे.

अल्लाउद्दीनच्या काळात दक्षिणेतून मोठ्या प्रमाणात सोने आणले. त्यामुळे सोन्याची नाणी प्रथमच पाडली. नाण्याच्या एका बाजूस वर्तुळात "दुसरा सिकंदर खलिफाचा उजवा हात, श्रद्धावान लोकांचा मुख्य सरदार" असा मजकूर कोरला. दुसऱ्या बाजूस "सुलतान-उल आझम-अला-उद-दर्निया वा-द-दीन" अशा मजकूर होता. हिसरी सन ६९८ व “नाणी पाडण्याची टंकासाळ दिल्ली" असा उल्लेख होता. याचे वजन १७० ग्रेन होते. हे सोन्याचे नाणे होते. अल्लाउद्दीनच्या काळात चांदीच्या नाण्यावर खलिफाचे नाव नव्हते. त्याऐवजी त्याच्या पदव्या होत्या. त्याचा मुलगा कतबद्दीन मुबारक याने खलिफाला दुखवणारा मजकर कोरला. त्यामध्ये त्याने स्वतःला इस्लामचा सर्वोच्च प्रमुख, ईश्वराचा खलिफा, सर्वोच्च इमाम अशा पदव्या कोरल्या. याच काळात प्रथमच सोन्याची चौकोनी नाणी पाडली. बिलाद-उल-हिंद, सुलमानपूर, दालउल-इस्लाम, किला देवगिर, कुतुबाबाद अशा गावांचा उल्लेख नाणी पाडल्याचे गाव म्हणून अल्लमश, बलबन, खिलजी यांनी केला.

सुलतान काळात तांबे व मिश्र धातू यांचीही नाणी होती. मिश्र धातूची नाणी ५६ ग्रेन वजनाची होती. सोने व चांदीच्या वापरलेल्या प्रमाणावर मिश्र धातूच्या नाण्यांची किंमत होती. देहलीवाला हे मिश्र धातूचे नाणे होते. त्याच्या मुख्य बाजूस घोडेस्वार तर त्याच्या दुसऱ्या बाजूस वशिंड असणारा बैल कोरलेला होता. सुलतानाचे नाव नागरी लिपित कोरले होते. अला-उल-दीन मसुद यांच्या काळापर्यंत म्हणजे १२४६ पर्यंत नाणे होते. रझिया सुलताना हिने ५४ ग्रेन वजनाचे मिश्र धातूची नाणी पाडली होती. याच्या एका बाजूस घोडे स्वार व त्याच्या कडेने ‘हमीरा' असे कोरलेले होते. दुसऱ्या बाजूस अरबी लिपीत राणीचे नाव होते. बलबनने एका बाजूला वर्तुळाच्या आत बलबन व बाहेरील बाजूस श्री सुलतान ग्यासुद्दीन असा मजकूर कोरला होता. त्याच्या उलट बाजूस बलबन व इतर पदव्या होत्या. कुतुबद्दीन मुबारक याने चौकोनी नाणे तयार केले. त्याच्या एक बाजूस वर्तुळाच्या आत 'ईश्वराचा खलिफा मुबारक शहा' असा मजकूर कोरला. तसेच ईश्वरावर विश्वास ठेवणारा असेही कोरले होते. मागील बाजूस चार समांतर रेषावर सुलतानाचे नाव होते. मिश्र धातूच्या नाण्याचे वजन ८० ग्रेन होते. त्यावर ७१९ हिजरी सन होते. अल्लाउद्दीन खिलजीने प्रथमच नाण्यावर सन कोरण्याची पद्धत सुरू केली.

महंमद तघलकची नाणी उत्तम दर्जा, सुबक व सुंदर अक्षरे यामुळे ती आकर्षक होती. सोन्याची नाणी अनेक प्रकारची व किंमतीप्रमाणे लहान मोठी आकाराची होती. सुरूवातीला १७२.८ ग्रेन वजनाची सोन्याची व चांदीची नाणी होती. चांदीचे नाणे १४४ ग्रेन वजनाचे असून त्यास अदली असे म्हणतात. सोन्याचे नाणे २०१.६ ग्रेन वजनाचे असून त्यास दिनार असे म्हणतात. महंमद तघलकला खलिफाबद्दल आदर असल्याने नाण्यावर पुन्हा कलमे कोरली. जुन्या चार खलिफाची नावे होती. तसे अलहाकीम या खलिफाचे नाव कोरले. तसेच नाणी पाडण्याचे ठिकाण, सन कोरले होते. दिल्ली, सतवाग, लखनौ, तुघलकपूर, सुलतानपूर, दौलताबाद इ. ठिकाणी नाणी पाडण्याचे काम चालत होते. महंमद

तघलकाने सोने व चांदीची ६ प्रकारची नाणी, मिश्र धातंची २५ प्रकारची नाणी, तांब्याची १२ प्रकारची नाणी पाडली होती. दिल्ली येथे रूपे या धातूची प्रकारची नाणी पाडली होती. दिल्लीत एक टंका ४८ जितल तर दक्षिण भारतात एल टंका-५० जितल होते. नाण्याची किंमत उतरती असून त्याचे ६ प्रकार होते ते म्हणजे सोळा, बारा, आठ, सहा, दोन, एक अशा किंमतीच गनी असत. तांबे व पितळ यांची नाणी प्रचारात आणण्याचा प्रयोग दुदैवी ठरला. फिरोजशहा तुघलकने सोन्याची सहा प्रकारची नाणी पाडली. नाण्याच्या मुख्य बाजूस खलिफाची नावे व दुसऱ्या बाजूस सुलतानाचे नाव कोरले. खलिफामध्ये अबुल अब्बास, अबुल फतह, अब्दुल्ला अशी नावे होती काही नाण्यावर त्याचा मुलगा फत्तहखान याचे नाव कोरले. दिल्ली येथे हिजरी सन ७७३ मध्य मिश्र धातूच्या नाण्यावर विश्वासू लोकांचा खलिफा' असे कोरले होते. जौनपूरच्या शर्की नाण्याचा प्रभाव लोदी चलनावर होता. १४५० ते १४८९ या काळात बहलोलखान लोदीने १४५ ग्रेन वजनाचे रूपयाचे नाणे पाडले होते. त्यास बहलोली असे नाव होते बहलोलखान, सिकंदर यांनी दिल्ली येथेच नाणी तयार केली. त्यांनी तांबे व रूपे यांची नाणी पाडली. बहलोल खान याने जौनपूर येथून ही तांब्याची नाणी पाडली.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- मध्ययुगातील उद्योग धंदे स्पष्ट करा.

## ७.४ सारंश

मध्ययुगीन काळातील सामाजिक जीवन अभ्यासत असतांना आपणांस स्पष्ट दिसून येते की, सुलतान, अमीर-उमराव, जहागीरदार यांना समाजातफार महत्त्व होते. धार्मिक व्यवस्थेत काझी, उलेमा यांना अतिरिक्त अधिकार होते. शासक वर्ग चैनी विलासी असून त्यांनी इस्लामेत्तर प्रजेवर प्रचंड अत्याचार करून लूट केली. गरीब जनतेचे शोषण व्यापारी, दलाल व सावकारांकडूनही होत असे. या काळातील हिंदू असो वा मुस्लिम, स्त्री जीवन अत्यंत वाईट असून अनेक बंधने स्त्रियांवर लादलेली होती. स्त्रियांवर जुलमी व अत्याचारी प्रथांनी थैमान घातले होते. या काळातील एक भयंकर प्रथा म्हणजे गुलामगिरी होय. शेळ्या-मेंढरांसारखे गुलामांचे बाजार भरत असत. गुलामांच्या विविध प्रकारावरून त्यांची तत्कालीन स्थिती समजून येते. कृषी, व्यापार, विविध उद्योग यावर तत्कालीन अर्थव्यवस्था निर्भर होती. प्रत्येक सुलतानाच्या काळात वेगवेगळी चलन व्यवस्था दिसून येते.

## ७.५ प्रश्न

१) मध्ययुगीन काळातील समाज रचना सांगा.

२) मध्ययुगीन काळातील स्त्री जीवनाचा आढाव घ्या.

३) मध्ययुगीन काळातील गुलामगिरी पद्धतीचे वर्णन करा.

४) मध्ययुगीन काळातील कृषी, व्यापार व उद्योगधंद्यावर सविस्तर माहिती सांगा.

५) मध्ययुगीन काळातील चलन व्यवस्थेची माहिती सांगा.

## ७.६ संदर्भ


१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयंसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२


*****

# ८

# दिल्ली सुलतानशाही काळातील सांस्कृतिक जीवन

**घटक रचना**

८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ सुलतान काळातील स्थापत्यकला

८.३ सुलतान काळातील कला

८.४ सुलतान काळातील शिक्षण-साहित्य

८.५ सारांश

८.६ प्रश्न

८.७ संदर्भ

## ८.० उद्दिष्टे

१. सुलतान - मोगल काळातील स्थापत्य कलेची माहिती देणे.

२. सुलतान - मोगल काळातील कला क्षेत्रातील प्रगती सांगणे.

३. सुलतान - मोगल काळातील शिक्षण-साहित्याची माहिती देणे.

## ८.१ प्रस्तावना

मध्ययुगीन भारत म्हटला तर इस्लामी सत्तेचा काळ म्हणून ओळखला जातो. त्यामुळे भारतासाठी हा काळ पूर्णपणे नवा आणि व्यवस्थेतील बदलांचा ठरतो. या काळात इस्लामेत्तर प्रजेचे जीवन काठीन बनले होते. इस्लाम धर्माचा कधी जबरदस्तीने तर कधी गुप्तपणे प्रचार व प्रसार सुरू होता. हिंदू प्रजेला इस्लाम धर्म न स्वीकारल्यास जझिया सारखे अनेक कर लादून त्यांना वेठीस धरले जात असे. सुलतान काळात भारतात अनेक ठिकाणी इस्लामी प्रभाव असलेले स्थापत्य उदयाला आले. या काळात कला-स्थापत्य, शिक्षण, साहित्य व संस्कृती यात जे बदल झाले, त्याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

## ८.२ सुलतान काळातील स्थापत्यकला

भारतामध्ये सुलतानांनी लष्करी सामर्थ्यावर आपली सत्ता स्थापन केली. आक्रमक युद्धनिती बरोबर कलात्मकदृष्टीकोनही भारतात त्यांनी जोपासला. डॉ.ईश्वरीप्रसाद म्हणतात, भारतात शासन निर्माण करणारे, तुर्क, अफगाण हे केवळ योध्दे नव्हते तर, ते कला व संस्कृतीबाबत त्यांचेही आदर्श होते. "इराणी शैली व भारतीय वास्तुशैली यांचे मिश्रण सुलतानशाहीच्या कालखंडातील बांधकामात दिसून येते. सुलतानशाहीचा कालखंड १२०६ ते १५२६ असून, या काळात बांधलेल्या इमारती आहेत. त्या प्रामुख्याने लाल

दगडात बांधलेल्या आहेत. उंच मिनार, लहान मोठे घुमट, मेहराबयुक्त प्रवेशद्वार, इमारतीमध्ये विस्तृत पटांगण, बेलबुट्ट्या, जाळ्या, रंगीत खिडक्या, कोरीव काम इत्यादी बांधकामाची वैशिष्ट्ये मानली जातात. सुलतान कालीन इमारतीवर कुराणातील वचने कोरलेली आहेत."

१) **गुलामवंश कालीन वास्तुकला (१२०६ ते १२९०):** गुलाम घराण्यात ऐबक, अलतमश, रझिया बेगम, बलबन हे प्रमुख सुलतान होऊन गेले. त्यांनी आपल्या काळात विविध इमारती बांधल्या त्या पुढीलप्रमाणे:

मुस्लिम शैलीचे बांधकाम करणारा पहिला सुलतान कुतूबबुद्दीन ऐवक असून कुब्बत-उल इस्लाम ही पहिली इमारत होय. दिल्ली येथे ११९५ ते ९९ याकाळात याचे बांधकाम ऐबकने केले. पुढे अल्तमशने त्यात सुधारणा केली. ऐबकने दिल्ली येथे दुसरी बांधलेली इमारत म्हणजे कुतूबमिनार होय. ११९९मध्ये ऐबकने बांधकाम सुरू केले. ते १२१२ मध्ये अल्तमशने पूर्ण केले. नमाजाच्या वेळी बांग देण्यासाठी मजिना म्हणून कुव्वत-उल-इस्लाम मशिदीजवळ हा मिनार बांधला असावा. ही इमारत चार मजली असून २२५ फूट उंच होती. वीज पडल्यामुळे चौथा मजला जळाला होता. त्यामुळे फिरोज शहा तुघलकने दोन मजले बांधून ही इमारत पाच मजली म्हणजे २३४ फूट उंचीची बांधली. यात ३६० पायऱ्या आहेत. लाल दगड व शुभ्र संगमरवरीमध्ये बांधकाम केलेले आहे. सुफी संत ख्वाजा कुतूबुद्दीनच्या नावावरून नाव देण्यात आले. या इमारतीची दुरूस्ती पुढे सिकंदर लोदीनीही केली. ऐबकने अजमेर येथे १२०८-०९ या काळात ढाई-दिन-का झोपडा ही मशीद बांधली. या ठिकाणी सुफी संप्रदायाचे अधिवेशन अडीच दिवस भरत असे म्हणून त्यात 'ढाई-दिन-का झोपडा' असे नाव पडले. ही इमारत सम्राट विग्रहराज चव्हाण याने स्थापन केलेली संस्कृत शाळा मोडून, त्या जागी बांधले. हे बांधकामासाठी चव्हाणवंशीय इमारती व मंदिरांची मोडतोड करून त्याची सामग्री या बांधकामासाठी उपयोगात आणली.

गुलामवंशातील परंतु दुसऱ्या घराण्यातील सत्ताधीश अल्तमशनेही बांधकाम केले. त्याने कुतूबमिनार याचे बांधकाम १२१२ मध्ये पूर्ण केले. अल्तमशने आपला मुलगा नासिरुद्दीन मेहमुद याच्या स्मृतिप्रीत्यर्थ १२२३ मध्ये दिल्ली-मलकापूर येथे सुलतान गढी ही इमारत बांधली. हा मकबरा म्हणजे हिंदू-मुस्लिम कलेचा सुंदर समन्वय आहे. अजमेर येथे १२३० मध्ये मुइनुद्दीन चिश्ती दर्गा, राजस्थान मध्ये नागौर येथे १२३० मध्ये अतारकिन का दरवाजा, दिल्ली येथे जामा मशीद व हौज-ए-शम्मी व शम्मी ईदगात इ. इमारती अल्तमशने बांधल्या. अल्तमशनंतर त्याची मुलगी रझिया सत्तेवर आली. रझियाने दिल्ली येथे १२३५-३६ या काळात अल्तमश का मकबरा ही लाल दगडामध्ये इमारत बांधली. काही प्रतिमाही कोरल्या आहेत. बलबनने दिल्ली येथे १२७५ मध्ये लाल महाल बांधला. तसेच बलबनचा मकबरा ही हिंदु कला प्रकाराची इमारत बांधली. गुलाम वंशाच्या इमारतीमध्ये कुराणातील वचने कोरलेली आहेत.

२) **खिलजी काळातील वास्तुकला (१२९०-१३२०):** जलालउद्दीन खिलजी याने खिलजी घराण्याची स्थापना केली. त्याच्या नंतर अल्लाउद्दीन खिलजी सत्तेवर आला त्याने अनेक इमारतीचे बांधकाम केले. कुव्वत-उल-इस्लाम मशिदीला सार्सेनिक शैलीचे कलात्मक प्रवेशद्वार तयार केले. त्यास 'अलाई दरवाजा' असे म्हणतात. हे

बांधकाम १३११ मध्ये केले. लाल व पांढऱ्या संगमरवरी दगडामध्ये बांधकाम केले. दिल्ली येथे १३१२ मध्ये जमानखाना मशीद लाल दगडात बांधली. याचे घुमट अतिशय सुंदर आहेत. अल्लाउद्दीनने १३०३ मध्ये दिल्लीजवळ सीरी नावाचे शहर व किल्ला बांधला. एक हजार खांबाचा महाल बांधला. आज ते सर्व नष्ट झाले. अल्लाउद्दीने दिल्ली येथे कासार-ए-सितूर महाल, अलाई मिनार आणि हौज-ए-अलाई हा तलाव बांधला. या सर्व इमारती इस्लामी शैलीच्या आहेत.

३) **तुघलक घराण्यातील वास्तुकला (१३२०ते १४११):** तुघलक घराण्यातील घियासउद्दीन महंमद, फिरोजशहा इ. सुलतान घेऊन गेले. घियासउद्दीन तुघलकने दिल्ली जवळ १३२५ मध्ये तुघलकबाद हे शहर वसविले. या शहरामध्ये किल्ला बांधला होता. घियासउद्दीनने सरोवराच्या मध्यभागी घियास उद्दीनचा मकबरा ही इमारत साधी परंतु भक्कम बांधलेली आहे. भारतीय व मुस्लिम शैलीचा उपयोग करून बांधकाम केले आहे. मकबरात लाल व संगमरवरी दगडाचा उपयोग करून बांधकाम केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने मिश्रित शैलीचा प्रारंभ झाला आहे. महमंद तुघलकने दिल्ली येथे १३२६-२७ मध्या ग्यासुउद्दीनचा मकबरा बांधला तुघलकाबादजवळ १३४० मध्ये आदिलाबाद किल्ला बांधला. १३५०मध्ये जहानपन्हा शहर बांधले असून, त्यास चौथी दिल्ली म्हणून ओळखतात. महमंद तुघल्लकने बारहखंभा महल, सतपुल बांध, बिजली महाल आणि दौलताबाद येथे अनेक इमारती बांधल्या.

फिरोजशहा तुघलकला बांधकामाची आवड होती. त्याने २०० नगरे, २० महाल, ३० पाठशाला, ४० मशिदी, १०० इस्पितले, १०० स्थानगृहे, ५ मकबरे, १५० पुल बांधले. फिरोजाबाद हे शहर वसवले त्यास पाचवी दिल्ली म्हटले जाते. फतेहबाद, जोनपूर, हिस्सार-फिरोज इ. शहरे वसविली. हौज-ए-श्वास जवळ मदरसा बांधली. शिकारीसाठी कुश्क-ए-शिकार हा महाल बांधला. काली मशीद, बेगमपुरी मशीद, बेगमपुरी मशीद, खिर्की मशिद या मशिदी बांधल्या. फिरोजशहा तुघलकला मलिक भाजीशहना आणि अब्दुल हक या प्रधानांनी बांधकामात मोठी मदत केली.

४) **सय्यद-लोदी काळातील वास्तुकला (१४११ ते १५२६):** तैमुरलंगच्या आक्रमणामुळे भारतातील राजकीय परिस्थिती अतिशय नाजूक झाली. त्याच्या परिणाम आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर झाला. आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने सय्यद-लोदी कालखंडामध्ये वास्तु कलेचा विकास झाला नाही. सय्यद घराण्याचा संस्थापक खिज्रखान याने खिज्राबाद शहर वसविले. मुबारकशहाने मुबारकबाद शहर वसविले. सय्यद व लोदी काळात सुलतानाची थडगी-जास्त प्रमाणात बांधली आहेत. मुबारकशहा सय्यद, सिकंदर लोदी यांचे मकबरे व सिकंदर लोदीच्या वजीशेक मोट की मशीद बांधली आहे. बारेखान, छोटे खान, बारा गुबंद, शीश का गुबंद, दादी का गुबंद, पोली का गुबंद इ. मकबरे या काळात बांधलेले आहेत.

५) **विविध प्रांतातील स्थापत्य कला:** सुलतानाच्या काळात विविध प्रांतातील राजांनी स्थापत्य कलेला प्रोत्साहन दिले. बंगाल, जोनपूर, माळवा, गुजराथ, पंजाब, बहामनी इ. राज्यात मुसलमानांची सत्ता होती. मेवाड, मारवाड, विजयनगरचा राज्यामध्ये

हिंदूची राजकीय सत्ता होती. यांच्या काळातील स्थापत्य कलेचा विकास झालेला दिसून येतो.

१) **बंगाल:** बंगालमध्ये बांधकामात प्रामुख्याने विटांचा उपयोग केलेला आढळतो. इंडो इस्लाम शैलीच्या मिश्रणातून बांधकाम केलेले आहे. हिंदू मंदिर शैलीचा बांधकामात स्विकार केलेला आहे. लखनौती, तिवेणी, गौंड, पंडुआ या ठिकाणी बांधकामे आहेत. या शैलीचा जफर खाँ गाजीचा मकबरा आहे. सिकंदरशहाने पंडुआ (पश्चिम बंगाल) येथे आदींना मशीद बांधली. तसेच जलालउद्दीन महमंद शाह का मकबरा, लोटन मशीद, बडा सोना मशीद, छोटा सोना मशीद. कदम रसूल मशीद इ. इमारती पंडुआ येथे बांधलेल्या आहेत. गौंड येथे दाखिली दरवाजा हा विटांनी बांधलेले आहे. ८४ फुट उंचीचा फिरोझ मीनार ही कलात्मक आहे.

२) **मुलतान:** प्रारंभापासूनच इस्लामी आक्रमणाचे केंद्र म्हणजे मुलतानप्रांत होय. त्यामुळे येथे मुसलमानाची सत्ता होती. महंमद बीन कासीमने येथे शमसुद्दीनचा मकबरा कलात्मक बांधलेला आहे.

३) **जोनपूर:** फिरोज शहा तुघलकने १३५९-६० मध्ये जोनखान (महंमद-बीन-तुघलक) स्मृति प्रित्यर्थ गोमती नदीच्या काठी जोनपूर शहर वसविले. पुढे मुस्लिम स्थापत्य कलेच्या शिक्षणाचे केंद्र बनले. येथे १३९९ ते १५०० या काळात शर्किया घराण्याची सत्ता होती. हिंदू-मुस्लिम शैलीचे बांधकाम आहे. शमसुद्दीन इब्राहिमने अटाला मशीद, महंमदशाहने लाल दरवाजा मशीद तर हुसेनशाहने जामी मशीद या प्रेक्षणीय वास्तु बांधल्या आहेत. सुलतान इब्राहिम शाहने आपली राजधानी या दृष्टीने सुशोभिकरण केले. जोनपूर हे इस्लामी संस्कृतीचे, कलेचे शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते.

४) **माळवा:** माळव्याच्या वास्तुकलेवर दिल्ली बांधकामाचा प्रभाव दिसून येतो. माळव्याची राजधानी धार येथे दोन मशिदी आहेत. त्यातील एक मशिद योग शाळा म्हणून आज प्रसिद्ध आहे. माळव्यात कमाल मौला मशीद, लाट मशीद, दिलावर खाँ मशीद, मलिक मुनिस मशीद या प्रमुख इमारती आहेत. हुसंगशाहने मांडूचा किल्ला, हिंडोल महल, जहाज महल, हुशंगशाह का मकबरा, बज बहादूर व रूपमतीचा महाल इ. इमारती बांधल्या.

५) **गुजराथ:** गुजराथ बांधकामात हिंदू जैन शैलीचा प्रभाव आहे. त्यामुळे प्रांतीय वास्तुशैली मध्ये गुजराथची वास्तुशैली अतिशय सुंदर आहे. जाफरखानने तैमूरच्या आक्रमणानंतर स्वतः सुलतान मुझफ्फरशहा किताब धारण केला. सुलतान अहमदशहाने अहमदाबाद शहर वसविले. यामध्ये जामा मशीद अतिशय कलात्मक आहे. तसेच अहमदशहाचा मकबरा, चंपानेरची जामा मशीद अहमदाबाद येथील रानी सिप्रीचे थडगे अतिशय सुंदर आहे.

६) **काश्मीर:** काश्मीर मधील वास्तु दगड व लाकूड याचा उपयोग करून बांधल्या आहे. हिंदू व मुस्लिम शैलीचे मिश्रण बांधकामात आढळते. जैनुल आबदीनने श्रीनगरमध्ये मदानीचा मकबरा व मशीद बांधली आहे. बुतकिशन सिकंदरने श्रीनगरमध्ये जामा मशीद व लाकडी बांधकामात बनवलेली शाह हमदान की मशीद बांधलेली आहे.

७) **बहामनी कालखंडातील स्थापत्य कला:** बहामनी राज्याची स्थापना हसन गंगू बहामनीने केली. याचे साधारण तीन कालखंड आहेत. १३४७-१४२२ या काळात गुलबर्ग तर १४२२ते८२ या काळात बीदर ही राजधानी असून हा दुसरा कालखंड होता. तिसरा कालखंड म्हणजे बहामनीचे विघटनाचा होय.

पहिल्या कालखंडात हसन गंगू, पहिला महम्मदशहा, मुजाहिदशहा दारूदखान या सुलतानाचे मकबरे (थडगे) तुघलक शैलीचे बांधकाम आहे. बहामनी कला व वास्तुकला भारतीय, तुर्की व इराणी शैलीचे संमिश्रण आहे. गुलबार्ग येथील जामा मशीद**, दौलताबाद येथील चांद का** मिनार या इराणी शैलीचा प्रभाव आहे. हफ्त गुम्बद/सात मकबरे ही मकबरे मुजाहिदशहा, दाऊदशहा आणि त्यांच्या कुटुंबातील मंडळीची बांधकामे आहेत.

गुलबर्गाहून बीदरला राजधानी हलवण्यात आली. तो दुसरा कालखंड होय. बीदर येथील किल्ला, मशीद, राजवाडा अतिशय सुंदर आहे. इराणी शैलीचे बांधकाम आहे. बिदरमध्ये बारा मकबरे असून अहमदशहाचा मकबरा सुंदर आहे. महमंद गवानची मदरसा पर्शियन शैलीचे आहे. बिदरमध्ये १६ खांबांची मशीद आहे. दौलताबाद येथील चांद मिनार १४४५ मध्ये बांधलेला असून त्याची उंची ३०.५ मीटर असून चार मजली इमारत आहे. ही इमारत पर्शियन शैलीची आहे.

तिसरा कालखंड म्हणजे बहामनीचा अस्त होऊन, त्यानंतरचा अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा, बिदर, वहाड या पाच शाहयांचा कालखंड होय. विजापूरमध्ये झांजीरी व आंदु मशिदी, शहापूर येथे सुनेहरी मशीद, लक्ष्मणेश्वर येथील काली मशीद इ. बांधकामे आहे. विजापूर येथे इब्राहिम रोजा, जामी मशीद, आसार महाल, ताज बावडी, बारा कमान महेतर महाल, गगन महाल, गोल घुमट या सर्व वास्तु प्रेक्षणिय आहेत. महंमद आदिलशहाने १६२७ते ५५ या काळात गोल घुमट बांधला आहे.

निजामशाहीच्या स्थापत्य कलेवर गुजराथ व माळवा शैलीचा प्रभाव पडलेला आहे. धर्मी मशीद, अहंमद निजामशहाचा मकबरा दो-बोटी-चिरा आणि फराह बागही नगरमधील वास्तु सुंदर आहेत. बिदरला ग्वालियर एलिचपूर, मलकापूर, हौजा कटोरा, येथे सुंदर मशिदी आहेत. कुतूबशहाच्या काळात गोवळकोंडा व हैद्राबाद शहरांचा विकास झाला. गोवळकोंड्याचा किल्ला, चारमिनार, कुतूबशाहाच्या काळातील महत्त्वाच्या इमारती आहे. सुलतान कुलीने किल्ल्याच्या आत जामे मशीद, राजवाडा याचे बांधकाम केले. औरंगजेबने गोवळकोंडा जिंकल्यानंतर दरवाजाला फत्तेह दरवाजा असे नाव दिले. चार मिनार इ.स.१५९१ मध्ये बांधला. दगडी कमानी व भव्य मिनार हे चारमिनारचे वैशिष्ट्ये आहे. बरीदशाही मध्ये काही मशिदी बांधल्या.

८) **विजयनगर काळातील स्थापत्य कला:** हरिहर व बुक्कयांनी १३४० मध्ये विजयनगरची स्थापना केली. संगमवंश (१३४०-१४८६) शाल्ववंश (१४८६-१५०५), तुल्ववंश (१५०५-७०) अरविंद वंश (१५७० ते १६१४) या वंशाची राजकीय सत्ता होती. हरिहर व बुक्क शहरातील यांनी विजयनगर शहरातील मंदिरे बांधली आहेत. दुसरा देवरायने अनेक मंदिरे, वाडे, तट, गोपूरे बांधली होती. कृष्णदेवराय यांच्या काळात मोठ्या प्रमाणात विकास झाला. कृष्णा स्वामी, हजारस्वामी ही प्रसिद्ध मंदिरे बांधली. मोठे कालवे खोदले. तलाव बांधले. राणीच्या

स्मरणार्थ नागलपूर शहर वसविले. कृष्णस्वामी मंदिराजवळ नृसिंहाचा दगडी पुतळा कोरला. विरूपाक्षमंदिर, अम्मा मंदिर(पत्नीचे मंदिर) विठ्ठल स्वामीचे मंदिर. बांधलेले आहे. द्राविड पद्धतीचे शिखर विटा चुन्याने बांधलेले आहे.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान काळातील स्थापत्य कला सांगा.

## ८.३ सुलतान काळातील कला

**अ) चित्रकला:** सुलतानांच्या कट्टर धार्मिक धोरणामुळे चित्रकलेचे पतन झाले. शरियतमध्ये जिवंत प्राण्यांचे चित्र बनविण्यास विरोध केलेला आहे. कारण व्यक्ती स्वतःस ईश्वराच्या समान समजते. गुलाम व खिलजी वंशाच्या काळातील चित्रे मिळत नाहीत. मात्र अमीर खुस्रो, दहलवी, शम्स-इ-सीराज, अफीफ मौलाना, दारूद या समकालीन लेखकांनी भित्तिचित्र व चित्रकाराचा उल्लेख केलेला आहे. महंमद तुघलकाचे एक चित्र प्राप्त झालेले असून ते इराणी चित्रकाराने काढलेले असावे. तो सिंहासनावर बसलेला असून, त्याच्या समोर व मागे नाचणाऱ्या, गाणाऱ्या, दारू देणाऱ्या, हवा घालणाऱ्या स्त्रीया सभोवती आहेत. फिरोजशहा तुघलकच्या काळात महालातील जीव असणारी चित्रे नष्ट केली. केवळ उद्यानची चित्रे काढावीत असे आदेश दिले. त्यामुळे सुलतान काळात फारसी चित्र कलेची प्रगती झाली नाही. मांडू, जोनपूर, अहमदाबाद येथील सुलतानांनी ग्रंथातील चित्रे काढण्यात उत्तेजन दिले. जोनपूर हे विद्येचे मोठे केंद्र होते. धार्मिक ग्रंथामधील प्रसंगावर आधारित चित्रे काढलेली होती.

**बहामनी काळातील चित्रकला:** बहामनी काळात फारसी कामगिरी झालेली नाही. बहामनीच्या पतनानंतर पाच शाह्या अस्तित्वात आल्या. प्रथम निजामशाहीने चित्रकलेला प्रोत्साहन दिले. स्थानिक व इराणी मिश्रणातून चित्रकलेचा उदय झाला. या शैलीला 'दख्खन कलम' असे म्हणतात. अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा यांनीही राजाश्रय दिला. लहान कागदावर चित्रे काढली ही सर्व चित्रे तारीख-इ-हुसेनशाही या काव्यग्रंथात समाविष्ट केलेली आहे. या चित्रातील रंगकाम इराणी नमुन्याचे आहेत तर, रेखांकन, कपडे व दागदागिणे हे दक्षिणीय आहेत.

**विजयनगर काळातील चित्रकला:** विजयनगर राज्यात सर्वच कलेचा विकास झालेला होता. प्राचीन भारतीय चित्रकलेचे रक्षण व विकास झाला. तालीकोटच्या युद्धानंतर विजयी मुसलमान सैन्याने या सर्वांचा विध्वंस केला. विजयनगरने दक्षिण भारतीय संस्कृतीचा समन्वय व संवर्धन करण्याचे कार्य केले.

**ब) संगीलकला**: सुलतान हे संगीत प्रेमी होते. अमीर खुस्रो मोठा संगीततज्ज्ञ होता. त्याने 'आवाजे खुसरवी' संगीतावर ग्रंथ लिहिला. भारतीय संगीता विषयी 'नृपसिपहर' (नव आकाश) ग्रंथ लिहिला. अमीर खुस्रोने भारतीय व इराणी संगीताच्या मिश्रणातून नवीन राग निर्माण केले. त्यामध्ये कव्वाली प्रमुख होता. सुफी पंथाने परमेश्वराच्या भक्तीसाठी

त्याचा उपयोग केला. भारतीय वीणा व इराणी तंबुरा याच्या मिश्रणातून सतार वाद्य निर्माण केले. तबला वाद्य खुस्रोने तयार केले. आमीर खुस्रो हा बलबनचा राजकवी होता. खुस्रोला ख्यालगायकीचा आद्य प्रवर्तक मानला जातो. इराणी संगीत व हिंदुस्थानी ध्रुपदे गायन यांच्या मिश्रणातून ख्याल म्हणजे रागदारी पद्धत निर्माण केली सरपर्दा, जिलाफ, सजगिरी इ-राग खुस्रोने निर्माण केले.

जलालउद्दीन खिलजीच्या काळात हा मुहम्मदशाहा, नुसरतखातून, मेहर अफरोज इ. संगीतकार होते. अल्लाउद्दीन खिलजी संगीत प्रेमी होता. त्याने दक्षिणी कवी गोपाळ नायक व अमीर खुस्रो यांच्या संगीत मैफली आयोजित केल्या. गोपाल नायक हा देवगिरीच्या दरबारात होता. सुफी संतांनी संगीताचा विकास केला. महंमद तुघलक, संगीत प्रेमी होते.

मांडूचा राजा बाजबहादूर व त्याची पत्नी रूपमती उत्तम संगीतज्ञ होते. जोनपूरचा सुलतान इब्राहिम व हुसेनशाह यांना संगीताची आवड होती. ग्वाल्हेरचा मानसिंह तोमर याने संगीत तज्ज्ञांचे संमेलन भरवले होते. त्यामुळे ग्वालियर शैलीचा विकास झाला. त्याने आपल्या राणीच्या नावाने गुजरी तोडी या रागाची निर्मिती केली. सिकंदर लोदी संगीत प्रेमी होता. विजयनगरच्या कृष्णदेवरायने संगीताला राजाश्रय दिला.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान काळातील कला विकास सांगा.

## ८.४ सुलतान काळातील शिक्षण-साहित्य

१२०६ मध्ये कुतूबुद्दीन ऐबकने हिंदुस्थानात सुलतानशाही सत्तेची स्थापना केली. मोगलबादशहा बाबराने लोदीचा पराभव करून सुलतान सत्तेचा शेवट केला. १२०६ ते १५२६ या सुलतानशाहीच्या काळात शिक्षण व्यवस्था कशी होती याचा विचार येथे करावयाचा आहे. या काळात मक्तब, खानकाह, आणि मदरसा या तीन प्रकारच्या शैक्षणिक संस्था होत्या. मक्तब व खानकाह या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या संस्था होत्या. मदरसाही उच्च शिक्षणाची संस्था होती. खेड्यात व शहरात मक्तब असत. खानकाह ही संस्था मशिदी किंवा सुफी संतांच्या मठांना जोडून होती.

मोठ्या शहरामध्ये फक्त मदरसा असत. इस्लामी आचार-विचाराचे शिक्षण देणे व त्याची जोपासना करणे हे मदरसाचे ध्येय होते. १३व्या शतकामध्ये इस्लामी शास्त्र, संस्कृतीचे देशातील सर्वात मोठे केंद्र म्हणजे दिल्ली होय. तेथून सर्व हिंदूस्थानमध्ये इस्लामी शिक्षणाचा प्रचार झाला. सुलतान काळातील अनेक राज्यकर्त्यांनी शिक्षण प्रसाराचे काम मोठ्या प्रमाणात केले.

महंमद घोरीने भारतात मदरसा स्थापन केली. अल्तमशने दिल्ली, मुलतान येथे मदरसा स्थापन केली होती, बलबनने सुलतान नासिरूद्दीन महंमदच्या नावाने नासिरिया मदरसा स्थापना केली. बलबनच्या कालखंडामध्ये शम्सुद्दीन ख्खोझिमी, बुहानुद्दीन बझाज, नजमुद्दीन दमिस्की हे प्रसिद्ध शिक्षक होते. अल्लाउद्दीन खिलजीने हौज-ए-खास जवळ मदरसा स्थापना केली. तुघलकच्या काळात दिल्लीमध्ये १००० शिक्षण संस्था होत्या. फिरोजशहाने ३०मदरसा स्थापन केल्या. त्यापैकी मदरसा-ए-फिरोज विशेष प्रसिद्ध होती.

सिकंदर लोदीच्या काळात शेख अब्दुल्ला व शेख अजिझुल्ला हे प्रसिद्ध विद्वान होते. जौनपूर हे प्रसिद्ध शिक्षण केंद्र होते.

**अभ्यासक्रम:** सुलतान काळातील शिक्षणाचे ध्येय म्हणजे समाजात प्रतिष्ठ मिळवणे, काझी कचेरीत नोकरी मिळवणे. त्याबरोबर सात्त्विक गुण संवर्धन आणि आत्मसंयमण हेच ध्येय होते. प्राथमिक शाळेत वाचन, लेखन, गणित, अरबी व्याकरण याचे शिक्षण दिले जाई. इस्लामी स्मृती, कायदा, कायद्याची मुलभूत तत्त्वे, गुढवाद, वाङ्मय गणित, खगोलशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान इ. विषय शिकवले जात होती, याबरोबरच स्थापत्य व हस्तलेखन, युनानी वैधकशास्त्र व खगोलशास्त्र हे विषय शिकवले जात होते.

**पदवीदान:** शिक्षण संपल्यावर विद्यार्थ्याला पदवी देण्यात येत असे. पदवीदान समारंभात म्हणजे दस्तरबंदी देण्यात येत. यावेळी विद्यार्थ्यांच्या डोक्याला रूमाल बांधत. त्यामुळे यास दस्तरबंदी असे म्हणतात. शेख निजामुद्दीन औलीचा त्यांना त्यांचे गुरू मौलाना कमालुद्दीन शहीर यांने पदवी प्रमाणपत्र दिले होते. मशिदीमध्ये विद्यार्थ्यांचे वसतिगृह होते. शिक्षक प्रेमळ असून विद्यार्थ्यांना पुत्राप्रमाणे वागवत असत. गुरू व शिष्यांना सरकारकडून व श्रीमंत लोकांकडून आर्थिक मदत मिळत असत. फिरोजशहाने शिक्षक व विद्यार्थ्यांना मानधन दिले.

**स्त्री शिक्षण:** सुलतान काळात स्त्रीयांसाठी स्वतंत्र शिक्षण संस्था नव्हत्या. होन्नावर येथे मुलीसाठी मक्तब स्थापन केलेली होती. असे इब्न बतुता म्हणतो. घरी मुलींना शिक्षण दिले जात होते. अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षणाचा भाग होता. मजलिस मध्ये स्त्रीयांना प्रवेश होता. घोडेस्वारी, युद्धशास्त्र, राजकारणाचे शिक्षण रझियाला मिळाले असावे. उच्च व मध्य वर्गातील स्त्रीयांना नृत्य संगीत या शिक्षणाची बंदी होती.

**ग्रंथालये:** सुलतान काळात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था अतिशय मर्यादित होत्या. तरीपण ग्रंथालय अतिशय सुसज्ज होते. अरबी व फारसी भाषेचा शिक्षणात समावेश असल्याने या भाषेतील ग्रंथ ग्रंथालयामध्ये होती. सुलतानांनाही अनेक विद्वानांना राजाश्रय दिल्याने अनेक साहित्यांची निर्मिती झाली. गद्य, पद्य, धर्मग्रंथ इत्यादी अनेक प्रकाराचे ग्रंथ ग्रंथालयात होते.

**आपली प्रगती तपासा:**

प्रश्न- सुलतान काळातील शिक्षण व्यवस्था सांगा.

## ८.५ सारांश

भारतात कुतुबुद्दीन ऐबक पासून सुलतान काळाला प्रारंभ झाला. या कालावधीत भारतावर गुलाम वंश, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी अशा विविध वंशांनी राज्य केले. या काळात सांस्कृतिक क्षेत्रातील स्थिती कशी होती याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. या काळातील स्थापत्य कलेवर इस्लामी प्रभाव जाणवतो. तसेच कट्टर इस्लामी धर्माचा अवलंब अनेक सुलतानांनी केल्यामुळे चित्रकला, संगीत, साहित्य, शिक्षण यातही मागासले पण जाणवते. बहामनी राजवटीत वेगळी परिस्थिती नव्हती. परंतु स्थापत्य, वास्तू, चित्र, शिल्प, संगीत, नाट्य, लेखन, काव्य, साहित्य, शिक्षण या सर्वच क्षेत्रात विजय नगर साम्राज्याने

मोठी प्रगती केलेली दिसते. बहामनी सत्तांनी १५६५ मधे विजयनगरचा सर्वनाश करूनही तेथील वास्तू, मंदिरे, चित्रे यांच्या खाना खुणा आजही पहावयास मिळतात.

## ८.६ प्रश्न

१) सुलतान कालीन स्थापत्य कलेचा विस्ताराने आढावा घ्या.

२) सुलतान कालीन विविध कलांचा विकास स्पष्ट करा.

३) सुलतान कालीन सांस्कृतिक बदलाची चिकित्सा करा.

## ८.७ संदर्भ

१) भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत (सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक) – फडके प्रकाशन कोल्हापूर

२) जे. एल. मेहता – मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड पहिला – के. सागर प्रकाशन, पुणे

३) प्रा. रं. ना. गायधनी – मध्ययुगीन भारताचा इतिहास (७५०-१७६१) – के. सागर प्रकाशन, नागपूर

४) डॉ. श. गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत (१२०६ ते १७०७) – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

५) डॉ. धनंजय आचार्य – मध्ययुगीन भारत (१००० ते १७०७) – श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६) डॉ. विभा आठल्ये – प्राचीन व मध्ययुगीन भारत – अंशुल प्रकाशन, नागपूर

७) डॉ. श. गो. कोलारकर – भारताचा इतिहास – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

८) प्रा. जयंसिंगराव पवार – मराठी साम्राज्याचा उदय व अस्त – मेहता प्रकाशन

९) R.C.Mujumdar – The delhi Sultanate – Bhartiya Vidya Bhavan, Mumbai

१०) बारगळ व ढवळे – मध्यकालीन भारत – विद्या प्रकाशन, नागपूर

११) कु. ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था – पुणे १९८२

*****